श्रीमन् महाभारत

(मराठी भाषांतर)

आदिपर्व – (१ ले पर्व) – भाग ३

अध्याय १६५ ते २३४

विषयानुक्रमणिका

१ आदिपर्व (पुढें चालू)

चैत्ररथपर्व ११. पृ. १—४७

अध्याय १६५ वा—एकचक्रा-नगरींतील ब्राह्मणाच्या घरीं आलेल्या अतिथीनें केलेलें तीर्थादिकांचें, भावी द्रौपदीस्वयंवराचें व धृष्टद्युम्नादिकांच्या जन्माचें वर्णन १; पांडवांचा त्यास द्रौपदीच्या जन्माविषयीं प्रश्न २.

अध्याय १६६ वा—अतिथि ब्राह्मणानें त्यांस सांगितलेला द्रोणाच्या उत्पत्ती-पासून द्रुपदाच्या पराभवापर्यंत संक्षिप्त वृत्तान्त २.

अध्याय १६७ वा—पराभूत द्रुपदाचा संताप, द्रोणाचा वध करील अशा पुत्राच्या प्राप्तीसाठीं अनुष्ठानार्ह पुरोहिताचा शोध ४; तदर्थ अनुयाजाची प्रार्थना, याजाचें वृत्त, त्याच्याशीं जनकाचा पुत्रार्थ संवाद ५; विपुल दक्षिणेच्या आमिषानें याजाची अनुष्ठानांत प्रवृत्ति, हविःसंपत्ति ६; त्याच्या ग्रहणार्थ राज्ञीस पाचारण, तिचें अशुचित्वामुळें अनागमन, हवीचें अग्नींत समर्पण, अग्नींतून धृष्टद्युम्नाची व वेदींतून कृष्णेची उत्पत्ति, त्यांचें स्वरूपादिवर्णन ७; द्रौपदीच्या उत्पत्तीनंतर झालेली आकाशवाणी, राज्ञीची याजापाशीं वरप्रार्थना व त्याची प्राप्ति, त्या अपत्यांचें नामकरण, धृष्टद्युम्नाचें द्रोणापासून अस्त्रग्रहण ८.

अध्याय १६८ वा—कुंतीचें पांची पुत्रांच्या संमतीनें पांचाल-देशास प्रस्थान ९.

अध्याय १६९ वा—प्रस्थानसमयीं व्यासदर्शन व द्रौपदीचें जन्मान्तरकथन १०.

अध्याय १७० वा—पांडवांचें रात्रीं 'सोमाश्रयायण'-तीर्थावर आगमन, त्यामुळें स्त्रियांसह जलक्रीडा करणाऱ्या अंगारपर्ण-गंधर्वाचा क्रोध व पुढें येण्यास प्रतिबंध ११; 'या सामान्य प्रदेशीं येण्यास प्रतिबंध करण्याचा तुला काय अधिकार?' इत्यादि अर्जुनाचा प्रश्न १२; अर्जुनाच्या आग्नेयास्त्रानें गंधर्वाचा पराभव, गंधर्वस्त्रीच्या प्रार्थनेवरून, युधिष्ठिराच्या आज्ञेनें, अर्जुनानें त्यास दिलेलें अभय १३; गंधर्वाचें अर्जुनास गांधर्वी माया, अश्व इत्यादि देण्याचें अभिवचन १४; ब्राह्मणादिकांचीं

वर्णे, गंधर्वांपासून कोणताहि प्रतिग्रह न करण्याचा अर्जुनाचा निश्चय, 'आग्नेयास्त्र देऊन चाक्षुषी-विद्येचा स्वीकार करण्याविषयीं गंधर्वाची अर्जुनास सूचना १५; 'आम्हांला तूं प्रतिबंध कां केलास' असा अर्जुनप्रश्न व त्यावर गंधर्वाचें उत्तर १६; तापत्य पांडवांस पुरोहित करण्याविषयीं उपदेश १७.

अध्याय १७१ वा—'आम्ही कौंतेय तापत्य कसे?' असा अर्जुनाचा प्रश्न, सूर्यकन्या तपतीचा वृत्तान्त सांगण्यास गंधर्वानें केलेला आरंभ १७; तिला योग्य पति न मिळणें, पौरवनंदन संवरण-राजाला तिचें समर्पण करण्याचा सूर्याचा संकेत, राजाची मृगया व त्याच्या अश्वाचा मृत्यु १८; पर्वतावरून पायांनींच फिरणाऱ्या संवरण-राजाला तिचें दर्शन, तिच्याविषयीं राजाचे तर्क, तिला 'तूं कोण?' इत्यादि प्रश्न १९; तिचें राजाला कांहीं उत्तर न देतां अंतर्धान, त्यामुळें राजाची मूर्च्छा २०.

अध्याय १७२ वा—तपतीच्या आश्वासनानें राजाच्या मूर्च्छेची निवृत्ति, 'कामातुर झालेल्या माझा तूं स्वीकार कर' इत्यादि राजाची प्रार्थना, त्यावर 'मी पितृपराधीन आहें, तूं त्याला प्रसन्न करून घे' असें तपतीचें उत्तर २१.

अध्याय १७३ वा—राजाची कामविह्वलता, त्याचा शोध करीत सैन्यासह आलेल्या सचिवास त्याचें दर्शन, राजाला सावध करण्यासाठीं उपाययोजना, सचिवावांचून इतर सर्व सैन्याला परत पाठवून तपतीच्या प्राप्तीसाठीं राजाची अकरा दिवस तीव्र तपश्चर्या २२; वसिष्ठाच्या अनुग्रहानें राजाला तपतीची प्राप्ति व विवाह २३; राजाच्या कामासक्तीमुळें राष्ट्रावरील संकट व तो स्वनगरीस परत गेल्यामुळें त्याची निवृत्ति २४; संवरणापासून तपतीच्या ठिकाणीं 'कुरु'चा जन्म, त्यामुळें तुम्ही 'तापत्य' २५.

अध्याय १७४ वा—अर्जुनानें प्रश्न केल्यामुळें गंधर्वानें सांगितलेला वसिष्ठाचा संक्षिप्त वृत्तान्त २५; विद्वान् पुरोहित करण्याविषयीं गंधर्वाचा आग्रह २६.

अध्याय १७५ वा—वसिष्ठ व विश्वामित्र यांच्या विरोधाचें कारण सांगण्याविषयीं अर्जुनाचा प्रश्न, गाधिपुत्र विश्वामित्राची मृगया, त्याचें श्रांत होऊन वसिष्ठाश्रमास गमन, वसिष्ठानें केलेला त्याचा सत्कार, वसिष्ठाच्या आज्ञेनें कामधेनूनें सैन्यासह विविध पदार्थांनीं केलेली त्याची तृप्ति, नंदिनीचें वर्णन, 'माझें राज्य घेऊन ही धेनु मला दे' अशी विश्वामित्रानें वसिष्ठाची केलेली प्रार्थना, 'ही धर्माच्या उपयोगी असलेली नंदिनी मी देणार नाहीं' असें वसिष्ठाचें उत्तर, 'तुज

तपःस्वाध्यायनिरत असलेल्या ब्राह्मणाचें हें गोधन मी बलात्कारानें हरण करीन' अशी क्षत्रिय विश्वामित्रानें त्याला दाखविलेली भीति २७; तसें करण्यास वसिष्ठाची अनुज्ञा, नंदिनीला बलात्कारानें नेण्याचा विश्वामित्राचा प्रयत्न, क्लेश पावणाऱ्या नंदिनीचा वसिष्ठाशीं संवाद २८; शेवटीं 'तूं स्वसामर्थ्यानें येथें खुशाल रहा' अशी वसिष्ठाची अनुज्ञा मिळतांच नंदिनीनें आपल्या भिन्न भिन्न अंगांपासून उत्पन्न केलेले यवनवीर, त्यांनीं केलेला विश्वामित्राच्या सैन्याचा पराभव २९; तें पाहून 'तपच श्रेष्ठ बल आहे' असा विश्वामित्राचा निश्चय, त्याला तपश्चर्येनें ब्राह्मणत्वाची प्राप्ति ३०.

अध्याय १७६ वा—इक्ष्वाकु-कुलोत्पन्न कल्माषपाद-राजाची मृगया ३०; मार्गासाठीं वसिष्ठपुत्र शक्तीशीं त्याचा कलह, राजानें ऋषीला केलेलें ताडन, त्यास 'तूं नरभक्षक राक्षस हो' असा ऋषीचा शाप, राजाच्या शरीरांत विश्वामित्रानें करविलेला राक्षसप्रवेश ३१; वनांत फिरणाऱ्या राजापाशीं क्षुधित ब्राह्मणानें केलेली मांसयुक्त भोजनाची याचना, तें देण्याचें राजाचें अभिवचन, प्रमादशील राजानें इतर मांसाच्या अभावीं त्यास नरमांस देण्याविषयीं केलेली आज्ञा, नरमांस पाहून ब्राह्मणानें 'तूं नरभक्षक होशील' असा राजास दिलेला शाप ३२; कल्माषपादानें केलेला वसिष्ठाच्या सर्व पुत्रांचा संहार, शोकाकुल झालेल्या वसिष्ठानें केलेला आत्महत्त्येचा प्रयत्न ३३.

अध्याय १७७ वा—वसिष्ठाच्या आत्महत्याप्रसंगानें विपाशा व शतद्रु या नद्यांची प्रसिद्धि ३४; वसिष्ठाचें स्वाश्रमीं पुनरागमन, वेड्याप्रमाणें फिरणाऱ्या वसिष्ठाच्या मागोमाग शक्तिपत्नी अदृश्यंतीचें अनुसरण, गर्भस्थ शक्तिपुत्राच्या वेदाध्ययनध्वनीचें श्रवण, अदृश्यंतीचें त्याविषयीं तत्त्वकथन, त्यामुळें वसिष्ठाचें समाधान, नरभक्षक कल्माषपादाच्या दर्शनानें अदृश्यंतीला वाटलेलें भय, वसिष्ठाच्या अनुग्रहानें त्याची शापनिवृत्ति ३५; वसिष्ठापासून कल्माषपादाला पुत्रप्राप्ति ३६.

अध्याय १७८ वा—शक्तिपुत्र पराशराचा जन्म, तो वसिष्ठालाच आपला पिता मानीत आहे, असें पाहून अदृश्यंतीनें त्याला तत्त्वार्थ सांगून त्याचें केलेलें निवारण ३७; पितृमरणाच्या वार्तेनें दुःखी झालेल्या पराशरानें केलेला सर्वलोकविनाशाचा निश्चय, त्याचें निवारण करण्यासाठीं वसिष्ठानें सांगितलेला भृगूंच्या नाशाचा पूर्वेतिहास ३८; और्वाची उत्पत्ति व त्याच्या तेजानें क्षत्रियांचें अंधत्व ३९.

अध्याय १७९ वा—औवींच्या अनुग्रहानें क्षत्रियांना चक्षुःप्राप्ति, औवींनें केलेला सर्व लोकांच्या नाशाचा निश्चय, पितरांनीं केलेलें त्याचें निवारण ४०.

अध्याय १८० वा—औवींचें पितरांस उत्तर ४१; और्व व पितर यांचा संवाद, पितरांच्या आज्ञेनें औवींनें समुद्रजलांत केलेला क्रोधाचा त्याग ४२.

अध्याय १८१ वा—पराशराचें राक्षससत्र, सत्रनिवारणार्थ ऋषींचें आगमन ४३; पुलस्त्याच्या उपदेशानें सत्रसमाप्ति ४४.

अध्याय १८२ वा—धनंजयाचा गंधर्वाला वसिष्ठाच्या अकार्याविषयीं प्रश्न ४४; पतिनिधनामुळें एका शोकसंतप्त ब्राह्मणीचा कल्माषपादाला शाप, संततीसाठीं राजपत्नीशीं वसिष्ठाचा नियोग ४६.

अध्याय १८३ वा—अर्जुनाचा गंधर्वाला योग्य पुरोहिताविषयीं प्रश्न, त्यानें केलेला धौम्याचा निर्देश, अर्जुनानें गंधर्वास केलेलें आग्नेयास्त्रसमर्पण, गंधर्वानें दिलेल्या अश्वांचा त्याजपाशींच न्यास, धौम्याला पुरोहित करून पांडवांचें पांचालीच्या स्वयंवरास प्रयाण ४७.

स्वयंवरपर्व १२. पृ. ४७–६६.

अध्याय १८४ वा—मार्गामध्यें पांडवांचा ब्राह्मणांशीं संवाद, द्रौपदी व धृष्टद्युम्न यांच्या उत्पत्तीचें कथन, द्रौपदी व मिथिला-नगरी यांचें वर्णन ४८.

अध्याय १८५ वा—पांडवांचें द्रुपदनगरीस गमन व निवास, स्वयंवराची योजना व त्यासाठीं ब्राह्मण-क्षत्रियादिकांचें आगमन ४९; स्वयंवरमंडपाचें वर्णन ५०; धृष्टद्युम्नाची प्रतिज्ञा ५१.

अध्याय १८६ वा—स्वयंवरास आलेल्या क्षत्रियवीरांचें नामकथन ५२.

अध्याय १८७ वा—लक्ष्यवेधासाठीं राजांचा प्रयत्न, राम-कृष्णांनीं ब्राह्मणसमूहांत बसलेल्या पांडवांस ओळखणें ५३; बहुतेक सर्व राजांचा निरुत्साह, कर्णानें धनुष्य सज्य केलेलें पाहून ' मी सूतपुत्राला वरणार नाहीं ' असा द्रौपदीचा निषेध, शिशुपाल व जरासंध यांचा पराभव ५४.

अध्याय १८८ वा—ब्राह्मणसमूहांतून लक्ष्यवेधासाठीं निघालेल्या पार्थाविषयीं ब्राह्मणांचीं अनुकूल-प्रतिकूल भाषणें ५५; अर्जुनानें केलेला लक्ष्यवेध, जय-घोषादि-उत्सव ५६; अनुरूपपतीच्या कंठांत पुष्पमाला घालून द्रौपदीचें अनुगमन ५७.

अध्याय १८९ वा—राजांचा द्रुपदाला मारण्याचा निश्चय ५७; भीमार्जुनांनीं त्यांना केलेला प्रतिबंध, राम-कृष्णांचा ' हे भीमार्जुनच आहेत ' असा निश्चय ५८.

अध्याय १९० वा—भीमार्जुन व कर्ण-शल्यादि यांचें युद्ध ५९; कर्णार्जुन-संवाद ६०; पांडवांचा विजय ६१; ब्राह्मणांनीं केलेला त्यांचा सत्कार, पुत्रांविषयीं कुंतीची चिंता ६२.

अध्याय १९१ वा—कुंतीला द्रौपदीचें भिक्षारूपानें निवेदन व कुंतीचें वचन ६२; त्याविषयीं पांडवांचा विचार ६३; कृष्णदर्शन ६४.

अध्याय १९२ वा—पांडवांच्या निवासस्थानीं धृष्टद्युम्नाचें गुप्तपणें गमन, पांडुपुत्रांनीं आणलेली भिक्षा, कुंतीच्या आज्ञेनें द्रौपदीनें केलेला तिचा विभाग, दर्भशय्येवर सर्वांचें शयन, पांडवांच्या वीरोचित विचित्र कथा ६५; पांडवांचा वृत्तान्त जाणून धृष्टद्युम्नाचें राजमंदिरीं प्रत्यागमन, द्रुपदाची कृष्णेविषयीं चिंता ६६.

वैवाहिकपर्व १३. पृ. ६६–८३.

अध्याय १९३ वा—धृष्टद्युम्नानें द्रुपदास सांगितलेला पांडवांचा वृत्तान्त ६६; द्रुपदाच्या पुरोहिताचें पांडवांकडे त्यांच्या शोधासाठीं आगमन ६७; युधिष्ठिराचें त्यास संदिग्ध उत्तर ६८; राजाकडून भोजनाचें निमंत्रण ६९.

अध्याय १९४ वा—पांडवांचें कुंतीसह द्रुपदमंदिरांत गमन ६९; पांडवांचा सत्कार, भोजन, परीक्षा ७०.

अध्याय १९५ वा—द्रुपदाचा युधिष्ठिरास ' तुम्ही कोण ' असा प्रश्न, ' आम्ही पांडवच आहों ' असें युधिष्ठिराचें उत्तर, राजाचा संतोष ७१; विवाहाविषयीं त्यांचा संवाद व मतभेद ७२; यदृच्छेनें व्यासागमन ७३.

अध्याय १९६ वा—व्यासांचा सत्कार, द्रुपदाचा प्रश्न, व्यासाज्ञेवरून द्रौपदीच्या बहुपतित्वाविषयीं द्रुपदादिकांचें मतकथन ७४.

अध्याय १९७ वा—पांडव व द्रौपदी यांचा पूर्व वृत्तान्त ७५; भागीरथींतील सुवर्ण कमलाचें देवादिकांस दर्शन, इंद्रानें त्या कमलांचा शोध लावण्यासाठीं केलेलें एका दुःखी स्त्रीचें अनुसरण ७६; रुद्रानें केलेलें इंद्राचें स्तंभन, गुहेंत प्रवेश करण्याची आज्ञा ७७; गुहेंतील चार पूर्वेंद्रांसह या पांचव्या इंद्रास भूलोकीं जन्म घेण्याची आज्ञा, विष्णूच्या शुक्ल व कृष्ण केंसांपासून बलराम व कृष्ण यांची उत्पत्ति ७८; ते पांच पूर्वेंद्रच पांच पांडव असून त्यांची 'श्री' हीच द्रौपदी आहे,

असें सांगून द्रुपदाला दिव्य दृष्टीनें त्यांचें दर्शन, एका ऋषिकन्येची पतीसाठीं तपश्चर्या, तिला शंकरानें दिलेला पांच पतींचा वर, असें उपाख्यान ७९.

अध्याय १९८ वा—द्रौपदीचा पांच पांडवांशीं विवाह ८०.

अध्याय १९९ वा—द्रौपदीला कुंतीचा आशीर्वाद ८२; पांडवांना श्रीकृष्णाकडून अहेर ८३.

विदुरागमन-राज्यलंभपर्व १४. पृ. ८३-१११.

अध्याय २०० वा—पांडव लाक्षागृहांतून जिवंत सुटले व द्रौपदीनें पांडवांना वरिलें, हें ऐकून स्वयंवरार्थ आलेल्या राजांचें स्वनगरांस गमन ८३; पांडवांचा हा अकल्पित उत्कर्ष ऐकून दुर्योधनाचा खेद ८४; धृतराष्ट्राचा कृत्रिम संतोष, दुर्योधन व कर्ण यांनीं त्यास दिलेला दोष ८५.

अध्याय २०१ ला—पांडवांच्या नाशासाठीं दुर्योधनानें धृतराष्ट्राला सुचविलेले उपाय ८६.

अध्याय २०२ रा—पांडव युद्धावांचून इतर कोणत्याहि उपायानें साध्य होण्यासारखे नाहींत असें कर्णाचें मत ८७; कर्णानें सुचविलेला युद्धरूपी उपाय व त्याचा विचार करण्यासाठीं भीष्मादिकांस पाचारण ८९.

अध्याय २०३ रा—भीष्माचें मत व दुर्योधनास उपदेश ९०.

अध्याय २०४ था—द्रोणाचार्यांचा हितोपदेश ९१; कर्णाचें द्वेषमूलक भाषण ९२; द्रोणाचार्यांचें त्यास उत्तर ९३.

अध्याय २०५ वा—धृतराष्ट्राला विदुराचा उपदेश ९४; पांडव, पांचाल व दाशार्ह यांची प्रशंसा ९५.

अध्याय २०६ वा—धृतराष्ट्राच्या आज्ञेनें पांडवांस आणण्यासाठीं विदुराचें द्रुपदनगरीस गमन ९६; द्रुपदादिकांस धनादि देऊन पांडवांस हस्तिनापुरीं पाठविण्याविषयीं द्रुपदाची प्रार्थना ९७.

अध्याय २०७ वा—द्रुपद व कृष्ण यांच्या संमतीनें पांडवांचें हस्तिनापुरीं गमन ९८; त्यांस खांडवप्रस्थाची प्राप्ति व तेथें वास्तव्य १००; खांडवप्रस्थाचें वर्णन, कृष्णाचें द्वारकेस प्रयाण १०१.

अध्याय २०८ वा—पांडवांकडे नारदाचें आगमन, त्यांस द्रौपदीविषयीं नियम करण्याचा उपदेश १०२; सुंदोपसुंदांच्या कथेचा प्रस्ताव १०३.

अध्याय २०९ वा—सुंदोपसुंदांचें वर्णन व तप १०३; त्यांस देवांनीं केलेला प्रतिबंध, ब्रह्मदेवाचें दर्शन, संवाद, वरप्राप्ति व उत्कर्ष १०४.

अध्याय २१० वा—सुंदोपसुंदांनीं केलेला जगाचा विध्वंस १०५.

अध्याय २११ वा—देवादिकांनीं ब्रह्मदेवास निवेदन केलेलें सुंदोपसुंदाचें घोर कृत्य १०७; ब्रह्माज्ञेनें तिलोत्तमेची उत्पत्ति, तिला त्या दैत्यांच्या नाशाची आज्ञा, तिला पाहून देवादिकांची व्याकुलता १०८.

अध्याय २१२ वा—सुंदोपसुंदांचा विंध्यपर्वतावरील विहार १०९; तेथें तिलोत्तमेचें आगमन, तिच्यासाठीं सुंदोपसुंदांचा कलह व नाश ११०; पांडवांचा द्रौपदीविषयीं नियम १११.

अर्जुनवनवासपर्व १५. पृ. १११–१२३.

अध्याय २१३ वा—पांडव व कुरुदेश यांचा उत्कर्ष १११; ब्राह्मणाच्या गोधनाचें हरण, ब्राह्मणाचा राजगृहापाशीं आक्रोश, अर्जुनाचें त्यांस अभयवचन व शस्त्रांसाठीं विचार ११२; अर्जुनानें केलेला चोरांचा निग्रह, ब्राह्मणाच्या गोधनाचें प्रत्यर्पण, अर्जुनानें नियमाप्रमाणें वनवासासाठीं युधिष्ठिराची विचारलेली अनुमति, त्याविषयीं युधिष्ठिराची अप्रीति व उपदेश ११३; सत्यप्रतिज्ञ अर्जुनाचें वनगमन ११४.

अध्याय २१४ वा—अर्जुनाची तीर्थयात्रा ११४; गंगेंत स्नान करणाऱ्या अर्जुनाचें उलुपी नागकन्येनें केलेलें हरण, तिच्याशीं अर्जुनाचा संवाद व भार्यात्वानें स्वीकार ११५.

अध्याय २१५ वा—अर्जुनाची पुढील तीर्थयात्रा ११६; चित्रांगदेच्या प्राप्तीसाठीं तिच्या चित्रवाहन-पित्याशीं संवाद व नियमपूर्वक तिचें पाणिग्रहण ११७.

अध्याय २१६ वा—पांच शून्य तीर्थांचें दर्शन, त्यांच्या शून्यत्वाचें कारण ऐकून सौभद्रतीर्थांतून वर्गा-अप्सरेचा केलेला उद्धार ११८; तिचें अद्भुत वृत्तश्रवण ११९.

अध्याय २१७ वा—तिचा पुढील वृत्तान्त व इतर चार अप्सरांचा उद्धार १२०; नियमाप्रमाणें चित्रवाहनाला बभ्रुवाहन-पुत्राचें शुल्कत्वानें समर्पण, चित्रांगदेला दिलेलें आश्वासन व गोकर्णक्षेत्राकडे गमन १२१.

अध्याय २१८ वा—अर्जुनाचें प्रभासक्षेत्रीं गमन, तेथें कृष्णदर्शन, रैवतकपर्वतावर गमन १२२; कृष्ण व अर्जुन यांचा द्वारकाप्रवेश व सत्कार १२३.

सुभद्राहरणपर्व १६. पृष्ठ १२३–१२७.

अध्याय २१९ वा—रैवतकावरील उत्सव, सुभद्रादर्शनानें अर्जुनाचा चित्तक्षोभ, त्याविषयीं कृष्णार्जुनसंवाद १२४; सुभद्राहरणाचा संकेत, त्यास युधिष्ठिराची संमति १२५.

अध्याय २२० वा—मृगयेच्या मिषानें कृष्णरथांत बसून निघालेल्या अर्जुनानें मार्गांतूनच केलेलें सुभद्रेचें हरण १२५; तें ऐकून यादवांचा क्षोभ १२६; बलरामाचें युक्त भाषण १२७.

हरणहारिकापर्व १७. पृ. १२७–१३३.

अध्याय २२१ वा—श्रीकृष्णाचें युक्तियुक्त भाषण १२८; सुभद्रा-अर्जुनविवाह, सुभद्रेसह खांडवप्रस्थास गमन, अर्जुनास उद्देशून द्रौपदीचें उपरोधिक भाषण, गोपीच्या वेषानें सुभद्रेला द्रौपदीकडे पाठविणें, तिचा व इतरांचा संतोष १२९; यादवांनीं सर्व पांडवांस केलेला मूल्यवान् अहेर १३०; यादवांचें द्वारकेस परत जाणें व कृष्णाचा खांडवप्रस्थीं वास १३१; सुभद्रापुत्र अभिमन्यूची उत्पत्ति, त्याचें पालन, पोषण व अस्त्रग्रहण १३२; द्रौपदीच्या पांच पुत्रांची उत्पत्ति, त्यांचे संस्कार व अस्त्रग्रहण १३३.

खांडवदाहपर्व १८. पृ. १३४–१५०.

अध्याय २२२ वा—पांडवांचा खांडवप्रस्थांतील सुखनिवास १३४; अर्जुन-कृष्णांचा यमुनातीरावरील विहार, एका तेजस्वी ब्राह्मणाचें दर्शन १३५.

अध्याय २२३ वा—ब्राह्मणरूपी अग्नीची भोजनप्रार्थना १३६; श्वेतकी-राजाचा यज्ञवृत्तान्त १३७; अग्नीची व्याधि व निष्फल उपाय १४०.

अध्याय २२४ वा—ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरून अग्नीनें केलेली कृष्णार्जुनांच्या साह्याची याचना १४१; अर्जुनानें केलेली धनुरादि युद्धसाधनांची मागणी १४२.

अध्याय २२५ वा—अर्जुनाला अग्नीपासून दिव्य आयुधांची प्राप्ति १४३; वरुणाच्या कौमोदकी-गदेचें कृष्णाला समर्पण १४४; खांडववनाचा दाह १४५.

अध्याय २२६ वा—खांडववनदाह ऐकून इंद्राचा क्रोध १४६; इंद्राच्या आज्ञेनें मेघांनीं केलेली वृष्टि १४७.

अध्याय २२७ वा—इंद्राच्या वृष्टीचें अर्जुनानें केलेलें निवारण १४७; नागराज तक्षक व त्याचा पुत्र अश्वसेन यांची अग्नीमुखांतून मुक्तता १४७; पार्थ व इंद्र यांचें युद्ध १४८; अर्जुन व माधव यांनीं केलेला देवांचा पराभव १४९; इंद्राचें पार्थाशीं पुनः युद्ध १५०.

मयदर्शनपर्व १९. पृ. १५०–१६७.

अध्याय २२८ वा—देवांसह इंद्राचा पराभव १५१; खांडववनाचा निःशेष दाह, अग्नीची तृप्ति १५२; मयाचें अग्नींतून पलायन, त्याची अर्जुनापाशीं प्राणरक्षणाविषयीं याचना, त्याला अभयप्राप्ति, अश्वसेन, मयासुर व चार शार्ङ्गक पक्षी यांची अग्नीपासून मुक्तता १५३.

अध्याय २२९ वा—शार्ङ्गक-पक्ष्यांचा वृत्तान्त, मंदपाल-ऋषीचा संततीसाठीं पक्ष्यांच्या योनींत जन्म, त्याला जरिता-भार्येपासून चार पुत्रांची प्राप्ति, तीं अपत्यें अंडावस्थेंत असतानांच त्याचे लपितेकडे गमन १५४; आपल्या संततीचा नाश होऊं नये म्हणून मंदपालानें केलेली अग्नीची स्तुति १५५.

अध्याय २३० वा—जरिता व तिचे पुत्र यांचा प्राणरक्षणाच्या उपायाविषयीं संवाद १५७.

अध्याय २३१ वा—जरितेचा पुत्रांना उंदरांच्या बिळांत लपून बसण्याचा उपदेश १५८; बिळापेक्षां वृक्षावरील सुरक्षितपणाचें पुत्रांनीं केलेलें प्रतिपादन, जरितेचें खांडववनांतून गमन १५९.

अध्याय २३२ वा—चारी शार्ङ्गकांनीं केलेली अग्नीची स्तुति १६२.

अध्याय २३३ वा—मंदपालाची पुत्राविषयीं चिंता १६३; त्याची लपितेनें केलेली निर्भर्त्सना, शार्ङ्गकांचा वृक्ष सोडून अग्नीचें दूर जाणें, मंदपालाचें पुत्राजवळ आगमन १६४; जरितेसह पुत्रांनीं केलेली त्याची उपेक्षा १६५.

अध्याय २३४ वा—मंदपालानें केलेलें पुत्रांचें सान्त्वन, त्याचें जरितेसह अन्य प्रदेशीं गमन, देवांसह इंद्राचें कृष्णार्जुनांपाशीं आगमन, इंद्राचें अर्जुनाला वरप्रदान, अर्जुनानें केलेली दिव्य अस्त्रांची मागणी, ‘ महादेवाच्या प्रसादानें सर्व अस्त्रांची प्राप्ति होईल ’ असा इंद्राचा वर १६६; अग्नीची प्रसन्नता, त्याची कृष्णार्जुनांस जाण्याची अनुज्ञा, कृष्णार्जुनांचें मयासह यमुनातीरावर गमन १६७.

श्रीमन्महाभारतार्थ

(महाभारताचें मराठी सुबोध भाषांतर)

द्वितीय भाग.

आदिपर्व—(पुढें चालू)

चैत्ररथपर्व ११.

अध्याय १६५ वा.

[१ पांडवांचा अतिथिब्राह्मणास द्रौपदीच्या जन्माविषयीं प्रश्न.]

(१) जनमेजय—हे श्रेष्ठ ब्राह्मणा, त्या बकराक्षसाचा वध केल्यावर पुढें त्या नरव्याघ्र पांडवांनीं काय केलें ?

वैशंपायन—हे राजन्, बकासुराला मारून ते पांडव त्या ब्राह्मणाच्याच घरीं वेदाचें अध्ययन करीत राहिले. अशा रीतीनें कांहीं काल लोटला असतां त्या ब्राह्मणाच्या घरीं कोणी एक तीक्ष्ण व्रतें आचरणारा ब्राह्मण वस्तीला आला. तेव्हां त्या सर्व अतिथींचा सत्कार करणाऱ्या ब्राह्मणानें आलेल्या श्रेष्ठ अतिथीचें योग्य प्रकारें पूजन करून त्यास रहावयास जागा दिली. तो ब्राह्मण अनेक श्रवणीय कथा सांगत असतां ते सर्व पराक्रमी पांडव कुंतीसह त्याच्या समीप जाऊन बसले. त्या ब्राह्मणानें अनेक पवित्र तीर्थें, नद्या, विविध राजे, आश्चर्यकारक देश व शहरें यांचें मनोरंजक वर्णन केलें.

जनमेजया, त्याचप्रमाणें त्या ब्राह्मणानें 'पांचाल देशांत लवकरच याज्ञसेनीचा अद्भुत स्वयंवर होणार आहे' हेंहि वृत्त सांगितलें. धृष्टद्युम्नाची व शिखंडीची उत्पत्ति, द्रुपदाच्या यज्ञापासून जन्मलेल्या द्रौपदीचें अयोनिजत्व इत्यादि अलौकिक गोष्टीहि त्यांस निवेदन केल्या. तेव्हां त्या महात्म्या ब्राह्मणाच्या मुखानें त्या सर्व अद्भुत कथा ऐकून श्रेष्ठ पांडवांनीं त्याला तो सर्व वृत्तांत सविस्तर सांगण्याची विनंति केली.

ते म्हणाले—हे विप्रश्रेष्ठा, द्रुपदाचा पुत्र धृष्टद्युम्न अग्नीपासून व द्रौपदी यज्ञवेदींतून कशी उत्पन्न झाली ? धृष्टद्युम्न महाधनुर्धर द्रोणापासून सर्व शस्त्रें कसा शिकला? हे ब्रह्मन्, द्रुपदराजा व द्रोणाचार्य या दोघांची इतकी दृढ मैत्री असतां पुढें त्यांच्यामध्यें कोणत्या कारणानें वैर उत्पन्न झालें ?

राजा जनमेजया, याप्रमाणें त्या पराक्रमी पांडवांनीं विचारलें असतां तो वक्त्यांतील श्रेष्ठ ब्राह्मण द्रौपदीची जन्मकथा सांगूं लागला. १. ११. १६५.

अध्याय १६६ वा.

[१ द्रोणाच्या उत्पत्तीपासून द्रुपदाच्या पराभवापर्यंत संक्षिप्त वृत्तान्त.]

(१) वैशंपायन—परिक्षित्पुत्रा, त्या ब्राह्मणानें पुढील कथा सांगण्यास आरंभ केला. तो म्हणाला—"हे तपोनिष्ठहो, पूर्वीं गंगाद्वारीं 'भरद्वाज'-नांवाचा एक मोठा ऋषि होता. तो एकदा गंगेवर स्नान करावयास गेला. तेथें घृताचि-अप्सरा त्याच्या अगोदरच येऊन स्नान करीत होती. तिला पाहून हा बालब्रह्मचारी ऋषि कामासक्त झाला. त्यामुळें त्याचें अमोघ वीर्य स्खलन पावलें. तें त्यानें द्रोणकलशांत धारण केलें. त्यापासून द्रोणाची उत्पत्ति झाली. त्यानें सर्व वेद व वेदांगें यांचें अध्ययन केलें.

भरद्वाजाचा 'पृषत' या नांवाचा राजा मित्र होता. त्याला द्रुपद हा पुत्र झाला. तो प्रत्यहीं भरद्वाजाश्रमास जाऊन द्रोणाबरोबर अध्ययन व क्रीडा करीत असे. कांहीं दिवसांनीं 'पृषत'-राजा मरण पावला व द्रुपद राज्यावर बसला. इतक्यांत 'परशुराम आपलें सर्व धन ब्राह्मणांना देऊन टाकीत आहे' असें द्रोणाला कळलें. लागलाच तो परशुरामाकडे गेला. तेवढ्या अवधींत

---

१ या अध्यायांतील सर्व कथानक संभवपर्व अ. १३० पृ. ३६७ यांत सविस्तर आलेलें आहे. यास्तव येथें तें संक्षेपानें दिलें आहे.

परशुरामानें पृथ्वीसह आपलें सर्व धन ब्राह्मणांना देऊन टाकिलें होतें. त्यामुळें 'मी धनाच्या इच्छेनें आपल्याकडे आलों आहें' हें द्रोणाचें वचन ऐकून 'ब्राह्मणा, माझ्यापाशीं माझें शरीर आणि अस्त्रें एवढेंच काय तें आतां राहिलें आहे, त्यांतील काय हवें असेल तें मागून घे' असें परशुराम म्हणाला. तेव्हां द्रोणानें त्याच्यापासून प्रयोग व संहार यांच्या मंत्रांसह सर्व अस्त्रें मागून घेतलीं व त्यामुळें तो कृतकृत्य झाला. भार्गवरामापासून ब्रह्मास्त्र मिळाल्यामुळें तर तो सर्व अस्त्रवेत्त्यांत श्रेष्ठ झाला.

त्यानंतर द्रोण द्रुपदाकडे जाऊन 'मी तुझा बालमित्र आहें, तूं मला ओळखिलेंस का?' इत्यादि त्याला विचारूं लागला. तेव्हां 'विद्वान् अविद्वानाचा, रथी अरथ्याचा व राजा अराजाचा मित्र कधींहि होत नसतो, तेव्हां तूं दरिद्री ब्राह्मण असतांना मला आपला मित्र कसें म्हणवितोस?' असें द्रुपदानें उद्दामपणानें कर्णकटु भाषण केलें.

तें ऐकतांच द्रुपदाचा हा दर्प घालविण्याचा निश्चय करून तो मानी द्रोण कुरुश्रेष्ठांच्या हस्तिनापुरास गेला. भीष्मानें त्याचा मोठा सत्कार करून व विपुल धनादि देऊन आपले पौत्र—कौरव व पांडव—यांस अस्त्रविद्या शिकण्यासाठीं त्याच्या स्वाधीन केलें. तेव्हां त्या शिष्यांना एकत्र जमवून 'मला अत्यंत इष्ट असलेली गुरुदक्षिणा तुम्ही द्याल ना?' असा त्यानें प्रश्न केला. त्या वेळीं अर्जुनादि शिष्यांनीं 'हो हो, आपल्याला अभीष्ट असलेली दक्षिणा आम्ही अवश्य देऊं' असें सांगितलें.

त्यानंतर सर्व पांडव कृतास्त्र व कृतनिश्चय झाले. तेव्हां द्रोण आपल्या गुरुदक्षिणेसाठीं त्यांस म्हणाला—"अहिच्छत्रामध्यें द्रुपदराजा राज्य करीत आहे. त्याचें राज्य हरण करून तुम्ही मला सत्वर द्या." गुरूच्या या आज्ञेप्रमाणें पांच पांडवांनीं द्रुपदाला युद्धांत जिंकून व त्याच्या सचिवांसह त्याला बांधून द्रोणाचार्यापाशीं आणिलें.

द्रुपदाला पाहून द्रोण म्हणाला—हे राजा, मी तुझ्या मैत्रीची पुनः इच्छा करितों. पूर्वीप्रमाणेंच आपलें सख्य असावें अशी माझी इच्छा आहे. 'अराजा राजाचा मित्र होऊं शकत नाहीं,' असें तूं मला सांगितलेंस, म्हणून मी हा राज्यासाठीं यत्न केला. हे यज्ञसेना, आतां यापुढें तूं भागीरथीच्या दक्षिण तीरावरील राजा हो व मी उत्तर तीराचा अधिपति होतों.

हे श्रेष्ठांनो, द्रोणाचें हें वचन द्रुपदानें मान्य केलें व 'आपलें पूर्वीप्रमाणेंच सख्य असो' असें म्हटलें. याप्रमाणें त्या दोघांनीं परस्परांशीं सख्य केलें व ते दोघेहि स्व-स्वस्थानीं निघून गेले. पण क्षत्रिय स्वभावतःच दीर्घद्रोही असल्यामुळें द्रुपदाला तो क्षणिक अपमानहि सहन झाला नाहीं. तो अतिशय खिन्न व त्यामुळें कृश झाला. १. ११. १६६.

अध्याय १६७ वा.

[१ धृष्टद्युम्न व द्रौपदी यांची उत्पत्ति.]

(१) **ब्राह्मण** म्हणाला—हे महात्म्यांनो, पुढें कर्मसिद्ध ब्राह्मणाचा शोध करणारा तो असहिष्णु द्रुपदराजा अनेक ब्राह्मणांच्या वसतिस्थानांतून हिंडला. शोकानें विवेकहीन झालेला तो राजा द्रोणाचार्यांचा सूड घेणाऱ्या पुत्राची इच्छा करूं लागला. 'द्रोणाचा प्रतिकार करण्यास समर्थ असें पराक्रमी अपत्य मला नाहीं' असें म्हणून तो नित्य चिंता करूं लागला. आपल्या विद्यमान असलेल्या पुत्रांना उद्देशून 'या सर्व बंधूंना धिक्कार असो,' असें तो म्हणूं लागला. द्रोणाचा पराभव करण्याच्या इच्छेनें तो वारंवार निराशेनें दुःखाचे सुस्कारे टाकीत असे. द्रोणाचा प्रभाव, विनय, शिक्षण, क्षात्रतेज व आचरण यांचा विचार करणाऱ्या द्रुपदास त्याचा सूड घेण्याचा कांहीं उपाय सुचेना.

हे भारता, एकदा द्रोणाच्या प्रतिकाराचा यत्न करणारा तो नृपश्रेष्ठ द्रुपद यमुना व गंगा यांच्या तीरावर फिरत असतां ब्राह्मणांच्या पवित्र निवासस्थानीं आला. हे राजा, त्या ठिकाणीं स्नातक नसलेला व व्रतें न करणारा असा एकहि ब्राह्मण नव्हता. तेथें त्यानें वेदाध्ययन करणारे व तीव्र व्रतें आचरणारे याज व उपयाज या नांवाचे दोन श्रेष्ठ ब्राह्मण पाहिले. ते ब्रह्मर्षि शांत व परब्रह्मनिष्ठ होते. संहितेच्या अध्ययनांत तत्पर असलेल्या त्या दोघांचें गोत्र काश्यप होतें.

राजा, द्रुपदानें त्या कुमारीप्रभव, सूर्यभक्त, सुस्वरूप, ब्रह्मवेत्त्या ऋषिश्रेष्ठ ब्राह्मणांचें अतुल सामर्थ्य जाणून त्यांस त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण करण्याचें अभिवचन दिलें व त्यांतील कनिष्ठ भ्राता जो उपयाज त्याला तो एकान्तांत शरण गेला. त्याच्या शुश्रूषेमध्यें तत्पर झाला. प्रिय भाषण व सर्व मनोरथ पूर्ण करण्याचें अभिवचन, यांच्या योगानें त्याला अनुकूल करून घेण्यासाठीं त्याची यथाविधि पूजा करून तो त्यास म्हणाला—"हे ब्राह्मणा, ज्या कर्माच्या योगानें

द्रोणाच्या मरणाला कारण होणारा पुत्र मला प्राप्त होईल असें कर्म तूं कर; म्हणजे मी तुला दहा कोटि गायी देईन, किंवा तुला दुसरें जें कांहीं प्रिय असेल तेंहि अर्पण करीन. याविषयीं मुळींच शंका बाळगूं नको."

द्रुपदाचें हें भाषण ऐकून ऋषि त्यास म्हणाला—'मी हें तुझें कार्य करणार नाहीं. तूं तें दुसऱ्या कोणाकडून तरी करून घे.' याप्रमाणें त्या ऋषीनें स्पष्ट उत्तर देऊन द्रुपदराजाला निरुत्साह केलें, तथापि तो त्याचीच आराधना करीत तेथें राहिला. एक वर्षभर त्यानें त्या ऋषीची तशीच परिचर्या केली. तेव्हां तो ब्राह्मणश्रेष्ठ उपयाज द्रुपदाला मधुर वाणीनें बोलला—

"राजा, माझा ज्येष्ठ भ्राता याज पूर्वीं एकदा गहन वनांत फिरत असतांना त्यानें भूमीवर पडलेलें एक फळ उचललें. पण ती भूमि शुद्ध आहे किंवा नाहीं हें कळण्यास कांहीं मार्ग नव्हता. त्याच्या मागोमाग जात असलेल्या मीं माझ्या भ्रात्याचें तें अयुक्त कर्म पाहिलें. त्यावरून मला असें वाटतें कीं, हा माझा भ्राता सदोष वस्तूंचें ग्रहण करतेवेळीं कांहीं विचार करणार नाहीं. कारण चांगलें फल दृष्टीं पडतांच त्यानें पापमूलक दोष पाहिले नाहींत. जो पदार्थांची शुद्धि व अशुद्धि यांचा विचार करीत नाहीं, तो धनादिकांचा स्वीकार करतांना तरी यांचा विचार कसा करील? पूर्वीं गुरुकुलांत संहितेचें अध्ययन करीत असतांना इतरांचें उष्टें अन्नहि तो खात असे. त्याला त्याबद्दल कांहीं लाज वाटत नसे. उलट तो त्या अन्नाची वारंवार प्रशंसाच करीत असे. त्यावरून तो माझा भ्राता फलार्थी आहे, असा माझा तर्क होतो. राजा, तूं त्याच्याकडे जा. तो तुझ्याकडून तुला इष्ट असलेला यज्ञ करवील."

उपयाजाचें हें वचन ऐकून मनानें याजाच्या या आचरणाची निंदा करीत द्रुपद आपल्या कार्याकडे दृष्टि देऊन याजाच्या आश्रमांत गेला व पूजार्ह याजाची पूजा करून त्यास म्हणाला—"हे महर्षे, मी तुला ऐशीं हजार गायी देतों. तूं द्रोणाच्या वैरानें अभिसंतप्त झालेल्या मला आल्हादित कर. रिक्त[1] हस्तानें राजा, देवता व गुरु यांचें दर्शन घेऊं नये, असें शास्त्रवचन असल्यामुळें या ऐशीं हजार गायी हें केवळ उपायन आहे.

हे ब्राह्मणा, माझा वैरी द्रोण ब्रह्मवेत्त्यांत श्रेष्ठ आहे. ब्रह्मास्त्रवेत्त्यांतहि त्याच्याहून वरिष्ठ कोणी नाहीं. त्यामुळें मित्रकलहांत त्यानें माझा पराभव केला. त्या

---

१ रिक्तहस्तस्तु नोपेयाद्राजानं देवतां गुरुम्।

बुद्धिमान् कौरवाचार्याहून श्रेष्ठ असा एकहि क्षत्रिय आज भूलोकीं नाहीं. द्रोणाचे बाण सर्व प्राण्यांच्या देहाचें हरण करणारे आहेत. त्याचें धनुष्य सहा हात लांब व फार मोठें आहे. तो ब्राह्मण वेषानें क्षात्रवेगाला निःसंशय कुंठित करीत असतो. तो महाधनुर्धर मानी भरद्वाजपुत्र जणुंकाय क्षत्रियांचा उच्छेद करण्यासाठींच उत्पन्न झाला आहे. त्यामुळें जमदग्निपुत्र रामासारखाच तो भासतो. त्याचें अस्त्र-बल घोर आहे. या भूलोकांतील मनुष्यांना तें सहन करितां येत नाहीं.

हे पूज्य विप्रवर्या, ज्याच्यामध्यें घृतादिकांच्या आहुति दिल्या आहेत, अशा अग्नीप्रमाणें तो ब्राह्मतेज धारण करितो आणि क्षात्रधर्मांचा स्वीकार केलेला तो वीर त्या ब्राह्मतेजानें युक्त होऊन समरांगणांत शत्रूंना जाळीत असतो. द्रोणा-चार्यांमध्यें ब्राह्मतेजासह क्षात्रतेज जरी असलें, तरी तुझें ब्राह्मतेज क्षत्रियाच्या बलापेक्षां श्रेष्ठ आहे. मी केवल क्षात्रबलानें युक्त असून ब्रह्मबलानें हीन आहें, म्हणून तुझ्या ब्राह्मतेजाचा आश्रय केला आहे. द्रोणाहून विशिष्ट असलेल्या तुज ब्रह्मवेत्त्याला प्राप्त झाल्यामुळें मला युद्धामध्यें दुर्जय असलेला व द्रोणाचा नाश करणारा पुत्र ज्या कर्मानें प्राप्त होईल, तें कर्म तूं कर. मी तुला दक्षिणा म्हणून दहा कोटि गायी देईन."

द्रुपदराजाची ही प्रार्थना ऐकून याजमहर्षीनें 'ठीक आहे' असें म्हटलें व द्रुपदाला इष्ट असलेला पुत्र ज्या कर्मानें प्राप्त होईल, त्या कर्माचा प्रयोग त्यानें आपल्या मनांत आठविला. द्रोणाचा वध करण्यास समर्थ असलेला पुत्र उत्पन्न करणें, हें फार मोठें कार्य आहे, असें जाणून त्यानें निष्काम उपयाजालाहि त्या प्रयोगाचें चिंतन करावयास सांगितलें व याजानें जो प्रयोग तयार केला होता, तो उपयाजाच्या प्रयोगाशीं जुळल्यावर याजाच्या मनाची खात्री झाली व त्यानें द्रोणाच्या विनाशाची प्रतिज्ञा केली. त्यानंतर महातपस्वी उपयाजानें द्रुपद-राजाला पुत्रफलासाठीं श्रौताग्निसाध्य कर्म करावयास सांगितलें. तो म्हणाला— "हे राजा, तुला जशा प्रकारचा पुत्र इष्ट आहे, तशाच प्रकारचा महाबलवान्, तेजस्वी व वीर्यवान् पुत्र या कर्माच्या योगानें होईल."

राजा जनमेजया, आपल्याला युद्धांत द्रोणाचा नाश करणारा पुत्र होईल, या आशेनें द्रुपदानें कर्मसिद्धीसाठीं सर्व सामग्री तयार केली व याजाच्या आज्ञेप्रमाणें सर्व कर्म संपादन केलें. हवनाच्या शेवटीं याज द्रुपदाच्या पत्नीला म्हणाला—"हे पृषतस्नुषे राज्ञि, ये; तुझ्यासाठीं हें अपत्यांचें जुळें उत्पन्न झालें आहे."

तेव्हां द्रुपदपत्नी त्यास म्हणाली—हे ब्राह्मणा, मीं अद्यापि मुखमार्जन केलें नाहीं. काल लावलेली गंधाची उटी अद्यापि तशीच आहे. मीं अजुन स्नानहि केलें नाहीं. त्यामुळें पुत्रासाठीं मी तुला स्पर्श करण्यास योग्य नाहीं. यास्तव हे श्रेष्ठा, मला प्रिय असलेलें पुत्ररूप फल प्राप्त व्हावें, म्हणून मी शुचिर्भूत होई-पर्यंत धीर कर. माझ्या शुद्धिकालाची प्रतीक्षा कर.

तें ऐकून याज म्हणाला—या याजानें शिजविलेलें व उपयाजानें उपमंत्रित केलेलें हें हव्य क्षेत्र व रेतःसेक यांवांचूनच इष्ट फल उत्पन्न करील! त्याला कालक्षेप सहन होणार नाहीं. आम्हां दोघां भ्रात्यांच्या सामर्थ्यानें तें हव्य स्त्री-पुत्ररूप अपत्याला उत्पन्न करीलच! तूं हवी तर येथून निघून जा किंवा उभी रहा, पण आमचा प्रयोगविधि थांबणार नाहीं.

हे द्विजहो, याजानें द्रुपदपत्नीला असें सांगून, तो सुसंस्कृत केलेला हवि अग्नीमध्यें अर्पिला असतां त्या अग्नींतून एक देवासारखा कुमार उत्पन्न झाला. त्याचा वर्ण अग्नीच्या ज्वालेसारखा पिंगट होता. त्याचें स्वरूप उग्र होतें. त्यानें उत्तम कवच व किरीट यांस धारण केलें होतें. खड्ग व सशर धनुष्य यांनीं युक्त असलेला तो वारंवार सिंहनाद करीतच बाहेर पडला. तो एका श्रेष्ठ रथावर आरूढ होऊन जाऊं लागला. तेव्हां सर्व पांचाल अतिशय हृष्ट होऊन 'धन्य, धन्य, फार चांगलें झालें' अशी गर्जना करूं लागले. त्या वेळीं त्यांना इतका हर्ष झाला होता कीं त्याचें वर्णन करितां येत नाहीं. अयोनिसंभव धृष्टद्युम्नाचें तेज अतिशय दुःसह असल्यामुळें पृथ्वीला तें सहन झालें नाहीं. इतक्यांत 'हा पांचालांचें यश वाढविणारा, त्यांच्या भयाची निवृत्ति करणारा व राजाचा शोक घालविणारा राजपुत्र द्रोणाच्या वधासाठीं उत्पन्न झाला आहे,' असें आकाशांत संचार करणारें एक महद्भूत बोललें.

इतक्यांत धृष्टद्युम्नाप्रमाणेंच वेदीच्या मध्यभागांतून कुमारी पांचाली उत्पन्न झाली. ती अति सुस्वरूप असून तिचीं सर्व अंगें दर्शनीय होतीं. तिचे नेत्र काळे व आकर्ण दीर्घ होते. अंगकांति श्यामवर्ण व केंस कुरळे होते. नखें लाल व उंच, भुंवया रेखीव आणि वक्षःस्थल विशाल होतें. त्यामुळें दुष्टांचा वध करावयास उद्युक्त झालेली ही जणुंकाय दुर्गाच किंवा एखादी देवकुमारीच मनुष्यशरीर धारण करून प्रकट झाली आहे, असा भास झाला. तिच्या अंगाचा नील कमला-सारखा सुगंध एक कोसभर पसरत होता. तिच्या रूपाला या भूलोकीं उपमाच

नव्हती. ती देवरूपिणी कन्या देव, दानव व यक्ष यांतील प्रत्येकाला अभीष्ट वाटली.

अहो ब्राह्मणहो, ती सुंदरी उत्पन्न झाली असतां अशी आकाशवाणी झाली— ' ही सर्व स्त्रियांमध्यें श्रेष्ठ असलेली कृष्णा भूलोकांतील क्षत्रियांचा क्षय करण्याची इच्छा करीत आहे. ही कृशोदरी योग्य समयीं देवकार्य करील. हिच्यामुळें कौरवांवर फार मोठें संकट ओढवेल. ' हें ऐकून सर्व पांचाल सिंहाप्रमाणें घोष करूं लागले. हर्षयुक्त झालेल्या त्यांना पृथ्वी सहन करूं शकली नाहीं.

त्या दोन अपत्यांना पाहून अपत्यांची इच्छा करणारी द्रुपदपत्नी ' याज '-महर्षीला शरण आली व त्यास म्हणाली—" हे भगवन्, हीं दोन अपत्यें मजवांचून दुसऱ्या कोणाला आपली जननी समजणार नाहींत, असा वर मला द्या. " तें ऐकून राजाचें प्रिय करण्याच्या इच्छेनें याजानें तिला ' तथास्तु ' असें म्हटलें.

त्यानंतर ज्यांचे मनोरथ पूर्ण झाले आहेत अशा ब्राह्मणांनीं त्यांचीं नांवें ठेविलीं. " हा पुत्र अति प्रगल्भ, शत्रूंचा उत्कर्ष सहन न करणारा व राजांचें वित्त जें बल, त्यानें युक्त किंवा कवच-कुंडलांसह उत्पन्न झाला आहे. यास्तव हा द्रुपदाचा कुमार धृष्टद्युम्न होवो " असें म्हटलें व कुमारी श्यामवर्ण असल्यामुळें तिला त्यांनीं ' कृष्णा ' असें म्हटलें. याप्रमाणें त्या महायज्ञांत द्रुपदाला दोन अपत्यें प्राप्त झालीं.

त्यानंतर त्या पांचालराजपुत्र धृष्टद्युम्नाला आपल्या गृहीं आणून महाप्रतापी द्रोणाचार्यांनीं त्यास अस्त्रदानानें उपकृत केलें. महाबुद्धिमान् द्रोणानें भावी दैव अनुलंघनीय आहे असें जाणून आपल्या कीर्तीच्या संरक्षणासाठीं त्याला अस्त्रविद्या शिकविली.[1] १. ११. १६७.

---

१ त्याचें अर्धें राज्य पूर्वींच घेतलेलें असल्यामुळें त्याच्यापासून कांहीं एक न घेतां त्यास धनुर्वेद शिकविला.

अध्याय १६८ वा.

[१ पांडवांचें पांचालदेशास प्रयाण.]

(१) **वैशंपायन**—हे जनमेजया, त्या ब्राह्मणाच्या मुखानें हा वृत्तान्त ऐकून ते पराक्रमी पांडव हृदयांत शल्य टोंचल्याप्रमाणें दुःखी झाले. त्या सर्व महाबलाढ्य कुंतीपुत्रांचें मन अस्वस्थ झालें. तेव्हां आपल्या सर्व पुत्रांचें चित्त द्रौपदीच्या स्वयंवराकडे लागलेलें पाहून ती सत्यवादिनी कुंती युधिष्ठिराला म्हणाली—

" वत्सा, आपण या ब्राह्मणाच्या घरांत पुष्कळ दिवस राहिलों. या नगरींत तुम्हांला भिक्षा चांगली मिळत गेल्यामुळें इतके दिवस आपलें मन येथें रमलें होतें. या प्रदेशांतील सर्व रम्य वनें व उपवनेंहि आपण पुनः पुनः पाहिलीं. आतां पुनः तींच तीं वनें पाहून मनाला फारसा संतोष होत नाहीं. येथें पूर्वीसारखी भिक्षाहि मिळत नाहीं. यास्तव तुझी जर इच्छा असेल तर आपण संपन्न पांचाल देशास जाऊं. तो प्रदेश आपण यापूर्वी कधीं पाहिलेला नाहीं. तो रमणीय आहे, असेंहि हा ब्राह्मण म्हणत आहे. पांचाल देशामध्यें विपुल अन्न आहे, अशी त्याची प्रसिद्धि आहे. राजा यज्ञसेन मोठा ब्राह्मणभक्त आहे. एकाच ठिकाणीं दीर्घकाल रहाणें मलाहि आवडत नाहीं. यास्तव हे पुत्रा, तुझी जर इच्छा असेल तर आपण पांचाल देशास जाऊं या. "

आपल्या पुत्रवत्सल जननीचें हें भाषण ऐकून युधिष्ठिर म्हणाला—हे माते, तुला जें करावेंसें वाटतें तें आम्हांला अत्यंत हितावहच असतें. पण माझे भ्राते तेथें येतील कीं नाहीं, तें मला माहीत नाहीं. यास्तव त्यांची इच्छा काय आहे तें तूं पहा.

राजा, युधिष्ठिराचें हें भाषण ऐकून कुंतीनें भीमसेनादि चारी पुत्रांना पृथक् पृथक् जवळ बोलावून विचारलें. तेव्हां त्या सर्वांनीं पांचाल देशास जाण्याची आपली इच्छा प्रदर्शित केली असतां कुंती त्या ब्राह्मणाचा निरोप घेऊन पुत्रांसह महात्म्या द्रुपदाच्या रम्य नगरीस जावयास निघाली. १. ११. १६८.

अध्याय १६९ वा.

[१ पांडवांच्या प्रस्थानापूर्वी व्यासदर्शन व त्यानें केलेलें द्रौपदीचें जन्मांतरकथन.]

(१) **वैशंपायन**—हे राजेंद्रा, याप्रमाणें महात्मे पांडव एकचक्रा-नगरींत गुप्तपणें रहात असतां त्यांना द्रौपदीच्या स्वयंवराचा वृत्तांत कळला व त्यांनीं तेथें जाण्याचा निश्चय केला. ते तेथून निघण्याच्या पूर्वी भगवान् व्यास त्यांस

भेटावयास आला. आपला पूज्य पितामह व्यास आला आहे, असें पाहून ते वीर भ्राते मोठ्या आदरानें त्यास सामोरे गेले आणि प्रणिपात व अभिवादन करून त्याच्यापुढें हात जोडून उभे राहिले.

तेव्हां त्या सर्वांना बसावयास सांगून त्यांच्याकडून पूजा केला गेलेला मुनि भूमीवर बसलेल्या त्यांस प्रीतिपूर्वक असें गुप्त वचन बोलला—"हे वीरांनो, तुम्ही धर्मानें व शास्त्रविधीप्रमाणें वागतां ना? पूजार्ह ब्राह्मणांचा तुम्ही योग्य सत्कार करितां ना? त्यांत कधींहि आळस करीत नाहीं ना?"

राजा, असे धर्म-अर्थयुक्त प्रश्न करून व विविध विचित्र कथा सांगून भगवान् व्यास त्यांस पुनः म्हणाला—एका तपोवनांत एका महात्म्या ऋषीची एक अति सुंदर व सर्वगुणसंपन्न कन्या होती. ती स्वकर्मांनींच अतिशय अभागी निपजली. त्यामुळें ती रूपवती असूनहि तिला पतीचा लाभ झाला नाहीं. म्हणून ती अतिशय खिन्न झाली व तप करूं लागली. उग्र तपश्चर्येनें तिनें शंकराला प्रसन्न करून घेतलें. तेव्हां संतुष्ट झालेला भगवान् 'हे भामिनि, मी शंकर आहें, तुझें कल्याण असो; हे भद्रे, तुला इष्ट असेल तो वर मागून घे,' असें म्हणाला. तें ऐकून 'भगवान् जर मजवर प्रसन्न झाला असेल तर मी सर्वगुणसंपन्न पतीची इच्छा करितें' असें ती त्या ईश्वरास पुनः पुनः बोलली.

तें ऐकून वक्त्यांतील श्रेष्ठ ईश्वर 'तुला भरतकुलांतील पांच पति प्राप्त होतील,' असें म्हणाला. तें ऐकतांच ती कन्या "हे भगवन्, तुझ्या प्रसादानें 'मला एकच पति प्राप्त व्हावा,' असा वर मीं तुजपाशीं मागितला होता, असें असतांना तूं मला हा भलताच वर कां देतोस?" असें त्या वरद ईश्वराला विचारूं लागली. तेव्हां महादेवानें तिला म्हटलें—"हे शुभे, 'मला पति दे' असें तूं पांच वेळां बोललीस. त्याला अनुसरून मीं तुला हा योग्यच वर दिला आहे. तुला या वराची प्राप्ति या जन्मांत न होतां तूं दुसरा जन्म घेतल्यावर तुला पांच पति प्राप्त होतील."

हे कुंतीपुत्रहो, तीच देवरूपिणी कन्या आतां द्रुपदाच्या घरीं उत्पन्न झाली आहे. ती अनिंद्य पृषतराजपौत्री कृष्णा तुमची पत्नी होणार आहे. यास्तव हे महाबल पांडवांनो, तुम्ही आतां पांचाल नगरांत जाऊन रहा. तेथें तुम्हांला तिची प्राप्ति होईल व तुम्ही सुखी व्हाल, यांत कांहीं संशय नाहीं. युधिष्ठिरादिकांना असें सांगून व त्यांचा व कुंतीचा निरोप घेऊन तो मुनि तेथून निघून गेला. १. ११. १६९.

अध्याय १७० वा.

[१ पांडवांचें प्रस्थान व गंगातीरीं आगमन. २ अंगारपर्ण-गंधर्वाचा पराजय व त्याच्याशीं सख्य.]

(१) **वैशंपायन**—भगवान् व्यास निघून गेले असतां पुरुषश्रेष्ठ पांडव आपल्या पूज्य जननीसह एकचक्रा-नगरींतून निघाले. घरांतून प्रस्थान करण्यापूर्वीं त्यांनीं आपल्याला निवासस्थान देऊन मोठे उपकार करणाऱ्या ब्राह्मणाला वंदन केलें व त्याचें अनुमोदन घेऊन 'येतों' असें म्हटलें आणि उत्तराभिमुख सममार्गानीं ते आपल्या उद्दिष्ट स्थानीं जावयास निघाले. ते पुरुषश्रेष्ठ पांडुनंदन अहोरात्र प्रवास करून गंगातीरावरील '[१]सोमाश्रयायण'-नांवाच्या तीर्थास प्राप्त झाले. मार्गानें जात असतां प्रकाशासाठीं व रक्षणासाठीं महारथ अर्जुन हातांत पेटलेली चूड घेऊन सर्वांच्या पुढें चालला होता. त्या तीर्थावरील एका निर्जन-प्रदेशीं क्रोधी गंधर्वराज आपल्या स्त्रियांसह गंगेच्या जलांत क्रीडा करीत होता. तेथेंच ते पांडव येऊन पोंचले. नदीसमीप येत असलेल्या त्यांचा शब्द ऐकून बलाढ्य गंधर्व क्रुद्ध झाला व मातेसह त्या परंतप पांच पांडवांना पाहून त्यानें आपलें धनुष्य आकर्ण ओढलें, त्याचा भयंकर टणत्कार केला व तो म्हणाला—

"अरे मानवा, रात्रीचा आरंभ होण्यापूर्वीं पश्चिम दिशेमध्यें सूर्याचें अर्धें मंडल अस्त पावलें म्हणजे जी संध्या रक्तवर्ण होते, त्या संध्याकालीं ऐंशीं निमेषांनंतर तुमचा प्रवास वर्ज्य मानिलेला आहे व तोच मुहूर्त यक्ष, गंधर्व व राक्षस यांच्या कामचाराला विहित आहे. तेवढा काल सोडून बाकीचा सर्व काल मनुष्यांच्या कर्माचरणासाठीं सांगितला आहे. म्हणजे संध्याकालांतील ऐंशीं लव-कालानंतर सर्व रात्र हा यक्षादिकांचाच संचारकाल असून बाकीचा सर्व दिवस मनुष्यांच्या संचारासाठीं आहे. जे मानव त्या वेळीं लोभानें संचार करितात, त्या मूढांचा राक्षसांसह आम्ही निग्रह करितों. म्हणून ब्रह्मवेत्ते रात्रीं जलासमीप येणाऱ्या मनुष्यांची किंबहुना बलाढ्य राजांचीहि निंदा करितात.

यास्तव तुम्ही दूर उभे रहा. माझ्या समीप येऊं नका. मी या भागीरथीच्या जलामध्यें क्रीडा करावयास आलों आहें, हें तुम्हांला कसें कळत नाहीं? आपल्या बलाचा आश्रय करून रहाणारा मी 'अंगारपर्ण'-नांवाचा गंधर्व आहें. मी

---

१ सोमाश्रय म्हणजे चंद्रधर रुद्र, त्याचें हें स्थान असल्यामुळें या तीर्थाला 'सोमाश्रयायण' असें नांव पडलें.

मोठा मानी, ईर्ष्यावान् व कुबेराचा प्रिय मित्र आहें. अंगारपर्ण याच नांवाचें हें माझें वन आहे. गंगेच्या तीरावर असलेल्या या रम्य वनांत मी विविध विषयांचा उपभोग घेत रममाण होतों.

हे वीरांनो, तुम्ही रम्याकृति दिसतां, त्यावरून तुम्ही विकराल राक्षस नाहीं. तुमच्या पाशीं शृंग, कपाल इत्यादि चिह्नें नाहींत. त्यावरून रात्रीं जलप्रवेश करण्यास योग्य असलेले कापालिकहि तुम्ही नव्हे. तुम्ही हातांत चूड घेऊन येत अहां, त्यावरून दिव्यदृष्टि देवहि तुम्ही नव्हे. आकाशादिकांतून गमन करण्याचें सामर्थ्य देणाऱ्या माळाहि तुमच्यापाशीं नाहींत. त्यावरून तुम्ही गंधर्व किंवा यक्षादिकहि नव्हे, हें उघड आहे. अर्थात् तुम्ही मनुष्यच अहां. मग असे मोठमोठ्यानें बोलत माझ्यासमीप कां येतां ? "

अर्जुन म्हणाला—हे दुर्मते, समुद्र, हिमालयाचा पार्श्वभाग व ही नदी यांवर रात्रीं, दिवसां किंवा संध्याकाळीं कोणा एखाद्याचें स्वामित्व नियत केलें आहे कीं काय ? कोणाचेंहि नाहीं. हे प्रदेश सर्वसाधारण आहेत. हे आकाशचरा, सर्व नद्यांमध्यें श्रेष्ठ असलेल्या या गंगेला प्राप्त होऊन भुक्त किंवा अभुक्त, रात्रीं किंवा दिवसां असा कांहीं कालनियम नाहीं. आम्हीं समर्थ आहों. म्हणूनच अकालीं तुजपाशीं येत आहों.

हे क्रूरा, जे मानव रणामध्यें तुमच्याशीं युद्ध करूं शकत नाहींत, तेच तुमची पूजा करितात. पूर्वी हिमालय पर्वताच्या सुवर्णशृंगापासून निघालेली ही गंगा वस्वौकसारा, नलिनी, पावनी, सीता, चक्षु, सिंधु व अलकनंदा या सात नद्यांच्या रूपांनीं समुद्राला जाऊन मिळाली आहे आणि जे कोणी गंगा, यमुना, प्लक्षद्वीपांत उगम पावलेली सरस्वती, रथस्था, सरयू, गोमती व गंडकी या सात नद्यांचें जल प्राशन करितात, ते निष्पाप होतात.

ही पवित्र गंगा आकाशरूप एकाच तटानें युक्त होऊन अंतरिक्षांतून वहाते व हे गंधर्वा, देवांमध्यें ही 'अलकनंदा' या नांवानें प्रसिद्ध आहे. पितृलोकांत हीच 'वैतरणी' या नांवानें प्रसिद्ध असून पाप्यांना दुस्तर आहे, असें कृष्ण-द्वैपायनानें आम्हांला सांगितलें आहे. या पवित्र देवनदीला इतर नद्यांप्रमाणें वर्षाकालीं एक क्षणभर सुद्धां अस्पृश्यत्व येत नाहीं. ही शुभ नदी स्वर्ग संपादन करून देणारी आहे, असें असतांना तूं आम्हांला प्रतिबंध करण्याची इच्छा कां करितोस ? हा सनातन धर्म नाहीं. ज्याचें कोणालाहि निवारण करितां येत

नाहीं व ज्याला कोणत्याहि प्रकारचा दोष नाहीं अशा या भागीरथीच्या पवित्र जलाला, केवळ तुझ्या सांगण्यावरून आम्हीं स्पर्श कां करूं नये ? आमच्या इच्छेप्रमाणें आम्ही स्पर्श करणारच.

(२) राजा जनमेजया, तुझ्या प्रपितामहाचें हें भाषण ऐकून गंधर्वराज अंगारपर्ण अतिशय क्रुद्ध झाला व आपल्या धनुष्यावर गुण चढवून विषारी सर्पासारखे तीक्ष्ण बाण सोडूं लागला. तेव्हां या पांडुपुत्रानेंहि हातांतील चूड व ढाल सभोंवार गरगर फिरविली व गंधर्वाच्या सर्व बाणांचें निवारण केलें आणि तो वीर त्यास म्हणाला—

" हे गंधर्वा, असल्या बुजगावण्याला अस्त्रज्ञ भीत नसतात, त्यांना दाखविलेली भीति जलावरील फेंसाप्रमाणें निष्फल होते. सर्व गंधर्व मनुष्यांपेक्षां अधिक बलवान् असतात, हें मला माहित आहे. यास्तव मी तुझ्याशीं दिव्य अस्त्रानें युद्ध करीन. तुझ्याशीं मी कपटानें युद्ध करणार नाहीं. मी आतां तुझ्यावर जें आग्नेयास्त्र सोडणार आहें, तें इंद्राच्या मान्य बृहस्पति-गुरूनें भरद्वाजाला दिलें. भरद्वाजापासून अग्निवेश्याला व अग्निवेश्यापासून द्रोणाचार्याला प्राप्त झालें. शेवटीं त्या माझ्या गुरूनें तें मला दिलें आहे. "

वैशंपायन म्हणाला—हे राजन्, असें बोलून क्रुद्ध झालेल्या अर्जुनानें तें अस्त्र गंधर्वावर सोडलें. त्याबरोबर प्रदीप्त झालेल्या त्या आग्नेयास्त्रानें गंधर्वराजाचा रथ जाळला. तेव्हां रथापासून च्युत होऊन खालीं अधोमुख पडत असलेल्या व अस्त्रतेजानें मूर्छित झालेल्या त्या गंधर्वाला अर्जुनानें एखाद्या पुष्पाप्रमाणें केशप्रदेशीं धरलें आणि अस्त्रप्रहारानें चेतनाशून्य झालेल्या त्या गंधर्ववीराला त्याचे केंस धरून ओढीत आपल्या बंधूपाशीं आणिलें.

तेव्हां पतीच्या प्राणरक्षणाची इच्छा करणारी 'कुंभीनसी'-नांवाची गंधर्वपत्नी युधिष्ठिराला शरण आली व मोठ्या नम्रपणें त्या पांडवश्रेष्ठास म्हणाली—" हे महाभाग, माझ्या या पतीचें तूं रक्षण कर व याला सोडून दे. हे प्रभो, ही कुंभीनसी-गंधर्वी तुला शरण आली आहे. "

तिचें तें करुण भाषण ऐकून युधिष्ठिराला दया आली व तो अर्जुनास म्हणाला—" हे रिपुसूदना, याला सोडून दे. वत्सा, युद्धामध्यें पराभूत, यशोहीन, पराक्रमशून्य व स्त्री ज्याचें रक्षण करीत आहे अशा शत्रूला कोण मारील ? "

आपल्या ज्येष्ठ भ्रात्याचें हें उत्कृष्ट भाषण ऐकून अर्जुन गंधर्वास म्हणाला—हे गंधर्वा, तुला मी अभय देतों. तूं शोक करूं नको. आपला जीव घेऊन येथून जा. आज हा कुरुराज युधिष्ठिर तुला अभय देत आहे.

तें ऐकून गंधर्व अर्जुनास म्हणाला—हे वीरा, मी तुझ्या हातून पराभूत झालों आहें. यास्तव मी आपलें पूर्वींचें अंगारपर्ण हें नांव सोडून देतों. अंगार म्हणजे धगधगित निखारा, त्याचप्रमाणें ज्याचें पर्ण म्हणजे वाहन-रथ दुःस्पर्श आहे, तो अंगारपर्ण; पण ती माझी अंगारपर्णता आज मी सोडून देतों. यापुढें मी जनसमूहामध्यें आपल्या सामर्थ्याची व नांवाची प्रशंसा करणार नाहीं. मला आज हा फारच मोठा लाभ झाला आहे. मी दिव्य अस्त्र धारण करणाऱ्या तुज अर्जुनाला गंधर्वांच्या मायेनें युक्त करण्याची इच्छा करितों. तुझ्या अस्त्राग्नीनें माझा हा विचित्र उत्तम रथ दग्ध झाला. मी पूर्वीं जो चित्ररथ होतों, तो आतां दग्धरथ झालों आहें.

मीं पूर्वीं ही गांधर्वी माया मोठ्या तपानें संपादन केली आहे. यास्तव मला प्राणदान देणाऱ्या तुज महात्म्याला मी ती समर्पण करितों. आपल्या वेगानें पूर्णपणें कुंठित करून जिंकलेल्या व शरण आलेल्या शत्रूला जो प्राणदान करितो, तो कोणत्या कल्याणाला पात्र होत नाहीं ? मी आतां जी विद्या देणार आहें, तिचें नांव 'चाक्षुषी' असें आहे. ती मनूनें सोमाला, सोमानें विश्वावसूला व विश्वावसूनें मला दिली आहे. गुरूनें दिलेली ही विद्या हीन पुरुषाला प्राप्त झाली असतां नाश पावते. या विद्येचा पूर्वक्रम मीं तुला सांगितला. आतां तिचें सामर्थ्य ऐक.

पुरुष तिन्ही लोकांतील जें कांहीं जशा प्रकारें प्रत्यक्ष नेत्रानें पहाण्याची इच्छा करील, तें तशा प्रकारें पाहण्यास तो या विद्येमुळें समर्थ होईल. सहा महिने एका पायावर उभें राहिल्यानें ही विद्या प्राप्त होते. तूं हें व्रत केलेंस, म्हणजे मग मी तुला ही विद्या देईन. हे राजा, या विद्येमुळेंच आम्ही मनुष्यांहून श्रेष्ठ व देवांसारखे प्रभावशाली झालों आहों. देवाप्रमाणेंच आम्ही आकाशांतून गमन करितों व अदृश्यादि पदार्थांना साक्षात् पाहूं शकतों. हे पुरुषश्रेष्ठा, मी तुझ्या भ्रात्यांना व तुला गंधर्वलोकांतील शंभर शंभर अश्व देईन. ते देव व गंधर्व यांस वाहतात. त्यांचा वर्ण दिव्य व वेग मनासारखा आहे. ते कधीं वृद्ध व तरुण होत नाहींत. त्यांचा वेग कधींहि कमी होत नाहीं. हे अश्व कसे उत्पन्न झाले, तेंहि मी तुला सांगतों.

पूर्वी वृत्राचा नाश करणारें इंद्राचें वज्र दधीचि ऋषीच्या अस्थींपासून उत्पन्न केलें. तें वृत्रासुराच्या मस्तकावर आपटून दशधा व शतधा विदीर्ण झालें. त्यामुळें त्याचे जे अनेक तुकडे झाले, त्यांतील एकेका वज्रभागाची देव उपासना करूं लागले. या लोकामध्यें जें उत्कृष्ट व स्पृहणीय यशोधन आहे, तें वज्राचेंच स्वरूप आहे.

ब्राह्मणाचा हात हविष्प्रद असल्यामुळें तो वज्रभागच आहे, म्हणून देव त्याची उपासना करितात. रथ हें क्षत्रियांचें वज्र आहे. कारण देव व ब्राह्मण यांच्या शत्रुनाशाला रथ कारण होत असतो, म्हणून देव त्या क्षत्ररूपी रथाची उपासना करीत असतात. दान हें वैश्यांचें वज्र असून, कर्म हें शूद्रांचें वज्र आहे. कारण दान व कर्म हीं दोन्ही ब्राह्मण व क्षत्रिय यांचें प्रिय करितात. यास्तव वज्रवान् ब्राह्मणादि चार वर्णांवर देव उपजीविका करितात.

अश्व क्षत्रवज्राचे म्हणजे रथाचे अंश असल्यामुळें ते त्याचे अवधिभूत मानले आहेत. ते अतिशय वेगवान् असतात. त्यामुळें अश्वांचा उत्कर्षच रथांच्या वज्रत्वाचें मुख्य कारण आहे. घोडी अश्वरूप रथांगाला प्रसवते व शूर पुरुषहि रथाचें अंग आहेत. त्यामुळें अश्वाची योग्यता रथी वीराइतकीच आहे. माझे गंधर्वलोकांतील अश्व, इच्छेस येईल तो वर्ण व वेग धारण करणारे आहेत. ते इच्छा करतांच जवळ येऊन उभे रहातात. त्यामुळें हे वीरा, ते तुझी इच्छा पूर्ण करतील.

गंधर्वाचें हें भाषण ऐकून अर्जुन म्हणाला—हे गंधर्वा, प्रसन्न झालेल्या तूं दिलेली विद्या, धन किंवा शास्त्र यांतील एकहि वस्तु उलट कांहीं दिल्यावांचून आपण घ्यावी, हें मला योग्य वाटत नाहीं. कारण देणें व घेणें, गुह्य सांगणें व विचारणें, स्वतः भोजन करणें व भोजन देणें, असें सहा प्रकारचें प्रीतिलक्षण आहे. यास्तव तुला कांहीं परत दिल्यावांचून तुजपासून चाक्षुषी विद्या घेतल्यास मी तुझा ऋणी होईन. किंवा तुझें जीवित क्षीण होण्याचा प्रसंग आला असतां तें मीं वांचविलें म्हणून तूं जरी ही विद्या मला देत असलास तरी मी ती घेणार नाहीं. कारण त्यामुळें माझ्या यशाची हानि होईल.

गंधर्व—महात्म्यांचा संयोग परस्परांची प्रीति उत्पन्न करितो, असें दिसतें. जीवितप्रदानानें संतुष्ट होऊन मी तुला ही विद्या देत आहें. मी तुझ्यापासूनहि उत्तम आग्नेय-अस्त्राचें ग्रहण करीन व हे अर्जुना, उभयतांनीं असा परस्पर उपकार करणेंच योग्य आहे. त्यामुळें आपला स्नेह चिरकाल टिकेल.

अर्जुन—गंधर्वा, मी तुला आग्नेयास्त्र देऊन तुजपासून अश्व घेतों. आम्हां उभयतांचा स्नेह शाश्वत राहो. हे मित्रा, तुमच्यापासून भय उत्पन्न होण्याचें कारण काय आहे, तें मला सांग. हे गंधर्वा, आम्ही सर्व वेदवेत्ते, सदाचारसंपन्न व शत्रूंचा नाश करणारे असतांना 'रात्रीं प्रवास करितों' एवढ्याच कारणानें तूं आम्हांला भय कां दाखविलेंस ? त्याचें कारण काय ?

गंधर्व—हे पांडुपुत्रांनो, तुम्ही अविवाहित असल्यामुळें अनग्नि अहां, तुम्हीं अग्नीचें आधान केलेलें नाहीं. तुमचें समावर्तन झालेलें असल्यामुळें तुम्ही सायंप्रातःसमिद्धोमहि करीत नाहीं. कारण ब्रह्मचाऱ्यालाच तो विहित आहे. तुम्ही पुरोहिताचाहि स्वीकार केलेला नाहीं. त्यामुळें रात्रीं गमन करणाऱ्या तुमचें मीं धर्षण केलें आहे. अनाश्रमी द्विज धर्षणास योग्य होतो. यक्ष, राक्षस, गंधर्व, पिशाच, उरग, दानव इत्यादि सर्व बुद्धिमान् कुरुवंशाचा विस्तार सांगतात. हे वीरा, तुझ्या बुद्धिमान् पूर्वजांचे गुण गात असलेल्या नारदादि महर्षींच्या मुखानें मीं ते ऐकले आहेत. या समुद्रवलयांकित सर्व पृथ्वीवर संचार करणाऱ्या स्वतः मींहि तुझ्या उत्तम कुलाचा प्रभाव प्रत्यक्ष पाहिला आहे.

अर्जुना, तीन्ही लोकांमध्यें प्रसिद्ध असलेला जो यशस्वी भारद्वाज द्रोण, म्हणजे तुझा वेद व धनुर्विद्या यांचा आचार्य, त्यालाहि मी जाणतों. धर्म, वायु, इंद्र, अश्विनिकुमार व पांडु या कुरुकुलाची वृद्धि करणाऱ्या तुमच्या सहा पित्यांनाहि मी चांगलें ओळखितों. धर्मादि पांच देव सर्व देवांमध्यें श्रेष्ठ आहेत व पांडु सर्व मनुष्यांमध्यें श्रेष्ठ होता. तुम्ही पांचहि भ्राते शूर, सदाचारसंपन्न, सर्व शस्त्रधारण करणारांमध्यें श्रेष्ठ, महात्मे व दिव्यस्वरूपी अहां. तुम्हां सर्वांचें चित्त अति शुद्ध असून तुमचा संकल्प व निश्चय उत्तम आहे.

हे पार्था, हें सर्व मला माहीत असूनहि मीं तुम्हांला येथें येण्यास प्रतिबंध केला. कारण हे वीरा, स्त्रीच्या समक्ष एखाद्या बाहुबलानें युक्त असलेल्या वीराचा जर कोणीं अपमान केला, तर तो त्याला सहन होत नाहीं. रात्रीं आमचें बल अधिकच वाढत असतें, त्यामुळें हे कौंतेया, भार्येसह जलक्रीडा करीत असलेल्या मला अतिशय क्रोध आला.

हे तापत्यनंदना, ज्या विधीनें मी या संग्रामांत तुझ्या हातून पराभूत झालों, तो विधि मी तुला सांगतों, ऐक. ब्रह्मचर्य श्रेष्ठ धर्म आहे व तो तुझ्या ठिकाणीं नियत आहे. त्यामुळें तुझ्या हातून मी पराभव पावलों. हे शत्रुनाशका, जो

क्षत्रिय कामवृत्त म्हणजे विवाहित असतो व रात्रीं युद्ध करितो, तो आमच्यासारख्या वीरांशीं युद्ध करीत असतांना केव्हांहि जिवंत रहात नाहीं. पण हे पार्था, जो क्षत्रिय कामवृत्त असूनहि ब्रह्मपुरस्कृत असतो, तो पुरोहिताकडून सुरक्षित असलेला वीर सर्व नक्तंचरांना जिंकतो. यास्तव हे तापत्या, मनुष्यांना जें कांहीं श्रेय इष्ट असेल, त्यासाठीं त्यांनीं सर्व कर्मांमध्यें जितेंद्रिय पुरोहितांची योजना करावी. राजाचे वेद व षडंगें यांमध्यें अत्यंत निरत, पवित्र, सत्यवादी, धर्मात्मे व सुसंस्कृत पुरोहित असावे.

अर्जुना, ज्या राजाचा धर्मज्ञ, वक्ता, शीलवान् व शुचि पुरोहित असतो, त्या राजाचा इहलोकीं विजय व परलोकीं स्वर्ग निश्चित असतो. राजानें धन मिळावें, त्याचें रक्षण व्हावें व शत्रूंच्या धनादिकांची हानि व्हावी म्हणून सर्वगुणसंपन्न पुरोहित करावा. ज्याला आपला उत्कर्ष व्हावा असें वाटत असेल त्या राजानें समुद्रवलयांकित सर्व पृथ्वीची प्राप्ति होण्यासाठीं पुरोहिताच्या आज्ञेंत रहावें. हे तापत्या, केवल शौर्य व उत्तम कुल यांच्याच योगानें कोणीहि अब्राह्मण राजा केव्हांहि सर्व पृथ्वीला जिंकूं शकत नाहीं. यास्तव कुरूंच्या वंशाची वृद्धि करणाऱ्या अर्जुना, ज्यामध्यें ब्राह्मण प्रमुख आहे असेंच राज्य चिरकाल पालन करणें शक्य आहे, हें तूं निश्चयानें जाण. १. ११. १७०.

अध्याय १७१ वा.

[१ तपतीचा वृत्तान्त.]

वैशंपायन—हे राजश्रेष्ठा, गंधर्वाचें हें भाषण ऐकून अर्जुन त्यास म्हणाला—"हे मित्रा, तूं माझ्याशीं बोलतांना दोन तीन वेळां मला 'तापत्य' असें संबोधिलेंस, पण त्या 'तापत्य'-शब्दाचा निश्चित अर्थ काय आहे, तें ऐकण्याची माझी इच्छा आहे. जिच्यामुळें आम्ही 'तापत्य' या नांवास प्राप्त झालों, ती तपती कोण होती ? कारण हे साधो, आम्ही तर कौंतेय आहोंत. यास्तव तुझ्या या संबोधनांतील तत्त्व जाणण्याची माझी इच्छा आहे.

(१) राजा, अर्जुनाचा हा प्रश्न ऐकून गंधर्व त्रिभुवनांत प्रसिद्ध असलेली कथा धनंजयाला सांगूं लागला—"अर्जुना, मी तुला ती प्राचीन मनोरम कथा सांगतों. हे बुद्धिमानांतील श्रेष्ठा, तूं ती आरंभापासून ऐक. मीं तुला तापत्य कां म्हटलें तेंच आतां सांगतों. माझ्या भाषणाकडे अवधान ठेव. द्युलोकामध्यें हा जो भगवान् सूर्य आपल्या तेजानें सर्व नभोमंडळाला सतत व्यापितो,

त्याची तपती या नांवाची त्याच्याचसारखी तेजस्वी कन्या होती. ती भगवान् विवस्वान् देवाची कन्या सावित्रीची कनिष्ठ भगिनी होय. तपानें युक्त असलेली ती सूर्यकन्या तिन्ही लोकांत तपती या नांवानें प्रख्यात झाली. तिच्यासारखी रूपवती कोणी देवी, आसुरी, यक्षी, राक्षसी, अप्सरा व गंधर्वीहि नव्हती. ती सर्वांगसुंदर असून तिचे नेत्र मनोहर होते. ती मोठी साध्वी व आचारसंपन्न होती. तिचा वेषहि मोठा प्रशंसनीय असे. तिचें रूप, शील, गुण व विद्या यांना अनुरूप असा भर्ता सूर्याला त्रिभुवनांत कोठें आढळेना. 'तपती तरुण झाली, आतां तिचा विवाह केला पाहिजे, पण तिला अनुरूप वर मिळत नाहीं, काय करावें ?' अशा चिंतेनें सूर्य व्याकुळ झाला. त्याच्या चित्ताला स्वास्थ्य मिळेना.

हे अर्जुना, इतक्यांत कुरुकुलांतील श्रेष्ठ व बलाढ्य ऋक्षपुत्र संवरणराजा पवित्र व नियत होऊन अर्घ्य, माल्य, उपहार, गंध, नियम, उपवास व विविध तपश्चर्या यांच्या योगानें सूर्याची आराधना करूं लागला. तो पौरवनंदन पूज्यांची शुश्रूषा करणारा निरभिमान व शुचि होता. तो भक्तिमान् राजा उदय पावलेल्या सूर्याची नित्य पूजा करीत असे. त्यामुळें हा संवरणराजा कृतज्ञ, धर्मज्ञ व अप्रतिम रूपवान् असून तपतीला अनुरूप वर आहे, असें आदित्याला वाटलें आणि आपली ही कन्या त्या संवरणराजाला द्यावी असा त्यानें निश्चय केला.

हे कुरुनंदना, तो भूपति भूलोकांतील सर्व राजांमध्यें श्रेष्ठ असून त्याचें कुलहि प्रसिद्ध होतें. ज्याप्रमाणें द्युलोकांत उष्णांशु सविता आपल्या तेजानें सर्वांना प्रकाशित करितो, त्याचप्रमाणें हा संवरणराजा भूलोकीं आपल्या तेजानें सर्वांना प्रकाशित करीत असे. वेदवेत्ते द्विज उदय पावलेल्या आदित्याची जशी पूजा करितात, तशीच क्षत्रियादि सर्व प्रजा संवरणराजाची पूजा करीत असे. तो चंद्राहूनहि अधिक आल्हादकारक व सूर्याहूनहि अति तेजस्वी असलेला राजा मित्र व शत्रु यांमध्यें अतिशय शोभत होता. तो मित्रांना आल्हाद देत असे व शत्रूंना ताप देत असे. अशा गुणांनीं व आचरणांनीं युक्त असलेल्या त्या राजाला आपली 'तपती' कन्या द्यावी, असा त्यानें दृढ संकल्प केला.

अर्जुना, इकडे एकदा तो अमित पराक्रमी श्रीमान् राजा पर्वतोपवनांत मृगया करीत फिरूं लागला. तो अहोरात्र मृगांचा पाठलाग करीत फिरत असल्यामुळें त्याचा अप्रतिम अश्व त्या पर्वतामध्यें क्षुधा व तृषा यांनीं व्याकुळ होऊन मृत्युमुखीं पडला.

तेव्हां तो नृपति त्या पर्वतावरून पायांनींच फिरूं लागला असतां त्याला या लोकीं अप्रतिम असलेली एक कन्या दिसली. त्यावेळीं शत्रुबलाचा नाश करणारा तो राजा एकटाच होता व ती कन्याहि तेथें एकटीच होती. राजा त्या सुंदरीकडे निश्चल दृष्टीनें पाहूं लागला. तिच्या असामान्य रूपावरून त्याला ती साक्षात् श्रीच असावी असें वाटलें. 'ही कोण बरें असावी?' असा तो तर्क करीत असतां त्याला एकदा ही सूर्यापासून भ्रंश पावलेली त्याची प्रभाच आहे, असें वाटलें. कांहीं वेळानें तिच्या शरीरकांतीवरून ही अग्नीची ज्वालाच असावी, असा त्यानें तर्क केला. पण तिची कांति अति प्रसन्न असल्यामुळें ही शुद्ध चंद्रलेखाच आहे, असाहि त्याला भास झाला.

ती कमलनयना तपती ज्या पर्वतपृष्ठावर उभी होती, तेथून ती सुवर्णाची पुतळीच असल्याप्रमाणें शोभत होती. तिचें रूप व विशेषेंकरून वेष, यांच्या योगानें वृक्ष, वेली व झुडपें यांसह तो पर्वत जणुंकाय सुवर्णमयच झाला. तिला पाहून सर्व लोकांतील स्त्रिया हिच्यापुढें तुच्छ आहेत अशी राजाची खात्री झाली. आज आपल्या या विशाल नेत्रांचें सार्थक्य झालें, असें त्याला वाटलें. संवरणराजा तपतीला पाहून जेथल्या तेथें स्तब्ध उभा राहिला. तो एक पाऊलभरहि इकडचा तिकडे झाला नाहीं. तो देहभान विसरला. तिच्या रूपसंपत्तीनें चकित झालेल्या राजानें 'खरोखर विधात्यानें देव, असुर व मानुष या तीन्ही लोकांचें मंथन करून या कमलनयनेचें हें रूप निर्माण केलें असावें, असा तर्क केला.

शेवटीं श्रेष्ठ कुलामध्यें उत्पन्न झालेल्या त्या वीरानें तिला पाहतांच कामबाणांनीं पीडित व तीव्र मदनाग्नीनें संतप्त होऊन मनांत पुष्कळ विचार केला व स्वभावतःच प्रगल्भ असलेल्या त्या वीरानें निसर्गतःच अप्रगल्भ असलेल्या त्या सूर्यकन्येला म्हटलें—"हे सुंदरि, तूं कोणाची कोण आहेस व येथें कशासाठीं उभी राहिली आहेस? हे कल्याणि, तूं एकटीच या निर्जन अरण्यांत कां फिरत आहेस? तूं सर्वांगसुंदर असून सर्व आभरणांनीं भूषित झाली आहेस. या सर्व भूषणांचें तूं जणुंकाय अत्यंत अभीष्ट असें भूषणच आहेस. तारुण्यानें अतिशय शोभणारी तूं कोणी देवी, आसुरी, यक्षी, राक्षसी, उरगी, गंधर्वी किंवा मानुषी असशील असें मला वाटत नाहीं. मी आजपर्यंत ज्या असंख्य श्रेष्ठ स्त्रिया पाहिल्या आहेत, किंवा ज्यांचें वर्णन ऐकिलें आहे, त्या सर्वांहून तूं अगदीं विलक्षण आहेस. हे सुमुखि, तुझें हें चंद्राहूनहि अतिशय आल्हादकारक

असलेलें मुख पाहून कामदेव मला व्याकुल करून सोडीत आहे. तुझे कमल-पत्रासारखे नेत्र पाहून मी मोहित झालों आहें."

पण हे राजपुत्रा, असें भाषण करणाऱ्या त्या कामार्त राजाशीं ती सूर्यकन्या एक अक्षरहि बोलली नाहीं. ही आपल्याशीं कांहींच बोलत नाहीं, असें पाहून तो कामासक्त राजा तिची अधिकच मनधरणी करूं लागला. तेव्हां ती श्रेष्ठ कन्या अभ्रांतील विद्युल्लतेप्रमाणें तेथेंच अंतर्धान पावली. ती भामिनी कोठें दिसत नाहीं, असें पाहून संवरणराजा तिला शोधण्यासाठीं सर्व अरण्यांत उन्मत्ताप्रमाणें भ्रमण करूं लागला. शेवटीं ती कोठें दिसत नाहीं, असें पाहून त्यानें पुष्कळ विलाप केला व कांहीं वेळ तो निश्चेष्ट पडला. १. ११. १७१.

अध्याय १७२ वा.

[१ संवरणराजाचा काममोह व तपतीचें आश्वासन.]

(१) गंधर्व म्हणाला—पार्था, ती तपती अदृश्य झाली असतां शत्रुसंघाचा नाश करणारा संवरणराजा काममोहित होऊन भूतलावर पडला. त्याची ती दीन स्थिति पाहून सुहास्य करणारी सूर्यकन्या प्रकट होऊन त्याला मधुर शब्दांनीं म्हणाली—"हे वीरा, ऊठ, ऊठ. तुजसारख्या कुरुकुलोत्पन्न राजाला असें काममोहित होणें उचित नाहीं. भूलोकीं प्रख्यात असलेल्यां तुला हा मोह शोभत नाहीं. हे धीरा, तुझें कल्याण असो. सावध हो."

तपतीनें हंसत असें मधुर भाषण केलें असतां तिच्या त्या कोमल शब्दांनींच तो देहभानावर आला. तों समीपच स्थित असलेली ती सूर्यकन्या त्याला दिसली. त्याबरोबर अतिशय संतुष्ट झालेला तो राजा मदनाग्नीनें संतप्त झाल्या-मुळें स्पष्ट शब्दांनीं तिला म्हणाला—"हे सुंदरि, कामातुर होऊन तुझ्या ठिकाणीं आसक्त झालेल्या माझा तूं स्वीकार कर. हे तरुणि, माझे प्राण व्याकुळ होऊन ते मला सोडून जात आहेत. हे विशालनयने, हा निर्दय काम आपल्या तीक्ष्ण शरांनीं तुझ्यासाठीं मला एकसारखा वेध करीत आहे. तो कांहीं केल्या शांत होत नाहीं. कामरूपी महासर्पानें मला दंश केला आहे. या वेळीं माझें रक्षण करणारा दुसरा कोणीहि दिसत नाहीं. हे कृशोदरि, तूं माझा स्वीकार कर.

हे किन्नरकंठि, माझे प्राण तुझ्या अधीन आहेत. हे भीरु, तुजवांचून मी जिवंत रहाण्यास समर्थ नाहीं. काम प्रतिक्षणीं माझ्या हृदयावर प्रहार करीत आहे. यास्तव हे भामिनि, मजवर दया कर. मज भक्ताचा परित्याग करूं नको. प्रीतिदानानें तूं माझ्या जीविताचें रक्षण कर. माझें मन तुला पहातांच तुजवर आसक्त होऊन अतिशय अस्वस्थ झालें आहे. तुला पाहिल्यावर मला आतां दुसऱ्या कोणत्याहि स्त्रीला पहावेंसें वाटत नाहीं. हे कल्याणि, प्रसन्न हो. मी सर्वथा तुझ्या अधीन आहें. मज भक्ताचा अंगीकार कर.

तूं माझ्या दृष्टीं पडतांच हा निर्दय कामदेव माझ्या हृदयांत प्रवेश करून आपल्या दुःसह शरांनीं मला व्याकुळ करीत आहे. हे शुभे, तूं मला आत्मसमर्पण करून माझी कामव्यथा शांत कर. हे श्रेष्ठ अंगने, गांधर्व विधीनें तूं माझा स्वीकार कर. हे रंभोरु, सर्व विवाहांत गांधर्व विधि श्रेष्ठ आहे. कामाग्नीनें उत्पन्न केलेला दाह तूं प्रीतिदानरूपजलानें शांत कर. याप्रमाणें तूं मजवर अनुग्रह केल्यावांचून हा दुर्धर पुष्पधन्वा मला जिवंत राहूं देणार नाहीं."

हे अर्जुना, तुझ्या पूर्वजाचें हें भाषण ऐकून सूर्यकन्या तपती त्यास म्हणाली—हे नृपते, मी स्वतंत्र नाहीं. पितृमती कन्या आहें. मजवर तुझी प्रीति असेल, तर तूं माझ्या पित्याची आराधना कर. हे नरेश्वरा, ज्याप्रमाणें तूं आपले प्राण मोठ्या कष्टानें धारण करीत आहेस, त्याप्रमाणें मीहि तुझें दर्शन घडल्यापासून तुझ्यापेक्षांहि अधिक व्याकुळ झालें आहे. तूं माझे पंचप्राण हरण केले आहेस. तथापि मजवर माझी सत्ता नाहीं. यास्तव मी तुझ्या समीप येण्यास समर्थ नाहीं.

हे नृपश्रेष्ठा, स्त्रिया स्वतंत्र नसतात. तुझ्यासारखा त्रिभुवनांत प्रसिद्ध असलेला श्रेष्ठ भक्तवत्सल भर्ता प्राप्त व्हावा अशी इच्छा कोणती कन्या करणार नाहीं ! यास्तव माझ्या आदित्यपित्याला तूं साष्टांग प्रणाम, तप व नियम यांच्या योगानें प्रसन्न करून माझी याचना कर. हे वरणीय वीरा, तुला माझें समर्पण करण्याची जर त्याला इच्छा झाली तर मी आजच तुझ्या अधीन होईन व सतत तुझ्या आज्ञेंत वागेन, हे क्षत्रियश्रेष्ठा, मी या लोकप्रकाशक सवित्याची कन्या असून सावित्रीची कनिष्ठ भगिनी आहें. १. ११. १७२.

अध्याय १७३ वा.

[१ वसिष्ठाच्या अनुग्रहानें संवरणाचा तपतीशीं विवाह. २ त्याच्या कामासक्तीमुळें राष्ट्रावरील संकट व त्याची निवृत्ति.]

(१) गंधर्व—हे कुंतीपुत्रा, सूर्यकन्या तपती राजाला असें सांगून सत्वर अंतरिक्षांत निघून गेली व तो संवरणराजा पुनरपि तेथील भूमीवर पडला. कांहीं वेळानें त्या महावनांत नृपोत्तमाचा शोध करणारा अमात्य चतुरंग सैन्यासह तेथें आला व त्यानें योग्य काळीं उंच शक्रध्वजाप्रमाणें भूमीवर पडलेल्या त्याला पाहिलें. तपतीनें त्याग केल्यामुळें भूमीवर पडलेल्या त्या महाधनुर्धराला पाहून त्याचा सचिव अग्नीचा स्पर्श झाल्याप्रमाणें संतप्त झाला. त्याला अतिशय भीति वाटली व स्नेहानें सत्वर त्याच्याजवळ येऊन पिता जसा पुत्राला उठवितो, तसें त्यानें त्या कामविह्वल राजाला उठविलें. बुद्धीनें, वयानें, कीर्तीनें व नीतीनें वृद्ध असलेला तो राजामात्य आपल्या प्रभूला वर उठवून थोडासा भयरहित झाला व कल्याणकर मधुर वाणीनें त्यास म्हणाला—" हे नरेंद्रा, भीऊं नको. तुझें कल्याण असो."

आपला हा प्रभु क्षुधा व तृषा यांनीं व्याकुळ झाला असावा असें त्याला वाटलें. कारण रणांगणांत शत्रूंचा संहार करणारा आपला महाराजा दुसऱ्या कांहीं कारणानें भूमीवर असा व्याकुळ होऊन पडेल, असें त्याच्या मनांतहि आलें नाहीं. म्हणून त्यानें राजाच्या मस्तकावर शीतल जलाचा सेक केला व कमलयुक्त सुगंधी वाळ्याचा मुकुट तयार करून, दाह शांत होण्यासाठीं, त्याच्या मस्तकावर स्थापिला; पण तो तत्काल सुकून गेला. त्यानंतर देहभानावर आलेल्या त्या बलवान् राजानें एका सचिवावांचून सर्व सैन्याला परत जावयास सांगितलें. तेव्हां राजाज्ञेनें तें महा सैन्य आपल्या राजधानीकडे परत जावयास निघालें.

हे वीरा, राजा त्याच पर्वतशिखरावर पुनः बसला व तपतीच्या प्राप्तीविषयींच विचार करूं लागला. तेव्हां त्याला 'सूर्याची आराधना केल्यावांचून तपती प्राप्त होणें शक्य नाहीं,' असें दिसून आलें. त्यानें भगवान् आदित्याची आराधना करण्याचा निश्चय केला. तो स्नान-आचमनादि करून शुचिर्भूत झाला, हात जोडून त्या श्रेष्ठ पर्वतावर ऊर्ध्वमुख होऊन उभा राहिला व सूर्याची आराधना करूं लागला. त्या वेळीं त्या शत्रुनाशक संवरणराजानें मनांत आपल्या ऋषिश्रेष्ठ वसिष्ठ पुरोहिताचें स्मरण केलें. तो प्रजेश्वर याप्रमाणें अहोरात्र उभा राहून सूर्याचें व ऋषीचें चिंतन करीत असतां अकरा दिवस निघून गेले.

बाराव्या दिवशीं वसिष्ठ ऋषि त्याच्याजवळ आला व त्यानें या राजाचें मन तपतीनें हरण केलें आहे व तिच्या प्राप्तीसाठीं हा राजा अशी उग्र तपश्चर्या करीत आहे, असें दिव्य दृष्टीनें जाणलें आणि त्याचें प्रिय करण्याच्या इच्छेनें तो धर्मात्मा त्यास म्हणाला—"हे राजा, चिंता करूं नकोस, मी सूर्याकडे जाऊन तुझा मनोरथ पूर्ण करण्याचा यत्न करितों." इतकें बोलून तो भगवान् ऋषि राजाच्या समक्ष भास्कराला भेटण्यासाठीं आकाशमार्गानें निघून गेला. त्या वेळीं त्या महर्षींची कांति भास्करासारखीच दिसत होती. योगसिद्धीच्या सामर्थ्यानें तो ब्राह्मण सूर्यमंडळास जाऊन पोंचला व हात जोडून सूर्यापाशीं उभा राहिला. 'मी वसिष्ठ आहें,' असें बोलून त्यानें मोठ्या प्रीतीनें आत्मनिवेदन केलें असतां अति तेजस्वी सूर्य त्या महर्षीस म्हणाला—"हे मुनिश्रेष्ठा, तुझें स्वागत असो, तूं आज कोणत्या कार्यासाठीं आला आहेस? हे महाभागा, तुझी जी इच्छा असेल ती मी पूर्ण करीन. तुझें कार्य कितीहि दुष्कर असलें तरी मी तें करीन."

भगवान् आदित्याचें हें वचन ऐकून संतुष्ट झालेला वसिष्ठ म्हणाला—हे विवस्वन्, सावित्रीची कनिष्ठ भगिनी 'तपती'-नांवाची जी तुझी कन्या आहे, तिची संवरणराजासाठीं मागणी करावयास मी आलों आहें. तो राजा मोठा कीर्तिमान्, धर्म व अर्थ यांस जाणणारा व उदार बुद्धि असल्यामुळें तुझ्या कन्येला अनुरूप वर आहे.

वसिष्ठाचें हें भाषण ऐकतांच सूर्यानें त्याचें अभिनंदन केलें व पूर्वींच निश्चय केलेल्या त्या भगवानानें 'ठीक आहे, मी आपली कन्या त्या राजाला देतों' असें म्हटलें. "हे मुने, पूरुकुलोत्पन्न संवरण भूलोकांतील सर्व राजांमध्यें श्रेष्ठ आहे, तूं सर्व ऋषींमध्यें वरिष्ठ आहेस व माझी कन्या तपती त्रिभुवनांतील सर्व स्त्रीरत्नांत उत्कृष्ट आहे. तेव्हां आतां तिचें दान करण्यापेक्षां अधिक श्रेष्ठ कार्य तें कोणतें!"

इतकें बोलून स्वतः सूर्यानें आपली सर्वांगसुंदर तपती-कन्या संवरण-राजासाठीं महात्म्या वसिष्ठाच्या स्वाधीन केली. त्या महर्षीनेंहि तिचा मोठ्या संतोषानें स्वीकार केला व आदित्याची अनुज्ञा घेऊन मदनानें व्याकुळ झालेला महाकीर्तिमान् कुरुश्रेष्ठ संवरणराजा जेथें तिचेंच ध्यान करीत उभा राहिला होता तेथें आला.

वसिष्ठासह अंतरिक्षांतून खालीं येत असलेल्या त्या सुहास्यवदन देवकन्येला पाहून राजा अतिशय संतुष्ट झाला. नभस्थलांतून पृथ्वीवर येणारी ती सुंदरी

सर्व दिशांना आपल्या तेजानें प्रकाशित करीत भूमीवर पडणाऱ्या विद्युल्लते-प्रमाणें अतिशय शोभली. राजाचा तो बारा दिवसांनीं साध्य होणारा नियम मोठ्या क्लेशानें समाप्त झाला असतां भगवान् वसिष्ठ ऋषी तपतीला घेऊन तेथें आला. अर्जुना, याप्रमाणें त्या वरद सूर्यदेवाची तपानें आराधना करून वसिष्ठाच्या तेजानेंच संवरणाला ती भार्या प्राप्त झाली.

(२) त्यानंतर देव व गंधर्व यांनीं सेवन केलेल्या त्या श्रेष्ठ पर्वतावर त्या नरेंद्रानें तपतीचें यथाविधि पाणिग्रहण केलें. वसिष्ठाची आज्ञा घेऊन त्या राजर्षीनें त्याच पर्वतावर भार्येसह विहार करण्याचा निश्चय केला व त्या भूपालानें आपलें नगर, राष्ट्र, वनें व उपवनें यांतील सर्व राजकार्य पहाण्याचा अधिकार त्याच वृद्ध सचिवास दिला. वसिष्ठ-पुरोहितहि राजाची अनुज्ञा घेऊन तेथून निघून गेला.

हे प्रभो, संवरणराजा त्याच पर्वतावर देवाप्रमाणें विहार करूं लागला. त्यानें आपल्या नववधूसह त्या पर्वतावरील अनेक वनें व उपवनें यांमध्यें बारा वर्षे यथेच्छ विषयसुख भोगलें. पण हे वीरा, संवरणराजा असा बारा वर्षे सतत कामासक्त होऊन राहिल्यामुळें त्याच्या नगरांतील ज्योतिष्टोमादि सर्व वार्षिक क्रिया लुप्त झाल्या. त्यामुळें इंद्रानें त्याच्या राष्ट्रांत जलवृष्टि केली नाहीं. राजाच्या या दोषामुळें दीर्घ अनावृष्टि प्रवृत्त झाली असतां संवरण-राजाच्या राष्ट्रांतील सर्व स्थावर-जंगम प्रजा क्षय पावली.

अर्जुना, तुला काय सांगूं ! त्या राष्ट्रांत तसला तो घोर काल प्रवृत्त झाला असतां पृथ्वीवर दंवाचे थेंबहि पडले नाहींत, मग वृष्टि तर दूरच राहिली. त्यामुळें भूमींतून कोणत्याहि जातीच्या तृणाचा अंकुरहि उगवेनासा झाला. त्यामुळें सर्व लोक भ्रांतचित्त झाले, ते क्षुधा व भय यांनीं अत्यंत पीडित झाले व गृहत्याग करून दशदिशांत भ्रमण करूं लागले. त्या वेळीं त्या राष्ट्रांत व नगरांत क्षुधेनें आर्त झालेले व स्त्री-पुत्रादि परिवार सोडलेले लोक मर्यादेचें उल्लंघन करून परस्परांचा वध करूं लागले.

हे तापत्या, क्षुधापीडित, दुःखी व त्यामुळें प्रेताप्रमाणें दिसणाऱ्या त्या प्रजाजनांच्या योगानें तें नगर मृत जीवांनीं व्यापलेल्या यमपुरीसारखें दिसूं लागलें. तेथील तो प्रकार पाहून मुनींतील श्रेष्ठ धर्मात्म्या भगवान् वसिष्ठमहर्षीचें मन द्रवलें व त्यानें त्या नरव्याघ्र 'संवरण'-नृपतीला तपतीसह बारा वर्षांनंतर आपल्या नगरींत आणिलें.

त्या नृपश्रेष्ठानें नगरींत पुनः प्रवेश करितांच सहस्राक्ष इंद्रानें त्याच्या राष्ट्रांत पूर्ववत् पर्जन्यवृष्टि केली व हे धनंजया, त्या प्रभूनें पुनः धान्य व तृण उत्पन्न केलें. त्या शुद्धचित्त भूपतीकडून अनुग्रहीत झालेलें तें नगर प्रजाजनांसह आनंदित झालें. त्यानंतर शचीसह जसा इंद्र त्याप्रमाणें तपतीसह त्या नरेंद्रानें बारा वर्षें पुनः यज्ञ केले. हे पार्था, याप्रमाणें ती वैवस्वती, महाभागा तपती तुझी पूर्वजा होती. त्या नृपश्रेष्ठ संवरणापासून तपतीला 'कुरु' हा पुत्र झाला. तुम्ही त्याचे वंशज असल्यामुळें मीं तुला 'तापत्य' असें म्हटलें. १. ११.१७३.

अध्याय १७४ वा.

[१ वसिष्ठाचा संक्षिप्त वृत्तान्त व पांडवांस पुरोहित करण्याविषयीं उपदेश.]

(१) वैशंपायन—हे जनमेजय-नृपेंद्रा, गंधर्वाचें तें वचन परम भक्तीनें ऐकून अर्जुन पूर्णचंद्राप्रमाणें शोभला. त्याला वसिष्ठ-महर्षींच्या तपःसामर्थ्याचें अतिशय कौतुक वाटलें व तो कुरुश्रेष्ठ धनुर्धर पार्थ गंधर्वाला म्हणाला—"हे गंधर्वराज, तूं ज्या 'वसिष्ठ'-नांवाच्या ऋषीचा उल्लेख केलास, त्या श्रेष्ठ ऋषीचा वृत्तान्त ऐकण्याची माझी इच्छा आहे. तो मला सविस्तर सांग. आमच्या पूर्वजांचा पुरोहित असलेला हा ऋषिश्रेष्ठ कोणाचा कोण, हें मला कथन कर."

राजा, महापराक्रमी पार्थाचा हा प्रश्न ऐकून तो गंधर्वपति म्हणाला—"हे कौंतेया, वसिष्ठमहर्षि ब्रह्मदेवाचा मानसपुत्र असून देवी अरुंधतीचा पति आहे. देवांनाहि अजिंक्य असलेले जे काम व क्रोध यांना त्यानें आपल्या तपोबलानें निःशेष जिंकलें आहे. त्यामुळें ते दोघेहि या महर्षींच्या चरणांचें नित्य संवाहन करीत असतात. याप्रमाणें इंद्रियांना वश करणारा म्हणून त्यास 'वासिष्ठ' असें म्हणतात. विश्वामित्रानें घोर अपराध केला असतांहि त्या उदारबुद्धि महर्षीनें क्रोधाचें निवारण केलें व कुशिकवंशाचा उच्छेद केला नाहीं. शंभर पुत्रांच्या नाशामुळें संतप्त झालेला वसिष्ठ समर्थ असूनहि एखाद्या दुर्बलाप्रमाणें शांत राहिला.

विश्वामित्रानें आपला पुत्रशतवधरूप अपराध केला असूनहि त्यानें त्याच्या नाशासाठीं दारुण कर्म आचरिलें नाहीं. महासागर आपल्या मर्यादेचें जसें उल्लंघन करीत नाहीं, त्याप्रमाणें आपल्या मृत पुत्रांना यमलोकांतून परत आणण्यास समर्थ असूनहि, त्यानें कृतान्ताची मर्यादा उल्लंघिली नाहीं. या जितेंद्रिय महा-

त्याला पुरोहित करून इक्ष्वाकुकुलांतील राजे या सर्व पृथ्वीचे अतिपति झाले व त्यांनीं अनेक यज्ञ केले. त्या श्रेष्ठ ऋषीनेंहि त्या सर्व नृपतिश्रेष्ठांकडून मोठमोठे याग करविले. देवपुरोहित बृहस्पति देवांकडून जशीं अनेक धर्मकार्यें करवितो, त्याचप्रमाणें या ब्रह्मर्षीनें सूर्यवंशीय भूपालांकडून मोठमोठीं धर्मकार्यें करविलीं व त्यामुळें त्या वंशाचें परम कल्याण झालें. यास्तव हे पांडवश्रेष्ठा, तूंहि धर्मपरायण, वेदधर्मज्ञ, गुणवान् व धर्मकार्यांत अत्यंत निष्णात, असा कोणी ब्राह्मण आपला पुरोहित कर.

हे पार्था, पृथ्वीला जिंकण्याची इच्छा करणाऱ्या कुलीन क्षत्रियानें राज्याच्या अभिवृद्धीसाठीं प्रथम उत्तम पुरोहित करावा, असें धर्मज्ञांचें मत आहे. पृथ्वीला जिंकण्याची इच्छा करणाऱ्या राजानें ब्राह्मणाला आपला अग्रेसर करावें. यास्तव हे वीरांनो, तुम्ही विद्वान्, गुणवान्, जितेंद्रिय आणि धर्म, काम व अर्थ या तिन्ही पुरुषार्थांचें तत्त्व जाणणारा असा एखादा पुरोहित करा." १. ११. १७४.

अध्याय १७५ वा.

[१ वसिष्ठ व विश्वामित्र यांच्या विरोधाचें कारण.]

(१) **वैशंपायन**—हे पारिक्षिता, गंधर्वाचें तें भाषण ऐकून बुद्धिमान् पार्थानें पुनः प्रश्न केला—"हे गंधर्वा, पवित्र आश्रमांत रहाणारा वसिष्ठ व विश्वामित्र या दोघां मुनींमध्यें कोणत्या कारणानें वैर उत्पन्न झालें, तो सर्व वृत्तान्त मला सांग."

गंधर्व म्हणाला—हे पार्था, हें वसिष्ठाचें पुरातन आख्यान सर्व लोकांमध्यें प्रसिद्ध आहे, तेंच मी तुला सविस्तर सांगतों. हे भरतश्रेष्ठा, कान्यकुब्ज देशांत कुशिकराजर्षीचा गाधी या नांवाचा एक पुत्र प्रसिद्ध राजा होता. त्या धर्मात्म्याचा बल व वाहनें यांनीं समृद्ध असा विश्वामित्र-नांवाचा रिपुनाशक पुत्र होऊन गेला. एकदा तो गहन वनांत अमात्यांसह मृगयेस गेला. तो अनेक हरिणें व वराह यांस वेध करीत अल्प जलानें युक्त असलेल्या 'मरु'-संज्ञक प्रदेशांत फिरत असतां श्रान्त होऊन अतिशय तृषा लागल्यामुळें वसिष्ठ मुनीच्या आश्रमास आला.

आपल्या आश्रमांत आलेल्या त्या नृपतीला पाहून पूज्यांची पूजा करणाऱ्या वसिष्ठानें नरश्रेष्ठ विश्वामित्राचा पाद्य, अर्घ्य व स्वागत यांच्या योगानें सत्कार केला. विश्वामित्रानेंहि वन्य हवीनें केलेल्या त्याच्या सत्काराचा स्वीकार केला.

त्या महात्म्या वसिष्ठाची सर्व कामना पूर्ण करणारी एक कामधेनु होती. ती इच्छेप्रमाणें सर्व कामांचें दोहन करीत असल्यामुळें वसिष्ठानें तिला 'या राजाची सर्व कामना पूर्ण कर, याला व याच्या अमात्यादि सर्व परिवाराला जें जें इष्ट असेल तें तें दे,' असें सांगितलें.

तेव्हां त्या धेनूनें ग्रामांतील व अरण्यांतील औषधि, दुग्ध, अमृतासारखें षड्रस अन्न, उत्तम रसायन, भक्ष्य, भोज्य, पेय, लेह्य व चोष्य असें विविध अन्न, उंची रत्नें, नाना प्रकारचीं वस्त्रें व इतर सर्व इष्ट पदार्थ त्यांस अर्पण केले. त्यामुळें तो राजा अमात्य व सैन्य यांसह अतिशय संतुष्ट झाला. त्या अरण्यांतहि राजाचे सर्व मनोरथ पूर्ण झाले.

ती कामधेनु नंदिनी मस्तक, मान, कटिप्रदेश, गळ्याखालची पोळी, पृष्ठभाग व नासिका या सहा प्रदेशीं उन्नत होती. तिच्या कुशी व मांड्या पुष्ट होत्या. तिचें ललाट, दोन कान व दोन नेत्र दीर्घ होते. तिचे नेत्र मंडूकाच्या नेत्रांप्रमाणें बटबटीत व ओटी अतिशय पुष्ट होती. तिच्या पुच्छाचा गोंडा सुंदर असून कान शंकूसारखे अणकुचीदार, शृंगें रमणीय आणि मान व मस्तक पुष्ट व दीर्घ होतीं. अशा सर्व शुभ लक्षणांनीं युक्त असलेल्या त्या धेनूला पाहून गाधिपुत्र विश्वामित्राला अतिशय संतोष झाला.

असली सुलक्षणी गाय आपल्यापाशीं असावी, असें त्याला वाटलें व तो वसिष्ठ महर्षीपाशीं येऊन म्हणाला—" हे ब्रह्मन्, ही तुझी नंदिनी धेनु मला दे. हिच्या स्थानीं मी तुला दहा कोटि गायी, किंवा तुझी इच्छा असेल तर सर्व राज्यहि अर्पण करितों. हे महामुने, तूं मला एक नंदिनी गाय देऊन माझ्या सर्व राज्याचा उपभोग घे."

अर्जुना, त्या लुब्ध राजाचें हें भाषण ऐकून वसिष्ठ त्यास म्हणाला—"हे निष्पाप राजा, देवता, अतिथि व पितर यांचीं कार्यें व माझ्या यजमानांचें याजन यांच्या उपयोगी असलेली ही नंदिनी, मला तुझें राज्य घेऊनहि देतां येण्यासारखी नाहीं. तूं तिचा लोभ धरूं नको."

महर्षीचें हें वचन ऐकून क्रुद्ध झालेला विश्वामित्र त्यास म्हणाला—मी क्षत्रिय आहें आणि तूं तप व स्वाध्याय या साधनांनीं युक्त असलेला ब्राह्मण आहेस. तुझ्यासारख्या अति शांत व संतुष्ट चित्त ब्राह्मणामध्यें वीर्य कोठचें असणार? दहा कोटि गायी घेऊनहि जर तूं मला इष्ट असलेली ही गाय न देशील तर मी आपला स्वधर्म सोडणार नाहीं. बलात्कारानें या गायीला घेऊन जाईन.

तें ऐकून वसिष्ठमुनि शांत चित्तानें त्यास म्हणाला—तूं स्वसामर्थ्यामध्यें स्थित असलेला राजा व बाहूमध्यें ज्याचें वीर्य असतें, असा क्षत्रिय आहेस. यास्तव तुझी जशी इच्छा असेल तसें सत्वर कर. त्याविषयीं मनांत मुळींच शंका धरूं नकोस.

पार्था, वसिष्ठाचें हें भाषण ऐकून विश्वामित्रानें हंस व चंद्र यांप्रमाणें शुभ्र वर्ण असलेल्या त्या नंदिनी धेनूला बलात्कारानें हरण करण्याचा यत्न चालविला. प्रतोद व दंड यांचे निर्दयपणें प्रहार करून राजसेवक तिला आश्रमांतून नेऊं लागले. तेव्हां वसिष्ठाच्या त्या कल्याणी नंदिनीनें हंबरडा फोडला आणि त्या क्रूर राजसेवकांच्या हातून निसटून ती वसिष्ठऋषीच्या समीप येऊन त्याच्याकडे पहात उभी राहिली. ते दुष्ट राजसेवक तिला अतिशय ताडन करीत असतांहि ती आश्रमांतून बाहेर गेली नाहीं.

आपल्या प्रिय नंदिनीचे ते क्लेश पाहून मनांत दुःखानें कळवळलेला ऋषि आपल्याकडे दीन दृष्टीनें पहात असलेल्या त्या धेनूला म्हणाला—"हे भद्रे, हंबरणाऱ्या तुझा ध्वनि माझ्या श्रोत्रेंद्रियाला विदीर्ण करीत आहे. हे पूज्य नंदिनि, विश्वामित्र तुला बलात्कारानें नेत आहे त्याला मी काय करूं? मी क्षमावान् ब्राह्मण आहें."

अर्जुना, ऋषीचें हें भाषण ऐकून विश्वामित्राच्या व सैन्याच्या भीतीनें उद्विग्न झालेली ती नंदिनी वसिष्ठमुनीच्या समीप जाऊन म्हणाली—"हे भगवन्, विश्वामित्राच्या घोर सैनिकांनीं मला चाबकाच्या वाद्या व दंड यांनीं अतिशय ताडन केल्यामुळें अनाथाप्रमाणें आक्रोश करणाऱ्या माझी तूं उपेक्षा कां बरें करीत आहेस?"

हे पार्था, याप्रमाणें नंदिनी हंबरडा फोडीत असतांहि तो महामुनि क्षुब्ध झाला नाहीं. तो व्रतस्थ मुनि धैर्यापासून ढळला नाहीं. उलट नंदिनीला म्हणाला—"हे माते, क्षत्रियांचें तेज हें बल आहे व ब्राह्मणांचें क्षमा हें बल आहे. या राजानें एवढा घोर अपराध केला असतांहि क्षमेचा त्याग करावा, असें मला वाटत नाहीं. यास्तव तुझी इच्छा असेल तर जा."

वसिष्ठाचें हें संदिग्ध वचन ऐकून त्याचा आशय स्पष्ट समजून घेण्यासाठीं, ती पुनः म्हणाली—"हे पूज्य महर्षे, तूं असें बोलत आहेस, त्यावरून तूं माझा

१ क्षमावान् ब्राह्मणो ह्यहम्। २ क्षत्रियाणां बलं तेजो ब्राह्मणानां क्षमा बलम्॥

त्याग केलास, असें मी समजूं कीं काय? कारण तूं जर माझा त्याग केला नसशील तर हे क्षमाशील ब्राह्मणा, हा दुष्ट राजा मला बलात्कारानें केव्हांहि नेऊं शकणार नाहीं. हें मी तुला सत्य सांगतें."

तेव्हां वसिष्ठ मोठ्या आदरानें म्हणाला—"हे पूज्य जननि, नाहीं; मीं तुझा त्याग केलेला नाहीं. तुला जर शक्य असेल तर तूं येथें खुशाल रहा. हे सैनिक तुझ्या या वत्साला दृढ दाव्यानें बांधून ओढून नेत आहेत. पहा."

हे कौंतेया, वसिष्ठाच्या तोंडून 'तूं खुशाल रहा' हे शब्द निघतांच ती समर्थ पयस्विनी अतिशय क्रुद्ध झाली. तिचें सर्वांग रोमांचित झालें. ती उग्र दिसूं लागली. नेत्र लाल करून तिनें भयंकर हंबरडा फोडला. तिचें तें उग्र स्वरूप व मेघगर्जनेसारखा भयंकर ध्वनि ऐकून विश्वामित्राचें सैन्य चोहोंकडे पळूं लागलें.

याप्रमाणें त्या समर्थ कामधेनूनें त्याच्या सैन्यास जरी पळविलें, तरी कांहीं शूर सैनिक तिला चाबकाच्या वाद्या व दंड यांच्या प्रहारांनीं आश्रमाच्या बाहेर नेण्याचा प्रयत्न करूं लागले. तेव्हां ती अधिकच चवताळली. क्रोधानें तिचें शरीर ग्रीष्म ऋतूंतील मध्याह्नकालीन सूर्याप्रमाणें प्रदीप्त झालें. ती आपल्या पुच्छाग्रापासून खरखीत निखाऱ्यांचा भयंकर वर्षाव करूं लागली.

तिनें आपल्या पुच्छापासून पल्हव, ओटीपासून द्राविड व शक, योनीपासून यवन, गोमयापासून अनेक शबर, गोमूत्रापासून विशिष्ट जातीचे भिल्ल, दोन्ही कुशींपासून पौण्ड्र, किरात, यवन, बर्बर, सिंहल, खस, हनुवटीपासून पुलिंद, चीन, केरलांसह हूण आणि फेंसापासून अनेक जातीचे म्लेच्छ उत्पन्न केले. त्या अद्भुत नंदिनीनें आपल्या निरनिराळ्या अंगांपासून उत्पन्न केलेल्या या म्लेच्छ सैन्यानें विश्वामित्राच्या सैन्यावर त्याच्या समक्ष चाल केली आणि विचित्र चिलखतांनीं आच्छादित झालेल्या व अनेक आयुधें धारण करणाऱ्या त्या म्लेच्छ वीरांनीं अतिशय क्षुब्ध होऊन आयुधांचा वर्षाव केला.

विश्वामित्राच्या एकेका योद्ध्याला पांच पांच किंवा सात सात योद्ध्यांनीं वेढलें. त्यांच्या भयंकर अस्त्रवृष्टीनें छिन्न-भिन्न होणारें विश्वामित्राचें सैन्य त्याच्या समक्ष भयभीत होऊन सर्वतः पराभूत झालें. पण वसिष्ठाच्या या क्रुद्ध झालेल्या म्लेच्छ वीरांनीं विश्वामित्राच्या एकाहि सैनिकाचा वध केला नाहीं. केवळ त्या सर्वांना भिववून पळावयास लाविलें.

धनंजया, याप्रमाणें त्या धेनूनें आपल्या अचिन्त्य सामर्थ्यानें विश्वामित्राच्या सैन्याला वसिष्ठाच्या तपोवनापासून तीन योजनें दूर पिटाळून लाविलें असतां भयानें उद्विग्न झालेलें तें राजसैन्य भयंकर आक्रोश करूं लागलें. पण त्या वेळीं त्याचें रक्षण करण्यास कोणीहि समर्थ झालें नाहीं.

ब्रह्मतेजापासून उत्पन्न झालेलें हें महदाश्चर्य पाहून विश्वामित्र आपल्या क्षत्रियत्वाला कंटाळला. तो म्हणाला—"क्षेत्रियांच्या या तुच्छ बलाला धिक्कार असो. ब्रह्मतेज हेंच खरें बल आहे." याप्रमाणें बलाबलाचा विचार करून 'तप हेंच श्रेष्ठ बल आहे' असा त्याचा निश्चय झाला. त्याबरोबर आपलें तें विस्तीर्ण राज्य व ती दिप्त राजश्री यांचा त्याग करून व सर्व विषयोपभोगांना दूर सारून त्यानें आपलें मन तपामध्यें स्थिर केलें. तो निश्चयी राजा दीर्घकालानें तपःसिद्धीला प्राप्त झाला. आपल्या तेजानें सर्व लोकांना व्यापून त्या अति ओजस्वी विश्वामित्रानें सर्वांना संतप्त केलें व तो महात्मा ब्राह्मणत्वास प्राप्त झाला आणि त्या कुशीकनंदनानें इंद्रासह सोमपान केलें. १. ११. १७५.

अध्याय १७६ वा.

[१ कल्माषपादाचा वृत्तांत. २ त्याला शक्तीचा शाप. ३ ब्राह्मणाचा शाप. ४ वसिष्ठपुत्रांचा नाश.]

(१) वैशंपायन—हे भरतसत्तमा, त्या गंधर्वानें याप्रमाणें वसिष्ठ-विश्वामित्रांची कथा सांगितल्यावर कल्माषपादाचें आख्यान सांगण्यास आरंभ केला. तो म्हणाला—"हे रणधुरंधर पार्था, पूर्वी इक्ष्वाकुवंशांत 'कल्माषपाद्'-नांवाचा एक राजा होऊन गेला. या भूलोकीं त्या नृपतीसारखा तेजस्वी दुसरा कोणीहि राजा नव्हता.

एकदा तो राजा आपल्या नगरींतून मृगयेसाठीं एका वनांत गेला. त्या महा घोर वनांत अनेक हरिणें व वराह यांना वेध करीत फिरत असतांना त्यानें असंख्य गेंड्यांचा वध केला. शेवटीं दीर्घकाल मृगया करून श्रांत झालेला तो राजा तेथून परत फिरला. या भूपालाकडून आपण यज्ञ करवावा अशी प्रतापी विश्वामित्राची मनीषा होती. तो क्षुधा व तृषा यांनीं व्याकुळ झालेला राजा परत

---

१ धिग्बलं क्षत्रियबलं ब्रह्मतेजोबलं बलम् । बलाबले विनिश्चित्य तप एव परं बलम् ॥

चालला असतां एकच मनुष्य जाऊं शकेल अशा एका अतिशय अरुंद मार्गांत आला. तों त्यानें महात्म्या वसिष्ठपुत्राला समोरून येतांना पाहिलें. तो वसिष्ठाच्या शंभर पुत्रांपैकीं 'शक्ति'-नांवाचा सर्वांत ज्येष्ठ पुत्र होता. तो महातपस्वी होता.

त्याला पाहून कल्माषपाद राजा म्हणाला—हे ब्राह्मणा, मला मार्ग दे. माझ्या मार्गांतून दूर हो. तेव्हां ऋषीनें मधुर वाणीनें त्याचें सांत्वन करीत म्हटलें—"हे महाराज, हा माझा मार्ग आहे, कारण जोंवर ब्राह्मण पुढें आला नाहीं तोंवरच राजानें एखाद्या मार्गानें जावें व ब्राह्मण पुढें आला असतां राजानें त्याला वाट देऊन त्याच्या मागून आपण जावें, हा सनातन धर्म आहे. यास्तव तूंच बाजूला हो."

याप्रमाणें ते दोघेहि परस्परांस 'दूर हो, दूर हो,' असें बोलूं लागले. परंतु धर्ममार्गांत स्थित असलेला तो ऋषि आपल्या जागेवरून हलला नाहीं.

(२) राजन्, तेव्हां कल्माषपाद मार्ग न सोडणाऱ्या त्या ऋषीपाशीं आला व क्रोधानें मोहित झालेल्या त्या बलाढ्य राजानें ऋषीला चाबकानें एखाद्या राक्षसाप्रमाणें ताडन केलें. त्यामुळें क्रोधानें देहभान विसरलेल्या वसिष्ठपुत्रानेंहि त्या पृथ्वीपतीला शाप दिला—"हे दुष्टा, ज्याअर्थी तूं मज तापसावर राक्षसासारखा प्रहार करीत आहेस, त्याअर्थी तूं नरभक्षक राक्षस होशील व हे अधम राजा, आजपासून तूं नरमांसाच्या आसक्तीनें या पृथ्वीतलावर भ्रमण करशील; जा आतां." असें त्या महा सामर्थ्यवान् शक्तिमुनीनें त्याला म्हटलें. याप्रमाणें विश्वामित्रानें आपल्या विद्याबलानें वसिष्ठपुत्र शक्ति आणि कल्माषपादराजा यांच्यामध्यें वैर उत्पन्न केलें व त्या राजर्षीनें यज्ञ करणाऱ्या राजाचा जेव्हां अंगीकार केला तेव्हां वसिष्ठ व विश्वामित्र यांमध्येंहि वैर उत्पन्न झालें.

अर्जुना, वर सांगितल्याप्रमाणें ते दोघे आपसांत वाद करीत असतांना उग्र तपस्वी प्रतापवान् विश्वामित्र ऋषि तेथें आला व त्याच्या तोंडून त्या श्रेष्ठ राजानें 'वसिष्ठाप्रमाणेंच तेजस्वी असलेला हा मुनि त्याचाच पुत्र आहे' असें ऐकिलें. तेव्हां त्याच्यापाशीं आलेला विश्वामित्र राजर्षि तेथेंच गुप्त राहिला व आपलें प्रिय करण्याची इच्छा करणाऱ्या त्यानें त्या दोघांचेंहि अतिक्रमण केलें. शक्तीनें शाप दिला असतां त्याला प्रसन्न करण्यासाठीं कल्माषपाद त्याला सत्कारपूर्वक शरण जात आहे, असें पाहून विश्वामित्रानें त्या राजाच्या शरीरांत एका राक्षसाचा प्रवेश करविला.

विप्रर्षीच्या शापानें व विश्वामित्राच्या आज्ञेनें 'किंकर' या नांवाचा राक्षस राजाच्या शरीरांत शिरला. याच्या शरीरांत राक्षसानें प्रवेश केला आहे, असें पाहून विश्वामित्र तेथून निघून गेला. अंगांत शिरलेल्या राक्षसानें अत्यंत पीडा दिल्यामुळें त्या इक्ष्वाकुकुलोत्पन्न राजालाहि कर्तव्याकर्तव्याचें भान राहिलें नाहीं.

(३) अर्जुना, एकदा वनांतून फिरत असलेल्या त्या राजाला क्षुधेनें व्याकुळ झालेल्या एका ब्राह्मणानें पाहिलें व त्याच्यापाशीं मांसयुक्त भोजनाची याचना केली. तेव्हां मित्रावर उपकार करणारा तो राजर्षि त्या ब्राह्मणास म्हणाला—"हे विप्रा, तूं कांहीं वेळ येथेंच माझी वाट पहात बैस. मी परत आलों, म्हणजे तुला इष्ट भोजन देईन."

इतकें बोलून राजा पुढें निघून गेला व तो ब्राह्मणश्रेष्ठ तेथेंच त्याची वाट पहात राहिला. त्यानंतर बराच वेळ वनांत यथेच्छ संचार करून तो उदार राजा आपल्या अंतःपुरांत परत आला. मध्यरात्रीच्या सुमारास 'एका ब्राह्मणाला मी आज मांसयुक्त भोजन देण्याचें अभिवचन दिलें आहे' हें त्यास आठवलें. तेव्हां त्यानें आपल्या बल्लवाला सत्वर बोलावून आणलें व त्यास म्हटलें—"हे सूदा, या वनांत एक अन्नार्थी ब्राह्मण माझी वाट पहात बसला आहे, त्याला मांसयुक्त अन्न सत्वर नेऊन दे. जा, उशीर लावूं नको."

पार्था, राजाची अशी आज्ञा होतांच तो स्वयंपाकी अन्न सिद्ध करण्याकरितां गेला. परंतु त्या वेळीं त्याला मांस कोठेंहि मिळेना. तेव्हां त्यानें खिन्न होऊन राजाला तसें निवेदन केलें. पण राजाच्या शरीरांत राक्षसानें प्रवेश केलेला असल्यामुळें त्याला त्याबद्दल कांहींच खेद वाटला नाहीं. उलट तो त्या सूदाला म्हणाला—"हरकत नाहीं, इतर मांस मिळत नसलें तर नरमांस घेऊन ये आणि त्या ब्राह्मणाला जेऊं घाल."

तेव्हां 'ठीक आहे' असें बोलून तो मनुष्यवध करणाऱ्या लोकांकडे गेला व त्यांच्यापासून नरमांस घेऊन आला. त्या मांसाचे विविध पदार्थ बनवून त्यानें तें अन्न त्या क्षुधार्त तपस्वी ब्राह्मणाला नेऊन दिलें.

त्या ब्राह्मणानें आपल्या दिव्य दृष्टीनें तें अन्न पाहिलें व हें आपल्याला अभोज्य आहे, असें जाणून तो श्रेष्ठ ब्राह्मण संतप्त झाला आणि नेत्र लाल करून म्हणाला—"ज्याअर्थी तो अधम राजा मला हें अभोज्य अन्न देत आहे, त्याअर्थी तोच नरमांसावर आसक्त होईल आणि पूर्वी शक्तिमुनीनें म्हटल्यांप्रमाणें तो या पृथ्वीतलावर सर्व प्राण्यांना भयप्रद होऊन भ्रमण करीत राहील."

(४) धनंजया, याप्रमाणें शक्ति व ब्राह्मण या दोघांनीं राजाला एकसारखाच शाप दिल्यामुळें त्या शापाचें सामर्थ्य वाढलें व त्या भूपालाच्या अंगांत राक्षसाच्या बलाचा संचार होऊन तो मूर्च्छित होऊन पडला. त्यानंतर कांहीं कालानें राक्षसानें ज्याचीं इंद्रियें आपल्या स्वाधीन करून घेतलीं आहेत अशा त्या राजाला शक्तिमुनि भेटला असतां त्यानें त्याला म्हटलें—"हे मुने, ज्याअर्थी तूं मला असा अयुक्त शाप दिला आहेस, त्याअर्थी मी तुझ्यापासूनच मनुष्यभक्षणाला आरंभ करितों."

अर्जुना, असें बोलून त्यानें तत्काल शक्तिमुनीचा वध केला व व्याघ्र जसा पशूला फाडून खातो, तसें त्यानें त्या ऋषीला भक्षण केलें. शक्ति मृत झालेला पहातांच विश्वामित्रानें वसिष्ठाचेच पुत्र खाण्याविषयीं त्या राक्षसाला पुनः पुनः उपदेश केला. तेव्हां क्रुद्ध झालेला सिंह जसा दीन हरिणांना खातो, त्याप्रमाणें त्या राक्षसानें शक्तीच्या सर्व कनिष्ठ भ्रात्यांना भक्षण केलें.

हे कौंतेया, विश्वामित्रानें आपल्या सर्व पुत्रांचा नाश करविल्याचें ऐकून, मेरुपर्वत पृथ्वीला जसा धारण करतो, त्याप्रमाणें वसिष्ठ-महर्षीनें तो असह्य पुत्रशोक सहन केला. शेवटीं त्या श्रेष्ठ मुनीनें आत्महत्या करण्याचें योजिलें. परंतु त्या बुद्धिमानांतील श्रेष्ठ व क्षमाशील महात्म्यानें विश्वामित्राचा उच्छेद करण्याचें मनांतहि आणलें नाहीं.

त्या भगवान् ऋषीनें मेरुपर्वताच्या शिखरावरून स्वतःचा देह खालीं सोडून दिला. परंतु हे पांडुनंदना, त्या भृगुपातानेंहि तो मरण पावला नाहीं. कापसाच्या राशीवर जसें पडावें, त्याप्रमाणें तो त्या पर्वताच्या शिळेवर पडला. त्यानंतर भगवान् वसिष्ठानें त्या महावनांतील प्रदीप्त अग्नींत प्रवेश केला. परंतु हे पार्था, त्या प्रदीप्त अग्नीनेंहि त्याला दग्ध केलें नाहीं. उलट तो देदीप्यमान अग्निहि शीतल झाला. तेव्हां त्या शोकाकुल महामुनीनें आपल्या कंठांत एक मोठी शिला बांधून समुद्रांत उडी घेतली. पण समुद्राच्या लाटांच्या वेगानें तो महर्षि तीरावर येऊन पडला. तेव्हां अनेक उपायांनींहि आपल्याला मरण येत नाहीं, असें पाहून तीव्र व्रत धारण करणारा मुनि खिन्न होऊन आपल्या आश्रमाकडे परत निघून गेला. १. ११. १७६.

अध्याय १७७ वा.

[१ वसिष्ठाच्या अनुग्रहानें कल्माषपादाच्या शापाची निवृत्ति व अपत्यप्राप्ति.]

(१) गंधर्व म्हणाला—हे पृथापुत्रा, वसिष्ठ आपल्या आश्रमास परत आला खरा, पण आपलें आश्रमस्थान पुत्ररहित आहे, असें पाहून त्याला अतिशय दुःख झालें व तो मुनि पुनः तेथून निघाला. त्या वेळीं वर्षाकाल होता. त्यामुळें त्याला नूतन जलानें तुडुंब भरलेली एक नदी लागली. ती आपल्या ओघानें तीरावरील अनेक वृक्ष समूळ उपटून त्यांना वाहून नेत होती. दुःखानें व्याकुळ झालेला तो मुनि आपण या अगाध जलांत देहत्याग करावा असा विचार करूं लागला.

पूर्वीप्रमाणेंच आपण पुनः तीरावर येऊन पडूं नये, म्हणून त्यानें आपले हात, पाय इत्यादि सर्व अवयव पाशांनीं बांधून टाकले व त्या महानदीच्या प्रवाहांत उडी घेतली. पण हे जिष्णो, काय चमत्कार सांगावा! त्या नदीनें त्याचे पाश तोडून मुनीला तीरावर आणून सोडिलें. तें पाहून वसिष्ठ मुनीनें आपल्याला पाशरहित करून परतीरावर आणून स्थिर करणाऱ्या त्या नदीला विपाशा म्हणजे पाशमुक्त करणारी असें नांव दिलें.

याप्रमाणें प्राणनाशाचे सर्व प्रयत्न व्यर्थ झाल्यामुळें तो महामुनि अत्यंत शोकाकुल झाला आणि एकाच ठिकाणीं न रहातां पर्वत, नद्या व सरोवरें इत्यादि प्रदेशांतून संचार करीत फिरूं लागला. तेथें त्या ऋषीला हिमालयांतून वेगानें वहाणारी भीमानदी लागली. भयंकर मकरांनीं व्याप्त असलेल्या त्या नदीचें विस्तृत पात्र पाहून त्या महर्षीनें त्यांत उडी घेतली. तेव्हां ती नदी हा ऋषि साक्षात् अग्नीसारखाच आहे, असें समजून आपला शतधा विभाग करून वाहूं लागली. तेव्हांपासून ती ‘ शतद्रु ’ म्हणजे शंभर मार्गानें जाणारी, या नांवानें प्रसिद्ध झाली.

वसिष्ठ मुनीनें स्वतःला भूमीवरच असलेलें जेव्हां पाहिलें तेव्हां आपल्याला मरण येणें शक्य नाहीं, असें मानून तो आपल्या आश्रमाकडे परतला व पुनः अनेक पर्वत व विविध देश पहात फिरूं लागला. तो वेड्याप्रमाणें फिरत आहे असें पाहून ‘ अदृश्यंती ’–नांवाची त्याची सून त्याच्या मागोमाग निघाली.

त्यावेळीं वसिष्ठ-मुनीनें आपल्या मागून येत असलेला षडंगयुक्त व अर्थपूर्ण वेदाध्ययनाचा ध्वनि ऐकिला. तेव्हां ‘माझ्या मागून हें कोण येत आहे’ असा

त्यानें प्रश्न केला. त्यावर 'हे भगवन्, मी अदृश्यंती आहें' असें ती महातपस्वीनी शक्तिमुनीची भार्या बोलली. आपल्या स्नुषेचें तें उत्तर ऐकून वसिष्ठ म्हणाला—" वत्से, हा सांग वेदाध्ययनाचा ध्वनि कोणाचा असावा बरें ! पूर्वी माझ्या शक्तीचा अशाप्रकारचा सांग वेदाध्ययनाचा ध्वनि मीं ऐकला होता."

अदृश्यंती म्हणाली—हे महाभागा, शक्तीपासून मीं गर्भ धारण केला आहे, तो आज माझ्या उदरांतच बारा वर्षें वेदांचा अभ्यास करीत आहे.

धनंजया, आपल्या ज्येष्ठ स्नुषेचें हें भाषण ऐकतांच तो श्रेष्ठ वसिष्ठ-ऋषि परम संतुष्ट झाला. 'आपली कुलवृद्धि करणारें संतान आहे' असें बोलून तो आत्मघातापासून निवृत्त झाला. नंतर मृत्यूचा प्रयत्न सोडून शांत झालेला तो महर्षि आपल्या स्नुषेसह चालला असतां त्याला घोर वनांत बसलेला कल्माषपाद दिसला. हे कुंतीपुत्रा, तो राजा या मुनीला पहातांच क्रुद्ध होऊन उठला व राक्षसाचा ज्यामध्यें आवेश झाला आहे, असा तो राजा मुनीला खावयास धांवला.

तेव्हां त्या क्रूर कर्में करणाऱ्या राक्षसाला पुढें पाहून अदृश्यंती भयभीत झाली व सद्गदित वाणीनें बोलली—"हे भगवन्, हातांत दंड घेतलेल्या साक्षात् मृत्यूप्रमाणेंच हा भयंकर राक्षस हातांत काठी घेऊन येत आहे. त्याचें निवारण करण्यास तुझ्यावांचून या लोकीं दुसरा कोणीहि समर्थ नाहीं. हे वेदवेत्त्यांतील श्रेष्ठा, या भयंकर पाप्यापासून माझें रक्षण कर. खरोखर हा राक्षस आम्हांला खाण्याची इच्छा करीत आहे."

तें ऐकून क्षमावान् वसिष्ठ तिला धीर देत म्हणाला—वत्से, भिऊं नको. या राक्षसापासून आपल्याला मुळींच भय नाहीं. कारण तूं ज्याला आपल्या पुढें पहात आहेस, तो खरा राक्षस नसून पृथ्वीवर प्रसिद्ध असलेला वीर्यवान् राजा कल्माषपाद आहे. तो या वनांत अति भीषण राक्षस होऊन राहिला आहे.

हे पांडवा, इतक्यांत तो राक्षस आपल्या अंगावर चाल करून येत आहे असें पाहून त्या तपस्वी वसिष्ठ महर्षीनें नुसत्या हुंकारानेंच त्याचें निवारण केलें आणि मंत्रानें पवित्र केलेल्या जलाचें सिंचन करून आपल्या योगसामर्थ्यानें त्या नृपश्रेष्ठाला शापापासून मुक्त केलें.

पार्था, पर्वकालीं राहु जसा सूर्याला ग्रासतो, त्याप्रमाणें वसिष्ठपुत्र शक्तीच्या तेजानें तो बारा वर्षें ग्रस्त होऊन राहिला होता. पण वसिष्ठाच्या तपःसामर्थ्यामुळें राक्षस त्याच्या शरीरांतून जेव्हां निघून गेला तेव्हां सूर्य संध्याकालीन अभ्राला

जसा रंजित करितो, त्याप्रमाणें त्या कल्माषपादराजानें त्या महद्वनाला आपल्या तेजानें शोभविलें.

तो नृपति देहभानावर आला आणि वसिष्ठ ऋषीला वंदन करून, हात जोडून म्हणाला—हे महाभागा, मी सुदासराजाचा पुत्र कल्माषपाद आहें. तुझा याज्य आहें. यावेळीं मी तुझें कोणतें प्रिय करूं तें सांग.

तें ऐकून मुनिश्रेष्ठ वसिष्ठ म्हणाला—हे भूपाला, तुझ्या शरीरांत राक्षसानें प्रवेश केल्यामुळें तूंच माझ्या शंभर पुत्रांना भक्षण केलेंस. पण त्याविषयीं मी तुला दोष देत नाहीं. ज्या कालीं जें भवितव्य होतें तें होऊन गेलें. पण यापुढें मात्र माझ्या आज्ञेप्रमाणें तूं वर्तन कर. आतां तूं अयोध्येस जाऊन आपल्या राज्याचें पूर्वीप्रमाणें शासन कर व हे राजेंद्रा, ब्राह्मणांचा अवमान कधींहि करूं नकोस.

वसिष्ठाची ही आज्ञा शिरसा मान्य करून तो म्हणाला—"हे मुने, मी यापुढें ब्राह्मणश्रेष्ठांचा कधींहि अवमान करणार नाहीं. तुझ्या आज्ञेमध्यें स्थित होऊन मी त्यांची उत्तम पूजाच करीन. हे द्विजश्रेष्ठा, ज्याच्या योगानें मी इक्ष्वाकूंच्या ऋणांतून मुक्त होईन असें इष्ट अपत्य तुझ्यापासून प्राप्त करून घेण्याची माझी इच्छा आहे. यास्तव इक्ष्वाकूंच्या कुलवृद्धीसाठीं शील, रूप व गुण यांनीं युक्त असें एक अपत्य तूं मला दे." तें ऐकून त्या सत्यप्रतिज्ञ भगवान् वसिष्ठानें त्या महा धनुर्धर राजाला 'ठीक आहे' असें म्हटलें.

त्यानंतर योग्यकालीं वसिष्ठ त्या राजासह त्रिभुवनांत प्रसिद्ध असलेल्या अयोध्या-नगरीस प्राप्त झाला. आपला राजा आला आहे, हें ऐकून सर्व प्रजेला अतिशय आनंद झाला व देव इंद्राला जसे सामोरे जातात, त्याप्रमाणें वसिष्ठाच्या अनुग्रहानें निष्पाप झालेल्या त्या महात्म्याला सर्व प्रजाजन सामोरे गेले. तेव्हां त्या नरेंद्रानें महर्षि वसिष्ठासह आपल्या पवित्र नगरींत दीर्घ कालानें प्रवेश केला.

अयोध्यानगरींत रहाणाऱ्या लोकांनीं पुरोहितासह आलेल्या त्या भूपालाला उदय पावलेल्या सूर्याप्रमाणें पाहिलें. शरत्समयीं उदय पावलेला चंद्र जसा आकाशाला शोभवितो, त्याप्रमाणें त्या कांतिमान् राजानें आपल्या तेजानें अयोध्येला सुशोभित केलें. ज्यांतील सुंदर मार्गावर चंदनोदकाचा सेक केला आहे व ज्याला गुढ्या, तोरणें यांनीं सुशोभित केलें आहे अशा त्या नगरानें राजाच्या

मनाला आह्लाद दिला. शक्राच्या योगानें जशी अमरावती शोभते, तशी त्या राजाच्या सान्निध्यानें तुष्ट व पुष्ट जनांनीं व्याप्त असलेली अयोध्या अतिशय शोभली.

हे कुरुनंदना, त्या राजर्षि कल्माषपादानें आपल्या उत्तम नगरींत प्रवेश केल्यावर त्याच्या आज्ञेनें त्याची महाराज्ञी महात्म्या वसिष्ठाकडे गेली. तेव्हां त्या महर्षीनें चित्ताची एकाग्रता केली व दिव्य विधीनें तो तिच्याशीं संगत झाला. त्या श्रेष्ठ मुनीपासून तिला गर्भ राहिला. त्यानंतर राजानें अभिवादन केलेला तो वसिष्ठमुनि आपल्या आश्रमास परत गेला.

पुढें दीर्घ काल निघून गेला तरी ती राज्ञी प्रसूत होईना, म्हणून त्या यशस्विनीनें आपल्या उदरावर अश्म्याचे म्हणजे दगडाचे प्रहार केले. तेव्हां बारा वर्षांनंतर तो पुत्र जन्मला. तो 'अश्मक'-नांवानें प्रसिद्ध असून त्यानेंच 'पौद्न्य'-नांवाचें नगर वसविलें. १. ११. १७७.

अध्याय १७८ वा.

[१ शक्तिपुत्र पराशराचा जन्म. २ पराशराचें लोकविनाशापासून निवारण करण्यासाठीं वसिष्ठानें सांगितलेला पूर्वेतिहास.]

(१) गंधर्व म्हणाला—वसिष्ठ ऋषि आपल्या आश्रमास परत आल्यावर आश्रमांत असलेली अदृश्यंती, जणुं काय दुसरा वसिष्ठपुत्र शक्तिच, अशा शक्तीच्या पुत्राला प्रसवली. तेव्हां वसिष्ठमुनीनें आपल्या पौत्राच्या जातकर्मादि क्रिया स्वतः केल्या. अर्जुना, जणुंकाय मृत झालेल्या वसिष्ठाला त्या गर्भस्थ पुत्रानें या लोकीं पुनः प्रस्थापित केलें, म्हणून वसिष्ठानें त्या पौत्राचें 'पराशर' असें नांव ठेविलें.

त्या धर्मात्म्या मुनीनें वसिष्ठालाच आपला जनक पिता मानलें व जन्मापासून तो त्याच्याशीं पित्याप्रमाणें वागूं लागला. तो आपल्या माते समक्ष वसिष्ठ ब्रह्मर्षीला 'हे तात' अशी हाक मारीत असे. तेव्हां हे धनंजया, आपल्या अर्भकाचें तें अर्थपूर्ण मधुर वचन ऐकून अदृश्यंतीचे नेत्र अश्रूंनीं भरून येत. एकदा ती आपल्या प्रिय पुत्राला म्हणाली—"वत्सा, तूं आपल्या पितामहाला 'तात, तात,' असें म्हणूं नकोस. कारण हे बाळा, तुझ्या पित्याला राक्षसानें वनांत खाऊन टाकलें आहे. तूं ज्याला पिता समजतोस, तो तुझा पिता नव्हे. तर हा आर्य तुझ्या यशस्वी पित्याचा जनक आहे."

प्रिय मातेनें असें सांगितलें असतां तो सत्यवक्ता पराशर दुःखानें व्याकुळ झाला व त्या निग्रही मुनीनें सर्व लोकांचा विनाश करण्याचा निश्चय केला. तेव्हां ब्रह्मवेत्त्यांतील श्रेष्ठ व सिद्धांतामध्येंच ज्याची बुद्धि निष्णात आहे, असा मित्रावरुणपुत्र वसिष्ठ आपल्या पौत्राच्या त्या घोर निश्चयाचें निवारण करून त्यास असें हेतुवचन बोलला.

(२) 'हे वत्सा, पूर्वी 'कृतवीर्य'-नांवाचा एक प्रसिद्ध राजा होऊन गेला. तो वेदवेत्त्या भृगूंचा याज्य--यजमान होता. त्या भूपतीनें सोमयागाच्या शेवटीं श्रेष्ठ पदार्थांचा उपभोग घेणाऱ्या आपल्या पुरोहितांस विपुल धन व धान्य यांनीं तृप्त केलें. तो राजसिंह स्वर्गलोकीं गेला असतां त्याच्या कुलांतील राजांना कांहीं कारणानें द्रव्याची फार आवश्यकता भासली. तेव्हां या आपल्या भृगुपुरोहिता-पाशीं पुष्कळ धन आहे, असें जाणून ते सर्व कार्तवीर्य राजे याचना करण्याच्या इच्छेनें त्या भार्गवश्रेष्ठांकडे आले. पण कांहीं भृगुकुलोत्पन्नांनीं आपलें अक्षय धन भूमींत पुरून ठेविलें होतें व कित्येकांनीं क्षत्रियांपासून आपल्याला धनासाठीं त्रास भोगावा लागेल, हें अगोदरच जाणून तें ब्राह्मणांना देऊन टाकिलें होतें. कित्येक भार्गवांनीं कांहीं कारणानें क्षत्रियांना इष्ट असलेलें धन त्यांना दिलें.

तेव्हां एका क्षत्रियानें धनाच्या आशेनें यदृच्छेनें भृगूच्या गृहांत खणण्यास आरंभ केला. त्याला त्यानें पुरून ठेविलेलें धन सांपडलें. त्याबरोबर सर्व क्षत्रिय तेथें जमले व त्यांनीं तें विपुल धन पाहिलें. आपल्या गृहांत इतकें धन असून या ब्राह्मणांनीं तें आपल्याला दिलें नाहीं, म्हणून त्यांना क्रोध आला व शरण आलेल्याहि सर्व भृगुकुलोत्पन्न ब्राह्मणांचा अपमान करून त्या धनुर्धरांनीं तीक्ष्ण बाणांनीं त्यांचा निर्दयपणें नाश केला. गर्भाशयांतील अर्भकांपर्यंत सर्व भृगुवं-शजांचा उच्छेद करीत ते उन्मत्त क्षत्रिय सर्व पृथ्वीवर संचार करूं लागले.

याप्रमाणें भृगूंचा उच्छेद होऊं लागला असतां भृगुवंशजांच्या स्त्रिया भीतीनें दुर्गम हिमालय पर्वताकडे पळून गेल्या. त्यांतील एका ब्राह्मणीनें 'तूं आपल्या गर्भाचें रक्षण कां केलेंस !' असें म्हणून हे दुष्ट क्षत्रिय आपल्यालाहि मारतील या भीतीनें आपल्या गर्भाला एका मांडींत लपवून ठेवलें. आपल्या भर्तृकुलाच्या अभिवृद्धीसाठींच तिनें हें अद्भुत कर्म केलें.

पण भयानें व्याकुळ झालेल्या दुसऱ्या एका ब्राह्मणीनें तिचा मांडींत लपवून ठेवलेला गर्भ पाहून 'तुला हें कपट माहित असतांना तूं आम्हांला कां सांगि-

तळें नाहींस,' असें म्हणून हे दुष्ट राक्षस आपल्यालाहि मारतील या भीतीनें ती क्षत्रियांपाशीं गेली व 'या भृगुस्त्रीनें आपल्या गर्भाला मांडींत लपवून ठेविलें आहे,' असें तिनें त्यांस निवेदन केलें. तेव्हां ते क्षत्रिय त्या गर्भाला मारण्यासाठीं तिच्या अंगावर धावून आले. पण तिच्या समीप येतांच त्यांना ती ब्राह्मणी आपल्या तेजानें देदीप्यमान झालेली दिसली. तो गर्भहि तिच्या मांडीचा भेद करून अकस्मात् बाहेर पडला.

मध्याह्नकालीन सूर्याप्रमाणें आपल्या तेजानें देदीप्यमान असलेल्या त्या गर्भानें त्या क्षत्रियांच्या दृष्टीला दिपवून त्यांना अंध करून सोडिलें. तेव्हां ते त्या पर्वताच्या दऱ्यांतून अडखळत मोठ्या कष्टानें भ्रमण करूं लागले. दृष्टिहीन झालेल्या त्यांचा सर्व दर्प एका क्षणांत उतरला. ते किंकर्तव्यतामूढ झाले व आपल्याला आपली शुभदृष्टि प्राप्त व्हावी म्हणून त्या अनिंद्य ब्राह्मणीला शरण गेले. ते अविवेकी क्षत्रिय त्या महाभागेला म्हणाले—

"हे कल्याणि, ज्यांच्या ज्वाला शांत झाल्या आहेत, अशा अग्नीप्रमाणें दृष्टिहीन झालेले आम्ही दुःखानें अतिशय व्याकुल झालों आहों. हे साध्वि, तुझ्या कृपाप्रसादानें आम्ही दृष्टियुक्त होऊन येथून निघून जाऊं. आम्ही सर्व पापकर्मापासून निवृत्त होऊन स्वस्थानीं जाऊं. असलें घोर कर्म पुनः कधीं करणार नाहीं. हे शोभने, आम्हांला दृष्टीचें दान देऊन तूं आमचें रक्षण कर. पुत्रासह तूं आम्हांवर प्रसन्न हो." १. ११. १७८.

अध्याय १७९ वा.

[१ और्वाच्या अनुग्रहानें क्षत्रियांना चक्षुःप्राप्ति. २ और्वानें केलेला सर्व लोकांच्या नाशाचा निश्चय. ३ पितरांनीं केलेलें त्याचें निवारण.]

(१) ब्राह्मणी म्हणाली—अरे बाबांनो, मी तुमच्यावर रागावलें नाहीं व तुमची दृष्टिहि हरण केली नाहीं. परंतु हा माझ्या मांडीपासून उत्पन्न झालेला भार्गव आज तुमच्यावर क्रुद्ध झाला आहे. तुम्हीं त्याच्या आप्तांचा वध केला, हें स्मरून त्यानें क्रोधानें तुमच्या नेत्रांचें हरण केलें आहे, यांत संशय नाहीं. तुम्ही जेव्हां गर्भांतील भृगूंचाहि नाश केलात, तेव्हां मीं या गर्भाला माझ्या मांडीमध्यें शंभर वर्षे धारण केलें. हा गर्भांत असतांनाच भृगुकुलाचें प्रिय करण्याच्या इच्छेनें षडंगांसह सर्व वेदानें याच्यावर अनुग्रह केला. तो हा माझा

पुत्र पितृवधामुळें क्रुद्ध होऊन तुमचा संहार करण्याची इच्छा करीत आहे. त्याच्या दिव्य तेजानें तुमची दृष्टि गेली, हें उघडच आहे. तरी आतां तुम्ही त्याचीच प्रार्थना करा. म्हणजे तुमच्या प्रणिपातानें संतुष्ट झालेला तो माझा श्रेष्ठ पुत्र और्व तुमची दृष्टि परत देईल.

ब्राह्मणीनें असें सांगितलें असतां ते सर्व क्षत्रिय और्वाला शरण गेले आणि त्याला 'हे महात्म्या प्रसन्न हो' असें म्हणाले. तेव्हां त्यानें संतुष्ट होऊन त्यांची दृष्टि परत दिली व नेत्र प्राप्त झालेले ते सर्व नृप तेथून परत गेले.

(२) याप्रमाणें तो विप्रर्षि मातेच्या मांडीचा भेद करून उत्पन्न झाला म्हणून 'और्व' या नांवानें लोकांत प्रसिद्ध झाला. त्या भार्गव-ऋषीनें लोकांचा विनाश करण्यासाठीं सर्व लोकांचा पराभव करण्याचा निश्चय केला. सर्व भृगूंच्या नाशाबद्दल सूड उगविण्याची इच्छा करणाऱ्या त्या भृगुनंदनानें आपलें मन पूर्णपणें तत्पर केलें. सर्व लोकांचा नाश करून आपल्या पूर्वजांना संतुष्ट करण्यासाठीं त्यानें उग्र तप आचरिलें व त्याच्या तेजानें सर्व देव, मनुष्य व असुर यांना अतिशय ताप दिला.

(३) बाळा पराशरा, त्या वेळीं त्याचे पितर हा आपला कुलनंदन आहे, असें जाणून पितृलोकांतून त्याच्या समीप आले व त्याला म्हणाले—"हे वत्सा और्वा, तुझ्या उग्र तपाचा प्रभाव आम्हीं पाहिला. आतां तूं आपला क्रोध आवर व लोकांवर प्रसन्न हो. अरे बाबा, क्षत्रियांनीं जेव्हां सर्व भृगुकुलाचा वध चालविला तेव्हां आम्हीं भार्गवांनीं त्यांची जी उपेक्षा केली, ती त्यांचा प्रतिकार करण्यास असमर्थ होतों, म्हणून नव्हे; तर आम्हांला दीर्घ आयुष्याचा अतिशय कंटाळा आला होता, म्हणून क्षत्रियांना निमित्तमात्र करून आम्हीं इष्ट असलेलें मरण ओढवून घेतलें. कोणा एका भार्गवानें आपल्या घरांत जें धन पुरून ठेविलें होतें, तेंहि क्षत्रियांना क्रोध आणून वैर उत्पन्न करण्यासाठींच होय. नाहीं तर हे वत्सा, आम्हां स्वर्गाची इच्छा करणाऱ्या ब्राह्मणांना द्रव्य घेऊन काय करावयाचें होतें! शिवाय कुबेरानें आम्हांला अगोदरच विपुल धन देऊन ठेविलें होतें. परंतु मृत्यु जेव्हां आम्हांला नेण्यास समर्थ होईना, तेव्हां आम्हीं इष्ट असलेला मरणाचा उपाय योजिला. आत्मघात करणाऱ्या पुरुषाला शुभलोक प्राप्त होत नाहींत, असा विचार करून आम्हीं आत्महत्या केली नाहीं.

यास्तव हे बाळा, तूं जें कार्य करण्याचें मनांत आणिलें आहेस, तें आम्हांला मुळींच प्रिय नाहीं. यास्तव सर्व लोकांचा पराभव करणाऱ्या या पापापासून तूं

आपलें मन निवृत्त कर आणि क्षत्रियांचा व सप्त लोकांचाहि नाश करूं नकोस, तर तुझ्या संपादित तपस्तेजाला दूषित करणाऱ्या क्रोधाचा त्याग कर." १. ११. १७९.

अध्याय १८० वा.

[१ और्वाचें पितरांस उत्तर. २ पितरांच्या आज्ञेनें और्वानें समुद्रजलांत केलेला क्रोधाग्नीचा त्याग.]

(१) **वसिष्ठ** म्हणाला—वत्सा पराशरा, पितरांचें हें भाषण ऐकून और्व म्हणाला—" हे पूज्य पितरहो, मीं क्रोधानें सर्व लोकांचा नाश करण्याची जी प्रतिज्ञा केली आहे, ती कदापि मिथ्या होणार नाहीं. रोषानें केलेली प्रतिज्ञा व्यर्थ झाल्यास मी जिवंत रहाणें शक्य नाहीं. कारण माझा क्रोध निष्फल झाल्यास, अग्नि जसा अरणीला दग्ध करितो, तसा तो माझ्या देहाचाच दाह करील. जो मनुष्य कांहीं कारणानें आलेला क्रोध सहन करतो, तो धर्म, अर्थ व काम या त्रिवर्गांचें चांगल्या प्रकारें पालन करण्यास समर्थ होत नाहीं. दुर्जनांचें नियमन व सज्जनांचें रक्षण करणाऱ्या क्रोधाचा उपयोग योग्य प्रसंगीं केलाच पाहिजे. सर्वांना जिंकण्याची इच्छा करणाऱ्या त्या क्षत्रियाधमांनीं भृगूंचा निर्दयपणें वध केला. त्यामुळें भार्गवांच्या मातांनीं केलेला आक्रोश त्या वेळीं जननीच्या ऊरूमध्यें गर्भस्थ असलेल्या मीं ऐकला आहे.

त्या दुष्ट नृपांनीं भृगूंच्या गर्भांपर्यंत जेव्हां त्यांचा संहार आरंभिला तेव्हांच माझ्या अंतःकरणांत क्रोध उत्पन्न झाला. ' तर मग तूं क्षत्रियांचाच वध करावास, हें उचित आहे; सर्व लोकांचा नाश करण्यास कां प्रवृत्त होतोस ! ' म्हणून म्हणाल तर त्याचेंहि कारण सांगतों, ऐका—हे पितरांनों, ज्यांचे गर्भ परिपूर्ण झाले आहेत, अशा माझ्या माता त्या क्षत्रियांना भिऊन सर्व लोकांमध्यें अभयाची याचना करीत फिरल्या, पण त्यांचें रक्षण करणारा एकहि वीर पुरुष त्यांना आढळला नाहीं. सामर्थ्य असूनहि लोकांनीं माझ्या मातांचें रक्षण केलें नाहीं, यास्तव तेहि मला वध्यच आहेत.

---

१ यो हि कारणतः क्रोधं संजातं क्षन्तुमर्हति । नालं स मनुजः सम्यक् त्रिवर्गं परिरक्षितुम् ॥ २ अशिष्टानां नियंता हि शिष्टानां परिरक्षिता । स्थाने रोषः प्रयुक्तः स्यात् ॥

हे पितरांनो, काय सांगूं! त्या भृगूच्या भार्यांना जेव्हां कोणीहि त्राता भेटला नाहीं, तेव्हां माझ्या या शुभ मातेनें मला आपल्या एका मांडींत धारण केलें. या लोकीं जेव्हां पापाचा प्रतिकार करणारा एखादा समर्थ पुरुष असतो, तेव्हां सर्व लोकांमध्यें एखादाहि पापकर्ता निपजत नाहीं. पण पाप्याला प्रतिबंध करणारा जेव्हां कोणीहि कोठेंच नसतो, तेव्हां पापकर्मामध्यें अनेक लोक प्रवृत्त होतात.

जो शक्तिमान् पापकर्त्याला जाणत असूनहि त्याचें नियमन करीत नाहीं, तो समर्थ पुरुष त्याच पापकर्मानें लिप्त होतो. समर्थ असलेल्या क्षत्रियांनीं व राजांनीं या लोकांतील आपलें जीवितच इष्ट मानून माझ्या पितरांचें रक्षण केलें नाहीं; त्यामुळें मीं या सर्व लोकांवर क्रुद्ध झालों आहें व मी त्यांचा नाश करण्यास समर्थ आहें. पण तुमच्या वचनाचें उलंघन करण्यासहि मी समर्थ नाहीं. मी समर्थ असूनहि जर या लोकांची उपेक्षा करीन, तर त्यांचें शासन न करणें याच पापापासून मला महद्भय उत्पन्न होईल. माझ्या क्रोधापासून उत्पन्न झालेला जो हा अग्नि सर्व लोकांचा नाश करण्याची इच्छा करीत आहे, त्याचाच जर मीं निग्रह केला तर तो आपल्या तेजानें मलाच जाळील. तुम्हांला सव लोकांचें हित करण्याची इच्छा आहे, हेंहि मी जाणतों. यास्तव हे समर्थ पितरांनों, माझें व या लोकांचेंहि ज्यामुळें हित होईल असें करा."

(२) पितर म्हणाले—वत्सा, तुझें कल्याण असो; तुझ्या क्रोधापासून उत्पन्न झालेला हा अग्नि लोकांना भक्षण करूं इच्छीत आहे, यास्तव तूं त्याला जलांत सोडून दे. कारण सर्व लोक जलामध्यें प्रतिष्ठित आहेत. सर्व रस आपोमय आहेत. फार काय, पण हें सर्व जगत् आपोमय आहे. यास्तव हे द्विजश्रेष्ठा, तूं आपल्या या क्रोधाग्नीला जलांत सोडून दे. तुझी जर इच्छा असेल, तर हा तुझा क्रोधजन्य अग्नि महासागरांतील जलाला दग्ध करीत राहूं दे. कारण हे सर्व लोक आपोमय आहेत. यास्तव कारणभूत जल दग्ध झालें असतां कार्यभूत लोकहि प्रायः दग्ध झाल्यासारखेच आहेत. हे निष्पाप और्वा, असें केल्यानें तुझी प्रतिज्ञाहि सत्य होईल व देवांसह या लोकांचाहि पराभव होणार नाहीं.

---

१ प्रतिषेद्धा हि पापस्य यदा लोकेषु विद्यते। तदा सर्वेषु लोकेषु पापकृन्नोपपद्यते ॥ २ यदा तु प्रतिषेद्धारं पापो न लभते क्वचित्। तिष्ठन्ति बहवो लोकास्तदा पापेषु कर्मसु ॥ ३ जानन्नपि च यः पापं शक्तिमान्न नियच्छति। ईशः सन्सोऽपि तेनैव कर्मणा संप्रयुज्यते ॥

वसिष्ठ म्हणाला—पराशरा, पितरांची ही हितबुद्धि ऐकून और्वानें आपल्या क्रोधजन्य अग्नीचा महासागरांत त्याग केला व तो अग्निहि त्या सागरांतील जलाला दग्ध करूं लागला. तो फार मोठें वडवामुख होऊन त्यांतून अग्नीच्या ज्वाला बाहेर सोडीत त्या महासागराचें जल प्राशन करूं लागला. वेदवेत्त्यांना वडवाग्नीचा हा वृत्तान्त अवगत आहे. बा पराशरा, तूं महाज्ञानी आहेस. तुला सर्व लोकस्थिति अवगत आहे. या सर्व लोकांचा नाश करणें तुला योग्य नाहीं. बाळा, तुझें कल्याण होवो. तूंहि और्वाप्रमाणेंच आपल्या क्रोधाचा त्याग कर. १. ११. १८०.

अध्याय १८१ वा.

[१ पराशराचें राक्षससत्र व पुलस्त्यमुनीनें केलेलें त्याचें निवारण.]

(१) गंधर्व म्हणाला—हे कुंतीपुत्रा, महात्म्या वसिष्ठानें असें सांगितलें असतां त्या विप्रश्रेष्ठ पराशरानें आपल्या क्रोधाचें नियमन केलें व तो सर्व लोकांच्या पराभवापासून निवृत्त झाला. पण त्या वेदवेत्त्या पराशरानें राक्षससत्र आरंभिलें व त्यांत त्या शक्तिपुत्रानें आबालवृद्ध सर्व राक्षसांचें हवन केलें. आपला पिता जो शक्ति त्याला राक्षसानें भक्षण केलें, याचें स्मरण करून त्यानें सर्व राक्षसांना जाळून टाकलें. या आपल्या पौत्राची ही दुसरी प्रतिज्ञाहि मिथ्या होऊं नये म्हणून वसिष्ठानें राक्षसांच्या वधापासून त्याला निवृत्त केलें नाहीं. त्या सत्रांतील तीन अग्नींच्या पुढें तो महामुनि पराशर चवथ्या अग्नीप्रमाणेंच शोभला.

शरदृतूंत सूर्य जसा आकाशाला प्रकाशित करितो, त्याप्रमाणें त्या शक्तिपुत्रानें पाप्यांच्या निग्रहामुळें निर्मल यज्ञीय द्रव्यांनीं हवन केल्या जाणाऱ्या अग्नीच्या योगानें सर्व अंतरिक्षाला प्रकाशित केलें. त्यामुळें वसिष्ठादि सर्व मुनि तेजानें दीप्त झालेल्या पराशराला ‘ हा दुसरा सूर्यच आहे ’ असें समजले. त्यानंतर पराशरमुनि दुसऱ्या कोणालाहि सर्वथा दुष्प्राप्य असलेलें तें सत्र शेवटास नेण्याची इच्छा करूं लागला असतां त्याच्या समीप अत्रि-ऋषि आला. त्याचप्रमाणें पुलस्त्य, पुलह, क्रतु, व महाक्रतु हे ऋषिहि राक्षसांच्या जीविताचें रक्षण करण्याच्या हेतूनें तेथें आले.

त्यांतील राक्षसांचा पूर्वज पुलस्त्यमुनि सर्व राक्षसांचा वध होत असल्यामुळें पराशराला म्हणाला—“हे वत्सा, तुझें हें सत्र निर्विघ्नपणें चाललें आहेना ! अज्ञ

व निर्दोष अशा सर्व राक्षसांचा वध करूनहि तुला सुख वाटत आहेना! हें पाप करूनहि तुझ्या मनाला उद्वेग होत नाहींना! पण वत्सा, माझ्या प्रजेचा असा उच्छेद करणें तुला उचित नाहीं. अरे बाबा, तपस्वी ब्राह्मणांचा हा धर्म नव्हे. शम हाच ब्राह्मणांचा श्रेष्ठ धर्म आहे. यास्तव बा पराशरा, तूं शमाचेंच आचरण कर. तूं इतका वरिष्ठ असतांना असा अधर्मिष्ठ कसा होतोस! धर्मज्ञ शक्तिमुनीचें अतिक्रमण करणें तुला उचित नाहीं.

हे द्विजा, शक्तीच्या शापामुळें मनुष्यभक्षक बनलेल्या राजानें शक्तीलाच भक्षण केलें, त्यांत राक्षसांचा काय अपराध! वस्तुतः कल्माषपादराजाला शाप देणें हा शक्तीचाच दोष आहे. त्या दोषामुळें राजाच्या शरीरांत शिरलेल्या राक्षसानें त्यालाच भक्षण केलें. कारण त्यानें जर शाप दिला नसता, तर कोणताहि राक्षस त्याला भक्षण करण्यास समर्थ झाला नसता.

तुझ्या पित्यानें स्वतःच आपल्यावर मृत्यु ओढवून घेतला. विश्वामित्र व राजा कल्माषपाद हे केवल निमित्तमात्र झाले. पण तुझा पिता शक्ति व त्याचे सर्व भ्राते स्वर्गामध्यें आनंदांत आहेत. ते सर्व देवांबरोबर विविध विलास करीत असतात. वसिष्ठाला हें सर्व विदित आहे. पराशरा, तूंहि या क्रतूच्या द्वारा बिचाऱ्या राक्षसांच्या नाशाचें केवल निमित्त झाला आहेस. यास्तव आतां तूं आपलें हें सत्र सत्वर समाप्त कर. वत्सा, तुझें कल्याण होवो."

हे पार्था, पुलस्त्य-मुनीनें पराशराला असा हितोपदेश केला व बुद्धिमान् वसिष्ठानेंहि त्याला अनुमोदन दिलें. तेव्हां त्या शक्तिपुत्रानें आपलें सत्र समाप्त केलें व राक्षसांच्या नाशासाठीं संपादन केलेल्या अग्नीचा हिमालय पर्वताच्या उत्तर भागांतील महावनांत उत्सर्ग केला. तो अग्नि सर्वदा प्रत्येक प्रतिपदेच्या आरंभीं तेथील राक्षस, वृक्ष व पाषाण यांना दग्ध करीत असलेला अद्यापि दिसतो. १. ११. १८१.

अध्याय १८२ वा.

[१ वसिष्ठापासून कल्माषपादाच्या पुत्रोत्पत्तीचें कारण.]

(१) **वैशंपायन**—राजा जनमेजया, याप्रमाणें गंधर्वानें सांगितलेलें तें वृत्त ऐकून धर्मवेत्त्या अर्जुनानें त्याला असा प्रश्न केला—" हे मित्रा गंधर्वा, राजा कल्माषपादानें कोणतें कारण पुढें करून आपली पत्नी ब्रह्मवेत्त्यांतील श्रेष्ठ गुरु-

कडे पाठविली आणि त्या महात्म्या वसिष्ठानें परम धर्म जाणत असूनहि हें अधर्मयुक्त अगम्यागमन कसें केलें ! त्या महर्षीनें पूर्वीं असलें पापकृत्य केलें असेल का, असा मला मोठा संशय येतो. यास्तव त्याचें निरसन करण्यास तूंच समर्थ आहेस."

गंधर्व—हे दुर्जय धनंजया, तूं मला जो वृतान्त विचारीत आहेस, तो मी तुला यथार्थ सांगतों, ऐक. वसिष्ठपुत्रानें त्या राजाला शाप दिल्याचें वृत्त मीं तुला सांगितलेंच आहे. तो शापवश झालेला राजा कल्माषपाद क्रोधानें नेत्र लाल करून राज्ञीसह आपल्या अयोध्या नगरींतून निघाला व अनेक मृगांच्या कळपांनीं व इतर क्रूर प्राण्यांनीं व्याप्त असलेल्या निर्जन अरण्यांत जाऊन पत्नीसह भटकूं लागला. याप्रमाणें वनांत भटकत असतां तो क्षुधेनें अतिशय व्याकुल झाला व भक्ष्य शोधूं लागला. तेव्हां मोठ्या प्रयासानेंहि भक्ष्य न मिळाल्यामुळें श्रांत व क्षुब्ध झालेल्या त्याला एकांत प्रदेशामध्यें विषयसुखांत प्रवृत्त झालेलें एक ब्राह्मणदांपत्य दिसलें. त्यांनींहि या राजाला पाहिलें व तीं दोघें तृप्त न होतांच भीतीनें पळूं लागलीं.

तें पाहून त्या राजानें त्यांचा पाठलाग केला व पळणाऱ्या ब्राह्मणाला बलात्कारानें धरिलें. तेव्हां आपल्या भर्त्याला धरलेलें पाहून ती ब्राह्मणी म्हणाली— "हे राजा, माझें वचन ऐक. तूं सूर्यकुलोत्पन्न कल्माषपाद राजा या लोकांत सुप्रसिद्ध आहेस. तूं सावधान चित्तानें धर्मांत स्थित व गुरुसेवेंत तत्पर होतास. यास्तव आतां जरी तूं शापानें विवेकहीन झाला आहेस, तरी असलें पातक करणें तुला उचित नाहीं. मी ऋतुकाल प्राप्त झाला असतां संततीसाठीं भर्त्याशीं समागम करीत होतें. परंतु कृतार्थ होण्यापूर्वीं भर्त्यावर ओढवलेल्या या संकटानें मला अत्यंत क्लेश होत आहेत. यास्तव हे नृपतिश्रेष्ठा, प्रसन्न हो आणि माझ्या पतीला सोडून दे."

हे धनंजया, याप्रमाणें ती ब्राह्मणस्त्री दुःखार्त होऊन त्याला विनवीत असतांहि, त्या निर्दय कल्माषपाद-राजानें, व्याघ्र जसा मृगाला मारून खातो, तसें त्या ब्राह्मणाला भक्षण केलें. त्या वेळीं क्रोधानें संतप्त झालेल्या तिच्या नेत्रांतून जे दुःखाश्रु भूमीवर पडले तोच प्रज्वलित अग्नि झाला व त्याच्या योगानें तो प्रदेश प्रदीप्त झाला. पतिघातानें विव्हल व शोकसंतप्त झालेल्या त्या ब्राह्मणीनें कल्माषपाद-राजाला क्रोधानें शाप दिला.

ती म्हणाली—हे क्षुद्रबुद्धे राजा, ज्याअर्थी मी अकृतार्थ असतांना माझ्या समक्ष तूं माझ्या प्रिय व महायशस्वी पतीला निर्दयपणानें भक्षण करीत आहेस, त्या अर्थी हे दुर्बुद्धे, तुलाहि माझ्या शापप्रभावानें भार्येच्या समागमकालीं मरण येईल व तूं ज्या वसिष्ठमहर्षींच्या पुत्रांचा वध केलास, त्याच मुनिश्रेष्ठ वसिष्ठापासून तुझ्या राज्ञीला संतति होईल आणि हे अधमा, तोच पुत्र तुझा वंश चालवील.

याप्रमाणें त्या राजाला शाप देऊन त्या अंगिरसकुलोत्पन्न साध्वीनें राजाच्या समक्ष तेथेंच प्रदीप्त झालेल्या अग्नींत प्रवेश केला. हे परंतप अर्जुना, भगवान् वसिष्ठानें आपल्या तपःसामर्थ्यानें व ज्ञानयोगानें हा सर्व प्रकार जाणला.

पुढें दीर्घ कालानंतर तो कल्माषपाद राजा शापमुक्त झाला व राज्ञी मदयंतीच्या ऋतुकालीं तो तिच्यापाशीं आला. पण तिनें त्याचें निवारण केलें. कामानें मोहित झालेल्या त्या राजाला ब्राह्मणीच्या शापाची आठवण नव्हती. पण त्याच्या राज्ञीनें त्याला आठवण दिली. राणीचें वचन ऐकून कल्माषपाद भ्याला व त्या शापाचें स्मरण करून अतिशय पश्चात्ताप पावला.

पार्था, या कारणास्तव राजानें वसिष्ठाला स्वस्त्रीच्या ठिकाणीं नियुक्त केलें. शापदोषानें युक्त झाल्यामुळें संततीसाठीं त्याला असें करावें लागलें. १.११.१८२.

अध्याय १८३ वा.

[१ पांडवांनीं धौम्यऋषीला आपला पुरोहित केलें.]

(१) **वैशंपायन**—हे जनमेजया, गंधर्वाच्या मुखानें हा वृत्तान्त श्रवण केल्यावर प्रतापवान् अर्जुनानें त्याला म्हटलें—“ हे गंधर्वपते, तुला सर्व धर्मज्ञ ब्राह्मणांची माहिती आहे. यास्तव, आम्हांला अनुरूप असा एखादा वेदवेत्ता पुरोहित सांग. ”

गंधर्व म्हणाला—हे धर्मनिष्ठ धनंजया, उत्कोचक तीर्थामध्यें देवल-ऋषीचा कनिष्ठ भ्राता धौम्यमुनि तपश्चर्या करीत आहे. तुमची इच्छा असल्यास तुम्ही त्याला पुरोहित करा. त्या गंधर्वश्रेष्ठाचें हें भाषण ऐकून अस्त्रवेत्त्या अर्जुनानें त्याला आग्नेय अस्त्र विधिपूर्वक अर्पण केलें व प्रेमानें म्हटलें—“ हे गंधर्वराजा, तूं दिलेले अश्व सध्यां तुझ्यापाशींच राहूं देत. योग्य काल प्राप्त होतांच मी त्यांचें ग्रहण करीन. हे श्रेष्ठा, तुझें कल्याण असो.”

त्यानंतर त्या गंधर्वानें व पांडवांनीं परस्परांचा सत्कार केला व ते त्या रम्य भागीरथीतीरावरून आपापल्या इष्ट प्रदेशीं निघून गेले. हे भारता, पांडव तेथून उत्कोचक तीर्थावरील धौम्यमुनीच्या आश्रमास गेले व त्यांनीं त्याला आपला पुरोहित होण्याविषयीं विनंति केली. तेव्हां त्या वेदवेत्त्यांतील श्रेष्ठ धौम्य महर्षीनें वनांतील फल-मूलांनीं पांडवांचें आतिथ्य केलें व त्यांचें पौरोहित्य स्वीकारिलें. त्यावेळीं पांडवांना आज आपल्याला राज्यलक्ष्मीच प्राप्त झाली आहे, असें वाटलें व ते त्या धौम्य-ऋषीला पुढें करून पांचालीच्या स्वयंवरास जावयास निघाले.

ते भरतर्षभ पांडुपुत्र त्या समर्थ पुरोहितानें युक्त होतांच स्वतःला सनाथ मानूं लागले. कारण तो त्यांचा गुरु वेदार्थतत्त्वज्ञ व मोठा बुद्धिमान् होता. तो श्रीमान् द्विजश्रेष्ठ धौम्यऋषि आपल्या तेजानें, बुद्धीनें, रूपानें, यशानें, श्रीनें, व विविध मंत्रांनीं देवगुरु बृहस्पतितुल्य होता. त्या धर्मज्ञ धौम्यानें आपले याज्य जे पृथापुत्र त्यांना धर्मज्ञ केलें व ते वीर स्वधर्मानें राज्याला प्राप्त झालेच आहेत, असें तो समजूं लागला. बुद्धि, वीर्य, बल व उत्साह यांनीं युक्त असलेल्या पांडवांना त्यानें दुसरे देवच मानिलें. धौम्य मुनीनें स्वस्त्ययन केल्यावर ते नरश्रेष्ठ कुंतीपुत्र पांचालीच्या स्वयंवरास जावयास निघाले. १. ११. १८३.

येथें अकरावें चैत्ररथपर्व समाप्त झालें.

स्वयंवरपर्व १२.

अध्याय १८४ वा.

[१ पांडवांचा ब्राह्मणाशीं संवाद.]

(१) **वैशंपायन**—हे कुरुश्रेष्ठा पारिक्षिता, त्यानंतर ते महापराक्रमी पांच भ्राते पांचाल देश, तेथील तो महोत्सव व विशेषतः अयोनिजा द्रौपदी, यांस पहाण्याच्या इच्छेनें तेथून निघून आपल्या मातेसह चालले असतां मार्गांत त्यांना पुष्कळ ब्राह्मणांचा समूह भेटला. त्या ब्राह्मणांनीं त्या ब्रह्मचारी पांडुपुत्रांना विचारिलें—"हे महात्म्यांनो, तुम्ही कोठून आलां व कोठें चाललां?"

तेव्हां युधिष्ठिर म्हणाला—हे द्विजश्रेष्ठहो, आम्ही पांच भ्राते आमच्या या मातेसह एकचक्रा-नगरींतून आलों.

हें ऐकून ब्राह्मण म्हणाले—हे तापसहो, तुम्ही आमच्याबरोबर पांचाल-देशास चला. तेथें द्रुपदराजाच्या मंदिरांत स्वयंवर होणार असून विपुल द्रव्याचा

व्यय होणार आहे. आम्ही सर्व तेथेंच जात आहों. त्या नगरींत 'न भूतो न भविष्यति' असा फार मोठा उत्सव होणार आहे. महात्म्या द्रुपदराजाची कन्या याज्ञसेनी यज्ञाच्या वेदींतून उत्पन्न झाली. तिचे नेत्र कमलपत्रासारखे असून ती सर्वांग सुंदरी मोठी मानी, सुकुमार व दर्शनीय आहे. द्रोणाचा शत्रु जो धृष्टद्युम्न, त्याची ही भगिनी आहे. धृष्टद्युम्नहि सहज कवच, खड्ग, बाण व धनुष्य यांसह प्रदीप्त अग्नीपासून उत्पन्न झाला. तो पराक्रमी धृष्टद्युम्न अग्नीसारखा तेजस्वी आहे.

द्रौपदी ही त्याची अयोनिसंभव भगिनी असून तिच्या अंगाचा नील कमलासारखा सुगंध कोसभर पसरत असतो. ती यज्ञसेनाची कन्या स्वयंवरासाठीं उत्सुक झाली आहे. आम्ही तो दिव्य महोत्सव पहावयास चाललों आहों. तेथें ज्यांनीं विपुल दक्षिणा देऊन याग केले आहेत, असे वेदाध्ययन करणारे, पवित्र, महात्मे, नियतव्रत, तरुण व दर्शनीय राजे व राजपुत्र नाना देशांतून आले आहेत आणि अनेक महारथ व अस्त्रविद्येंत कुशल असलेले अनेक भूपाल येणार आहेत. ते नरेश्वर तेथें आपल्या विजयासाठीं नाना प्रकारचें देय धन, गायी, भक्ष्य व भोज्य पदार्थ सर्वांना देतील. आपण त्या सर्वांचा परिग्रह करून, स्वयंवर पाहून व महोत्सव अनुभवून आपआपल्या इष्ट स्थानीं जाऊं.

त्या मिथिला नगरींत अनेक नट, नर्तक, मंगलपाठक, पौराणिक, वंशसूचक, स्तुति पाठ करणारे व महा बलाढ्य मल्लहि निरनिराळ्या देशांतून येतील. हे महात्म्यांनो, तुम्हीहि आम्हांबरोबर तेथें चला आणि कांहीं दिवस आपल्या मनाचें रंजन करून व जें कांहीं धन मिळेल तें घेऊन पुनः स्वस्थानीं परत जा. तुम्हीहि सर्व मोठे दर्शनीय अहां. देवांच्या स्वरूपाप्रमाणें ज्यांचें स्वरूप आहे, अशा तुम्हांस पाहून दैवयोगानें तुम्हांपैकीं एखाद्याला ती कृष्णा कदाचित् वरीलहि! विशेषतः हा तुझा मध्यम भ्राता मोठा तेजस्वी, सुंदर व पराक्रमी दिसत आहे. कदाचित्, दैववशात् हा विजयामध्यें नियुक्त होऊन पुष्कळ धन संपादन करील व तुमचा संतोष वाढवील, असेंहि आम्हांला वाटतें.

ब्राह्मणांचें हें भाषण ऐकून युधिष्ठिर म्हणाला—विप्रांनो, आम्हीहि तो महोत्सव पहाण्यासाठींच एकचक्रानगरींतून निघालों आहों. मार्गांत तुमचें दर्शन झालें, हा शुभ शकुनच आहे. यास्तव आम्ही तुम्हांबरोबरच पुढें येतों. १, १२, १८४.

अध्याय १८५ वा.

[१ पांडवांचें द्रुपदपुरींत गमन व वास. २ स्वयंवराची तयारी व त्यासाठीं ब्राह्मण-क्षत्रियादिकांचें आगमन. ३ स्वयंवरमंडपाचें वर्णन. ४ धृष्टद्युम्नाची प्रतिज्ञा.]

(१) **वैशंपायन**—राजा जनमेजया, ब्राह्मणांशीं असा संवाद झाल्यावर पांडव त्यांच्याबरोबरच राजा द्रुपदानें रक्षण केलेल्या दक्षिण पांचाल देशाकडे जावयास निघाले. त्यावेळीं त्या ब्राह्मणसमूहांतच वीर पांडवांना निष्पाप व शुद्धात्म्या भगवान् कृष्णद्वैपायनाचें दर्शन झालें.

तेव्हां त्यांनीं त्याचा यथाविधि सत्कार केला व त्या महात्म्यानेंहि त्यांना योग्य आशीर्वाद दिले. कांहीं संभाषण झाल्यावर व्यासांच्या अनुज्ञेनें ते महा-रथ, रमणीय वनें आणि सरोवरें पहात व जागजागीं विश्रांति घेत हळुहळू द्रुप-दाच्या राजधानीस येऊन पोंचले. ते अध्ययन करणारे, पवित्र, सुस्वरूप व प्रिय भाषण करणारे पांची पांडव राजनगरींत गेले व त्यांनीं राजाचें तें भव्य नगर आणि लोकसमूहस्थान प्रत्यक्ष पाहिलें; नंतर ते स्वतः एका कुंभाराच्या गृहांत जाऊन राहिले. तेथें ब्राह्मणांच्या वृत्तीचा आश्रय करून ते भिक्षेवर आपला निर्वाह करूं लागले. त्यामुळें त्या वीरांना कोणीहि ओळखूं शकलें नाहीं.

(२) हे भरतर्षभा, पांडुपुत्र पार्थालाच आपली कन्या कृष्णा द्यावी अशी त्या यज्ञसेन राजाची मनीषा होती. परंतु त्यानें ती प्रगट केली नाहीं. तथापि अर्जुनाचा शोध लावण्यासाठीं द्रुपदानें दुसऱ्या कोणासहि वांकविण्यास अशक्य असें एक दृढ धनुष्य तयार करविलें. अंतरिक्षांत अतिशयवेगानें फिरणारें एक कृत्रिम यंत्र बनविलें. त्या फिरणाऱ्या यंत्राच्या पलीकडे लक्ष्याची योजना केली. त्या फिरत्या यंत्रांतून लक्ष्यवेध करावयाचा असून त्याचें छिद्र सूक्ष्म होतें.

त्यानंतर नृपश्रेष्ठ द्रुपदानें " या येथें ठेविलेल्या बाणांनीं हें धनुष्य सज्ज करून जो या लक्ष्याचा वेध करील, त्यालाच माझी कन्या प्राप्त होईल." असा संकेत केला व त्याप्रमाणें पृथ्वीवर सर्वत्र स्वयंवराचा घोष करविला. तो ऐकून सर्व राजे तेथें जमले. हे भारता, त्या वेळीं स्वयंवर पहाण्याची इच्छा करणारे महात्मे ऋषि, कर्णासह दुर्योधनप्रभृति कौरव आणि महाभाग ब्राह्मण विविध देशांतून तेथें आले. तेव्हां धर्मनिष्ठ द्रुपदानें त्या सर्व नृपतींचा यथाविधि सत्कार करून स्वयंवर पहावयास आलेल्या त्यांना त्यांच्यासाठीं सिद्ध केलेल्या उच्च सिंहासनांवर बसविलें. त्या वेळीं सर्व नागरिकांनीं समुद्राच्या भयंकर ध्वनी-सारखा मोठ्यानें जयघोष केला.

(३) राजा, तो स्वयंवरमंडप नगराच्या समीप ईशान्य दिशेंत सम व पवित्र भूमीवर उभारला होता. त्याच्या सभोंवर भव्य प्रासाद बांधले होते, त्यांच्या सभोंवतीं उंच तट असून त्याच्या पलीकडे खंदक खणलेला होता. त्या स्वयंवरमंडपाचीं द्वारें सुंदर तोरणांनीं अलंकृत केलीं होतीं व चित्र-विचित्र छतानें तो सुशोभित केला होता. अनेक मंगल वाद्यांचे ध्वनि व अगरु धूप इत्यादिकांचा सुगंध अनेक योजनें लांब पसरला होता. तेथील भूमीवर चंदनरसाचा सडा घातला होता व पुष्पांच्या मालांनीं तो मंडप विभूषित केला होता. प्रासादांचीं, कैलास शिखरांप्रमाणें, शुभ्र व उंच शिखरें जणुंकाय आकाशालाच जाऊन भिडलीं होतीं. त्यांच्या खिडक्या सुवर्णाच्या असून तेथील भूमि रत्नजडित होती.

त्या प्रासादांतील जिने चढण्यास सुलभ होते. त्यांत सर्व उपकरणांसह मोठमोठीं आसनें मांडलीं होतीं. त्यांचीं अंतर्गृहें पुष्पमालांनीं अलंकृत व उत्तम अगरु-धूपानें सुवासित केलीं होतीं. प्रासादांचा वर्ण हंसासारखा शुभ्र असून त्यांतील सुवास दूरवर पसरला होता. त्यांना अनेक विस्तीर्ण द्वारें होतीं. ते शय्या व आसनें यांनीं सुशोभित केले होते. हिमालयाच्या शिखरांप्रमाणें त्यांच्या भिंती अनेक रंगांनीं चित्रविचित्र केल्या होत्या.

अशाप्रकारें अलंकृत केलेल्या त्या सात मजली राजगृहांमध्यें एकमेकांशीं स्पर्धा करणारे ते सर्व नृप आपापल्या इच्छेप्रमाणें बसले. तेथें बसलेल्या त्या महा-पराक्रमी राजांना पांचालांनीं पाहिलें. ते महाभाग राजसिंह कृष्णागरूनें विभूषित झाले होते. ते सर्व मोठे उदार, ब्राह्मणभक्त व आपापल्या राष्ट्रांचें उत्तमप्रकारें रक्षण करणारे असून आपल्या शुभकर्मांनीं सर्व लोकांना प्रिय झाले होते. ते कृष्णेच्या दर्शनासाठीं त्या मंडपांत सभोंवार उंच मंचकावर बसले. पांडवहि ब्राह्मणांसह पांचालराजाचें अनुपम ऐश्वर्य पहात त्या स्वयंवरमंडपांत येऊन बसले.

हे राजा, याप्रमाणें तो समाज उत्तरोत्तर वाढतच गेला. तेथें रत्नांचें दान मोठ्या प्रमाणांत होऊं लागलें. नट-नर्तकांनीं सुशोभित झालेला तो जनसमूह अतिशय दर्शनीय होता. याप्रमाणें सर्व सिद्धता झाल्यावर सोळाव्या दिवशीं जिनें मंगल स्नान करून सुंदर वस्त्र परिधान केलें आहे व जी सर्व भूषणांनीं भूषित झाली आहे, अशी द्रौपदी हातांत सुवर्णमाला घेऊन त्या स्थानीं आली. तेव्हां सोमकांच्या मंत्रवेत्त्या शुचिर्भूत ब्राह्मण पुरोहितानें अग्नीच्या सभोंवतीं

दर्भांचीं परिस्तरणें घालून त्यांत घृतानें यथाविधि हवन केलें आणि अग्नीला तृप्त करून व ब्राह्मणांकडून स्वस्तिवाचन करवून सभोंवार वाजत असलेलीं सर्व मंगलवाद्यें थांबविलीं.

(४) हे राजन्, याप्रमाणें तें स्थान निःशब्द झालें असतां, ज्याचा आवाज मेघ किंवा दुंदुभि यांसारखा गंभीर आहे, असा धृष्टद्युम्न त्या रंगभूमींत, जेथें तें धनुष्य व बाण ठेविले होते, त्या स्थानीं कृष्णेला घेऊन आला व आपल्या गंभीर वाणीनें असें मधुर व अर्थपूर्ण उत्तम वचन बोलला—

"अहो येथें प्राप्त झालेले सर्व क्षत्रियवीरहो, या स्थानीं हें धनुष्य व हे बाण ठेविले आहेत व अंतरिक्षांत हें वेगानें फिरणारें यंत्र आहे. त्याच्या छिद्रांतून एकाच वेळीं हे पांच बाण सोडून त्या आकाशांत संचार करणाऱ्या तीक्ष्ण बाणांनीं जो वरील लक्ष्याचा भेद करील, त्याचीच ही माझी भगिनी भार्या होईल. उत्तम कुल, बल व रूप यांनीं युक्त असलेला जो कोणी हें महत्कार्य करील, त्यालाच ही कृष्णा वरील. हें मी तुम्हांला सत्य सांगतों."

त्या सर्व नृपतींना असें सांगून तो द्रुपदपुत्र तेथें जमलेल्या त्या सर्व भूपालांचीं नांवें, पराक्रम व कुल आपल्या भगिनीला सांगूं लागला. १. १२. १८५.

अध्याय १८६ वा.

[१ स्वयंवरास आलेल्या क्षत्रिय वीरांचें नामकथन.]

(१) धृष्टद्युम्न म्हणाला—हे द्रौपदि, तुझ्यासाठीं हे दुर्योधन, दुर्विषह, दुर्मुख, दुष्प्रधर्षण, विविंशति, विकर्ण, सह, दुःशासन, युयुत्सु, वायुवेग, भीमवेग, रव, उग्रायुध, बलाकि, करकायु, विरोचन, कुंडक, चित्रसेन, सुवर्चा, कनकध्वज, नंदक, बाहुशाली, तुहुंड, विकट व आणखीहि अनेक पराक्रमी धृतराष्ट्रपुत्र कर्णासह येथें आले आहेत. त्याचप्रमाणें दुसरेहि असंख्य क्षत्रियश्रेष्ठ भूपाल आले आहेत. सौबल, शकुनि, वृषक आणि बृहद्बल हे गांधार देशांतील राजपुत्र येथें जमले आहेत. सर्व शस्त्रधारण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ असलेले अश्वत्थामा व भोज हे दोघेहि उत्तम अलंकारांनीं भूषित होऊन तुझ्यासाठीं आले आहेत.

तसेच बृहंत, मणिमान् व दंडधार राजा, सहदेव, जयत्सेन, मेघसंधि, शंख आणि उत्तर या दोघां पुत्रांसह विराट राजा, वार्धक्षेमि, सुशर्मा, सेनाबिंदु हे भूपाल आणि आपल्या सुनामा व सुवर्चा या पुत्रांसह सुकेतु, सुचित्र, सुकुमार,

बृक, सत्यधृति, सूर्यध्वज, रोचमान, नील, चित्रायुध, अंशुमान्, चेकितान, महाबलाढ्य श्रेणिमान्, समुद्रसेनाचा पुत्र प्रतापशाली चंद्रसेन, जलसंध, विदंड व त्याचा पुत्र दंड, पौंड्रक, वासुदेव, वीर्यवान् भगदत्त, कलिंग आणि ताम्रलिप्त देशाचे अधिपति व पत्तनाधिपति, आपल्या पुत्रांसह मद्रदेशाचा राजा शल्य, वीर रुक्मांगद व रुक्मरथ यांसह कुरुकुलोत्पन्न सोमदत्त, त्याचा महारथ पुत्र सूरि, भूरिश्रवा व शल हे शूर क्षत्रिय, कांबोज-देशाचा राजा सुदक्षिण, पौरव दृढधन्वा, बृहद्बल, सुषेण, उशीनर राजाचा पुत्र शिबि, चोरांचा नाश करणारा कारूषाधिपति, हे सर्व वीर येथें जमले आहेत.

त्याचप्रमाणें बलराम, श्रीकृष्ण, रुक्मिणीचा पुत्र सांब, चारुदेष्ण, गद, प्रद्युम्नाचा पुत्र अनिरुद्ध, अक्रूर, सात्यकि, महाबुद्धिमान् उद्धव, कृतवर्मा, हार्दिक्य, पृथु, विपृथु, विदूरथ, कंक, शंकु, गवेषण, आशावह, अनिरुद्ध, समीक, सारिमेजय, वीर वातपति, झिल्ली, पिंडारक व पराक्रमी उशीनर हे वृष्णिकुलांतील क्षत्रिय, भगीरथ, बृहत्क्षत्र, सिंधुदेशाचा राजा जयद्रथ, बृहद्रथ, बाल्हीक, महारथ श्रुतायु, उलूक, कैतव, चित्रांगद, शुभांगद, बुद्धिमान् वत्सराज, कोसलाधिपति पराक्रमी शिशुपाल व जरासंध हे सर्व येथें जमले आहेत. दुसरेहि अनेक देशांचे भूपति व पृथ्वीवर प्रसिद्ध असलेले क्षत्रिय तुझ्याकरितां येथें आलेले आहेत. ते या उत्कृष्ट लक्ष्याचा भेद करतील आणि हे भद्रे, त्यांतील जो कोणी या लक्ष्याचा भेद करील, त्याला तूं आज वरावेंस. १. १२. १८६.

अध्याय १८७ वा.

[१ लक्ष्यवेधासाठीं सर्व राजांचा प्रयत्न व त्याचें निष्फलत्व.]

(१) वैशंपायन—हे राजेंद्रा, त्यानंतर विविध अलंकारांनीं भूषित झालेले व कुंडलें धारण केलेले ते तरुण नरेंद्र परस्परांशीं स्पर्धा करूं लागले आणि त्यांतील प्रत्येक जण आपल्यामध्यें अस्त्रविद्या व बल हीं दोन्ही आहेत असें समजूं लागला. ते सर्वच आपापलीं आयुधें उचलून त्वरेनें त्या लक्ष्याकडे जाऊं लागले. रूप, वीर्य, कुल, शील, वित्त व यौवन यांनीं ज्यांचा दर्प उद्दीपित झाला आहे, असे ते राजे हिमालय पर्वतांतील मदाचा स्राव करणाऱ्या गजेंद्रांप्रमाणें दिसले.

ज्यांच्या अंतःकरणांत मदनानें संचार केला आहे, असे ते राजे एकमेकांकडे स्पर्धेनें पाहूं लागले व 'ही कृष्णा माझी आहे' असें म्हणत ते सर्वहि आपा-

पल्या आसनावरून एकदम उठले. हिमालयाची कन्या जी उमा तिच्यासाठीं एकत्र जमलेले देवगण जसे शोभावे त्याप्रमाणें त्या स्वयंवरमंडपांत एकत्र जमलेले व त्या द्रुपदात्मजेला जिंकण्याची इच्छा करणारे ते सर्व क्षत्रिय शोभले. ज्यांचीं शरीरें कामशरांनीं जर्जर झालीं आहेत, असे ते राजे आपल्या मनानें कृष्णेजवळ गेले.

राजा, त्या रंगभूमींत उतरलेले ते सर्व क्षत्रिय त्यावेळीं आपसांतील मित्रभाव विसरून द्रुपदकन्येसाठीं सुहृदांचाहि द्वेष करूं लागले. त्या प्रसंगीं विमानांतून रुद्र, आदित्य इत्यादि देवगण, दैत्य, गरुडादि पक्षी, श्रेष्ठ नाग, देवर्षि, गुह्यक, चारण, विश्वावसु, नारद, पर्वत व अप्सरांसह मुख्य मुख्य गंधर्व आकाशांत येऊन उभे राहिले. बलराम, जनार्दन, वृष्णि व अंधक हे आपापल्या योग्यतेप्रमाणें स्वस्थानींच बसून राहिले. कृष्णाच्या इच्छेप्रमाणें वागणारे सर्व बलाढ्य यादवहि क्षत्रियांचा तो विचित्र क्षोभ नुसता पहात बसले.

इतक्यांत मत्त गजेंद्रासारखें ज्यांचें स्वरूप आहे अशा ब्राह्मणसमूहांत बसलेल्या सर्वांगसुंदर पांच वीरांना भस्माच्छादित अग्नीप्रमाणें पाहून यदुवीरांमध्यें श्रेष्ठ असलेल्या कृष्णानें ‘ हे कोण बरें असावे ! ’ असा विचार केला व भीम आणि अर्जुन यांसह युधिष्ठिर व माद्रीपुत्र वीर नकुल-सहदेव असे पांच पांडवहि येथें ब्राह्मणवेषानें आले आहेत, असें त्यानें ओळखलें व तो बलरामास म्हणाला—“रामा, पांच पांडवहि ब्राह्मणवेषानें द्रौपदीच्या लोभानें आले आहेत; ते पहा.”

तेव्हां बलरामानेंहि हळूच त्यांच्याकडे पाहिलें व त्यांस ओळखून संतोषानें श्रीकृष्णाकडे पुनः अवलोकन केलें. इतर राजांचे वीर पुत्र व पौत्र कृष्णेकडे निश्चल दृष्टीनें पाहूं लागले. त्यांचे नेत्र, मन व आशय कृष्णामय झाले. सर्व राजे नेत्र लाल करून व दांत-ओंठ खाऊन एकमेकांकडे पाहूं लागले. महा बलाढ्य पृथापुत्र व वीर माद्रीपुत्रहि द्रौपदीला पाहून मदनशरांनीं विह्वल झाले. त्यावेळीं अंतरिक्षांतहि देवर्षि-गंधर्वांची मोठी गर्दी झाली. तें दिव्य सुगंधांनीं भरून गेलें व दुंदुभींच्या ध्वनीनें दुमदुमलें. देवादिकांचीं विमानें एकमेकांना खेटून उभीं राहिलीं. इकडे विविध वाद्यांचा ध्वनि होत असतां त्यांनीं अंतरिक्षांतून पुष्पवृष्टि केली. नंतर कर्ण, दुर्योधन, शाल्व, शल्य, अश्वत्थामा, क्राथ, सुनीथ, वक्र, कलिंग, वंग, पांड्य, पौंड्र देशाचा राजा, विदेहाधिपति, यवन देश व इतर राष्ट्रांचे भूपाल, कमलपत्राप्रमाणें नेत्र असलेले राजपुत्र व राजपौत्र, या सर्व क्षत्रिय वीरांनीं द्रौपदीच्या प्राप्तीसाठीं क्रमानें आपआपला पराक्रम प्रकट केला.

त्यांनीं कुंडलें, बाहुभूषणें इत्यादि अलंकार धारण केले होते. ते विशालबाहू, पराक्रमी व शक्तिमान् होते. बलानें व वीर्यानें युक्त असलेले ते पराक्रमी वीर दर्पानें गर्जना करूं लागले. परंतु तें दृढ धनुष्य वांकविणें अशक्य आहे, असें पाहून तें सज्ज करण्याचें कोणी मनांतहि आणीना.

पण त्यांतील जे कित्येक तें धनुष्य वांकविण्याचा प्रयत्न करूं लागले, त्यांच्या हातांतून त्याचें टोंक निसटलें व दांडूनें जशी विटी फेंकतात, त्याप्रमाणें धनुष्याच्या टोंकानें त्यांना उडविलें, त्यामुळें ते भूतलावर सपशेल पडले. त्यांनीं आपलें सामर्थ्य व शिक्षण यांच्या अनुसार तें धनुष्य वांकविण्याचा बराच प्रयत्न केला, पण शेवटीं भूमीवर आदळल्यामुळें त्यांच्या उत्साहाचा भंग झाला. किरीट, हार इत्यादि भूषणें आपापल्या स्थानापासून गळून पडलीं व ते धापा टाकीत स्वस्थानीं जाऊन बसले. त्या वेळीं ज्यांचे हार व बाहुभूषणें अस्ताव्यस्त झालीं आहेत अशा राजमंडळांत त्या दृढ धनुष्यानें मोठा हाहाकार उडविला. कृष्णा आपली पत्नी व्हावी, ही त्यांची इच्छा सर्वथा लोपली व तें राजमंडळ अतिशय खिन्न झालें.

जनमेजया, त्या राजांची ही दुर्दशा पाहून धनुर्धरांतील श्रेष्ठ कर्ण त्या धनुष्याजवळ गेला व एका क्षणांत तें धनुष्य उचलून, त्यावर गुण चढवून त्यानें त्याला बाणहि जोडिले. तें पाहून ब्राह्मणसमुदायांत बसलेल्या पांडुपुत्रांनीं अंतरिक्षांतील लक्ष्य कर्णाच्या बाणांनीं विद्ध होऊन भूमीवर पडलेंच आहे, असें मानिलें. पण द्रौपदीच्या प्रीतीनें ज्यानें हें महत्कार्य करण्याची प्रतिज्ञा केली आहे व ज्यानें आपल्या तेजानें अग्नि, चंद्र व सूर्य यांनाहि दिपविलें आहे, अशा त्या सूर्यपुत्राला पाहून द्रौपदी 'मी सूतपुत्राला वरणार नाहीं' असें मोठ्यानें बोलली.

तेव्हां कर्णाला नीच कुलाच्या संबंधामुळें क्रोध आला व सूर्याच्या अपराधामुळें हसूंहि आलें. त्यानें सूर्याकडे पाहिलें व हातांतील धनुष्य टाकून दिलें. याप्रमाणें बहुतेक सर्व क्षत्रिय त्या महत्कार्यापासून निवृत्त झाले असतां चेदिदेशाचा बलवान्, धीर, वीर, व यमोपम राजा दमघोषपुत्र शिशुपाल त्या धनुष्यापाशीं जाऊन तें आपल्याला वांकवितां येईल किंवा नाहीं, असें पाहूं लागतांच तो भूमीवर गुडघे टेंकून पडला.

त्याच्या मागून महापराक्रमी जरासंध धनुष्यापाशीं गेला व निश्चल पर्वतासारखा उभा राहिला, पण त्याचीहि तीच स्थिति झाली. तेव्हां लज्जित झालेला

तो राजा स्वदेशीं निघून गेला. त्याच्या मागून महा बलाढ्य मद्रराज शैल्य त्यावर गुण चढवूं लागला, पण तोहि तोंडघशीं पडला. त्यामुळें सर्व क्षत्रियसमाज भयभीत झाला व त्यांतील एकाहि राजानें धनुष्य सज्ज करण्याचें नांवहि घेतलें नाहीं. तेव्हां कुंतीपुत्र अर्जुनानें त्याला सज्ज करण्याचें मनांत आणिलें. १. १२. १८७.

अध्याय १८८ वा.

[१ अर्जुनाचा लक्ष्यवेध.]

(१) वैशंपायन म्हणाला—राजा जनमेजया, जेव्हां ते सर्व भूपाल निरुत्साह होऊन धनुष्य सज्ज करण्याच्या कार्यापासून निवृत्त झाले, तेव्हां महाबुद्धिमान् पार्थ ब्राह्मणसमूहांतून उठला. तें पहातांच सर्व ब्राह्मण आपलीं अजिनें हालवूं लागले. इंद्राच्या ध्वजाप्रमाणें उंच असलेला तेजस्वी पार्थ त्या धनुष्याकडे जात आहे हें पाहून कांहीं विप्रांना खेद झाला व कांहींना हर्ष झाला. त्यांतील कांहीं बुद्धिमान् द्विज इतरांस म्हणाले—

" हे विप्रहो, धनुर्विद्येंत प्रवीण असलेल्या कर्ण, शल्य इत्यादि प्रसिद्ध क्षत्रियांना जें धनुष्य वांकवितां आलें नाहीं, तें अस्त्रविद्या न जाणणारा, शक्तीनें व बलानें दुर्बल असलेला हा बटु सज्ज करण्यास कसा बरें समर्थ होईल ! या अविचारानें केलेल्या कृत्यांत याला यश न मिळाल्यास खरोखर या राजसभेंत ब्राह्मणांचा मोठा उपहास होईल ! यास्तव ब्राह्मणांच्या चंचल स्वभावाला अनुसरून हा दर्पानें व हर्षानें तें धनुष्य उचलण्यास जात आहे खरा, पण तुम्ही त्याचें निवारण करा. हा न गेलेलाच बरा !"

त्यावर कांहीं ब्राह्मण म्हणाले—आमचा उपहासहि होणार नाहीं व आम्हांला कमीपणाहि येणार नाहीं. त्याचप्रमाणें आम्हीं या भूपालांच्या द्वेषासहि पात्र होणार नाहीं !

दुसरे कित्येक म्हणाले—हा विप्र तरुण हत्तीच्या सोंडेसारखा उंच, बलवान् व तेजस्वी असून त्याचे स्कंध, बाहु व मांड्या पुष्ट दिसत आहेत. हा धैर्यानें हिमालयासारखा आहे. याची गति सिंहाच्या लीलेसारखी असून हा मत्त गजाप्रमाणें पराक्रमी दिसतो. याच्या उत्साहावरून हा लक्ष्यभेद करील, असेंच अनुमान होतें. याचा हा महान् उत्साहच याच्या शक्तीची कल्पना करून देत

आहे. कारण कोणीहि असमर्थ मनुष्य आपण होऊन त्या धनुष्याकडे जाण्याचें साहस करणार नाहीं.

शिवाय ब्रह्मलोकापर्यंत या सर्व देवासुरादि आकारांनीं संचार करणाऱ्या लोकांमध्यें ब्राह्मणांना असाध्य असें कांहींच नाहीं. ते जल प्राशन करणारे, वायु भक्षण करणारे, केवल फलाहार करणारे, दृढव्रत धारण करणारे व त्यामुळेंच दुर्बल जरी दिसले तरी आपल्या तेजानें बलवान् असतात. यास्तव एखादा ब्राह्मण सुखद, दुःखद, लहान, मोठें इत्यादि प्राप्त झालेलें चांगलें किंवा वाईट कर्म जरी करीत असला तरी त्याचा केव्हांहि अवमान करूं नये. परशुरामानें युद्धामध्यें क्षत्रियांना जिंकलें. अगस्त्य-मुनीनें आपल्या ब्रह्मतेजानें अगाध समुद्र प्राशन केला. त्याचप्रमाणें ‘ हा बटु हें धनुष्य सत्वर सज्ज करो ’ असेंच आपण सर्वांनीं बोलावें. तेव्हां ते सर्व विप्र त्याप्रमाणें बोलले.

पारिक्षिता, याप्रमाणें त्या ब्राह्मणांचीं विविध भाषणें चाललीं असतां अर्जुन त्या धनुष्याजवळ जाऊन क्षणभर पर्वताप्रमाणें निश्चल उभा राहिला. नंतर त्यानें त्या धनुष्याला प्रदक्षिणा घातली. वर देणाऱ्या प्रभु शंकराला शिरसा वंदन केलें व मनांत श्रीकृष्णाचें स्मरण करून तें धनुष्य हातीं घेतलें. जें धनुष्य रुक्म, सुनीथ, वक्र, कर्ण, दुर्योधन, शल्य, शाल्व, इत्यादि धनुर्वेदांत निष्णात असलेल्या नृपश्रेष्ठांना मोठ्या प्रयत्नानेंहि वांकवितां आलें नाहीं, तेंच धनुष्य श्रीविष्णूप्रमाणें प्रभावशाली असलेल्या पराक्रमी अर्जुनानें सहज सज्ज केलें आणि एका निमिषाच्या आंत त्या यंत्राच्या छिद्रांतून पांच बाण सोडून तें लक्ष्य छिन्न-विच्छिन्न करून भूमीवर पाडविलें.

त्यामुळें अंतरिक्षांत व त्या स्वयंवरमंडपांतील समाजांत फार मोठा जयघोष झाला व देवांनीं शत्रूंचा नाश करणाऱ्या पार्थावर दिव्य पुष्पवृष्टि केली. हजारों ब्राह्मणांनीं आपलीं वस्त्रें ध्वजाप्रमाणें फडफडविलीं व क्षत्रिय लज्जित होऊन सर्व बाजूंनीं हाहाकार करूं लागले. आकाशांतून चोहोंबाजूंनीं पुष्पवृष्टि झाली. असंख्य वाद्यें वाजूं लागलीं. सूत व मागध यांचा समुदाय सुस्वर स्तुति करूं लागला. तेव्हां त्या विजयी पार्थाला पाहून शत्रुनाशक द्रुपदराजा अतिशय संतुष्ट झाला व द्रौपदी प्राप्त न झाल्यामुळें क्षुब्ध झालेले नृपाल कदाचित् युद्धास तयार होतील, या भीतीनें तो सैन्यासह अर्जुनाच्या साह्यार्थ आला.

त्या मंडपांत फार मोठा कोलाहल वाढला असतां धर्मात्मा युधिष्ठिर पुरुष-श्रेष्ठ नकुल-सहदेवांसह तेथून त्वरेनें निघाला व आपल्या निवासस्थानीं आला.

इकडे लक्ष्याचा भेद करणाऱ्या इंद्रतुल्य अर्जुनाला पाहून आपल्याला उत्तम पतीचा लाभ झाला, याचा अत्यंत अभिमान बाळगणारी ती कृष्णा शुभ्र वस्त्र व पुष्पमाला घेऊन अर्जुनाच्या समीप गेली व तिनें त्याला माळ घातली. तेव्हां तो अर्जुन सर्व राजांसमक्ष तिला जिंकून व तिचा स्वीकार करून चालला असतां ब्राह्मणांनीं त्याचा सत्कार केला. नंतर ज्याच्या मागोमाग पत्नीहि चालली आहे असा तो अचिंत्य कर्म करणारा पार्थ तेथून निघाला. १. १२. १८८.

अध्याय १८९ वा.

[१ राजांचा द्रुपदाला मारण्याचा निश्चय. २ भीमार्जुनांनीं त्यांना केलेला प्रतिबंध. ३ हे पांडुपुत्रच आहेत असा श्रीकृष्णाचा तर्क.]

(१) **वैशंपायन**—जनमेजया, इकडे पांचालेश्वर आपली कन्या लक्ष्याचा वेध करणाऱ्या त्या ब्राह्मणाला देऊं इच्छित आहे, हें पाहून त्या सर्व श्रेष्ठ नृपालांना अतिशय क्रोध आला व ते परस्परांस म्हणाले—" हा द्रुपदराजा आमचें अतिक्रमण करून, येथें जमलेल्या आम्हां सर्वांस तृणतुल्य लेखून स्त्रियांतील श्रेष्ठ द्रौपदी या ब्राह्मणाला देऊं पहात आहे. एखाद्याला वृक्षावर चढवून तो फलापर्यंत जाऊन पोंचला असतां त्याला जसें अकस्मात् खालीं ढकलून द्यावें, तसेंच हें याचें कृत्य आहे. यास्तव आम्हांला कस्पटाप्रमाणें मानणाऱ्या या दुरात्म्याचा आपण वध करूं या.

अहो, हा राजा आपल्या गुणांनींच वृद्धांच्या उपचारास व मानास पात्र नाहीं. क्षत्रियांचा द्वेष करणाऱ्या या दुराचाऱ्याला पुत्रांसह मारून टाकूं या. आम्हां सर्व नराधिपांना येथें बोलावून सत्कार करून, सुग्रास भोजन देऊन शेवटीं हा आमचा असा अपमान करीत आहे. देवांसारख्या या एवढ्या मोठ्या राजसमूहांत या राजाला एकहि अनुरूप क्षत्रिय आढळला नाहीं काय! वस्तुतः ब्राह्मणाला स्वयंवराचा अधिकारच नाहीं. क्षत्रियांना तो विहित आहे. किंवा ही कन्याच जर आम्हांपैकीं कोणाला वरण्याची इच्छा करीत नसेल, तर हिला अग्नींत फेकून आपण आपापल्या राष्ट्राला निघून जाऊं.

हे वीरहो, या ब्राह्मणानें आपल्या स्वाभाविक चापल्यामुळें व लोभामुळें हें राजेंद्रांना अप्रिय असलेलें कार्य जरी केलें आहे, तरी तो आम्हांला वध्य नाहीं. कारण आमचें राज्य, जीवित, विविध धन, पुत्र, पौत्र व दुसरेंहि जें

कांहीं धन आहे तें ब्राह्मणांसाठीं आहे. पण अवमानाच्या भीतीनें व स्वधर्माच्या रक्षणासाठीं इतर स्वयंवरांचाहि असाच प्रकार होऊं नये म्हणून आम्हांला या राजाचा प्रतीकार केलाच पाहिजे." असें बोलून ज्यांचे बाहु परिघासारखे पुष्ट आहेत, असे ते सर्व हृष्ट झालेले राजसिंह आपापलीं आयुधें सज्ज करून द्रुपदाला मारण्याच्या इच्छेनें त्याच्या अंगावर धावले.

(२) तेव्हां अतिशय क्रुद्ध होऊन व आपापलीं आयुधें उचलून वेगानें येत असलेल्या त्या असंख्य राजांना पाहून द्रुपदराजा भयभीत झाला व ब्राह्मणांना शरण गेला. इतक्यांत मदोन्मत्त हत्तीप्रमाणें वेगानें चाल करून येत असलेल्या त्या सर्व क्षत्रियांना अडविण्यासाठीं हे दोघे शत्रुनाशक वीर पांडुपुत्र त्यांच्या समोर गेले.

तें पाहून शस्त्रास्त्रांनीं सज्ज झालेल्या क्षत्रियांनीं त्या दोघां वीरांना मारण्याचा निश्चय केला. इकडे वज्राप्रमाणें ज्याचें सामर्थ्य आहे, अशा अद्भुत व भयंकर कर्म करणाऱ्या भीमानें एखाद्या गजेंद्राप्रमाणें दोन्ही हातांनीं एक वृक्ष उपटून घेतला. त्यावरील पानें काढून टाकिलीं आणि उग्र दंड हातीं घेतलेल्या यमराजाप्रमाणें तो भीम त्या वृक्षानें शत्रूंना झोडूं लागला. अर्जुनाचें रक्षण करण्यासाठीं तो शत्रूंचें मर्दन करणारा भीम हातांत वृक्ष घेऊन उभा राहिला असतां अर्जुनालाहि मोठा विस्मय वाटला व तोहि निर्भय झाला आणि महेंद्राप्रमाणें ज्याचें कर्म आहे, असा तो कुंतीपुत्र धनुष्य सज्ज करून आपलें सामर्थ्य प्रकट करण्यासाठीं पर्वताप्रमाणें स्थिर झाला.

(३) भीमासह पार्थाचें हें अचिंत्य कर्म पाहून असामान्य बुद्धिमान् दामोदर आपल्या भ्रात्या हलायुधाला म्हणाला—"हे वीरा, सिंह किंवा वृषभ यांप्रमाणें लीलेनें गमन करणारा हा जो ताडासारखें फार मोठें धनुष्य सज्ज करून त्याची प्रत्यंचा आकर्ण ओढीत आहे, तो अर्जुनच आहे, यांत कांहीं संशय नाहीं. हे संकर्षणा, माझें हें बोलणें जर खोटें झालें तर मी आपलें 'वासुदेव' हें नांव बदलून टाकीन. त्याचप्रमाणें हा जो दुसरा वीर वेगानें वृक्ष उपटून या राजसमूहावर त्वरेनें धावून जात आहे तो वृकोदरच आहे. कारण भूलोकीं त्याच्या वांचून दुसरा कोणीहि समरांगणांत असें कृत्य करण्यास समर्थ नाहीं.

त्याचप्रमाणें आतांच जो एक कमलनयन, कृश, सिंहाप्रमाणें गमन करणारा, नम्र, गौरवर्ण, उंच व शुकासारख्या सुंदर नासिकेनें युक्त असलेला पुरुष येथून निघून गेला तो धर्मपुत्र युधिष्ठिर होय आणि कार्तिकस्वामीप्रमाणें असलेले जे

दोन कुमार त्याच्या मागोमाग निघून गेले, ते अश्विनिकुमारांचे पुत्र नकुल-सहदेव आहेत, असा माझा तर्क होतो. कारण त्या लाक्षागृहाच्या भयंकर दाहांतून पृथेसह पांचहि पांडुपुत्र सुखरूपपणें निघून गेले असें मी यापूर्वींच ऐकिलें आहे."

राजा, श्रीकृष्णाचें हें वचन ऐकून जलरहित मेघाप्रमाणें शुभ्रवर्ण असलेला बलराम आपल्या अनुजास म्हणाला—"कृष्णा, तूं म्हणतोस तें खरें आहे, असें मलाहि वाटतें. आपली पितृभगिनी पृथा व तिचे पुत्र पांच पांडव हे त्या अग्नीपासून सुरक्षितपणें मुक्त झाले, हें पाहून मला मोठा संतोष वाटत आहे. १. १२. १८९.

अध्याय १९० वा.

[१ भीमार्जुन व कर्ण-शल्यादि यांचें युद्ध. २ त्यांत पांडवांचा विजय.]

(१) **वैशंपायन**—हे राजेश्वरा, द्रुपद ब्राह्मणांना शरण आला असतां आणि अर्जुन व भीम क्षुब्ध झालेल्या राजसमूहास प्रतीकार करण्यासाठीं पुढें सरसावले असतां ब्राह्मणश्रेष्ठ आपलीं अजिनें व कमंडलु हालवीत भीमार्जुनांस म्हणाले—"वीरांनों, भीऊं नका. आम्ही शत्रूंशीं युद्ध करतों."

तेव्हां असें बोलणाऱ्या त्या पूज्य ब्राह्मणांना अर्जुन हंसतच म्हणाला—हे भगवन्, आपण सर्व प्रेक्षक होऊन बाजूला उभे रहा. क्रुद्ध झालेल्या विषारी नागांचें मंत्रांनीं जसें निवारण करितात, त्याप्रमाणें मी या क्रुद्ध क्षत्रियांचें शेकडों बाणांनीं निवारण करीन. ज्यांचीं अग्रें सरळ आहेत, अशा तीक्ष्ण शरांचा सभोंवार वर्षाव करून मी यांना एक पाऊलभरहि पुढें येऊं देणार नाहीं. तुम्ही शांत चित्तानें युद्धचमत्कार पहात रहा.

राजा, ब्राह्मणांना असें सांगून व पणानें प्राप्त झालेलें तें धनुष्य सज्ज करून महा बलाढ्य अर्जुन भ्रात्या भीमासह त्या क्षत्रियांसमोर एखाद्या पर्वताप्रमाणें निश्चल उभा राहिला. त्यानंतर दोन मत्त गज जसे इतर गजांबरोबर झुंझतात, तसे ते दोघे निर्भय वीर युद्धाच्या मदानें उन्मत्त झालेल्या कर्णप्रभृति क्षत्रियांना पाहून त्यांच्यावर तुटून पडले.

तेव्हां ते युद्धाची इच्छा करणारे राजे 'युद्धामध्यें ब्राह्मणांचाहि वध विहित आहे' असें कठोर वचन बोलून त्या विप्रांवर वेगानें धावून गेले. हत्तिणीसाठीं एक गज दुसऱ्या गजावर जसा हल्ला करितो, तसा महा तेजस्वी कर्ण युद्धामध्यें पार्थावर चाल करून गेला. मद्रदेशाधिपति बलाढ्य शल्य भीमसेनावर तुटून पडला व दुर्योधनादिक योद्धे इतर ब्राह्मणांबरोबर युद्ध करूं लागले.

पण ते सर्व शूर क्षत्रिय भीमार्जुनांना न ओळखिल्यामुळें, ते ब्राह्मणच आहेत, अशा समजूतीनें प्रथम त्यांच्याशीं अनादरानें लढूं लागले, मोठ्या आवेशानें व प्रयत्नपूर्वक लढले नाहींत. पण अर्जुनानें आपलें दृढ धनुष्य आकर्ण ओढून आपल्यावर चालून आलेल्या सूर्यपुत्र कर्णाला जेव्हां तीक्ष्ण बाणांनीं वेध केला तेव्हां अग्नीसारख्या प्रखर तेजानें युक्त असलेल्या त्या बाणांच्या वेगानें राधासुताला मूर्च्छाच आली. तरीहि तो मोठ्या प्रयत्नानें धीर धरून पार्थावर धावला.

हे पांडवेया, त्या दोन्ही वीरांचें हस्तलाघव सारखेंच असल्यामुळें त्यांतील कर्ण कोणता व विप्रवेषधारी पार्थ कोणता हेंहि ओळखूं येईनासें झालें. एकमेकांना जिंकण्याची इच्छा करणारे ते दोघे अतिशय क्षुब्ध होऊन युद्ध करूं लागले. ते 'तुझ्या अस्त्रप्रयोगाचा प्रतीकार मी कसा केला! आतां हें पहा माझें बाहुबल!' अशीं शौर्य व्यक्त करणारीं अर्थपूर्ण वचनें परस्परांस बोलूं लागले. अर्जुनाचें बाहुबल या भूलोकीं अप्रतिम आहे, असें जाणून कर्ण मोठ्या वेगानें युद्ध करूं लागला. त्या वेळीं अर्जुनाच्या वेगवान् बाणांचा प्रतिकार करणाऱ्या सूर्यपुत्राचा क्षत्रियसैन्यांनीं उच्च स्वरानें मोठा जयघोष करून सत्कार केला.

इतक्यांत कर्ण अर्जुनाला म्हणाला—हे श्रेष्ठ ब्राह्मणा, तुझा उत्साह, युद्धांतील कौशल्य, शौर्य व शस्त्रास्त्रांतील प्रावीण्य पाहून मी संतुष्ट झालों आहें. हे विप्रसत्तमा, तूं कोण आहेस! तूं साक्षात् धनुर्वेद आहेस किंवा भार्गवराम आहेस, कीं साक्षात् इंद्र आहेस, कीं अच्युत विष्णु आहेस! तूं स्वतःचें स्वरूप गुप्त ठेवण्यासाठीं विप्ररूप धारण करून आपल्या बाहुबलाच्या आश्रयानें माझ्याशीं युद्ध करीत आहेस, असें मला वाटतें. कारण क्रुद्ध झालेल्या माझ्याशीं साक्षात् इंद्र किंवा पार्थ या दोघांशिवाय कोणीहि युद्ध करण्यास समर्थ नाहीं.

कर्णाचें हें भाषण ऐकून पार्थ त्यास म्हणाला—हे कर्णा, मी धनुर्वेदहि नाहीं व प्रतापवान् परशुरामहि नाहीं. सर्व शस्त्रधारण करणाऱ्या योद्ध्यांमध्यें श्रेष्ठ असा मी एक ब्राह्मण आहें. गुरूच्या उपदेशानें ब्राह्म व ऐंद्र हीं अस्त्रें मला उत्तमप्रकारें अवगत आहेत. आज मी तुला युद्धांत जिंकण्यासाठीं येथें स्थित आहें. यास्तव हे वीरा तूं स्थिर हो.

(२) राजा जनमेजया, अर्जुन असें बोलला असतां तो महारथ कर्ण 'ब्राह्म तेज जिंकण्यास अशक्य आहे' असें पाहून युद्धापासून निवृत्त झाला. इतक्यांत दुसरीकडे विद्या व बल यांनीं युक्त असलेले शल्य व वृकोदर हे दोघे बलाढ्य

वीर मत्त महागजांप्रमाणें एकमेकांस युद्धाचें आह्वान करून परस्परांवर गुडघ्यांचे आघात व मुष्टिप्रहार करूं लागले, एकमेकांस ओढूं लागले व ठोसे मारूं लागले. तेव्हां त्यांच्या प्रहारांचा 'चट्‌चट्' असा फार मोठा ध्वनि ऐकूं येऊं लागला. पाषाणांच्या प्रहाराप्रमाणें ते परस्परांवर प्रहार करीत होते.

याप्रमाणें दोन घटका त्या दोघांचें द्वंद्वयुद्ध झालें. नंतर भीमानें आपल्या दोन्ही हातांनीं त्या शल्याला वर उचलून जोरानें खालीं आपटलें. तेव्हां हे कुरुश्रेष्ठा, ते सर्व ब्राह्मण हंसूं लागले. परंतु भीमसेनानें फार मोठें आश्चर्य केलें. त्या बलाढ्य वीरानें शल्याला भूमीवर भोपळ्याप्रमाणें आपटलें असूनहि त्याचा वध केला नाहीं.

याप्रमाणें भीमसेनानें शल्याला पाडलें असतां व कर्ण शंकित झाला असतां जयांविषयीं साशंक झालेले ते सर्व भूपाल भीमसेनाच्या भोंवतीं जमून म्हणाले—"हे दोघे ब्राह्मणवीर धन्य होत. यांचा जन्म कोठें झाला व हे रहातात कोठें, हें आपण समजून घेऊं या. कारण भार्गवराम, द्रोणाचार्य, धनंजय, देवकीचा पुत्र वासुदेव आणि कृपाचार्य यांच्यावांचून महापराक्रमी कर्णाशीं युद्ध करण्यास कोण बरें समर्थ आहे! तसेंच, दुर्योधनाशीं युद्धांत स्पर्धा करण्याचें सामर्थ्य कोणाच्या अंगीं आहे!

त्याचप्रमाणें मद्राधिपति बलवान् शल्याचा पाडाव हलधर, वृकोदर, किंवा वीर दुर्योधन यांच्यावांचून दुसरा कोण करूं शकणार! यास्तव ब्राह्मणांनीं व्यापिलेल्या या युद्धांतून आपण निवृत्त होऊं या. ब्राह्मणांनीं जरी नित्य अपराध केले, तरी त्यांचें सर्वदा रक्षण करावें, अशी नीति आहे. यास्तव हे कोण आहेत, तें आपण अगोदर समजून घेऊं व मग यांच्याशीं मोठ्या संतोषानें पुनः युद्ध करूं." याप्रमाणें त्यांचें बोलणें चाललें असतां भीमार्जुन स्वस्थ उभे राहिले होते.

हे कुरुश्रेष्ठा, भीमसेनाचें तें अचाट कर्म पाहून हे दोघे पांडुपुत्रच आहेत असें श्रीकृष्णानें निश्चित जाणलें व 'हे भूपालहो, या वीरानें द्रौपदीला धर्मानें जिंकलें आहे. यास्तव त्याच्याशीं युद्ध करणें योग्य नव्हे' असें म्हणून त्या सर्व बलाढ्य नृपश्रेष्ठांचें निवारण केलें; तेव्हां ते सर्व युद्धविशारद श्रेष्ठ क्षत्रिय युद्धापासून निवृत्त झाले व अतिशय विस्मित होऊन आपआपल्या निवासस्थानीं निघून गेले. तेथें जमलेला इतर जनसमूहहि 'या समारंभांत ब्राह्मणांचा विजय झाला व पांचालीनें ब्राह्मणाला वरिलें' असें म्हणत आपापल्या स्थानीं निघून गेला.

त्यानंतर 'रुरु'-नांवाच्या मृगाचीं अजिनें पांघरलेल्या ब्राह्मणांनीं भीमार्जुनांस वेढून टाकिलें. तेव्हां त्या जनसंमर्दातून ते मोठ्या कष्टानें मार्ग काढूं लागले. पौर्णिमेच्या दिवशीं मेघमंडलापासून मुक्त होऊन उदय पावणारे चंद्र-सूर्य जसे शोभतात, तसे ज्यांच्या मागोमाग द्रौपदी चालली आहे, असे ते दोघे वीर शोभले.

हे राजा, इकडे भिक्षा घेऊन येण्याची वेळ टळून गेली, तरी पांडव घरीं आले नाहींत, हें पाहून त्यांची माता कुंती अतिशय चिंतातुर झाली. 'माझ्या शूर पुत्रांना ओळखून दुष्ट दुर्योधनादिकांनीं त्यांचा वध तर केला नसेल ना! किंवा मायावीरूप धारण करणाऱ्या दीर्घ द्वेषी राक्षसांनीं तर त्यांचा नाश केला नाहीं! महात्म्या कृष्णद्वैपायनाचा उपदेश असा विपरीत कसा बरें झाला!' असे अनेक तर्क-वितर्क करणारी पृथा पुत्रस्नेहानें व्याकुळ झाली. इतक्यांत अपराह्णकाल उलटण्याच्या सुमारास मेघांनीं परिवेष्टित झालेल्या सूर्याप्रमाणें ब्राह्मणांनीं परिवेष्टित झालेला जिष्णु त्या कुलालशालेंत येऊन पोंचला. १. १२. १९०.

अध्याय १९१ वा.

[१ कुंतीला द्रौपदीचें भिक्षारूपानें निवेदन व कुंतीचें वचन.
२ त्याविषयीं विचार. ३ कृष्णदर्शन.]

(१) **वैशंपायन**—हे राजन्, याप्रमाणें ते दोघे विजयी नरश्रेष्ठ भीमार्जुन परम हृष्ट चित्तानें याज्ञसेनीसह त्या कुलालशालेंत शिरले व 'हे माते, ही पहा आम्ही भिक्षा आणली आहे.' असें बोलून त्यांनीं भिक्षा म्हणून कुंतीला याज्ञसेनीचेंच निवेदन केलें. त्यावेळीं कुंती कुलालशालेंत होती. त्यामुळें तिनें पुत्रांना न पहातांच 'सर्व मिळून सेवन करा' असें म्हटलें व हे शब्द मुखांतून निघून गेल्यावर पुढें येऊन तिनें कृष्णेला अवलोकन केलें आणि विह्वल होऊन "अरे अरे, मी हें काय बोललें!" असें म्हणत ती पश्चात्ताप पावली.

राजा, अधर्मभीरु साध्वी कुंती 'माझ्या तोंडून न कळत निघून गेलेलें वाक्य खरें कसें बरें होईल!' असा मनांत विचार करीत याज्ञसेनीजवळ गेली व अतिशय संतुष्ट झालेल्या तिचा हात धरून युधिष्ठिराला म्हणाली—"वत्सा, तुझ्या या दोघां अनुजांनीं द्रुपदराजाच्या कन्येचें भिक्षा म्हणून मला निवेदन केलें व मींहि तिला न पहातां प्रमादानें नेहमींप्रमाणें 'सर्व मिळून सेवन करा'

असें सांगितलें. पण एका स्त्रीचें बहुभर्तृत्व संभवत नाहीं. मला अधर्माची मोठी भीति वाटते. तेव्हां हे कुरुश्रेष्ठा, माझें भाषण असत्य कसें होणार नाहीं तें मला सांग. पांचालराजकन्येला अधर्म स्पर्श करणार नाहीं व अधर्मामुळें तिला पश्चादि योनींमध्यें पुनः पुनः भ्रमण करावें लागणार नाहीं, असा कांहीं उपाय मला सांग."

(२) जनमेजया, पूज्य कुंतीमातेनें असें म्हटलें असतां बुद्धिमान् युधिष्ठिरानें क्षणभर विचार केला व खिन्न झालेल्या जननीला धीर देऊन तो धनंजयाला म्हणाला—" अर्जुना, तूं या याज्ञसेनीला जिंकलें आहेस व ही याज्ञसेनी तुझ्या सांनिध्यांतच अधिक शोभेल. यास्तव हे वीरा, अग्नीला प्रज्वलित करून तूं हिचें पाणिग्रहण कर."

युधिष्ठिराचें हें आज्ञावचन ऐकून अर्जुन म्हणाला—हे नरेंद्रा, तूं मला अशा अधर्मांत नियुक्त करूं नकोस. तूं मला जो सांगत आहेस तो धर्म कोठेंहि रूढ नाहीं. प्रथम तुझा विवाह होणें उचित आहे. त्यानंतर अचिंत्य कर्मे करणाऱ्या या पराक्रमी भीमसेनाचा विवाह होईल. त्यानंतर माझा व क्रमानें या दोघां नकुल-सहदेवांचा विवाह होणें उचित आहे. आम्ही वृकोदरादि चारी भ्राते ही वधू तुला अर्पण करीत आहों व असें करणें हा आमचा धर्मच आहे. यास्तव या प्रसंगीं धर्म व यश यांना अनुसरून जें करणें उचित असेल, तेंच करण्याचा तूं निश्चय कर. युधिष्ठिरा, पूर्ण विचार करून ज्याच्या योगें पांचाल-राजाचें हित होईल, तेंच करण्याची आम्हांला आज्ञा कर. आम्ही सर्व भ्राते तुझ्या अधीन आहों.

हे पारिक्षिता, जिष्णूचें हें भक्तिस्नेहयुक्त वचन ऐकून सर्व पांडुपुत्रांनीं पांचालीकडे पाहिलें. ती यशस्विनी कृष्णाहि त्यांच्याकडे पहात होती. याप्रमाणें परस्पर अवलोकन केल्यावर पांची पांडुपुत्रांनीं तिला आपल्या हृदयांत धारण केलें. कारण त्या सुंदरीला पाहून सर्वहि पराक्रमी पांडुपुत्रांच्या मनांत कामोद्भव झाला. मदनानें त्यांच्या इंद्रियांना व्याकुळ केलें. कारण स्वतःच विधात्यानें निर्मिलेलें तिचें स्वरूप त्रिभुवनांतील सर्व स्त्रियांच्या स्वरूपाहून अधिक मनोहर होतें. त्यामुळें तिच्याकडे पहाणाऱ्या कोणाहि पुरुषाचें मन ती आकर्षण करीत असे.

राजा, याप्रमाणें वृकोदरादिकांच्या चर्येवरूनच त्यांचा आशय ओळखून कुंतीपुत्र युधिष्ठिराला द्वैपायन व्यासांच्या वचनाचें स्मरण झालें व द्रौपदी

यांच्यापैकीं कोणा एकाचीच भार्या झाल्यास तो इतरांचा शत्रु होईल, हें जाणून तो म्हणाला—"ही शुभ द्रौपदी आम्हां सर्वांचीच भार्या होईल." हे कुरुश्रेष्ठा, आपल्या ज्येष्ठ भ्रात्याचें हें वचन ऐकून पांडूचे चारी पुत्र त्याचाच विचार करीत बसले.

(३) इतक्यांत वृष्णिकुलांतील श्रेष्ठ महावीर वासुदेव रोहिणीपुत्र बलरामासह जेथें हे पांच पुरुषश्रेष्ठ रहात होते, त्या कुलालशालेंत आले. कारण हे कुरुकुलश्रेष्ठ पांडवच असावेत, अशी त्यांच्या मनाची खात्री झाली होती. बलरामासह कृष्णानें तेथें बसलेल्या अजातशत्रूला व त्याच्या सभोंवार असलेल्या अग्नितुल्य तेजस्वी चार भ्रात्यांना पाहिलें आणि वासुदेव धर्मधारण करणारांतील श्रेष्ठ कुंतीसुतापाशीं जाऊन 'मी कृष्ण आहें' असें म्हणाला व त्यानें त्या अजामीढ युधिष्ठिर-राजाचे दोन्ही पाय आपल्या दोन्ही हातांनीं घट्ट धरिले.

कृष्णाच्या मागोमाग बलरामानेंहि आपलें नांव निवेदन करून त्यास तसेंच अभिवादन केलें. तेव्हां हृष्ट झालेल्या पांडवांनींहि त्यांचें अभिनंदन केलें. त्या दोघां यदुश्रेष्ठांनीं आपल्या पितृभगिनीचेहि चरण वंदिले. तेव्हां त्यांस बसावयास दर्भासनें देऊन व कृष्ण आपल्या भ्रात्यासह कुशल आहे, असें पाहून युधिष्ठिर म्हणाला—" हे वासुदेवा, आम्ही येथें गुप्त रीतीनें रहात असतांना 'आम्ही पांडवच आहों' हें तुला कसें कळलें ?"

हें ऐकून वासुदेव हंसून म्हणाला—हे राजा, अग्नि जरी गुप्त असला तरी तो जाणतां येतोच. या मनुष्यलोकीं कर्ण-शल्यासारख्या महावीरांचा पराभव करण्याचें सामर्थ्य पांडवांवांचून दुसऱ्या कोणामध्यें आहे ? शत्रूंचा वेग सहन करणारे पांची पांडव लाक्षागृहांतील त्या घोर अग्नीपासून जिवंत बाहेर पडले ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. अमात्यांसह पापी धृतराष्ट्रपुत्रांचे मनोरथ पूर्ण झाले नाहींत, याविषयीं आम्हांला मोठें समाधान वाटतें. तुमच्या मनांत गुप्त असलेल्या तुमच्या सर्व इच्छा पूर्ण होवोत. तुमचें कल्याण होवो. अग्नीप्रमाणें तुमची उत्तरोत्तर वृद्धि होवो. युधिष्ठिरा, आम्ही आतां येथें फार वेळ बसत नाहीं. इतर राजांनीं तुम्हांला ओळखूं नये म्हणून आम्ही आपल्या शिबिरासच जातों.

कृष्णाचें हें भाषण ऐकून पांडवांनीं त्यांना मोठ्या संतोषानें जाण्याची अनुज्ञा दिली व तो अक्षय, श्रीमान् वासुदेव बलदेवासह सत्वर निघून गेला. १. १२. १९१.

अध्याय १९२ वा.

[१ पांडवांच्या निवासस्थानीं धृष्टद्युम्नाचें गुप्तपणें गमन. २ चौघां पांडुपुत्रांनीं आणलेल्या भिक्षेची कुंतीच्या आज्ञेनें द्रौपदीनें केलेली वांटणी. ३ पांडवांचा वृत्तांत जाणून धृष्टद्युम्नाचें परत जाणें.]

(१) **वैशंपायन**—हे भरतसत्तमा, ते पराक्रमी वीर भीमार्जुन आपल्या निवासस्थानाकडे चालले असतां पंचालदेशाचा राजपुत्र धृष्टद्युम्न त्यांच्या मागोमाग निघाला व कोणाच्या दृष्टीस न पडतां त्या कुलालशालेंत प्रवेश करून पांडवांच्या नकळत, त्यांच्या समीप गुप्तपणें राहिला. सायंकाळीं बलाढ्य भीमसेन, शत्रुनाशक पार्थ व महानुभाव माद्रीपुत्र नकुल-सहदेव यांनीं भिक्षा आणून तिचें युधिष्ठिराला निवेदन केलें.

(२) नंतर कुंती त्या द्रुपदात्मजेला म्हणाली—हे भद्रे, या अन्नांतून प्रथम बलि काढून ठेव. ब्राह्मणांना भिक्षा घाल व नंतर जे अन्नार्थी जन जवळपास असतील त्यांस कांहीं अन्न दे. नंतर जें शिल्लक राहील त्याचे दोन भाग कर. एक भाग भीमासाठीं तसाच ठेवून दुसऱ्या भागाचे सहा वांटे कर. त्यांतून दोन तुझ्या व माझ्यासाठीं ठेवून बाकीचे चार विभाग भीमाखेरिज माझ्या चौघां पुत्रांना दे आणि भीमासाठीं काढून ठेवलेला भाग सगळाच त्याला दे. हे वत्से, तो माझा पराक्रमी पुत्र रूपवान्, तरुण व गजेंद्रासारखा बलिष्ठ आहे. त्याची क्षुधा सदैव प्रज्वलित असते.

जनमेजया, कुंतीची ही आज्ञा आपल्या हिताची आहे असें त्या संतुष्ट झालेल्या राजकन्येनें मानिलें व त्याप्रमाणें अन्नाचे विभाग करून प्रत्येकाला त्याचा वांटा दिला असतां त्या सर्वांनीं तें अन्न भक्षण केलें. नंतर चपल सहदेवानें भूमीवर दर्भ पसरले व त्यांवर आपापलीं अजिनें आंथरून त्यांनीं भूमीवर शयन केलें. सर्व पांडव दक्षिणेकडे मस्तक करून अंथरुणावर पडले. त्यांच्या उशाकडे कुंती व पायांकडे द्रौपदी आडवें अंथरुण घालून निजल्या.

हे राजा, ती द्रुपदराजाची कन्या पांडुपुत्रांबरोबर नुस्त्या दर्भशय्येवर, त्यांच्या पायांचाहि स्पर्श होईल, इतक्या अंतरावर निजली. पण त्या वेळीं तिच्या मनाला दुःखाचा स्पर्शहि झाला नाहीं. किंवा तिनें त्या कुरुश्रेष्ठांचा अवमानहि केला नाहीं. त्या शय्येवर पडल्या पडल्या सेनाधीश होण्यास योग्य असलेले ते वीर पांडव आपसांत दिव्य अस्त्रें, रथ, गज, खड्ग, गदा, परशु इत्यादिकांविषयीं विचित्र कथा सांगूं लागले.

(३) त्या वेळीं त्यांच्या त्या गोष्टी द्रुपदपुत्र धृष्टद्युम्नानें आडून ऐकल्या व त्यांच्या पायाशीं निजलेल्या कृष्णेला त्यानें व इतर लोकांनींहि पाहिलें. नंतर तो राजपुत्र धृष्टद्युम्न रात्रीं पाहिलेला सर्व वृत्तांत द्रुपदराजाला निवेदन करण्यासाठीं त्वरेनें तिकडे गेला.

पांडवांना न ओळखिल्यामुळें खिन्न झालेल्या पांचालेश्वरानें धृष्टद्युम्नाला विचारिलें—"वत्सा, आपली कृष्णा कोठें आहे ! तिला कोणीं नेलें ! एखाद्या हीनवर्ण शूद्रानें किंवा कर देणाऱ्या वैश्यानें तिला जिंकून आपला चिखलाचा पाय माझ्या मस्तकावर दिला नाहींना ! किंवा ही माझी पुष्पमाला श्मशानांत तर पडली नाहींना ! हा वीर आपल्याच वर्णाचा क्षत्रिय आहे किंवा कोणी श्रेष्ठ वर्णाचा ब्राह्मण आहे ! हे पुत्रा, एखाद्या हीन वर्णाच्या मनुष्यानें आज याज्ञसेनीच्या अभिलाषानें मुद्दाम आपला डावा पाय माझ्या मस्तकावर ठेविला नाहीं ना ! परंतु तूं खिन्न दिसत नाहींस, तर उलट अशाप्रकारचें शौर्य अन्यत्र संभवत नसल्यामुळें नरवीर पार्थाशीं संयुक्त झाल्याप्रमाणें अत्यंत संतुष्ट दिसतोस. यास्तव माझी कन्या आज कोणीं जिंकून नेली तें मला सांग. विचित्रवीर्याचे पौत्र कुरुश्रेष्ठ पांडव जिवंत आहेत ना ! आज धनुष्य सज्ज करून लक्ष्याचा वेध करणारा तो मध्यम पांडव पार्थ तर नव्हे ?" १. १२. १९२.

येथें बारावें स्वयंवरपर्व समाप्त झालें.

वैवाहिकपर्व १३.

अध्याय १९३ वा.

[१ धृष्टद्युम्नानें सांगितलेला पांडवांचा वृत्तांत. २ द्रुपदाच्या पुरोहिताचें पांडवांकडे शोधासाठीं आगमन. ३ त्यास युधिष्ठिराचें संदिग्ध उत्तर.]

(१) वैशंपायन—राजा जनमेजया, द्रुपदाचे ते प्रश्न ऐकून सोमकवंशांतील श्रेष्ठ राजपुत्र धृष्टद्युम्नानें प्रसन्न मुखानें कृष्णेचें हरण करणारांचा सर्व वृत्तांत पित्याला कथन केला. तो म्हणाला—"स्वयंवरासाठीं जमलेल्या वीरांमध्यें जो आरक्त व विशाल नेत्राचा, कृष्णाजिन पांघरलेला व देवासारखा सुस्वरूप तरुण होता, ज्यानें तें धनुष्य सज्य करून यंत्रभेद केला व तें लक्ष्य भूमीवर पाडविलें,

ज्या वीराला श्रेष्ठ ब्राह्मणांनीं मोठ्या आदरानें सभोंवार वेढलें, देव व ऋषि यांनीं सेवन केलेला इंद्र दैत्यांचा जसा पराभव करतो, त्याप्रमाणें ज्या वेगवानानें कर्णादि सर्व क्षत्रियांचा आज पराभव केला, आपली कृष्णा ज्याचें अजिन आपल्या हातीं धरून गजेंद्राच्या मागोमाग जाणाऱ्या गजवधूप्रमाणें हर्षानें चालली व त्याच्याच बरोबर चाललेल्या ज्या दुसऱ्या वीरानें एक महावृक्ष उपटून घेऊन क्रुद्ध झालेल्या अंतकाप्रमाणें राजसंघामध्यें संचार करून सर्व क्षत्रियांना पिटाळून लाविलें, ते दोघे चंद्र-सूर्याप्रमाणें शोभणारे नरश्रेष्ठ सर्व राजांच्या समक्ष कृष्णेला घेऊन नगराच्या बाहेर असलेल्या कुलालगृहाकडे गेले.

तेथें अग्नीच्या ज्वालेसारखी एक तेजस्वी स्त्री बसली होती. ती त्यांची जननी असावी असा माझा तर्क आहे. तिच्या जवळच अग्नीसारखे देदीप्यमान तीन वीर पुरुष बसले होते. हे दोघे वीर कृष्णेसह त्या स्त्रीपाशीं गेले. तिला प्रणाम करून त्यांनीं कृष्णेलाहि 'तूं हिला वंदन कर' असें सांगितलें व त्या वृद्ध स्त्रीला नमस्कार करून बाजूला उभ्या राहिलेल्या कृष्णेला तिच्या स्वाधीन केलें. ते नरश्रेष्ठ भिक्षा मागावयास गेले. कांहीं वेळानें त्यांनीं आणलेलें तें भिक्षान्न घेऊन कृष्णेनें देवतांना बलि समर्पण केला. कांहीं अन्न ब्राह्मणांनाहि दिलें. नंतर त्या वृद्ध स्त्रीला व त्या पांचहि नरश्रेष्ठांना वाढून स्वतः कृष्णेनेंहि अवशिष्ट अन्न भक्षण केलें. हे राजन्, त्यानंतर ते सर्व वीर निजले. कृष्णाहि त्यांच्याच पायांशीं झोंपली.

ते सर्व भूमीवर दर्भ पसरून व त्यांवर अजिनें अंथरून त्यांवर निजले. त्या वेळीं प्रलय कालच्या मेघाप्रमाणें गर्जना करणाऱ्या त्या वीरांच्या आपसांत विचित्र गोष्टी चालल्या होत्या. हे तात, त्या वेळीं ते जें बोलत होते, तें वैश्य, शूद्र, किंवा ब्राह्मण यांस शोभण्यासारखें नव्हतें. हे पूज्य राजा, ते युद्धासंबंधींच गोष्टी बोलत होते. त्यावरून ते निःसंशय क्षत्रियश्रेष्ठच आहेत. पृथापुत्र त्या प्रसिद्ध अग्निदाहांतून जिवंत बाहेर पडले, असें आम्हीं ऐकलें आहे. यास्तव आमचा मनोरथ निःसंशय पूर्ण झाला आहे."

(२) धृष्टद्युम्नाचें हें भाषण ऐकून द्रुपदराजा अतिशय संतुष्ट झाला व त्यानें 'तुम्ही महात्मे पांडुपुत्रच आहां कीं काय, हें जाणण्याची आमची इच्छा आहे,' असें सांगून आपला पुरोहित पांडवांकडे पाठविला. राजाचें वचन मान्य करून तो पुरोहित पांडवांकडे गेला व त्यानें त्यांची प्रशंसा करून त्यांस

राजाचा निरोप कळविला. तो म्हणाला—" वराई असलेल्या वीरांनो, वरद पंचालराजा तुम्ही कोण अहांत हें जाणण्याची इच्छा करीत आहे. लक्ष्याचा वेध करणाऱ्या या वीर पुरुषाला पाहून आमच्या राजाला पराकाष्ठेचा हर्ष झाला आहे. यास्तव तुम्ही आतां आपली ज्ञाति व कुलपरंपरा सांगून शत्रूंच्या मस्तकांवर पाय द्या. हे देवस्वरूप वीरांनो, आपलें कुल निवेदन करून तुम्ही माझ्या व सर्व आप्तांसह पंचालराजाच्या हृदयाला आल्हादित करा.

हे वीरांनो, प्रसिद्ध पांडुराजा आमच्या द्रुपदराजाचा प्राणाहूनहि प्रिय मित्र होता. आपल्या कन्येनें त्या कुरुश्रेष्ठाची स्नुषा व्हावें, हाच आमच्या श्रेष्ठराजाचा मनोरथ होता. 'अलौकिक वीर्यवान् अर्जुनानेंच माझ्या या कन्येचें पाणिग्रहण करावें,' ही इच्छा द्रुपदराजाच्या मनांत अहर्निश घोळत होती. 'आजच्या या स्वयंवरप्रसंगानें ती याची इच्छा जर पूर्ण झाली असेल, तर माझें महत्पुण्य फळास आलें व माझें पवित्र यश त्रिभुवनांत पसरलें आणि माझें परम हित झालें असें मी समजेन,' असें तो राजा म्हणत आहे."

याप्रमाणें बोलून तो पुरोहित नम्रपणें बसला असतां युधिष्ठिरानें समीप असलेल्या आज्ञाधारक भीमाला म्हटलें—" हे वत्सा, द्रुपदराजाच्या पुरोहिताला अर्घ्य-पाद्य देऊन त्याचा सत्कार कर. हा राजाला मान्य असल्यामुळें याचा विशेष सत्कार करणें योग्य आहे." ज्येष्ठ भ्रात्याच्या आज्ञेप्रमाणें भीमानें त्याचा सत्कार केला. त्या पूजेचा मोठ्या हर्षानें स्वीकार करून सुखासनावर बसलेल्या पुरोहिताला युधिष्ठिर म्हणाला—

(३) " हे विप्रश्रेष्ठा, पंचालराजानें क्षत्रियांना उचित अशा धर्मानेंच पण लावून आपल्या कन्येचा स्वयंवर आरंभिला. आपल्या इच्छेस येईल त्याप्रमाणें कसा तरी अधर्मानें स्वयंवर केला नाहीं. त्यांत वर्ण, शील, कुल, गोत्र यांची कांहीं अपेक्षा नव्हती. हें धनुष्य सज्य करून लक्ष्यवेध करणें हीच त्याची मुख्य अट होती. त्याला अनुसरून या महात्म्यानें त्या नृपमंडलासमोर लक्ष्यभेद करून कृष्णेला जिंकिलें आहे. असें असतां आतां राजा द्रुपदानें या वीराच्या कुलशीलाविषयीं साशंक होणें उचित नाहीं. तथापि त्या नृपश्रेष्ठाचा मनोरथहि पूर्ण होईल.

कारण हे ब्राह्मणा, ही अप्रतिम रूपवती राजकन्या भलत्याच हीनपुरुषाला कदापि प्राप्त होणार नाहीं, असेंच मी समजतों. त्या प्रचंड धनुष्यावर गुण

चढविण्यास व त्या लक्ष्याचा भेद करून तें भूमीवर पाडविण्यास कोणीहि अस्त्रविद्याशून्य, हीनकुलोत्पन्न दुर्बल मनुष्य समर्थ होणार नाहीं. म्हणून मी म्हणतों कीं पंचालराजाला आज पश्चात्ताप करण्याचें कांहीं कारण नाहीं. हे विप्रेंद्रा, द्रुपदराजानें ज्या कृत्रिम लक्ष्याला अंतरिक्षांत योजून ठेविलें होतें, त्याला खालीं पाडविणें भूलोकांतील मानवाला शक्य नाहीं. यास्तव हें महत्कार्य असामान्य मनुष्यानेंच केलें आहे, एवढेंच निश्चयानें जाणून तुम्ही आतां स्वस्थ रहा."

जनमेजया, युधिष्ठिर जों इतकें बोलत आहे, तों पंचालराजाकडून दुसरा एक योग्य अधिकारी तेथें त्वरेनें आला व नम्रपणें म्हणाला—"महाराज, भोजन सिद्ध आहे. यास्तव आपण सर्वांनीं राजगृहीं चलावें." १. १३. १९३.

अध्याय १९४ वा.

[१ पांडवांचें कुंतीसह द्रुपदमंदिरांत गमन. २ त्यांचा सत्कार व परीक्षा.]

(१) वैशंपायन—हे कुरुश्रेष्ठा, द्रुपदराजाकडून पांडवांस पाचारण करावयास आलेला तो दूत पुढें म्हणाला—"हे श्रेष्ठ वीरहो, पंचालेश्वर द्रुपदानें विवाहाप्रीत्यर्थ वरपक्षीय मंडळीसाठीं भोजनसमारंभ केला आहे; तरी आपलें सर्व नित्य कर्म उरकून राजकन्या कृष्णेसह त्वरित भोजनास चलावें व तेथेंच कृष्णेचें पाणिग्रहण करावें. भूपालांना योग्य अशा उत्तम अश्वांनीं युक्त असलेले व सुवर्णकमलांनीं अलंकृत केलेले हे रथ आपणांसाठीं आणले आहेत, त्यांतून आपण द्रुपदाच्या मंदिराकडे चलावें."

राजेंद्रा, याप्रमाणें द्रुपदाचा निरोप ऐकून युधिष्ठिरानें त्या राजपुरोहिताला पुढें पाठविलें. नंतर ते सर्व कुरुश्रेष्ठ त्या सुशोभित भव्य रथांत बसून जावयास निघाले. कृष्णा व कुंती एकाच रथांत बसल्या व ते पांचहि वीर भ्राते निरनिराळ्या रथांत बसून राजमंदिरांत आले.

हे भारता, इकडे पुरोहिताच्या तोंडून युधिष्ठिराचें भाषण ऐकून बुद्धिमान् द्रुपदराजानें ते क्षत्रियश्रेष्ठ पांडवच आहेत कीं काय या जिज्ञासेनें त्यांची परीक्षा पहाण्यासाठीं एक युक्ति योजली. त्यानें एक लहानसें पदार्थसंग्रहालय तयार केलें व तेथें नानाप्रकारच्या वस्तु ठेविल्या.

ब्राह्मणोपयोगी यज्ञपात्रें, अजिनें, फळें व विचित्र पुष्पमाला, क्षत्रियांचें लक्ष वेधणारीं चिलखतें, ढाली व धनुष्यें व वैश्यांना प्रिय असलेल्या गायी, बैल, दावीं, त्याचप्रमाणें शेतकीचीं सर्व आउतें, बियाणें व विविध धान्यें, शिल्प-कामाचीं हत्यारें, ब्राह्मण व क्षत्रिय यांच्या रुचीप्रमाणें भिन्न भिन्न प्रकारचीं क्रीडासाधनें; तरवारी, उत्कृष्ट धनुष्यें, विचित्र बाण, शक्ति, भाले, पट्टे, भुशुंडी, परशु, अश्व, रथ इत्यादि युद्धसामग्री, उत्तम शृंगारलेलीं आसनें, मऊ शय्या, रत्नजडित अलंकार व मूल्यवान् वस्त्रें इत्यादि विविध वस्तु तेथें व्यवस्थित ठेवल्या होत्या.

(२) राजा जनमेजया, राजभवनापाशीं आल्यावर साध्वी कृष्णेला बरोबर घेऊन कुंतीनें द्रुपदराजाच्या मंदिरांत प्रवेश केला, तेव्हां द्रुपदाच्या स्त्रियांनीं त्या राजमातेचें स्वागत करून संतुष्ट चित्तानें तिला अंतःपुरांत नेलें. सिंहाच्या चालीनें चालणाऱ्या त्या भव्य पांडुपुत्रांनीं उत्तरीय वस्त्रासारखीं अजिनें पांघरलीं होतीं. त्यांचे नेत्र मत्त वृषभाच्या नेत्रांसारखे, खांदे भरींव व बाहु वासुकीच्या शरीरा-सारखे लांब व पुष्ट होते. त्यांना पाहून राजाचे सर्व मंत्री, सुहृद् व राजपुत्रांसह तो द्रुपदराजा अतिशय संतुष्ट झाला.

पादपीठांनीं युक्त असलेल्या मूल्यवान् आसनांवर ते पांचहि वीर निःशंकपणें बसले. आपापल्या मानाप्रमाणें ते क्रमानें बसले असतां तेथील अप्रतिम राजैश्वर्य पाहून त्यांना यत्किंचित्‌हि विस्मय वाटला नाहीं.

नंतर उत्तम वस्त्रें परिधान केलेल्या दासी, दास व परिचारक यांनीं सुवर्णाच्या व रुप्याच्या पात्रांतून नृपांना योग्य असे उत्तम भोज्यादि पदार्थ त्यांना वाढले. त्या वीरांचें भोजन झाल्यावर दासींनीं दिलेला सुवासिक तांबूल ग्रहण करून ते पदार्थसंग्रह पहावयास निघाले. पण तेथील इतर सर्व वस्तूंची उपेक्षा करून प्रथम ते युद्धसामग्री अवलोकन करूं लागले. तें पाहून संतुष्ट झालेला द्रुपदराजा व त्याचे मुख्य मंत्री यांनीं हे वीर कुंतीपुत्र पांडवच आहेत अशी कल्पना केली. १. १३. १९४.

अध्याय १९५ वा.

[१ आम्ही पांडवच आहों, असें युधिष्ठिराच्या तोंडून ऐकून द्रुपदाचा संतोष. २ विवाहाविषयीं त्यांचा संवाद.]

(१) वैशंपायन—हे राजन्, त्यानंतर पंचालेश्वर द्रुपदानें राजपुत्र युधिष्ठिराला आपल्या समीप बोलाविलें, ब्राह्मणांना उचित असा त्याचा सत्कार केला व त्या महातेजस्वी कुंतीपुत्राला म्हटलें—" हे वीरा, तुम्ही कोण अहांत ! तुम्ही क्षत्रिय किंवा ब्राह्मण अहांत ! अथवा गुणसंपन्न वैश्य, कीं शूद्र अहांत ? मीं तुम्हांस कसें ओळखावें ! किंवा तुम्ही ब्राह्मणवेष धारण करून सर्वत्र संचार करणारे मायावी राक्षस कृष्णेला जिंकण्याच्या हेतूनें आलां अहां कीं, स्वयंवर पहाण्यासाठीं आलेले देव अहांत ! यांतील सत्य काय, तें आम्हांला सांग. आमच्या मनांत संशयकल्लोळ उठला आहे. तुम्ही याचें जेव्हां निरसन कराल तेव्हांच आम्हांला संतोष होईल. हे परंतपा, आमचें भाग्य शुभ आहेना ! यास्तव जें सत्य असेल तेंच सांग. राजांच्या समोर सत्यभाषणच शोभतें. जर तूं असत्य भाषण केलेंस तर यज्ञ, याग व इष्टापूर्त या धर्माचरणांनीं संपादिलेलें तुझें सर्व पुण्य नाश पावेल. हे श्रेष्ठा, तूं असत्य भाषण करूं नको. हे अमरतुल्य पुरुषश्रेष्ठा, तुझें भाषण ऐकून मी तत्काल कृष्णेचा यथाविधि विवाह करून देण्याचा निश्चय केला आहे. "

द्रुपदराजाचें हें भाषण ऐकून धर्मात्मा युधिष्ठिर म्हणाला—" हे पंचालेश्वरा, तूं खिन्न होऊं नको. प्रसन्नचित्त हो. तुझा मनोरथ निःसंशय पूर्ण झाला आहे. हे राजन्, आम्ही क्षत्रिय आहों. महात्म्या पांडुराजाचा मी ज्येष्ठपुत्र आहें. नृपसभेंत तुझ्या कन्येला जिंकणारे हे दोघे कुंतीपुत्र भीमार्जुन आहेत व ते दोघे माद्रीपुत्र नकुल-सहदेव असून आंत कृष्णेजवळ बसलेली आमची माता कुंती आहे. यास्तव हे राजन्, तूं मुळींच दुःखी होऊं नको. कारण एका सरोवरांतील पद्मिनी जशी दुसऱ्या सरोवरांत जावी, तशी ही राजकन्या एका क्षत्रियकुलांतून दुसऱ्या क्षत्रियकुलांतच प्रवेश करीत आहे. याप्रमाणें हे महाराज, मी तुला सर्व खरा वृत्तान्त सांगितला आहे. तूं आमच्या पूज्य वडिलांच्या स्थानीं असून आम्हांला आतां केवल तुझाच आधार आहे. "

राजा, युधिष्ठिराचें हें भाषण ऐकतांच द्रुपदराजाचे नेत्र आनंदाश्रूंनीं भरून आले. हर्षातिशयानें त्याचा कंठ दाटून आला. त्यामुळें त्याच्या मुखांतून शब्द

उमटेना. तेव्हां क्षणभर थांबून त्यानें मोठ्या यत्नानें आपला हर्ष आवरला व त्या वेळेला योग्य असें प्रतिवचन तो युधिष्ठिराला बोलला.

नंतर त्या धर्मात्म्यानें ज्येष्ठ पांडवाला ते वारणावतांतून कसे निसटून गेले, इत्यादि सर्व वृत्तान्त विचारिला. तेव्हां त्यानें लाक्षागृहांतून मोठ्या कष्टानें बाहेर पडल्यापासून घडलेला इत्थंभूत वृत्तान्त त्यांस सविस्तर निवेदन केला. कुंतीपुत्र युधिष्ठिरानें सांगितलेलें वृत्त ऐकून वक्त्यांतील श्रेष्ठ द्रुपदराजानें कौरवाधिप धृतराष्ट्राची अतिशय निर्भर्त्सना केली आणि त्या कुंतीपुत्र युधिष्ठिराला आश्वासन देऊन त्यांचें राज्य परत मिळवून देण्याची प्रतिज्ञा केली.

त्यानंतर कुंती, कृष्णा, भीमसेन, पार्थ व नकुल-सहदेव यांनीं राजानें दाखविलेल्या भव्य मंदिरांत प्रवेश केला. तेथें यज्ञसेनानें त्यांचा सत्कार केल्यावर ते पांडव त्याच राजभवनांत राहिले.

(२) इकडे द्रुपदराजा आपल्या पुत्रांसह युधिष्ठिराला म्हणाला—हे कुरुनंदना, आज पराक्रमी अर्जुनानें कृष्णेचें यथाविधि पाणिग्रहण करावें. आजचा शुभ मुहूर्त आहे. यास्तव विवाहाच्या पूर्वी करावयाचे सर्व कुलधर्म त्याला करूं दे. त्याचें हें वचन ऐकून धर्मात्मा युधिष्ठिर म्हणाला—" हे श्रेष्ठ नरेंद्रा, मलाहि स्त्रीपरिग्रह करावयाचा आहे. "

द्रुपद्—हे वीरा, तर मग तूंच माझ्या कन्येचें यथाविधि पाणिग्रहण कर. किंवा तुझ्या अन्य भ्रात्यांतून तुला जो कोणी योग्य वाटत असेल, त्यास ही कृष्णा अर्पण करावयास मला सांग.

युधिष्ठिर—हे राजन्, ही द्रौपदी आम्हां सर्वांचीच राज्ञी होईल. कारण आमची माता पूर्वींच असें वचन बोलून गेली आहे. शिवाय मी व भीमसेन हे दोघेहि ज्येष्ठ भ्राते अविवाहित असतांना अर्जुनानें हें तुझें कन्यारत्न जिंकलें आहे. हे राजेश्वरा, आम्हां पांचहि भ्रात्यांचा असा नियम आहे कीं, कोणत्याहि अमूल्य रत्नाचा लाभ झाला असतां त्याचा सर्वांनीं सारखा उपभोग घ्यावा. हे महाराजा, हा आमचा नियम मोडण्याची माझी इच्छा नाहीं. यास्तव ही कृष्णा आम्हां पांची भ्रात्यांची धर्मतः पत्नी होईल. या पांचालीनें अग्नीसमक्ष आम्हां सर्वांचें क्रमानें पाणिग्रहण करावें.

द्रुपद्—हे कुरुश्रेष्ठा, एका पुरुषाला अनेक भार्या शास्त्रसंमत आहेत, परंतु एका स्त्रीला अनेक पति मात्र ज्याअर्थी कोठेंहि श्रुत नाहींत त्याअर्थीं अनेकपतित्व

निषिद्ध आहे. हे कुंतीपुत्रा, तूं मोठा धर्मवेत्ता व पुण्यवान् आहेस. यास्तव असा वेदविरुद्ध व लोकविरुद्ध अधर्म करणें तुला उचित नाहीं. हे कुंतीपुत्रा, तुला ही अशी विपरीत बुद्धि कशी झाली ?

युधिष्ठिर—हे महाराज, धर्म अतिशय सूक्ष्म आहे. त्याची गति आम्हांला कळत नाहीं. प्राचीन पूर्वजांच्या मार्गालाच आम्ही अनुसरतों. माझी वाणी कधींहि असत्य भाषण करीत नाहीं व बुद्धि केव्हांहि अधर्मात प्रवृत्त होत नाहीं. माझ्या मातेची अशीच आज्ञा आहे व माझेंहि मनोगत तसेंच आहे. मातेच्या आज्ञेचें केव्हांहि उल्लंघन करूं नये, असें शास्त्रवचन आहे. पित्याच्या आज्ञेसाठीं परशुरामानें निषिद्ध असलेला मातृवधहि केला. मग या गोष्टीची काय कथा ! हा शाश्वत धर्म आहे, यास्तव हे राजेंद्रा, अधिक विचार न करतां तूं माझें म्हणणें मान्य कर. हे राजा, याविषयीं तूं मुळींच साशंक होऊं नकोस.

द्रुपद्—हे धर्मज्ञा, तूं, साध्वी कुंती व माझा पुत्र धृष्टद्युम्न हीं तिघें जें कांहीं ठरवाल तें मला मान्य आहे. त्याप्रमाणें आपण उद्यां योग्य समयीं याचा विचार करूं. राजा जनमेजया, त्यानंतर दुसऱ्या दिवशीं ते सर्व एकत्र जमून विचार करीत असतां तेथें यदृच्छेनें कृष्णद्वैपायन मुनि आला. १. १३. १९५.

अध्याय १९६ वा.

[१ व्यासाज्ञेवरून द्रौपदीच्या बहुपतित्वाविषयीं द्रुपदादिकांचें मतकथन.]

(१) वैशंपायन—हे राजा, भगवान् व्यास अकस्मात् प्रकट झाल्याचें पाहून ते सर्व पांडव व महायशस्वी पांचाल्य द्रुपद आपापल्या आसनावरून एकदम उठून उभे राहिले व त्या सर्वांनीं महात्म्या कृष्ण द्वैपायनाला अभिवादन केलें. त्यांच्या त्या सत्काराचा स्वीकार करून व त्यांना कुशल विचारून तो उदार बुद्धि व्यास सुवर्णाच्या शुद्ध आसनावर बसला व त्यानें त्या सर्वांना बसावयास सांगितलें.

तेव्हां ते नरश्रेष्ठ मूल्यवान् आसनांवर बसले असतां कांहीं वेळानें पृषतपुत्र द्रुपद त्या महात्म्याला द्रौपदीसाठीं मधुर वाणीनें म्हणाला—" हे भगवन्, एक कन्या अनेक पुरुषांची धर्मपत्नी कशी होऊं शकेल व त्यामुळें संकर झाल्यावांचून कसा राहील, हें सर्व मला यथाशास्त्र निवेदन कर." तें ऐकून व्यास

म्हणाला—"हा धर्म अति गहन असल्यामुळें शास्त्रीय कापट्यानें प्रतिहत झाला आहे. त्यामुळेंच तो लोक व वेद यांच्याशीं विरुद्ध आहे असें वाटतें. यास्तव तुम्हांपैकीं कोणाचें काय मत आहे, हें ऐकण्याची माझी इच्छा आहे."

द्रुपद्—हे द्विजश्रेष्ठा, लोक व वेद या दोहोंच्याहि विरुद्ध असा हा अधर्म आहे असें माझें निश्चित मत आहे. अनेक पुरुषांची एक पत्नी असणें सर्वथा अनुचित होय. पूर्वींच्या महात्म्यांनींहि या धर्माचें आचरण केलेलें नाहीं. विद्वानांनीं अधर्माचें आचरण कोणत्याहि कारणानें करूं नये, असा शास्त्रसिद्धांत आहे. यास्तव असलें अधर्म कृत्य करण्याचा निश्चय मी केव्हांहि करणार नाहीं. हा धर्म मला सर्वदाच संदिग्ध आहे, असें वाटतें.

धृष्टद्युम्न—पूज्य महर्षे, ज्येष्ठ भ्राता सदाचारसंपन्न असतांना तो कनिष्ठ भ्रात्याच्या भार्येशीं असा असद्व्यवहार कसा करील ! हे तपोधना, धर्म अतिशय सूक्ष्म असल्यामुळें आम्हांला त्याचें स्वरूप कळत नाहीं. हा धर्म आहे किंवा अधर्म आहे, याविषयीं आमच्यासारख्यांना निश्चय करतां येत नाहीं. यास्तव हे ब्रह्मर्षे, कृष्णेनें पांच पांडवांची महिषी व्हावें या म्हणण्याला आम्ही आपलें अनुमोदन केव्हांहि देणार नाहीं.

युधिष्ठिर—माझी वाक् केव्हांहि अनृत भाषण करीत नाहीं. माझी मति कधींहि अधर्माचें चिंतन करीत नाहीं. हा कोणत्याहि प्रकारें अधर्म होत नाहीं, असेंच माझें मन मला सांगत आहे. धर्मधारण करणारांमध्यें श्रेष्ठ असलेली 'जटिला'-नांवाची गौतमी सात ऋषींची भार्या झाली, असें पुराणांतहि श्रुत आहे. त्याच प्रमाणें मुनिकन्या वार्क्षी तपानें अतिशय शुद्धचित्त झालेल्या, प्रचे-तस'-नांवाच्या दहा भ्रात्यांशीं संगत झाल्याचा प्राचीन इतिहास श्रुत आहे. हे धर्मज्ञांतील श्रेष्ठा, गुरूचें वचन धर्माला सोडून केव्हांहि नसतें, असें धर्मज्ञ सांगतात. सर्व गुरूंमध्यें माता हा श्रेष्ठ गुरु आहे आणि त्या मातेनें 'भैक्ष्या-प्रमाणें हिचें सेवन करा,' असें वचन स्वमुखानें उच्चारिलें आहे. यास्तव हे द्विजोत्तमा, हा परम धर्म आहे, असें मी समजतों.

कुंती—हे भगवन्, धर्मिष्ठ युधिष्ठिर जें सांगत आहे, तें अगदीं सत्य आहे. मला अनृताचें फार भय वाटतें. मी या अनृतापासून मुक्त कशी होईन !

व्यास—हे कल्याणि, तूं भिऊं नको. तूं अनृतापासून मुक्त होशील. हा सनातन धर्म आहे. हे पांचाला, हा विहित धर्म कसा आणि तो सनातन कां,

हें मी तुम्हां सर्वांना सांगतों. तुम्ही सावधान चित्तानें ऐका. कुंतीपुत्र युधिष्ठिराच्या म्हणण्याप्रमाणें हा धर्म आहे, यांत संशय नाहीं.

राजा जनमेजया, इतकें बोलून भगवान् व्यास आपल्या आसनावरून उठला व राजा द्रुपदाचा हात आपल्या हातांत धरून त्याला राजमंदिरांतील एकान्त स्थानीं घेऊन गेला. तेव्हां पांडव, कुंती व द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न स्व-स्वस्थानीं जाऊन त्या दोघांची वाट पहात राहिलीं. एकान्त स्थानीं गेल्यावर महर्षि द्वैपायनानें महात्म्या द्रुपदाला 'अनेकांचें एकपत्नीत्व' हा धर्म कसा हें समजावून सांगितलें. १. १३. १९६.

अध्याय १९७ वा.

[१ व्यासानें द्रुपदाला सांगितलेला पांडव व द्रौपदी यांचा पूर्ववृत्तान्त.]

(१) भगवान् व्यास म्हणाले—हे द्रुपदराजा, पूर्वी नैमिषारण्यांत देवांनीं सत्र आरंभिलें. त्या सत्रांत वैवस्वत यमानें शामित्राचें म्हणजे पशुवधकर्त्या ऋत्विजाचें कर्म केलें. हे भूपाला, त्या वेळीं त्या सत्रांत दीक्षा घेतलेल्या यमानें प्रजेपैकीं कोणालाहि मारिलें नाहीं. त्यामुळें त्या प्रजा अतिशय वाढल्या. मरणकालाचें अतिक्रमण झाल्यामुळें त्या मरणरहित झाल्या. तेव्हां सोम, इंद्र, वरुण, कुबेर, साध्य, रुद्र, वसु, अश्विनिकुमार व दुसरेहि सर्व देव सृष्टिकर्त्या प्रजापतीकडे जाण्याचा विचार करूं लागले. कारण मनुष्यांची अतिशय वृद्धि झाल्यामुळें त्यांना फार भीति वाटली व सुखाची इच्छा करणारे ते सर्व देव भयानें उद्विग्न होऊन 'आपण सर्व पूज्य प्रजापतीला शरण जाऊं,' असा निश्चय करून त्याच्याकडे जावयास निघाले. हे पांचाला, त्या लोकगुरूपाशीं येऊन पोंचल्यावर त्या सर्वांनीं पितामहास अभिवादन करून म्हटलें—"भगवन्, आम्ही सर्व तीव्र भयानें उद्विग्न होऊन तुला शरण आलों आहों. आमच्या भीतीचें निवारण कर."

देवांचें हें वचन ऐकून ब्रह्मदेव म्हणाला—देवांनो, तुम्ही अमर असतांना मनुष्यांना कां भितां! तुम्ही मर्त्यांना भिणें उचित नाहीं.

तें ऐकून देव म्हणाले—जे मर्त्य होते, तेच अमर झाले आहेत. आतां मर्त्यांमध्यें व आम्हांमध्यें कांहीं अंतर राहिलें नाहीं. त्यामुळेंच आम्ही अतिशय भयभीत होऊन मनुष्यांपेक्षां आम्हांमध्यें कांहीं विशेष असावा, म्हणून तुला शरण आलों आहों.

राजा, देवांची ही भीति सकारण आहे, असें जाणून भगवान् प्रजापति त्यांस म्हणाला—" देवांनों, सूर्यपुत्र यमराज तुमच्या यज्ञामध्यें गुंतला आहे, त्यामुळें ते मानव मरत नाहींत. तो पितृराज या वेळीं आपल्या कार्यांत निमग्न होऊन गेला आहे. यास्तव त्याचें तें सत्रकार्य समाप्त झालें म्हणजे या सर्व लोकांचा अंतकाल प्राप्त होईल. त्या सूर्यपुत्राचीच योगबलानें अतिशय वृद्धि पावलेली तनु दोन प्रकारें विभक्त होऊन ती यांचा नाश करील. मनुष्यांना देवतांचें सामर्थ्य केव्हांहि प्राप्त होणार नाहीं. तुम्ही स्वस्थ रहा.

राजा यज्ञसेना, त्या आदि देवाचें हें वाक्य ऐकून सोमादि देव नैमिषारण्यांतील त्या देवसत्रांत गेले व ते सर्व वीर एकत्र बसले. इतक्यांत भागीरथींत त्यांना एक सुवर्णकमल दिसलें. तें पाहून सर्व देव विस्मित झाले. तेव्हां त्यांतील शूर इंद्र त्या कमलाचा शोध करावयास गंगेच्या उगमापाशीं गेला. तों त्याला तेथें अग्नीच्या ज्वालेसारखी एक तेजस्वी स्त्री दिसली. जलाची इच्छा करणारी ती गंगेमध्यें प्रवेश करून रडत होती. तिच्या नेत्रांतून गंगेंत पडलेला प्रत्येक अश्रुबिंदु सुवर्णकमल होत असे.

तें आश्चर्य पाहून वज्रधर इंद्र त्या स्त्रीजवळ जाऊन म्हणाला—हे भद्रे, तूं कोण आहेस व अशी रडतेस कां! तुझ्या दुःखाचें खरें कारण ऐकण्याची माझी इच्छा आहे. यास्तव खरें काय असेल तें सांग.

इंद्राचा हा प्रश्न ऐकून ती स्त्री म्हणाली—हे इंद्रा, मी पुढें होतें व तूं माझ्या मागून ये. म्हणजे मी मंदभागिनी कोण आहें व कां रडत आहें, तें तुला कळेल. ज्यासाठीं मी रडत आहें, तें कारण तुला साक्षात् दिसेल.

हे पार्षता, इतकें बोलून ती सुंदरी पुढें जाऊं लागली व इंद्रहि तिच्या मागोमाग चालला. कांहीं वेळानें तीं दोघें हिमालयपर्वताच्या शिखरावर चढून गेलीं. तेव्हां तेथें इंद्रानें एका सिद्धासनस्थ सुंदर तरुणाला एका तरुणीबरोबर फांशांनीं खेळत असलेलें पाहिलें. तो तरुण पुरुष साक्षात् रुद्रच होता. पण क्रुद्ध झालेला देवराज त्यास म्हणाला—" हे विद्वाना, हें सर्व भुवन माझें आहे. तें माझ्या अधीन आहे. मी त्याचा प्रभु आहें. असें असतांना तूं फांशांनीं खेळण्यांतच मग्न झाला आहेस, माझ्याकडे पहातहि नाहींस. तूं इतका प्रमत्त कां झालास! तुला या वेळीं शासन करणेंच उचित आहे."

द्रुपदा, असें बोलून देवेंद्रानें त्याला मारण्यासाठीं आपलें वज्र उगारलें. तेव्हां इंद्राला मोठा क्रोध आला आहे, असें जाणून महादेव अनादरानें हंसला व

वज्रप्रहार करण्याची इच्छा करणाऱ्या इंद्राकडे त्यानें वर मान करून हळूच नुसतें पाहिलें. रुद्रानें त्याच्याकडे पहातांच देवराज स्तंभासारखा स्तब्ध होऊन उभा राहिला. त्याला इकडचा हात तिकडे करतां येईना. मग वज्राचा प्रहार करण्याचें तर दूरच राहिलें. तशा स्थितींत इंद्र बराच वेळ उभा राहिला.

शेवटीं त्या पार्वतीपतीची अक्षक्रीडा जेव्हां संपली, तेव्हां तो भगवान् त्या रडणाऱ्या स्त्रीला म्हणाला—"हे भामिनि, याला इकडे घेऊन ये. माझ्या समोर हा पुनरपि असा दर्प करणार नाहीं, अशी मी योजना करितों." रुद्राची ही आज्ञा ऐकून ती स्त्री इंद्रापाशीं गेली व त्याला स्पर्श करतांच त्याचीं सर्व अंगें शिथिल होऊन तो भूमीवर पडला.

तेव्हां उग्र तेजस्वी भगवान् रुद्र त्याला म्हणाला—हे इंद्रा, तूं पुनः केव्हांहि असा अतिप्रसंग करूं नको. तुझें बल व वीर्य अमर्याद आहे. यास्तव तूं गुहेच्या द्वाराला झांकून टाकणाऱ्या या पर्वताला दूर करून तींत प्रवेश कर. तेथें तुझ्यासारखे दुसरे चार पुरुष आहेत. त्यांची कांति सूर्यासारखी आहे. तूंहि त्यांच्याच बरोबर आपल्या अपराधाचें फळ भोगीत रहा.

रुद्राच्या आज्ञेप्रमाणें गुहेच्या द्वारावरील पर्वत दूर सारून इंद्रानें त्या महागिरीच्या गुहेंत आपल्या सारखेच तेजस्वी आणखी चार पुरुष पाहिले. त्यांना अवलोकन करून 'माझीहि स्थिति यांच्या सारखीच होणार नाहींना?' असें म्हणून इंद्र अतिशय दुःखी झाला व रुद्राच्या आज्ञेप्रमाणें गुहेंत शिरला नाहीं.

तेव्हां अतिशय क्रुद्ध झालेला भवानीपति डोळे वटारून इंद्रास म्हणाला—"हे शतक्रतो, तूं या विवरांत प्रवेश कर. कारण तूं अज्ञानानें माझा अवमान केला आहेस. त्या अपराधाचें फल तुला भोगिलेंच पाहिजे." रुद्राचें हें उग्र भाषण ऐकून देवराज दुःखानें भिऊन थरथर कांपूं लागला. वाऱ्यानें उडविलेल्या पिंपळाच्या पानाची जी अवस्था होते, तीच स्थिति ज्याचीं अंगें शिथिल झालीं आहेत, अशा इंद्राची झाली आणि तो हिमालयपर्वताच्या शिखरावर गलित पर्णासारखा हतबल होऊन, हात जोडून उभा राहिला.

तें पाहून वृषभवाहन रुद्र भयानें कांपणाऱ्या त्या इंद्राला पुनः क्रोधानें म्हणाला—"या दरींत सत्वर प्रवेश कर."

रुद्राचें तें उग्र स्वरूप पाहून इंद्र त्याला म्हणाला—"हे भव, या सर्व सृष्टीचा तूंच स्वामी आहेस."

हें ऐकून रुद्र हंसून म्हणाला—अशा प्रकारचें शील असलेल्या तुझ्यासारख्या लोकांवर मी केव्हांहि प्रसन्न होत नसतों. हे चौघेहि पूर्वी तुझ्यासारखेच उन्मत्त झाले होते. यास्तव आतां तूं या दरींत प्रवेश करून तेथेंच पडून रहा. तुम्ही सर्वजण मनुष्ययोनींत जन्म घेऊन तेथेंहि असेच दुर्धर्ष व्हाल. पृथ्वीवर अलौकिक कर्में करून व असंख्य लोकांचे प्राण हरण करून पुनः तुम्ही सर्वजण पूर्वसंचितानें संपादिलेल्या आपल्या इंद्रलोकाला प्राप्त व्हाल. माझ्या या अर्थपूर्ण सांगण्याप्रमाणें वागणें हेंच तुमचें आतां कर्तव्य आहे.

रुद्राचें हें भाषण ऐकून पूर्वीचे चौघे इंद्र म्हणाले—हे महेश्वरा, जेथें मोक्ष अतिशय दुर्लभ आहे, अशा या देवलोकांतून आम्ही मनुष्यलोकीं जाऊं; परंतु हे ईश्वरा, आमच्या जननीच्या ठिकाणीं यम, वायु, इंद्र व अश्विनिकुमार या देवतांपासून आमची उत्पत्ति झाली पाहिजे. त्या भूलोकीं दिव्य अस्त्रांनीं युक्त होऊन, मानवांशीं युद्ध करून आम्ही पुनः इंद्रलोकीं परत येऊं.

हे पंचालेश्वरा, त्या पूर्वेंद्रांचें तें भाषण ऐकून पांचवा इंद्र पुनः म्हणाला—"या कार्यासाठीं उत्पन्न होणाऱ्या पांच पुरुषांपैकीं मी आज माझा एक अंश देतों." याप्रमाणें त्या ईश्वराशीं संकेत करणाऱ्या पांच दिव्य पुरुषांतील पहिला विश्वभुक्, दुसरा भूतधामा, तिसरा शिबि, चवथा शांति व पांचवा पराक्रमी इंद्र होता. भगवान् शंकरानें 'त्यांची ती इच्छा पूर्ण होईल' असा वर दिला व मनुष्यलोकामध्यें उत्पन्न झालेल्या त्या पांचजणांच्या स्त्रीरूपी लोकमनोहर श्रीला त्यांची भार्या नियत केली.

त्यानंतर रुद्र त्या सर्वांना बरोबर घेऊन अप्रमेय, अनंत, अव्यक्त, अज, पुराण, सनातन विश्वरूप नारायणाकडे गेला व त्यानें त्यास हें वृत्त निवेदन केलें. तेव्हां त्या विश्वचालकानें ही योजना मान्य केली व आपल्या मस्तकावरील एक कृष्ण व एक शुक्ल असे दोन केंस उपटून ते आपले अंश यदुकुलांतील देवकी व रोहिणी या दोन श्रेष्ठ स्त्रियांच्या ठिकाणीं स्थापन केले. त्या विश्वरूप देवाच्या शुभ्र केंसापासून बलराम झाला आणि काळ्या केंसापासून केशव उत्पन्न झाला. त्याच्या वर्णावरून त्याला 'कृष्ण' हें नांव प्राप्त झालें. त्या उत्तर पर्वताच्या दरींत अडकवून ठेवलेले ते पूर्वीचे इंद्रच इहलोकीं हे वीर्यवान् पांडव झाले आहेत. त्यांतील इंद्राच्या अंशापासून हा सव्यसाची धनंजय झाला आहे.

हे राजा, याप्रमाणें पूर्वी इंद्र असलेले ते महात्मेच या लोकीं पांडव झाले आहेत आणि मी पूर्वी जिचें वर्णन केलें ती श्रीच त्यांची भार्या होण्यासाठीं

ही दिव्यरूप धारण करणारी द्रौपदी उत्पन्न झाली आहे. कारण दैवयोगा-वांचून चंद्र-सूर्यासारखें जिचें अप्रतिम रूप आहे व जिच्या अंगाचा सुवास कोसभर पसरतो, अशी अलौकिक दिव्य कन्या या पृथ्वीतलांतून अयोनिसंभव उद्भवणें कसें संभवतें! हे राजेंद्रा, मी तुजवर प्रसन्न होऊन तुला दिव्य दृष्टि प्राप्त होण्याचा अद्भुत वर देतों. त्यायोगें तूं या कुंतीपुत्रांना पूर्वजन्मींच्या पुण्यकारक दिव्य देहांनीं युक्त असलेलें पहाशील."

त्यानंतर त्या तपस्वी, परम उदार कर्में करणाऱ्या, पवित्र व्यास महर्षीनें आपल्या तपःसामर्थ्यानें त्या द्रुपदराजाला दिव्य दृष्टि दिली. तेव्हां त्या पांचालेश्वरानें पांची पांडवांस पूर्वी वर्णिलेल्या दिव्य स्वरूपांत पाहिलें. त्या दिव्य पुरुषांचे दिव्य देह अग्नि व सूर्य यांसारखे तेजस्वी, इंद्रासारखे दृढ, रत्नजडित सुवर्णकिरीट धारण करणारे, अतिशय मनोहर, तरुण व ताल वृक्षासारखे उंच असून ते शुभ्र दिव्य वस्त्रांनीं व श्रेष्ठ सुगंधी मालांनीं अतिशय शोभत होते. ते साक्षात् रुद्र, वसु, किंवा सर्व गुणसंपन्न आदित्यच आहेत कीं काय, असा त्या राजाला भास झाला. त्या चारी पूर्वेंद्रांना पाहून व अर्जुन हा इंद्राचा तत्तुल्य पुत्र आहे, असें व्यासमुखानें ऐकून द्रुपदराजा संतुष्ट झाला व ती अद्भुत दिव्य माया साक्षात् अवलोकन करून विस्मित झाला.

त्या पांच पूर्वेंद्रांबरोबरच त्यांचें रूप, तेज व यश यांस सर्व प्रकारें अनुरूप अशी ती दिव्य स्त्रीहि त्याच्या दृष्टीस पडली. चंद्र व अग्नि यांच्या सारख्या तेजानें युक्त असलेली ती दिव्य स्त्री त्यांची पत्नी असावी, असें त्याला वाटलें. राजा जनमेजया, तें महदाश्चर्य पाहून द्रुपदानें सत्यवतीपुत्राचे दोन्ही चरण घट्ट धरिले व 'हे महर्षे, तुझ्या ठिकाणीं हें कांहीं मोठेंसें आश्चर्य नाहीं.' असें त्यास प्रसन्न चित्तानें म्हटलें. तेव्हां भगवान् व्यास म्हणाला—"मी तुला आणखी एक इतिहास सांगतों, तो ऐक."

हे द्रुपदराजा, पूर्वी एका तपोवनामध्यें एका महात्म्या ऋषीची एक रूपवती व सुशील कन्या होती. तिला पति मिळेना. म्हणून तिनें उग्र तप आचरून शंकराला संतुष्ट केलें. तेव्हां शंकरानें 'मी प्रसन्न झालों आहें, इष्ट वर मागून घे' असें तिला म्हटलें. तें ऐकून ती कन्या वर देणाऱ्या ईश्वराला 'मीं सर्व गुणांनीं युक्त अशा पतीची इच्छा करीत आहें' असें पुनः पुनः म्हणाली.

तेव्हां त्या महादेवानें तिला 'तुझा मनोरथ पूर्ण होवो,' असा वर दिला आणि त्या शंकरानें प्रसन्न चित्तानें तिला म्हटलें—"हे भद्रे, तुला पांच पति

प्राप्त होतील." तें ऐकून ती पुनः त्या देवेशाला म्हणाली—"हे महेश्वरा, 'तुझ्या प्रसादानें मला सर्व गुणसंपन्न एकच पति प्राप्त व्हावा' अशी मी प्रार्थना करीत आहें."

राजा, तें ऐकून तो उमाकांत संतुष्ट मनानें तिला असें शुभवचन बोलला—"हे कन्ये, तूं 'मला पति दे' असें पुनःपुनः पांच वेळां म्हटलेंस. यास्तव तसेंच घडून येईल. तुझें कल्याण असो. पुढल्या जन्मीं तुला या वराची प्रतीति येईल."

हे पंचाला, तीच पूर्वजन्मींची ऋषिकन्या तुझी ही दिव्यरूप धारण करणारी दुहिता उत्पन्न झाली आहे. यास्तव हे पार्षता, ही कृष्णा पांची पांडवांची पत्नी होणेंच विहित आहे. त्यांत मुळींच दोष नाहीं. ही स्वर्गांतील 'श्री' पांडवांसाठीं तुझ्या महा यज्ञांत उत्पन्न झाली आहे. ती तीव्र तप आचरून या लोकीं तुझी कन्या झाली आहे. ही सुकुमार देवी स्वतःच्या कर्मानेंच पांच पतींची पत्नी होण्यासाठीं उत्पन्न झाली आहे. साक्षात् ब्रह्मदेवानें ही देवपत्नी निर्माण केली आहे. यास्तव हे द्रुपदराजा, हा सर्व पूर्ववृत्तान्त ऐकून तुला जसें योग्य वाटेल तसें कर. १. १३. १९७.

अध्याय १९८ वा.

[१ द्रौपदीचा पांच पांडवांशीं विवाह.]

(१) वैशंपायन—हे पारिक्षिता, कृष्णद्वैपायनाचें तें भाषण ऐकून तो भाग्यवान् द्रुपदराजा संतुष्ट चित्तानें म्हणाला—"हे भगवन्, आपण सांगितलेला हा पूर्ववृत्तांत ठाऊक नसल्यामुळें मी ही कन्या एकाच पतीला देण्याचा आग्रह धरिला. परंतु दैवानें प्राप्त झालेल्या कर्तव्याचें उल्लंघन करितां येणें शक्य नाहीं. यास्तव प्राप्त कर्तव्य करणें सर्वथा उचित आहे. या लोकांतील आपल्या पुरुषार्थानें कोणाला कांहीं घडवून आणतां येत नाहीं. भवितव्यतेचें निवारण करितां येणें शक्य नाहीं. केवल वरासाठींच या कृष्णेनें पूर्वजन्मीं तप केलें व त्याचेंच हें फल तिला प्राप्त झालें आहे. ज्या अर्थीं कृष्णेनें पूर्वजन्मीं 'भगवान् मला पति देवो' असें अनेकदा म्हटलें व ईश्वरानेंहि तिला तसाच वर दिला, त्या अर्थीं शंकरच त्यांतील परम धर्म जाणण्यास समर्थ आहे. ही गोष्ट जर महेश्वराला विहित आहे तर मग तो धर्म असो किंवा अधर्म असो, माझा त्यांत कांहीं दोष नाहीं. यास्तव ही कृष्णा त्या पांचहि भ्रात्यांचें विधियुक्त पाणिग्रहण करो."

हे भारता, द्रुपदराजाची अशी संमति मिळतांच भगवान् व्यास युधिष्ठिराला म्हणाला—" हे वत्सा, आज शुभ दिवस आहे, आज चंद्र बहु संततिप्रद पौष्य योगास प्राप्त होत आहे. यास्तव हे ज्येष्ठ पांडवा, आज प्रथम तूं कृष्णेचें पाणि-ग्रहण कर." त्यानंतर पुत्रांसह यज्ञसेनराजानें वरपक्षीय लोकांना विपुल व विविध धन दिलें. कृष्णेला मंगल स्नान घालून व अनेक रत्नांनीं भूषित करून मंडपांत आणविलें. इतक्यांत राजाचे सर्व सुहृद् व मंत्रीहि तेथें आले. अतिशय संतुष्ट झालेले ब्राह्मण व मुख्य मुख्य पौरजन कृष्णेचा विवाह पहावयास राजगृहांत एकत्र जमले. त्यामुळें ज्याचें अंगण विस्तीर्ण कमलमालांनीं सुशोभित केलें आहे, असें तें राजगृह श्रेष्ठ जन, सैन्यसमूह व विविध रत्नें यांच्या योगानें नक्षत्रयुक्त निर्मल आकाशाप्रमाणें शोभलें.

त्यानंतर तरुण पांडव मंगल स्नान व मंगल क्रिया करून कानांत कुंडलें घालून, महावस्त्रें नेसून, चंदनाची उटी लावून व विचित्र भूषणांनीं भूषित होऊन अग्नीसारख्या तेजस्वी धौम्य पुरोहितासह क्रमानें विवाहमंडपांत आले. त्यांना पहातांच तेथें जमलेल्या सर्व लोकांना मोठा हर्ष झाला. कारण मदोन्मत्त ऋषभ जसे गोठ्यांत प्रवेश करतात, तसेच ते पांची प्रसन्नमुख भ्राते एकामागून एक असे त्या मंगलस्थानीं प्रविष्ट झाले.

त्यावेळीं त्यांच्या वेदवेत्त्या पुरोहितानें अग्नीचें आधान करून प्रदीप्त हुता-शनामध्यें मंत्रयुक्त हवन केलें व युधिष्ठिराला अग्नीसमीप आणून त्याच्याकडून कृष्णेचें मंत्रयुक्त पाणिग्रहण करविलें. त्या वेदविधिज्ञ धौम्यानें परस्परांचा हात धरवून त्यांच्याकडून अग्नीला प्रदक्षिणा करविली व रणांगणांत शोभणाऱ्या त्या युधिष्ठिराची आज्ञा घेऊन धौम्य-ऋषि राजगृहांतून निघून गेला.

त्यानंतर क्रमानें एकेक दिवसाच्या अंतरानें सुस्वरूप व पराक्रमी वृकोदरादि पांडवांनींहि त्या श्रेष्ठ स्त्रीचें पाणिग्रहण पूर्वोक्त विधीनेंच केलें. त्यावेळीं देवर्षीच्या सांगण्याप्रमाणें एक अलौकिक चमत्कार घडला. द्रौपदी प्रतिदिवशीं एकेका पांडवाचें पाणिग्रहण जरी करीत होती, तरी तो दिवस निघून गेला असतां दुसऱ्या दिवशीं ती सुंदरी कन्याच होत असे.

याप्रमाणें पांची पांडवांशीं द्रौपदीचा यथाविधि विवाह झाला असतां द्रुपदानें त्या पांची महारथांना अनेक प्रकारचें सर्वोत्तम धन दिलें. सुवर्णाच्या रश्मींनीं युक्त असलेले चार अश्व जोडलेले प्रत्येकाला शंभर शंभर सुवर्ण रथ दिले.

त्याच प्रमाणें पर्वताच्या सुवर्ण शिखरासारखे शोभणारे व उत्तम लक्षणांनीं युक्त असे प्रचंड शंभर गज दिले. तशाच उत्तम वस्त्रालंकारांनीं भूषित केलेल्या तरुण शंभर दासी प्रत्येकाला पृथक् पृथक् दिल्या. त्या द्रुपदराजानें अग्नीसमक्ष त्यांना आणखीहि इतर मूल्यवान् देणग्या, वस्त्रें, भूषणें व धन अर्पण केलें.

जनमेजया, त्याप्रमाणें विवाहविधि झाल्यानंतर ते इंद्रासारखे महाबलाढ्य पांडव प्राप्त झालेलीं विपुल रत्नें घेऊन, साक्षात् लक्ष्मीप्रमाणें शोभणाऱ्या द्रौपदीसह, त्या पंचालेश्वराच्या नगरांत कांहीं काल राहिले. १. १३. १९८.

अध्याय १९९ वा.

[१ द्रौपदीला कुंतीचा आशीर्वाद. २ पांडवांना श्रीकृष्णकडून अहेर.]

(१) **वैशंपायन**—राजा जनमेजया, याप्रमाणें पांडवांचा द्रुपदाशीं निकट आप्तसंबंध जडल्यामुळें त्यांना देवांपासूनहि भय राहिलें नाहीं. त्यानंतर महात्म्या द्रुपदाच्या स्त्रियांनीं कुंतीपाशीं येऊन आपापलीं नांवें सांगून तिच्या चरणांवर मस्तकें ठेविलीं. त्यावेळीं जिनें उंची रेशमी वस्त्र परिधान केलें आहे व सौभाग्यालंकार धारण केले आहेत अशी कृष्णा सासूला नमस्कार करून हात जोडून उभी राहिली.

तेव्हां त्या रूपवती, सुशील व सद्गुणी स्नुषेला पाहून पृथा प्रेमानें असें आशीर्वचन बोलली—" हे शोभने, इंद्राला जशी शची, अग्नीला जशी स्वाहा, नलाला जशी दमयंती, चंद्राला जशी रोहिणी, कुबेराला जशी भद्रा, वसिष्ठाला जशी अरुंधती व नारायणाला जशी लक्ष्मी तशी तूं आपल्या पतींना शोभविणारी हो. हे वत्से, तुला दीर्घायु वीर पुत्र होवोत. तूं यज्ञपत्नी, पतिव्रता व सर्वैश्वर्यसंपन्न होऊन विपुल सुख भोग, अतिथि, अभ्यागत, साधु, आबालवृद्ध व गुरुजन यांचा यथायोग्य सत्कार करण्यांत तुझें आयुष्य दीर्घ काल जावो.

हे धर्मवत्सले, कुरुजांगलादि राष्ट्रें व नगरें यांची तूं आपल्या सार्वभौम पतींसह अभिषिक्त सम्राज्ञी हो. तुझ्या वीर पतींनीं स्वपराक्रमानें जिंकलेली पृथ्वी अश्वमेधादि महाक्रतूंमध्यें ब्राह्मणांना अर्पण कर. हे गुणवति, पृथ्वीमध्यें जेवढ्या उत्कृष्ट व गुणसंपन्न वस्तु आहेत, तेवढ्या सर्व तुला प्राप्त होवोत आणि त्या सर्व ऐश्वर्यांचा तूं पूर्ण शंभर वर्षें उपभोग घे. हे वधू, त्याचप्रमाणें

विवाहकालीन मंगल वस्त्र नेसलेल्या तुला मी आज जसा आशीर्वाद देत आहें, तसेंच पुत्रवती झालेल्या तुझें मी पुनः अभिनंदन करीन."

(२) राजेंद्रा, त्यावेळीं पांडुपुत्रांचा विवाह झालेला ऐकून मधुसूदनानें त्यांस मूल्यवान् अहेर पाठविला. त्या बरोबर वैडूर्यरत्नें जडलेलीं सुवर्णभूषणें, नानादेशांतील अमूल्य वस्त्रें, विविध रत्नें, मृदु शालजोड्या, पवित्र अजिनें, अनेक मऊ शय्या, उंची आसनें, नानाप्रकारचीं वाहनें, शेकडों रत्नजडित पात्रें, नानादेशांतील अलंकारांनीं भूषित झालेल्या रूप-यौवनयुक्त अनेक दासी माधवानें त्यांस दिल्या. तसेच उत्तमप्रकारें शृंगारिलेले सुलक्षणी गज व अश्व, शुभ्र जरतारी वस्त्रानें आच्छादिलेले व सुवर्णानें सुशोभित केलेले हस्तिदंती रथ व त्याचप्रमाणें धान्यांच्या राशींसारखे कोट्यवधि सुवर्णाचे ढीग श्रीकृष्णानें त्यांच्याकडे रवाना केले. धर्मराज युधिष्ठिरानें गोविंदाचें प्रिय करण्याच्या इच्छेनें त्या सर्व बहुमोल वस्तूंचा मोठ्या संतोषानें स्वीकार केला. १. १३. १९९.

येथें तेरावें वैवाहिक पर्व समाप्त झालें.

विदुरागमन-राज्यलंभपर्व १४.

अध्याय २०० वा.

[१ पांडवांच्या उत्कर्षामुळें दुर्योधनाचा खेद व धृतराष्ट्राचा कृत्रिम संतोष.]

(१) वैशंपायन—राजा परिक्षिता, याप्रमाणें नृपश्रेष्ठ द्रुपदाच्या नगरींत वीर्यवान् पांडवांचा सुलक्षणी द्रौपदीबरोबर विवाहसमारंभ झाला असतां तो वृत्तांत निरनिराळ्या राजांना त्यांच्या विश्वसनीय हेरांकडून कळला. 'ज्या महात्म्यानें स्वयंवरमंडपांतील तें प्रचंड धनुष्य उचलून लक्ष्याचा भेद केला, तो द्रौपदीला जिंकणारा वीर महा धनुर्धर पार्थ होय आणि ज्या बलाढ्य वीरानें मद्रराज शल्याला भूमीवर आपटिलें आणि क्रुद्ध होऊन एका वृक्षानें ताडण करीत समरांगणांत सर्व क्षत्रियांना भयभीत केलें, पण ज्या महात्म्याला एवढ्या मोठ्या शत्रुसमूहांत दंडधर यमाप्रमाणें संचार करीत असतांना यत्किंचित्‌हि भीति वाटली नाहीं, तो शत्रूंच्या सेनेंतील रथ व गज यांचा विध्वंस करणारा भीमकर्मा वृकोदर होय. ब्राह्मणांचा वेष धारण करून बाह्यतः शांत दिसणारे ते पांच वीर कुंतीपुत्र पांडव आहेत.' हें ऐकून सर्व नरेंद्रांना मोठा विस्मय वाटला.

कुंती आपल्या पुत्रांसह लाक्षागृहांत दग्ध झाली, असें त्यांनीं पूर्वीं ऐकिलें होतें. त्यामुळें ते सर्व भूपाल पांडवांचा आज जणुकाय पुनर्जन्मच झाला, असें समजले. पुरोचनानें केलेल्या त्या अति दुष्ट कर्मामुळें त्या सर्वांनीं कौरव, भीष्म व धृतराष्ट्र यांचा धिक्कार केला. ' द्रौपदीचा स्वयंवर होऊन त्यांत तिनें पांडवांना वरिलें आहे,' हें ऐकून ते आपआपल्या नगरास परत गेले.

द्रौपदीनें अर्जुनाला वरिलें आहे, असें पाहून दुर्योधनराजा अतिशय खिन्न झाला व आपले सर्व भ्राते, अश्वत्थामा, शकुनि, कर्ण व कृप यांसह तेथून परतला. तेव्हां लज्जित झालेला दुःशासन त्याला हळु हळू म्हणाला—" हे राजन्, हा अर्जुन जर ब्राह्मणवेषानें आला नसता, तर त्याला द्रौपदी मिळाली नसती. कारण हा धनंजय आहे, असें त्या वेळीं कोणासच कळलें नाहीं. खरोखरें दैवच बलवत्तर आहे. मनुष्याचा प्रयत्न व्यर्थ आहे. पांडव मरावे म्हणून आम्हीं इतके यत्न केले असूनहि ज्याअर्थीं ते अद्यापि जिवंत आहेत, त्याअर्थीं पुरुषप्रयत्नाला धिक्कार असो."

राजा, याप्रमाणें आपसांत संभाषण करणारे व पुरोचनाची निंदा करणारे ते कौरव दीन व खिन्न होऊन हास्तिनपुरास परत आले. पांची पांडव अग्नीच्या भयंकर मुखांतून जिवंत सुटले व द्रुपदराजाशीं प्रेमबद्ध झाले, हें पाहून ते भयभीत झाले. त्यांचे सर्व संकल्प अस्त पावले. राजा जनमेजया, धृष्टद्युम्न, शिखंडी व द्रुपदाचे सर्व प्रकारच्या युद्धामध्यें विशारद असलेले इतर पुत्र यांचा विचार करून पांडवांना पराभूत करण्याचे त्यांचे सर्व मनोरथ शिथिल झाले.

पांडवांनीं द्रौपदीला वरिलें आहे, असें ऐकून व धृतराष्ट्राचे पुत्र लज्जित व भग्नदर्प होऊन परत आले आहेत, असें पाहून विदुर संतुष्ट मनानें धृतराष्ट्राला म्हणाला —" हे राजन्, द्रुपदकन्येच्या संबंधानें कौरवांचा मोठा उत्कर्ष झाला आहे. खरोखर हें मोठें आश्चर्य आहे!"

विदुराचें हें भाषण ऐकून वैचित्रवीर्य राजाहि परम संतोषानें 'फार चांगलें झालें, फार उत्तम झालें, वत्सा, खरोखरच हा आमचा फार मोठा उत्कर्ष आहे ' असें म्हणाला. कारण अज्ञानामुळें तो प्रज्ञाचक्षु नरेंद्र ' द्रुपदकन्येनें आपल्या ज्येष्ठ पुत्र दुर्योधनालाच वरिलें आहे, ' असें समजला व त्या आनंदाच्या भरांत त्यानें

१ दैवं च परमं मन्ये पौरुषं चाप्यनर्थकम्।

'द्रौपदीला अनेक भूषणें देऊन माझ्याकडे घेऊन ये' अशी दुर्योधनाला आज्ञा केली.

पण राजाचा हा हर्ष अस्थानीं आहे, असें पाहून विदुर त्यास म्हणाला—"हे महाराजा, सर्व पांडुपुत्र कुशल आहेत. द्रौपदीनें स्वयंवरांत त्यांना वरिलें असून द्रुपदानें त्यांचा मोठा सत्कार केला आहे. त्या स्वयंवरांत पांडवांना अनेक बलाढ्य आप्तसंबंधी प्राप्त झाले असून राजानें त्या सर्वांचा अतिशय सन्मान केला आहे."

विदुराचें हें भाषण ऐकूनहि धृतराष्ट्रानें आपणास मोठा संतोष झालासें दाखवून म्हटलें—"हे क्षत्त्या, पांडुराजाला त्याचे पांच पुत्र जसे प्रिय होते, तसेच किंबहुना त्याहूनहि अधिक ते मला प्रिय आहेत. ते मला प्रियतम असण्याचें कारण सांगतों ऐक. ते पांचहि वीर सुस्वरूप असून त्यांना उत्तम मित्रांचा लाभ झाला आहे. त्यांना या विवाहामुळें दुसरेहि अनेक महाबलाढ्य संबंधी लाभले आहेत. हे विदुरा, बांधवांसह द्रुपदासारख्यांचें मित्रत्व प्राप्त झाल्यावर नष्ट झालेलें राज्य परत मिळविण्याची इच्छा कोणता वैभवशून्य झालेलाहि राजा करणार नाहीं!" तेव्हां 'राजन्, तुझी ही बुद्धि चिरकाल अशीच राहूं दे' असें बोलून विदुर स्वगृहीं परत गेला.

त्यानंतर हे राजश्रेष्ठा, दुर्योधन व कर्ण धृतराष्ट्रापाशीं येऊन म्हणाले—"हे तात, विदुराच्या समक्ष आमच्यानें तुला दोष देववेना. पण आतां येथें एकान्त असल्यामुळें आम्ही आपलें म्हणणें तुला स्पष्ट सांगतों. तूं हें काय करण्याचें मनांत आणिलें आहेस! शत्रूच्या उत्कर्षाला तूं स्वतःचा उत्कर्ष कसा समजतोस? हे श्रेष्ठ राजन्, विदुरासमक्ष तूं शत्रूचें अभीष्ट कसें चिंतिलेंस! आज आपलें जें कर्तव्य आहे, त्याच्या विपरीत तूं वागत आहेस. हे निष्पाप राजा, आम्हीं त्या शत्रूंना नित्य हतबल करण्याचीच योजना करावी, हें उचित आहे. ज्यायोगें ते आमचे पुत्र, मित्र, सामर्थ्य व बांधव, यांस ग्रासणार नाहींत, असा कांहीं तरी उत्कृष्ट उपाय योजण्याचा काल प्राप्त झाला आहे, यास्तव आतां काय करावें, याचा आपण निश्चित विचार ठरवूं या." १. १४. २००.

अध्याय २०१ ला.

[१ पांडवांच्या नाशासाठीं दुर्योधनानें धृतराष्ट्राला सुचविलेले उपाय.]

(१) वैशंपायन—हे भारता, दुर्योधनाचें हें भाषण ऐकून तो प्रज्ञाचक्षु धृतराष्ट्र म्हणाला—" पुत्रांनों, मीहि तुमच्यासारखीच इच्छा करीत आहें. परंतु माझें खरें मनोगत विदुरापाशीं प्रकट करण्याचें धैर्य मला नसल्यामुळें त्याच्या समक्ष मी पांडवांची नेहमीं स्तुतिच करीत असतों. विदुराला माझा आशय माझ्या चर्येवरून कळणेंहि इष्ट नाहीं. बा सुयोधना, तूं जें प्राप्तकाल कर्तव्य समजत आहेस, तें मला सांग. हे राधेया, या वेळीं तुला काय करावेंसें वाटतें, तें तूंहि मला सत्वर सांग."

पित्याचा हा प्रश्न ऐकून दुर्योधन म्हणाला—तात, आपण आतां अगोदर अतिशय गुप्तपणें आपलें हित करणाऱ्या चतुर ब्राह्मणांकडून कुंतीपुत्र व माद्रीपुत्र यांच्यामध्यें भेद उत्पन्न करूं या. किंवा राजा द्रुपद, त्याचे पुत्र व सर्व अमात्य यांना विपुल धन देऊन तो कुंतीपुत्र युधिष्ठिराचा त्याग करील, अशा प्रकारें त्याच्या मनांत लोभ उत्पन्न करूं या. किंवा आपल्या कुशल ब्राह्मण हेरांनीं पांडवांकडे जाऊन त्यांतील प्रत्येकाला पृथक् पृथक् भेटून 'त्यांनीं पुनः येथें येऊन राहणें योग्य नाहीं' असें सांगावें व तेथेंच रहाण्याविषयीं त्यांच्या मनांत रुचि उत्पन्न करावी व आमच्यापासून विभक्त होऊन त्यांनीं तेथेंच रहाण्याचा निश्चय करावा.

किंवा कुशल व उपाय योजण्यांत चतुर असलेल्या कांहीं लोकांनीं पांची पांडवांचें परस्परांवरील प्रेम कमी करून त्यांच्या मध्यें भेद उत्पन्न करावा. किंवा कृष्णेकडून भर्त्यांचा त्याग करवावा. तिला अनेक भर्ते असल्यामुळें हें कार्य सुकरहि आहे. किंवा ती आपल्या पांची पतींवर सारखें प्रेम करीत नाहीं, असें निदर्शनास आणून पांडव तिचा त्याग करतील असें करावें, म्हणजे ती अनायासानेंच आम्हांला प्राप्त होईल.

किंवा आपल्या साहसी गुप्त हेरांकडून भीमसेनाचा वध करवावा. कारण हे राजा, तोच त्या सर्वांमध्यें अधिक बलवान् आहे. त्याच्याच बलावर कुंतीपुत्र युधिष्ठिर पूर्वीपासून आम्हांला कस्पटासारखा लेखीत आहे. भीमच मोठा क्रूर, शूर व त्यांचा मुख्य आधार आहे. यास्तव हे राजा, त्याला मारविलें असतां सर्व पांडव निरुत्साह व निस्तेज होऊन राज्यप्राप्तीसाठीं

पुनः यत्न करणार नाहींत. कारण तो भीमच त्या सर्वांचा आधारस्तंभ आहे. वृकोदर पाठिराखा असला, म्हणजे अर्जुन संग्रामांत अजेय होतो. भीमावांचून अर्जुन युद्धामध्यें राधेयाच्या पासंगालाहि पुरणार नाहीं. भीमसेनाच्या अभावीं आपलें अत्यंत दौर्बल्य जाणणारे बाकीचे चारी पांडव आम्हांला बलवान् समजून राज्यासाठीं यत्न करणार नाहींत. किंवा दुर्बल झालेले ते चारी भ्राते येथें येऊन आमचे आज्ञांकित होऊन राहिले असतां हे भूपते, आम्ही यथाशास्त्र त्यांचा वध घडवून आणूं.

किंवा अतिशय सुस्वरूप तरुण स्त्रियांकडून एकेका कुंतीपुत्राला विषयासक्त करवावें. म्हणजे कृष्णा अन्य स्त्रीच्या ठिकाणीं आसक्त झालेल्या त्यांतील प्रत्येकाविषयीं विरक्त होईल. किंवा त्यांना येथें आणण्यासाठीं या राधेयाला पाठवावें व निरनिराळ्या उपायांनीं त्यांच्या मनांत आपल्याविषयीं विश्वास उत्पन्न करून आमच्या गुप्त हेरांनीं त्यांचा नाश करावा.

हे तात, या अनेक उपायांतील जो तुला योग्य वाटत असेल, त्याची तत्काल योजना कर. आतां त्यांची उपेक्षा करणें केव्हांहि हितावह होणार नाहीं. जोंवर त्यांनीं द्रुपदराजाच्या मनांत विश्वास उत्पन्न केला नाहीं तोंवरच त्यांचा घात करतां येणें शक्य आहे. एकदा त्या राजाचें प्रेम त्यांच्यावर जडलें म्हणजे आपल्याला कांहीं करतां येणार नाहीं. बाबा, त्या शत्रूंचा निग्रह करण्यास मला हे उपाय सुचतात. राधेया, याविषयीं तुझें मत काय आहे? १. १४. २०१.

अध्याय २०२ रा.

[१ कर्णानें सुचविलेला उपाय.]

(१) **वैशंपायन**—जनमेजया, दुर्योधनाचे हे बालिश उपाय ऐकून वीर कर्ण त्यास म्हणाला—" दुर्योधना, तुझा हा विचार माझ्या बुद्धीला मुळींच पटत नाहीं. हे कुरुनंदना, शूर पांडव असल्या क्षुद्र उपायांनीं साध्य होतील असें मला वाटत नाहीं. हे वीरा, तूं यापूर्वींच अनेक सूक्ष्म उपायांनीं त्यांचा वध करण्याचा अनेक वेळां यत्न केलास. पण त्यांतील एकाहि उपायानें तूं त्यांना मारूं शकला नाहींस.

हे राजा, ते सहायशून्य व वयानें अल्प असून येथें तुझ्या समीप तुझ्या घरांत रहात असतांनाहि जर तूं त्यांचा वध करूं शकला नाहींस, तर आतां

बलाढ्य साह्यकर्त्यांनीं युक्त होऊन परदेशांत रहाणाऱ्या व सर्व प्रकारें उत्कर्ष पावलेल्या कुंतीपुत्रांना तूं उपायानें स्ववश कसें करून घेशील ! ते वीर उपायानें साध्य होण्यासारखे नाहींत, असें माझें निश्चित मत आहे. त्यांना संकटांत टाकणेंहि शक्य नाहीं.

अनुकूल दैवयोगानें जे जतुगृहादि संकटांतूनहि स्वसंरक्षण करण्यास समर्थ झाले व आतां पितृ-पितामहांच्या परंपरेनें प्राप्त झालेलें राज्यपद मिळविण्याची इच्छा करीत आहेत त्या पांडवांचा आपसांत भेद करणेंहि शक्य नाहीं. कारण एका स्त्रीवर आसक्त असलेले ते परस्परांच्या विरुद्ध कदापि जाणार नाहींत. शिवाय कृष्णेला त्यांच्यापासून दूर करण्यास कोणीहि समर्थ होणार नाहीं. भिक्षेवर उपजीविका करणाऱ्या व त्यामुळेंच हीन स्थितींत असलेल्याहि त्यांना जिनें वरलें, ती आतां सुंदर वेष धारण करून सुस्थितींत असलेल्या त्यांना कशी सोडील ! एका स्त्रीचें बहुभर्तृत्व हा स्त्रियांना अत्यंत इष्ट असलेलाच गुण आहे. त्याला अनायासानें प्राप्त झालेली कृष्णा त्यांच्यापासून दूर करितां येणें कोणालाहि शक्य नाहीं.

तो पांचालेश्वर अत्यंत धर्मनिष्ठ आहे. तो राजा द्रव्यलोभी नाहीं. त्याला आपण समग्र राज्य जरी देऊं केलें तरी तो पांडवांचा त्याग कदापि करणार नाहीं. त्या राजाचा गुणवान् पुत्र धृष्टद्युम्न तर पांडवांवर अतिशय लुब्ध झाला आहे. यास्तव हे पुरुषश्रेष्ठा, पांडव असल्या उपायांनीं साध्य होतील असें मला मुळींच वाटत नाहीं. यावेळीं आपल्याला एकच गोष्ट करितां येणें शक्य आहे.

हे राजा, ते पांडुपुत्र जोंवर दृढमूल झाले नाहींत, तोंवर त्यांच्यावर उघड उघड प्रहार करावा आणि हे मित्रा, हा उपाय तुलाहि रुचावा असें मी म्हणतों. जोंवर आमचा पक्ष बलवान् आहे व पांचालपक्ष दुर्बल आहे, तोंवरच त्यांच्यावर शस्त्रप्रहार करावा. आतां विचार करीत बसूं नकोस. हे गांधारेया, जोंवर पांडवांनीं विपुल वाहनें, मित्र व क्षत्रियकुलें यांचा संग्रह केला नाहीं, तोंवर तूं त्यांच्यावर चाल करून जा. राजा, महापराक्रमी पुत्रांसह द्रुपदराजानें जोंवर पांडवांस साह्य करण्याचें मनांत आणलें नाहीं, तोंवर तूं आपला पराक्रम प्रकट कर.

हे कौरवा, वृष्णिकुलोत्पन्न कृष्ण आपली अजिंक्य यादवसेना बरोबर घेऊन पांडवांना राज्य मिळवून देण्यासाठीं जोंवर पांचालराजाच्या घरीं येऊन पोंचला

नाहीं, तोंवर तूं त्या वीरांना पराभूत करण्याचा प्रयत्न कर. त्या देवकीपुत्र कृष्णाला पांडवांसाठीं विपुल धन, विविध भोग, किंबहुना स्वतःचें राज्यहि अत्याज्य नाहीं. तो आपल्या प्रिय मित्रांसाठीं त्या सर्वांचाहि त्याग करील. महात्म्या भरतानें पराक्रमानेंच पृथ्वी मिळविली. इंद्रानें पराक्रमानेंच त्रिभुवन जिंकलें. हे राजन्, क्षत्रियांच्या पराक्रमाचीच प्रशंसा करितात. हे नरश्रेष्ठा, पराक्रम हाच शूरांचा स्वाभाविक धर्म आहे.

आम्ही फार मोठ्या चतुरंग सैन्यानें द्रुपदाचा पराभव करून पांडवांना सत्वर आपल्या स्वाधीन करून घेऊं या. साम, दान किंवा भेद, यांतील एकाहि उपायानें ते साध्य होणारे नाहींत. यास्तव हे दुर्योधना, तूं पराक्रमानेंच त्यांचा नाश कर. तूं शौर्यानें या सर्व पृथ्वीला जिंकून तिचा भोग घे. हे जनेश्वरा, द्रुपद व पांडव यांच्याशीं शक्य तितक्या लवकर युद्ध करण्यावांचून दुसरा कोणताहि उपाय मला दिसत नाहीं."

राजा जनमेजया, प्रतापी धृतराष्ट्रानें राधेयाचें हें वचन ऐकून सत्कारपूर्वक मान डोलविली व म्हटलें—" कर्णा, तूं मोठा बुद्धिमान् व कृतास्त्र आहेस. तूं असें पराक्रमयुक्त भाषण करावेंस हें योग्यच आहे. पण भीष्म, द्रोण, विदुर व तुम्ही दोघे एकत्र बसून ज्याच्या योगानें आपलें हित होईल असा उपाय निश्चित करा. तुम्हां सर्वांचें एकमत झालें म्हणजे आपण तत्काल त्याप्रमाणें आचरण करूं." हे महाराज, कर्णाला असें बोलून महायशस्वी धृतराष्ट्रानें भीष्मादि सर्व मंत्र्यांना बोलाविलें व तो पुढील कर्तव्याविषयीं त्यांच्याशीं विचार करूं लागला. १. १४. २०२.

अध्याय २०३ रा.

[१ भीष्माचें मत. २ दुर्योधनाला उपदेश.]

(१) **वैशंपायन**—हे भूपाला, भीष्मादि मंत्री एकान्तांत येऊन बसल्यावर धृतराष्ट्रानें पांडवांना साध्य करून घेण्याचा कर्णानें सुचविलेला उपाय त्यांस सांगितला व त्याविषयीं त्यांचें मत विचारिलें.

---

१ विक्रमेण मही प्राप्ता भरतेन महात्मना । विक्रमेण च लोकांस्त्रीञ्जितवान्पाकशासनः ॥ विक्रमं च प्रशंसन्ति क्षत्रियस्य विशांपते ।

तेव्हां भीष्म म्हणाला—राजा, पांडुपुत्रांशीं युद्ध करणें मला मुळींच संमत नाहीं, कारण मला जसा तूं तसाच पांडु व जसे गांधारीचे पुत्र तसेच कुंतीपुत्र. हे धृतराष्ट्रा, पांडव मला जसे रक्षणीय आहेत, तसेच ते तुलाहि आहेत. ते जसे तुला व मला रक्षणीय आहेत, तसेच दुर्योधनाला व इतर कौरवांनाहि आहेत. असें असल्यामुळें हे राजा, पांडवांशीं युद्ध करणें हा मोठा अन्याय आहे. माझें सांगणें जर तुला ऐकावयाचें असेल तर त्या वीरांशीं संधि करून त्यांना अर्धें राज्य दे. कारण हें राज्य त्या कुरुश्रेष्ठांच्या प्रपितामहाचें व पित्याचें आहे.

(२) हे दुर्योधना, तूं जसा या राज्याकडे आत्मत्वानें पहात आहेस, त्याप्रमाणें वत्सा, तेहि पहात आहेत बरें! व तें त्यांचें पहाणें सर्वथा योग्यहि आहे. बा गांधारेया, हें माझ्या पित्याचें राज्य आहे, असें जर तूं समजतोस तर त्यांनींहि हें आमच्या पांडूचें राज्य आहे, असें कां समजूं नये! आणि ते यशस्वी पांडुपुत्र जर राज्याला प्राप्त होत नसतील, तर दुसऱ्या कोणा भारताचा तरी त्यावर अधिकार कसा पोंचतो! उलट हे भरतनंदना, तूंच अधर्मानें हें राज्य संपादन केलें आहेस. तुझ्या पूर्वीं तेच या राज्याचे खरे अधिकारी आहेत, असें माझें निश्चित मत आहे. यास्तव या राज्याचा अर्धा भाग तुम्ही त्यांना संतोषानेंच द्या. हे पुरुषश्रेष्ठा, असें करणेंच सर्व लोकांना हितावह होईल. याहून दुसरा कांहीं उपाय जर कराल, तर आपलें कधींहि हित होणार नाहीं. या लोकीं तुझीहि अपकीर्ति होईल, यांत संशय नाहीं.

बाबा, आपल्या कीर्तीचें रक्षण कर. दुर्योधना, कीर्ति हेंच परम बल आहे. ज्या मनुष्याची कीर्ति नष्ट होते, त्याचें जीवित निष्फल आहे, असें श्रेष्ठ लोक म्हणतात. जोंवर मनुष्याची कीर्ति अढळ असते, तोंवरच तो जिवंत असतो. एकदा कीर्ति नष्ट झाली म्हणजे त्याचाहि नाशच होतो. यास्तव हे वीरा, तूं कुरुकुलाला उचित असें धर्माचेंच आचरण कर. आपल्या पूर्वजांना शोभेल असेंच वर्तन ठेव.

पांडव व पृथा त्या भयंकर अग्निमुखांतून जिवंत राहिलीं ही मोठ्या समाधानाची गोष्ट आहे आणि त्या पापी पुरोचनाचा पांडवांना जाळण्याचा मनोरथ

---

१ कीर्तिरक्षणमातिष्ठ कीर्तिर्हि परमं बलम् । नष्टकीर्तेर्मनुष्यस्य जीवितं ह्यफलं स्मृतम् । यावत्कीर्तिर्मनुष्यस्य न प्रणश्यति कौरव । तावज्जीवति गान्धारे नष्टकीर्तिस्तु नश्यति ॥

सिद्धीस गेला नाहीं, उलट तोच दुष्ट नाश पावला, हें सर्वथा योग्यच घडलें. मला या दोन्ही गोष्टींविषयीं परम संतोष होत आहे. ज्या दिवशीं ते अनाथ कुंतीपुत्र आपल्या वृद्ध जननीसह लाक्षागृहांत दग्ध झाले असें मीं ऐकलें, तेव्हांपासून माझ्यानें तुझें मुखावलोकनहि करवत नाहीं.

कुंती तशा निर्दयपणें जाळली गेली हें ऐकून या लोकांतील कोणीहि जिवंत मनुष्य तुला जसा दोष देईल, तसा पुरोचनाला देणार नाहीं. पांडव जिवंत आहेत, असें कळेपर्यंत मला जगांत तोंड दाखविण्याचीहि लाज वाटत होती. यास्तव त्या पांडवांचें जिवंत राहणें, हें तुझ्या पापाचें परिमार्जनच आहे, असें तूं समज आणि हे महाराजा, पांडवांच्या दर्शनाला आपलें अनुमोदन दे. मृत्यूच्या मुखांतून सुटलेल्या व स्वधर्माचरणानेंच उत्कर्ष पावलेल्या त्या वीरांचें आम्हांला मुखावलोकन घडूं दे.

शिवाय हे कुरुनंदना, तूं व तुझ्या दुर्मंत्र्यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, ते वीर जिवंत असतांना पितृ-पितामहांच्या परंपरेनें प्राप्त झालेल्या त्यांच्या अंशाचा अपहार प्रत्यक्ष इंद्रालाहि करितां येणार नाहीं. ते सर्व वीर धर्मामध्यें निश्चित आहेत. सर्व एकचित्त आहेत. मनानेंहि अधर्माला स्पर्श करीत नाहींत आणि विशेषतः राज्याचे ते समान भागीदार आहेत. यास्तव वत्सा दुर्योधना, तुला जर धर्माचें आचरण करावयाचें असेल, माझें प्रिय करावयाचें असेल व आपलें हित करून घ्यावयाचें असेल तर त्यांना अर्धें राज्य दे. १. १४. २०३.

अध्याय २०४ था.

[१ द्रोणाचार्यांचा हितोपदेश. २ कर्णाचें द्वेषमूलक भाषण.]

(१) **वैशंपायन**—राजन्, भीष्मानें असें निःपक्षपात भाषण करून दुर्योधनाला सदुपदेश केला असतां धनुर्वेदाचार्य द्रोण म्हणाला—“ राजा धृतराष्ट्रा, हितावह व गुप्त मंत्र करावयास बोलाविलेल्या राजाच्या हितेच्छूंनीं धर्माला सोडून नसलेलें आणि अर्थ व यश यांच्या वृद्धीला कारण होणारें वचनच बोलावें, असें आम्हीं नीतिज्ञांच्या तोंडून ऐकिलें आहे. यास्तव महात्म्या भीष्मासारखेंच माझेंहि मत आहे. कुंतीपुत्रांना राज्याचा भाग द्यावा, हेंच उचित होय. हा सनातन धर्म आहे.

हे राजा, एखादा प्रिय भाषण करणारा तुझा अमात्य पांडवांसाठीं विपुल रत्नें घेऊन द्रुपदाकडे जाऊं दे. वरपक्षीयांनीं वधूपक्षाला जें जें वस्त्र-भूषणादि वस्तुजात देणें उचित आहे तें सर्व घेऊन त्याला तेथें पाठीव आणि 'आपल्या संबंधामुळें आमचा फार मोठा उत्कर्ष झाला आहे, त्यामुळें राजा धृतराष्ट्राला व त्याच्या दुर्योधनादि पुत्रांना अतिशय संतोष झाला आहे.' असें द्रुपदराजा व धृष्टद्युम्न यांच्या समक्ष त्यानें वारंवार बोलावें. 'हा अतिशय प्रिय व उचित असाच योग घडून आला आहे' असेंहि त्यानें पुनः पुनः वर्णन करावें आणि कुंतीपुत्र व माद्रीपुत्र यांचें सांत्वन करावें.

त्याचप्रमाणें हे राजेंद्रा, सुवर्णाचीं व रत्नांचीं अनेक सुंदर भूषणें द्रौपदीला अर्पण करण्याची तुझ्या अमात्याला आज्ञा दे. हे कुरुनंदना, द्रुपदराजाचे सर्व पुत्र, सर्व पांडव व कुंती यांचाहि वस्त्रालंकारांनीं योग्य सत्कार कर. याप्रमाणें पांडवांसह द्रुपदाला आपल्या नम्र भाषणानें व देणग्यांनीं संतुष्ट करून नंतर त्या अमात्यानें द्रुपदापाशीं पांडवांच्या हस्तिनापुरगमनाविषयीं योग्य वेळीं बोलणें करावें.

द्रुपदानें त्या वीरांस हस्तिनापुरास जाण्याची अनुज्ञा दिली असतां त्यांना येथें आणण्यासाठीं दुःशासन व विकर्ण यांनीं चतुरंग सैन्यासह पंचाल देशास जावें. ते श्रेष्ठ पांडव येथें आल्यावर राजा, तूं त्यांचा सर्वदा पुत्रांप्रमाणें सत्कार करावास. म्हणजे तुझ्या आदरास पात्र झालेले ते वीर प्रजेला संमत असलेल्या त्यांच्या पैतृक स्थानावर स्थिर होतील. हे महाराज, कौरव व पांडव या दोघांशीं तूं असेंच वर्तन अवश्य करावेंस, असें भीष्माप्रमाणेंच मलाहि वाटतें."

(२) भीष्म व द्रोण या उभयतांचें हें अनिष्ट भाषण ऐकून राधापुत्र **कर्ण** म्हणाला—राजा धृतराष्ट्रा, तूं भीष्म व द्रोण यांना धन व मान यांनीं युक्त केलेंस. सर्व कार्यांमध्यें त्यांना आपले अंतरंग मंत्री बनविलेंस. असें असूनहि हे तुला हितावह उपदेश करीत नाहींत. यापेक्षां अधिक आश्चर्य तें काय आहे! जो मनांतून शत्रूंचें हित करण्याची इच्छा करितो व बाहेरून हें स्वामीचें हितच आहे असें दाखवितो, तो वस्तुतः स्वामीचा हितकर्ता नसून प्रच्छन्न शत्रुच आहे. अशा पुरुषानें आपल्या दूषित मनानें केलेला उपदेश स्वामीला हितावह कसा होणार! त्याच्या उपदेशाप्रमाणें वागणाऱ्या स्वामीचें कधींहि कल्याण होणार नाहीं. कारण शठ मित्र स्वामीचा घातच करितो. तो त्याला केव्हांहि हितावह होत नाहीं.

राजा, उत्कर्ष व अपकर्ष यांचें मुख्य कारण दैवच आहे. एखादें संकट प्राप्त झालें असतां पुरुषाचें हित व अहित होण्यास त्याचे मित्र मुळींच कारण होत नाहींत. प्रत्येक जीवाला दैवयोगानेंच सुख किंवा दुःख प्राप्त होतें. मनुष्य मोठा बुद्धिमान् व विद्वान् असो, कीं बुद्धिहीन व अज्ञ असो. तो बाल असो कीं वृद्ध असो. ससहाय असो कीं असहाय असो. त्याला ज्यावेळीं जें इष्ट किंवा अनिष्ट प्राप्त व्हावयाचें तें त्या त्या वेळीं होतेंच.

राजा, पूर्वी मागधराजांच्या राजगृह-नामक नगरांत कोणी एक अंबुवीच नामक राजा होता. तो सर्व इंद्रियांनीं रहित असल्यामुळें त्याचें अस्तित्व केवल श्वासमात्र होतें. त्यायोगें त्याचा ' महाकर्णि '-नांवाचा अमात्य त्याच्या राज्याचा स्वामी होऊन बसला. राजाचें सर्व बल मला प्राप्त झालें आहे असें समजणारा तो मूर्ख राजाचा अवमान करूं लागला. तो मूढ त्या राजाच्या भोग्य स्त्रिया, रत्नें, धन व सर्व ऐश्वर्य यांचा स्वतःच उपभोग घेऊं लागला. त्या सर्वांचा स्वीकार करूनहि त्या लोभी अमात्याचा लोभ अधिकच वाढत चालला व तो त्याचें राज्यहि हरण करण्याची इच्छा करूं लागला. परंतु सर्व इंद्रियशून्य व श्वासमात्र असलेल्या त्या राजाचें राज्य तो अमात्य मोठ्या प्रयत्नानेंहि घेऊं शकला नाहीं, असें आम्हीं ऐकिलें आहे. कारण त्या राजाची राजेंद्रता त्याला दैवानेंच प्राप्त झाली होती. ती मनुष्यप्रयत्नानें मिळणारी नव्हती.

यास्तव हे भूपाला, तुझ्या दैवांतच जर राज्य असेल तर या सर्व लोकांच्या देखत तें तुझ्या ठिकाणींच अढळ राहील. परंतु तें जर तुझ्या दैवांतच नसेल तर तूं कितीहि प्रयत्न केलास तरी तें तुला प्राप्त होणार नाहीं. तस्मात्, हे बुद्धिमान् राजा, तूं आपल्या मंत्र्यांच्या उपदेशांतील हितावह उपदेश कोणता व अहितावह कोणता, सदोष भाषण कोणाचें व निर्दोष कोणाचें याचा विचार करून त्यांतील जें योग्य वाटेल त्याचा स्वीकार कर.

कर्णाचें हें भाषण ऐकून द्रोणाचार्य त्याला क्रोधानें म्हणाला—" हे दुष्टा, तुझी मत्सर बुद्धि मी जाणून आहें. पांडवद्वेषानें तूं हें बोलत आहेस. कर्णा, कुरुकुलाचें परम हित व्हावें, असाच उपदेश मी राजाला केला आहे. परंतु तें माझें वचन दुष्ट आहे, असें जर तूं समजत असशील, तर तुला ज्यांत परम हित वाटत असेल तें सांग. पण हेंहि लक्षांत ठेव कीं, मी जें परम हितवचन बोललों आहें, त्याच्या विपरीत जर तुम्हीं कराल, तर कौरवांचा सत्वर विनाश होईल, असें माझें निश्चित मत आहे." १. १४. २०४.

अध्याय २०५ वा.

[१ धृतराष्ट्राला विदुराचा उपदेश.]

(१) वैशंपायन—राजा पारिक्षिता, याप्रमाणें द्रोणाचार्यांचें हितवचन ऐकून महा बुद्धिमान् विदुर धृतराष्ट्राला म्हणाला—" हे राजन्, तुझ्या बांधवांनीं तुला निःसंशय श्रेयस्कर असेंच हितवचन सांगावें, हेंच त्यांचें खरें कर्तव्य आहे. परंतु तें हितवचन न ऐकणाराच्या मनावर त्याचा कांहींच परिणाम होत नाहीं. हे राजा, शान्तनव भीष्मानें तुला प्रिय व हित असा उपदेश केला असतां तो तूं मान्य करीत नाहींस. त्याचप्रमाणें हा द्रोणाचार्य तुझ्या परम कल्याणाचा बोध करीत असतां हा राधासुत कर्ण त्यांत तुझें हित मानीत नाहीं.

हे कुरुनंदना, मी आपल्या मनाशीं पुष्कळ विचार केला, परंतु मला या दोघां पुरुषश्रेष्ठ भीष्म-द्रोणांपेक्षां बुद्धीनें अधिक व तुझा परम सुहृद् दुसरा कोणीहि दिसत नाहीं. ते दोघे वयानें, बुद्धीनें व विद्येनें वृद्ध असून हे राजेंद्रा, तूं व पांडुपुत्र यांच्याशीं समवृत्तीनें वागणारे आहेत. दाशरथिराम व गय यांहून हे दोघेहि धर्म व सत्य यांत हीन नाहींत. त्यांनीं या पूर्वींहि तुला तुझें अकल्याण होईल, असें कधीं सांगितलेलें नाहीं व तुला कधीं कोणत्याहि प्रकारें अपकार केलेला नाहीं.

तेव्हां हे वीरा, ते पुरुषश्रेष्ठ व सत्यपराक्रमी भीष्म द्रोण स्वतः निरपराध असलेल्या तुझ्या अकल्याणाची गोष्ट तुला कशी सांगतील ! या लोकीं मोठे बुद्धिमान् म्हणून प्रसिद्ध असलेले हे दोघेहि महात्मे तुझें हितच सांगत आहेत, यत्किंचित्हि कुटिल भाषण करीत नाहींत, अशी माझी निश्चित मति आहे. हे धर्मज्ञ भीष्म-द्रोण धनादिकांच्या लोभानें कोणत्या तरी एकाच पक्षाचा आश्रय करून कधींहि बोलणार नाहींत. हे भारता, ते जें सांगत आहेत, त्यांतच तुझें परम हित आहे, असें मलाहि वाटतें.

हे धृतराष्ट्रा, दुर्योधनादि जसे तुझे पुत्र आहेत, तसे पांडवहि तुझे पुत्रच आहेत. पण हें तत्त्व न जाणतां पांडवांविषयीं जर तुला कोणी अहिताचा उपदेश करूं लागेल, तर तो तुझा खरा मंत्रीच नव्हे, त्याच्या बुद्धीनें चालल्यास तुझें कल्याण केव्हांहि होणार नाहीं. राजा, पांडवांचें अहित चिंतिणारे तुझे मंत्री तुझें व या कुरुकुलाचें हित कशांत आहे, हें जाणत नाहींत, असें मी समजतों. धृतराष्ट्रा, तुझा आपल्या पुत्रांवर जर अधिक स्नेह असेल तर तो तुझ्या मनांतील

गुप्त आशयच बाहेर प्रकट करणारे ते तुझे मंत्री केव्हांहि शाश्वत हित करणार नाहींत, उलट तुझ्या मनांतील वैषम्यच प्रकट करतील व तुझें कोणतेंहि कार्य साधणार नाहींत.

यासाठीं हे राजा, या तेजस्वी महात्म्यांनीं पांडवांच्या हितासाठीं उघड असें कांहींच सांगितलें नाहीं. कारण पांडवांचें हित व्हावें अशी तुझी सद्बुद्धि नाहीं, हें त्यांना माहित आहे. म्हणूनच त्यांनीं पांडवांना अर्धराज्य देण्याचा जो उपदेश केला तो त्यांच्या हितासाठीं नव्हे, तर तुझ्या व तुझ्या पुत्रांच्या कल्याणासाठीं आहे. त्या दोघां पुरुषश्रेष्ठांनीं पांडव तुझ्या पुत्रांना अजिंक्य आहेत, असें जें सांगितलें आहे, तें अक्षरशः खरें आहे. हे नरेंद्रा, तुझें कल्याण असो व तुलाहि त्यांचें तें म्हणणें सत्य वाटो.

श्रीमान् सव्यसाची धनंजय युद्धामध्यें साक्षात् इंद्रालाहि अजिंक्य आहे. दहा हजार नागांचें बल धारण करणाऱ्या पराक्रमी भीमसेनाला युद्धामध्यें या भूलोकांतील कोणता मानव पराभूत करील! देवांनाहि त्याला जिंकतां येणें शक्य नाहीं. खड्गयुद्धामध्यें अति विशारद असलेले जे माद्रीपुत्र नकुल-सहदेव हे तर समरांगणांत साक्षात् यमपुत्रांसारखेच भासतात. तेव्हां जिवंत रहाण्याची इच्छा करणारा कोणता पुरुष समरांगणांत त्यांना जिंकील! त्याचप्रमाणें ज्याच्या ठिकाणीं संतोष, दया, क्षमा, सत्य व पराक्रम नित्य वास करितात, त्या ज्येष्ठ पांडवाला तरी समरांगणांत कोण जिंकणार! ज्यांचा पक्षपाती हलधर राम आहे, मंत्री जनार्दन आहे व ज्यांच्या पक्षामध्यें सात्यकि आहे, त्यांना समरांगणांत अजिंक्य असें काय आहे!

ज्या पांडवांचा श्वशुर द्रुपद आहे व धृष्टद्युम्नादि द्रुपदपुत्र वीर भ्राते श्यालक आहेत, ते पांडव युद्धांत कोणालाहि जिंकतां येणें शक्य नाहीं. हें जाणून व ते दुर्योधनादि कौरवांच्याहि पूर्वींच आपल्या पितृधनाचे मुख्य भागीदार आहेत, त्यांच्या पित्यापासूनच त्यांना या राज्याचा भाग प्राप्त झाला आहे, हें लक्षांत आणून तूं त्यांच्याशीं धर्म्य आचरण कर. राजा धर्माला सोडून तूं जर विषम दृष्टि ठेवशील तर तुझें व तुझ्या कुलाचेंहि हित होणार नाहीं. पुरोचनाच्या दुष्ट कृत्यानें तुझें जें फार मोठें अपयश जगांत पसरलें आहे, त्याचें पांडवांवर अनुग्रह करून तूं या वेळीं परिमार्जन कर.

वस्तुतः हा पांडवांवर अनुग्रह नसून आमच्या कुलांतील सर्वांवर हा तुझा अनुग्रह आहे. क्षत्रियकुलाची वृद्धि करणें व आपलें जीवित राखणें, यांतच परम

कल्याण आहे. आम्हीं पूर्वीं द्रुपदाचेंहि वैर संपादन केलें आहे. यास्तव पांडवांच्या निमित्तानें या वेळीं त्यांचा संग्रह करणें म्हणजे आपल्या पक्षाची वृद्धि करणेंच आहे.

राजा, कृष्णाच्या अंकित असलेले दाशार्ह यादवहि महाबलाढ्य व संख्येनें अधिक आहेत. ज्या पक्षामध्यें कृष्ण असेल, त्याच पक्षामध्यें ते सर्व रहाणार व जेथें कृष्ण तेथेंच जय निश्चित आहे. जें कार्य सामोपचारानेंच साध्य होणें शक्य आहे, तें युद्धानें साधण्यास कोणता दुर्दैवी मनुष्य तयार होईल!

हे राजा, पांडव जिवंत आहेत हें ऐकून सर्व प्रजाजन व नगरवासीजन त्यांच्या दर्शनाविषयीं उत्सुक झाले आहेत. यास्तव पांडवांना येथें आणवून आपल्या प्रजाजनांना संतुष्ट कर. हे महाराज, दुर्योधन, कर्ण व शकुनि, हे तिघेहि अधार्मिक, दुर्बुद्धि व मूर्ख आहेत. त्यांचें वचन तूं मान्य करूं नकोस. हे गुणवान् राजा, या तुझ्या दुर्योधनाच्या अपराधामुळें तुझ्या सर्व प्रजेचा विनाश होईल, असें मीं तुला या पूर्वींच सांगितलेलें आहे. १. १४. २०५.

अध्याय २०६ वा.

[१ विदुराचें द्रुपदनगरीं गमन. २ द्रुपदादि सर्वांस धनादि देऊन पांडवांना हस्तिनापुरास पाठविण्याविषयीं द्रुपदाची प्रार्थना]

(१) **वैशंपायन**—राजा जनमेजया, याप्रमाणें विदुराची स्पष्टोक्ति ऐकून धृतराष्ट्र म्हणाला—" हे विदुरा, विद्वान् शांतनव भीष्म, पूज्य द्रोणाचार्य व तूं मला अगदीं सत्य व परम हितवचन सांगत अहां. ते वीर कुंतीपुत्र जसे महात्म्या पांडूचे पुत्र आहेत, तसेच ते सर्व धर्मतः माझेहि पुत्र आहेत, यांत संशय नाहीं. ज्याप्रमाणें हें राज्य माझ्या पुत्रांचें आहे, तसेंच तें निःसंशय पांडुपुत्रांचेंहि आहे. यास्तव हे क्षत्त्या, तूं जाऊन त्या पांची भ्रात्यांना त्यांच्या मातेसह व दिव्य स्वरूपवती कृष्णेसह मोठ्या सन्मानानें घेऊन ये. ते पार्थादि सर्व भ्राते पृथेसह जिवंत आहेत व त्या महारथांना द्रुपदराजाची कन्या प्राप्त झाली, हें केवढें महद्भाग्य! आज आपला केवढा उत्कर्ष झाला हा! दुष्ट पुरोचनाचा नाश झाला व माझें महद्दुःख नष्ट झालें हें तरी केवढें भाग्य! खरोखर हें सर्व ऐकून मला परम आह्लाद होत आहे."

हे राजा, त्यानंतर विदुर धृतराष्ट्राच्या आज्ञेनें द्रुपदराजा व पांडव यांच्याकडे जावयास निघाला. त्यानें आपल्या बरोबर द्रौपदी, पांडव व द्रुपद यांच्यासाठीं विविध रत्नें व विपुल धन घेतलें होतें. सर्व शास्त्रविशारद व धर्मज्ञ विदुर पंचाल देशांत जाऊन द्रुपदाला भेटला व ज्येष्ठांच्या अनुक्रमानें आलिंगन, नमस्कार इत्यादि उपायांनीं भेटलेल्या द्रुपदाजवळ उभा राहिला. तेव्हां द्रुपदराजानेंहि विदुराचें धर्माला अनुसरून स्वागत केलें. त्यांनीं परस्परांस कुशल प्रश्न विचारले. नंतर विदुर पांडवांना व तेथेंच असलेल्या वासुदेवाला भेटला. हे भारता, विदुरानें त्या सर्वांना आलिंगन दिलें व कुशल प्रश्न केले. उलट पांडवांनींहि क्रमानें त्या महा बुद्धिमान् पितृतुल्य विदुराचा मोठा सत्कार केला.

त्यानंतर धृतराष्ट्राच्या सांगण्यावरून विदुरानें मोठ्या प्रेमानें त्या सर्व पांडुपुत्रांना पुनः पुनः कुशल विचारलें. युधिष्ठिरादि पांच भ्राते, कुंती, द्रौपदी, द्रुपद व त्याचे पुत्र यांच्यासाठीं कौरवांनीं पाठविलेलीं विविध रत्नें व धन ज्यांचीं त्यांस दिलीं व तो मतिमान् विदुर पांडुपुत्र व केशव यांच्या समक्ष मोठ्या विनयानें असें मधुर वचन बोलला—

(२) " हे राजन्, तूं आपले अमात्य व पुत्र यांसह माझें वचन ऐक. तुझ्याशीं जडलेल्या या नूतन संबंधानें संतुष्ट झालेल्या धृतराष्ट्राजानें पुत्र, अमात्य व बांधव यांसह आपलें कुशल निवेदन करावयास सांगून मला तुमचें कुशल पुनः पुनः विचारावयाची आज्ञा केली आहे. हे नरेंद्रा, तुझ्या दृढ संबंधानें त्याला परम आह्लाद वाटत आहे. महाबुद्धिमान् शांतनव भीष्मानें सर्व कौरवांसह तुला सर्व प्रकारचें कुशल विचारलें आहे. तुझा प्रिय सखा जो भरद्वाजपुत्र द्रोण, त्यानें दृढ आलिंगनपूर्वक तुझें कुशल विचारलें आहे.

हे पांचाल्या, कन्येच्या द्वारा तुझ्याशीं संबद्ध झालेला राजा धृतराष्ट्र व सर्वहि कौरव आपल्याला कृतार्थ समजत आहेत. हे यज्ञसेना, तुझा संबंध त्यांना जेवढा प्रीतिकर वाटत आहे, तशी राज्यप्राप्तिहि वाटत नाहीं. हें जाणून हे राजा, तूं मजबरोबर पांडवांना हस्तिनापुरास पाठीव. सर्व कौरव त्यांना पहाण्यास फार उत्सुक झाले आहेत.

हे नरश्रेष्ठहि हस्तिनापुर सोडून आज बरेच दिवस बाहेर आहेत; त्यामुळें ते व पृथाहि आपलें नगर पहाण्यास उत्सुक झाली असेल. सर्व श्रेष्ठ कुरुस्त्रिया पांचाली कृष्णला पहाण्याची इच्छा करीत आहेत; त्या यांच्या आगमनाची

वाटच पहात असतील. सर्व हस्तिनापुर व आमचा कुरुजांगल देश यांची मार्गप्रतीक्षा करीत आहे. यास्तव हे उदार नृपते, तूं पांडुपुत्रांना आपल्या राजधानीस जाण्याची सत्वर अनुज्ञा दे. त्यांनीं या वेळीं आपल्या भार्येसह तेथें जावें, असें माझें मत आहे. हे नरेंद्रा, तूं महात्म्या पांडवांना जाण्याची अनुज्ञा दिलीस म्हणजे मी शीघ्र गमन करणारे दूत पुढें पाठवून 'वीर कुंतीपुत्र कृष्णा व कुंती यांसह येत आहेत,' असें धृतराष्ट्राला कळवीन." १. १४. २०६.

अध्याय २०७ वा.

[१ पांडवांचें हस्तिनापुरीं गमन. २ खांडवप्रस्थाची प्राप्ति व तेथें वास्तव्य.]

(१) वैशंपायन—हे परिक्षित्पुत्रा, विदुराचें हें मधुर भाषण ऐकून द्रुपदराजा त्यास म्हणाला—" हे महाप्राज्ञ विदुरा, तूं म्हणतोस तें अगदीं खरें आहे. तुमच्याशीं माझ्या कुलाचा संबंध जडल्यामुळें मलाहि परम हर्ष वाटत आहे. आतां या महात्म्यांनीं हस्तिनापुरास गमन करावें, हें सर्वथा युक्तच आहे. पण मी स्वतः आपल्या मुखानें त्यांस असें सांगणें उचित नाहीं. यास्तव वीर कुंतीपुत्र युधिष्ठिर, भीमसेन, अर्जुन, पुरुषश्रेष्ठ नकुल, सहदेव आणि धर्मज्ञ राम व कृष्ण यांना येथून जेव्हां जावेंसें वाटेल तेव्हां ते येथून खुशाल जावोत. हे पुरुषश्रेष्ठ राम व कृष्ण पांडवांचें प्रिय व हित करण्यांत नेहमीं तत्पर आहेत. यास्तव ते जेव्हां सांगतील तेव्हां यांनीं खुशाल येथून निघावें. "

द्रुपदाचें हें भाषण ऐकून युधिष्ठिर म्हणाला—हे राजन्, आम्ही सर्व भ्राते तुझ्या अधीन आहों. तूं आम्हांला जशी आज्ञा करशील, तसें आम्ही मोठ्या आनंदानें करूं.

हे कुरुश्रेष्ठा, यावर श्रीकृष्णानें म्हटलें—बा युधिष्ठिरा, तुम्हीं हस्तिनापुरास गमन करावें, हेंच मला योग्य दिसतें. परंतु या धर्मवेत्त्या राजा द्रुपदाचें काय मत आहे ?

तेव्हां लगेच द्रुपद म्हणाला—हे पुरुषोत्तमा, या वेळीं वीर पांडवांनीं जें कांहीं करणें उचित आहे, असें तुला वाटेल तें मला पूर्णपणें संमत आहे, असें तूं समज. कारण हे महाभाग कुंतीपुत्र जसे माझे आप्त आहेत, तसेच ते वासुदेवाचेहि आहेत, यांत संशय नाहीं. हा पुरुषश्रेष्ठ केशव यांच्या कल्याणाचें जसें अहर्निश चिंतन करीत असतो, तसें स्वतः युधिष्ठिरहि करीत नाहीं.

जनमेजया, द्रुपदानें इतकें बोलून ज्यांना स्वनगरास जाण्याचें अनुमोदन दिलें आहे, असे पांडव कृष्ण, विदुर, यशस्विनी कुंती व द्रुपदकन्या कृष्णा, यांस बरोबर घेऊन लीलेनें हस्तिनापुरास जावयास निघाले. ते सुखानें प्रवास करीत होते. पांडवांचा हस्तिनापुरास जाण्याचा निश्चय होतांच विदुरानें शीघ्रगामी दूत धृतराष्ट्राकडे पाठविले होते. त्यांच्या तोंडून पराक्रमी पांडव इकडे जावयास निघाले आहेत, असें ऐकून धृतराष्ट्रानें त्यांचें स्वागत करण्यासाठीं पराक्रमी विकर्ण, चित्रसेन, द्रोणाचार्य, कृप व इतर कौरव यांस पुढें पाठविलें. त्यांनीं परिवेष्टित झाल्यामुळें अतिशय शोभणारे ते पांडव हळुहळू हस्तिनापुर नगरांत आले.

त्या राजपुत्रांना पहाण्याच्या उत्सुकतेनें सर्व नगर जणुंकाय सागरासारखें क्षुब्ध झालें. सर्वांच्या संतापाचा व दुःखाचा नाश करणारे ते पुरुषव्याघ्र आपल्या राजधानींत शिरतांच त्यांचें प्रिय करण्याची इच्छा करणाऱ्या पौरजनांनीं कृतज्ञतेनें उच्चारलेले असे हृदयंगम उच्च-नीच शब्द त्यांच्या कानीं पडले—" जो आपल्या पुत्रांप्रमाणें आमचें धर्मानें रक्षण करीत असे, तो हा धर्मज्ञ पुरुषश्रेष्ठ युधिष्ठिर आज पुनः या नगरांत येत आहे. त्याला पाहून आज लोकांना प्रिय असलेला महाराज पांडूच जणुंकाय आमचें प्रिय करण्यासाठीं वनांतून आला आहे, असें आम्हांला वाटतें. हे वीर कुंतीपुत्र आज या नगरास पुनः परत आले, हें फार चांगलें झालें. त्यांनीं या आपल्या उदार आगमनानें आम्हां सर्वांचें कोणतें प्रिय केलें नाहीं! खरोखर आमचें सर्व प्रिय झालें. आमचें जर कांहीं दान, हवन व तप यांपासून निष्पन्न झालेलें पुण्य असेल, तर त्याच्या बलानें हे पांडुपुत्र या नगरांत शंभर वर्षें राहोत."

त्यानंतर ते वीर हळुहळू मोठ्या समारंभानें राजगृहांत येऊन पोंचले व त्यांनीं राजा धृतराष्ट्र, महात्मा भीष्म व इतर पूजार्ह लोक यांस वंदन केलें. नंतर नगरांतील सर्व लोकांना कुशल प्रश्न करून ते धृतराष्ट्राच्या आज्ञेनें निरनिराळ्या राजमंदिरांत जाऊन राहिले.

कांहीं वेळ विश्रांति घेतल्यावर त्या बलाढ्य महात्म्यांना राजा धृतराष्ट्र व शांतनव भीष्म यांनीं आपल्यापाशीं बोलावून आणिलें व धृतराष्ट्र मोठ्या प्रेमानें म्हणाला—" वत्सा युधिष्ठिरा, तूं आपल्या चारी भ्रात्यांसह मी काय सांगतों तें ऐक. आपलें परस्पर वैर वाढूं नये, म्हणून तूं खांडवप्रस्थामध्यें जाऊन रहा. वज्रपाणि इंद्राकडून सुरक्षित असलेल्या देवांप्रमाणें धनुर्धर पार्थाकडून संरक्षण

केल्या जाणाऱ्या तुम्हांला तेथें पीडा देण्यास कोणीहि समर्थ होणार नाहीं. राज्याचा अर्धा भाग घेऊन तुम्ही खांडवप्रस्थामध्यें सुखानें रहा. "

(२) हे पारिक्षित राजा, धृतराष्ट्राचें तें हितवचन पांडवांनीं शिरसा मान्य केलें व ते पुरुषश्रेष्ठ त्याला वंदन करून त्या घोर वनांत जावयास निघाले. कारण धृतराष्ट्रानें त्यांना लागवडीस न आलेला भूमीचा अर्धा भाग दिला होता व धन-धान्यांनीं संपन्न असलेला अर्धा भाग आपल्याकडे ठेविला होता. तथापि तसलें अर्धें राज्य स्वीकारूनहि पांडव कृष्णासह खांडवप्रस्थास गेले व अल्पावधींतच त्यांनीं त्या घोर अरण्याला स्वर्गाप्रमाणें मंडित केलें.

तेथें जाऊन पोंचतांच त्या महारथांनीं आपलें नगर वसविण्यासाठीं एक पवित्र व सुखावह प्रदेश निश्चित केला. तेथें व्यासादि महर्षींनीं यथाविधि शांति करून खांडवप्रस्थ नगराची सीमा आंखली. त्या नगराच्या सभोंवार समुद्रासारखा विस्तीर्ण खंदक खणला आणि त्याच्या आंतल्या अंगाला गगनचुंबित उंच तट उभारला. तेव्हां शुभ्र अभ्रांच्या प्रकाशांनीं तें नगर नागांच्या योगानें शोभणाऱ्या भोगावती नगरीप्रमाणें शोभूं लागलें.

त्या नगराचीं प्रवेशद्वारें गरुडाच्या पंखांप्रमाणें दिसत होतीं. तेथें अनेक उंच शिखरांचीं भुवनें असून मेघसमूहाप्रमाणें भासणाऱ्या गोपुरांनीं त्यांचें रक्षण केलें होतें. त्या उंच तटाच्या बुरुजावरून मोठ्याल्या शक्ति व शस्त्रास्त्रें ठेविलीं होतीं. त्यामुळें तें नगर द्विजिह्व सर्पांनीं वेढल्याप्रमाणें भासत होतें. त्या नगरांत जागजागीं रक्षकांचे समूह नगराचें व तटाचें रक्षण करीत होते. तीक्ष्ण अंकुश, तोफा व बंदुका यांच्या योगानें तो विशाल तट भूषित झाला होता. लोखंडी महाचक्रांनीं तें श्रेष्ठ नगर अतिशय शोभत होतें. त्या नगरांत मोठाले रुंद रस्ते सारख्या प्रमाणांत आंखले होते व तें खांडवप्रस्थ अतिवृष्टयादि दैवी आपत्तींनीं रहित होतें.

याप्रमाणें नानाप्रकारच्या रम्य भुवनांनीं युक्त असलेलें तें इंद्रप्रस्थ स्वर्गाप्रमाणें शोभत होतें. अशा त्या स्वर्गतुल्य नगरांतील पवित्र व रम्य प्रदेशीं ज्येष्ठ पांडवाचें राजमंदिर होतें. तें मेघसमूहामध्यें चमकणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें सर्व मंदिरांच्या समूहांत झळकत होतें. तें सर्व प्रकारच्या धनांनीं परिपूर्ण असलेलें राजमंदिर कुबेराच्या समृद्ध गृहाप्रमाणेंच शोभत होतें.

हे राजन्, युधिष्ठिरानें अशाप्रकारें तें इंद्रप्रस्थ नगर वसविल्यावर तेथें सर्व वेदवेत्त्यांतील श्रेष्ठ ब्राह्मण येऊन राहिले. द्रव्याची इच्छा करणारे सर्व भाषा-

भिन्न व्यापारी चोहोंकडून तेथें आले व त्यांना तेथेंच वास्तव्य करणें आवडलें. तसेच सर्व शिल्पवेत्तेहि तेथें रहाण्यासाठीं आले.

त्या नगराच्या सभोंवतीं रम्य उद्यानें होतीं. त्यांत आम्र, आम्रातक, कदंब, जांभुळ, फणस इत्यादि अनेक मधुर फलांचे व कण्हेर, बकुल, पारिजात, केतकी, चंपक इत्यादि सुगंधित पुष्पांचे व ताल, तमाल, शाल इत्यादि दुसरेहि अनेक प्रचंड वृक्ष होते. तसेंच, इतर सुवासिक फुलांचे वृक्ष व लता असंख्य असून त्या सर्व पुष्प-फलांनीं युक्त होत्या. त्या वृक्षांवर व लतांवर अनेक जातींचे पक्षी मोठ्या आनंदानें रहात असत. तेथें मत्त मयूरांच्या केका व तरुण कोकिलांचे मंजुल ध्वनि सर्वदा ऐकूं येत. त्या उद्यानांत रमणीय लताकुंज असून तेथें आरशासारखीं निर्मल गृहें होतीं. कांहीं ठिकाणीं कृत्रिम पर्वत व मनोहर विचित्र क्रीडागृहें होतीं. अनेक प्रकारचे जलाशय, पुष्करणी व सरोवरें सुगंधी व रम्य कमलांनीं व हंसादि सर्व जल-चरांनीं शोभत होतीं. राजा, अशा प्रकारच्या पुण्यवान् लोकांनीं युक्त असलेल्या त्या रम्य नगरींत पांडवांनीं प्रवेश करतांच त्यांचें त्यांवरील प्रेम अधिकच वाढलें. याप्रमाणें भीष्माचार्य व राजा धृतराष्ट्र यांनीं प्रयाणाची आज्ञा दिल्यावर पांड-वांनीं खांडवप्रस्थांत वास्तव्य केलें. ते महा धनुर्धर इंद्रतुल्य पांच भ्राते तेथें रहातांच ती नगरी नागांनीं परिवेष्टित असलेल्या श्रेष्ठ भोगावती नगरीसारखी शोभूं लागली. राजा, याप्रमाणें त्या वीर पांडवांना तेथें स्थिर करून महा बुद्धिमान् श्रीकृष्ण त्यांचें अनुमोदन घेऊन बलरामासह द्वारकेस परत आला. १. १४. २०७.

अध्याय २०८ वा.

[१ धर्मानें राज्य करीत असलेल्या पांडवांकडे नारदाचें आगमन. २ सुदोपसुंदाच्या कथेचा प्रस्ताव.]

(१) जनमेजय म्हणाला—हे तपोधना, याप्रमाणें इंद्रप्रस्थ नगरीचें राज्य प्राप्त झाल्यावर त्या महात्म्या पांडवांनीं काय केलें ? माझे ते सर्व पूर्व प्रपितामह महा बलवान् होते. असें असतां द्रौपदी त्या सर्वांची धर्मपत्नी होऊन त्यांच्या आज्ञेंत कशी राहिली ? त्या पांच नरश्रेष्ठांची एकच पत्नी असतां त्यांचा पर-स्परांत कलह कसा झाला नाहीं ? हे विप्रश्रेष्ठा, कृष्णेनें युक्त असलेल्या त्यांचें परस्परांशीं वर्तन कसें होतें ? हें सर्व सविस्तर ऐकण्याची माझी इच्छा आहे.

जनमेजयाचा हा प्रश्न ऐकून वैशंपायन म्हणाला—हे राजा, धृतराष्ट्रानें अनुज्ञा दिलेले पांडव राज्यारूढ होऊन खांडवप्रस्थांत द्रौपदीसह सुखानें राहिले. त्या महा तेजस्वी, सत्यनिष्ठ युधिष्ठिरानें राज्य प्राप्त झालें असतां आपल्या भ्रात्यांसह पृथ्वीचें धर्मानें पालन केलें. ते सर्व सत्यधर्मपरायण, बुद्धिमान् भ्राते शत्रूंना जिंकून इंद्रप्रस्थ नगरींत आनंदानें राहूं लागले. ते नरश्रेष्ठ पांडुपुत्र आपापल्या अधिकाराप्रमाणें श्रेष्ठ सिंहासनावर बसून राज्याचें सर्व कार्य पहात असत व प्रजेला न्याय देत असत.

हे भारता, एकदा ते सर्व महात्मे आपल्या उच्च आसनांवर बसले असतां देवर्षि नारदमुनि यदृच्छेनें तेथें आला. त्याला पहातांच युधिष्ठिरानें उठून स्वतःचें मूल्यवान् सुंदर उच्चासन त्यास दिलें व तो देवर्षि त्यावर बसला असतां बुद्धिमान् युधिष्ठिरानें स्वतः त्याचें अर्घ्य-पाद्यादिकांनीं यथाविधि पूजन करून त्याला आपलें राज्य निवेदन केलें. तेव्हां त्या देवर्षीनें त्याच्या पूजेचा परम प्रीतीनें स्वीकार करून त्याला शुभाशीर्वाद दिले व बसावयास सांगितलें. नारदाच्या आज्ञेनें बसलेल्या युधिष्ठिरानें द्रौपदीला भगवान् नारदमुनि आल्याचें वर्तमान कळविलें.

तें ऐकतांच द्रौपदी तत्काल शुचिर्भूत व शांतचित्त होऊन जेथें पांडवांसह नारद बसला होता तेथें आली व ती धर्मशालिनी कृष्णा त्या देवर्षीच्या दोन्ही चरणांना वंदन करून आपले पाय व मस्तक वस्त्रानें आच्छादून नम्रपणानें हात जोडून उभी राहिली. त्या वेळीं धर्मात्म्या सत्यवक्त्या नारदमुनीनें त्या द्रुपदनंदिनीला अनेक शुभाशीर्वाद दिले आणि त्या निष्पाप नववधूला जाण्याची आज्ञा दिली.

राजा, द्रौपदी अंतःपुरांत गेल्यावर भगवान् नारद युधिष्ठिरादि पांची भ्रात्यांना एकांतांत म्हणाला—“ हे पांडवहो, ही यशस्विनी पांचाली तुम्हां पांचजणांची एकच धर्मपत्नी आहे. यास्तव ज्यायोगें तुमच्यामध्यें वैमनस्य उत्पन्न होणार नाहीं, असाच कांहीं नियम तुम्ही करून ठेवा.

(२) पूर्वी ‘सुंद’ व ‘उपसुंद’ या नांवाचे दोघे सोदर भ्राते होते. ते त्रिभुवनांत दुसऱ्या सर्वांना अवध्य व प्रसिद्ध होते. त्या दोघांचें एकच राज्य होतें व त्याचें गृह, आसन व शय्या हीं सर्व एकत्र होतीं. परंतु इतक्या एकमतानें रहाणाऱ्याहि त्या भ्रात्यांनीं तिलोत्तमेसाठीं एकमेकांचा वध केला.

यास्तव हे युधिष्ठिरा, तुम्ही परस्परांवरील प्रेम व स्नेह यांचें रक्षण करा आणि ज्यायोगें तुमच्यामध्यें भेद उत्पन्न होणार नाहीं, असेच परस्परांशीं वागा.

देवर्षि नारदाचें हें भाषण ऐकून युधिष्ठिर म्हणाला—हे भगवन्, सुंदोपसुंद हे असुर कोणाचे पुत्र, त्यांच्यामध्यें भेद कसा उत्पन्न झाला व त्यांनीं परस्परांचा घात कसा केला ? जिच्या कामनेनें उन्मत्त होऊन त्यांनीं एकमेकांचा वध केला ती तिलोत्तमा कोण होती ? अप्सरा कि देवकन्या ? हा सर्व वृत्तान्त सविस्तर ऐकण्याची आमची इच्छा आहे. हे महामुने, त्याविषयीं आमची जिज्ञासा फार वाढली आहे. १. १४. २०८.

अध्याय २०९ वा.

[१ सुदोपसुंदांचें तप, वरप्राप्ति व त्यांचा उत्कर्ष.]

(१) **वैशंपायन**—कुरुनंदना, युधिष्ठिराचा हा प्रश्न ऐकून नारदमुनि म्हणाला—हे युधिष्ठिरा, हा प्राचीन इतिहास मी तुला सविस्तर सांगतों, तो तूं भ्रात्यांसह श्रवण कर.

पूर्वीं हिरण्यकशिपूच्या वंशांत ‘ निकुंभ ’-नांवाचा एक तेजस्वी व बलवान् दैत्य होता. त्याला सुंद व उपसुंद म्हणून महा बलाढ्य दोन पुत्र झाले. ते दोघेहि दैत्यश्रेष्ठ भयंकर पराक्रम करणारे, निष्ठुर व क्रूर स्वभावाचे होते. ते दोघेहि सर्व कार्यांत एकमतानें वागत होते व त्या दोघांचा निश्चयहि एकसारखाच होता. ते दोघेहि दैत्य निरंतर एकमेकांच्या सुख-दुःखांनीं सुखी व दुःखी होत. एक दुसऱ्यावांचून कधींहि भोजन करीत नसे व कोणाशीं बोलतहि नसे. ते दोघे परस्परांचें प्रिय करणारे व एकमेकांशीं प्रिय भाषण करणारे होते. एकाच पदार्थाचे दोन भाग केल्याप्रमाणें त्यांचा आचार व शील एकसारखेंच होतें.

सर्व कार्यामध्यें एकमत असलेल्या त्या दोघांनीं त्रैलोक्य जिंकण्याचा निश्चय केला व दीक्षा घेऊन विंध्यपर्वतावर उग्र तप आचरिलें. दीर्घ कालानें त्यांची तपश्चर्या सिद्ध झाली. नंतर जटा-वल्कलें धारण करणारे ते क्षुधा व तृषा यांनीं श्रांत होऊन वायुभक्षण करून राहिले. त्यांच्या सर्वांगावर धुळीचीं पुटें बसलीं. त्यांनीं आपल्या अंगाचें मांस तोडून त्याच्या अग्नीमध्यें आहुत्या दिल्या. दोन्ही हात वर करून निमेषोन्मेषहि न करितां ते पायांच्या आंगठ्यांवर दीर्घ काल उभे राहिले.

त्या दोघां असुरांच्या उग्र तपश्चर्येनें तप्त झालेल्या विंध्य पर्वतांतून धुराचे लोट निघूं लागले. खरोखर ती मोठी अद्भुत गोष्ट घडली. तेव्हां त्यांचें तें उग्र तप पाहून देव भयभीत झाले व त्यांच्या तपाला प्रतिबंध करण्यासाठीं देवांनीं त्यांत अनेक विघ्नें आणिलीं. त्यांनीं अमूल्य रत्नें व सुंदर स्त्रिया यांचा त्या दोघांस पुनः पुनः लोभ दाखविला. परंतु दृढ व्रत धारण करणाऱ्या त्यांच्या तपाचा यत्किंचित्‌हि भंग झाला नाहीं.

तेव्हां देवांनीं त्या महात्म्यांच्या दृष्टीपुढें अद्भुत माया पसरविली. हातांत शूल घेतलेले राक्षस त्यांच्या भगिनी, माता, भार्या व इतर आप्त स्त्रिया यांच्या पाठीस लागल्यामुळें त्या सर्व त्रस्त होऊन पळत आहेत, अडखळून पडत आहेत, त्यांचीं भूषणें गळून पडलीं आहेत, केंस व वस्त्रें अस्ताव्यस्त झालीं आहेत व भयानें त्या सर्व ' आमचें रक्षण करा, रक्षण करा ' असा आक्रोश करीत आहेत, असें एक मायावी दृश्य त्यांच्या दृष्टीस पाडिलें; परंतु त्यामुळेंहि ते दोघे महा तपस्वी आपल्या व्रतापासून च्युत झाले नाहींत. तेव्हां ते दोघे क्षुब्ध किंवा खिन्नहि होत नाहींत, असें पाहून त्या स्त्रियांसह तें सर्व दृश्य नाहींसें झालें.

पुढें कांहीं कालानें साक्षात् पितामह त्या दोघां महा असुरांपाशीं आला व त्या सर्व लोकांचें हित करणाऱ्या प्रभूनें त्यांस इष्ट वर मागावयास सांगितलें. त्या वेळीं ते दृढनिश्चयी पराक्रमी भ्राते सुंदोपसुंद पितामहाला पाहून हात जोडून उभे राहिले व ते दोघे एकाच वेळीं त्या प्रभूला म्हणाले—" हे भगवन्, तूं जर आमच्या तपानें प्रसन्न झाला असशील तर आम्हां दोघांनाहि मायाविद्, अस्त्रवेत्ते, बलवान् व कामरूपी होण्याचा वर दे. हे प्रभो, तुझ्या प्रसादानें आम्हां उभयतांसहि अमर होऊं दे."

ब्रह्मदेव म्हणाला—हे दैत्यांनो, अमरत्वावांचून तुमची सर्व इच्छा पूर्ण होईल. तुम्हांला देवांप्रमाणें सर्व ऐश्वर्य प्राप्त होईल. मृत्यूला मात्र जिंकतां येणार नाहीं. कारण तुम्ही जें अद्भुत तप आचरिलेंत, तें अमरत्व मिळविण्याच्या हेतूनें नव्हे, तर त्रैलोक्याला जिंकण्यासाठीं तुम्हीं ही तीव्र तपश्चर्या केलीत. यास्तव हे श्रेष्ठ दैत्यांनो, मला ही तुमची इच्छा पूर्ण करतां येत नाहीं.

सुंदोपसुंद म्हणाले—हे पितामहा, तर मग आम्हांला एकमेकांवांचून त्रिभुवनांतील दुसऱ्या कोणत्याहि स्थावर-जंगम पदार्थापासून भय नसावें, असा वर दे. तें ऐकून ब्रह्मदेव म्हणाला—" तुम्हीं प्रार्थिलेले सर्व वर मी तुम्हांला देतों. मृत्यूविषयींहि तुमच्या इच्छेप्रमाणेंच घडून येईल."

बा युधिष्ठिरा, याप्रमाणें त्या दोघां दैत्यांना वर देऊन पितामह ब्रह्मलोकीं निघून गेला व ते दोघे दैत्य तपापासून निवृत्त झाले. त्यानंतर वरानें सर्व लोकांना अवध्य झालेले ते दोघे दैत्येंद्र भ्राते स्वगृहीं परत आले. वर मिळवून कृतकृत्य व मनांत येईल तें करण्यास समर्थ झालेल्या त्या दोघांस पाहून त्यांचे सर्व आप्तसंबंधी जन अतिशय आनंदित झाले.

त्यांनीं आपल्या मस्तकावरील जटा काढून मुकुट धारण केले व ते निर्मल वस्त्रें व अमूल्य अलंकार यांनीं भूषित झाले. त्यांनीं आपल्या नगरांत सतत कौमुदीमहोत्सव सुरू केला. त्यांचे सर्व सुहृद् व आप्तजन नित्य सुखांत राहूं लागले. खा, प्या, द्या, क्रीडा करा, गा, हे शब्द घरोघर ऐकूं येऊं लागले. मंगल वाद्यांच्या व टाळ्यांच्या ध्वनींनीं तें दैत्यांचें नगर दुमदुमून गेलें व सर्वत्र आनंद पसरला. असे विविध विहार करण्यांत त्या कामरूपी दैत्यांचीं अनेक वर्षें एका दिवसाप्रमाणें निघून गेलीं. १. १४. २०९.

अध्याय २१० वा.

[१ सुंदोपसुंदांनीं केलेला जगाचा विध्वंस.]

(१) नारद—युधिष्ठिरा, याप्रमाणें त्या दोघां बलाढ्य दैत्यांनीं दीर्घकाल आनंदांत घालविल्यानंतर त्रिभुवन जिंकण्याची इच्छा करणाऱ्या त्या दोघांनीं संकेत करून सैन्याला सज्ज होण्याची आज्ञा दिली. नंतर सुहृद्, आप्त व वृद्ध दैत्य मंत्री यांची अनुज्ञा घेऊन त्यांनीं प्रस्थानविधि केला व शुभ गमनाला निषिद्ध असलेल्या मघा नक्षत्रावर रात्रीं त्या असुरांनीं प्रयाण केलें. त्यांच्या बरोबर गदा, पट्टे, शूल व मुद्गर हातांत घेतलेली आणि इतर आयुधें धारण केलेली कवचयुक्त फार मोठी दैत्यसेना होती. त्या वेळीं चारणादिक विजयद्योतक मंगल गीतें व स्तुतिपाठ म्हणत असतां इच्छेस येईल तेथें गमन करणारे व युद्धाचा मद चढलेले ते दोघे दैत्य अंतरिक्षांत उड्डाण करून सैन्यासह देवलोकीं गेले. त्यांचें आगमन व पितामहानें त्यांना दिलेला वर जाणून सर्व देव स्वर्ग सोडून ब्रह्मलोकीं निघून गेले.

तेव्हां त्या दोघां भयंकर पराक्रमी दैत्यांनीं इंद्रलोक जिंकून यक्ष-राक्षसांचा समुदाय व अंतरिक्षांतील इतर प्राणी यांचा वध केला. त्यानंतर ते महारथ

वीर पातालांत गेले व तेथें त्यांनीं नागांना जिंकून समुद्रांत रहाणाऱ्या सर्व म्लेच्छ जातींना पराभूत केलें. तेथून ते क्रूर कर्में करणारे दैत्य पृथ्वीतलावर आले व सर्व पृथ्वी जिंकण्याची इच्छा करणाऱ्या त्या असुरांनीं आपल्या सैनिकांना बोलावून त्यांस अशी निष्ठुर आज्ञा केली, " हे सैनिकहो, या पृथ्वीवर क्षत्रिय आणि ब्राह्मण यज्ञ व हव्य-कव्य यांच्या योगानें देवांचें बल व ऐश्वर्य वाढवीत असतात. यास्तव या कर्मांत प्रवृत्त होणाऱ्या त्या सर्व असुरशत्रूंचा आम्हीं सर्वांनीं मिळून पूर्णपणें नाश करावा, हेंच आपलें मुख्य कर्तव्य आहे."

याप्रमाणें आपल्या सैनिकांना आज्ञा करून ते दोघेहि सर्वत्र संचार करूं लागले. ते क्रूर कर्मांचा निश्चय करून प्रथम समुद्राच्या पूर्व तीरावर गेले. तेथें त्या बलाढ्य दैत्यांना यज्ञ-याग करणारे किंवा याजन करणारे जेवढे द्विज आढळले, त्या सर्वांचा बलात्कारानें वध करून ते पुढें निघाले. त्यांच्या सैन्यानें धार्मिक मुनींच्या आश्रमांत प्रवेश करून त्यांचीं अग्निहोत्रें उचलून निःशंकपणें जलांत फेकून दिलीं.

तेव्हां त्या क्रुद्ध झालेल्या तपोनिष्ठ महात्म्यांनीं त्यांना शाप दिले. परंतु ब्रह्मदेवाच्या वरानें निर्भय झालेल्या त्यांना ते शाप कांहीं करूं शकले नाहींत. उलट शिलेवर मारलेल्या बाणाप्रमाणें ते निष्फळ झाले. म्हणजे एखादा बाण शिलेवर मारला असतां तो तिचा छेद न करितां स्वतःच जसा बोथट होतो, त्याप्रमाणें वरसामर्थ्यानें वज्रप्राय झालेल्या त्या दैत्यांवर शापांचा कांहींच परिणाम झाला नाहीं.

त्यामुळें उद्विग्न झालेले ते सर्व द्विज आपलें व्रत व नियम सोडून मार्ग सांपडेल तेथें निघून गेले. पृथ्वीवर जेवढे तपोनिष्ठ, दमनशील व शमपरायण मुनि होते, तेवढे सर्व गरुडाला पाहून सर्प जसे पळतात तसे, त्या दोघां दैत्यांच्या भयानें पळाले, त्या दैत्यांनीं ऋषींचे आश्रम भग्न केले, त्यांचीं यज्ञोपयोगी कलश, स्रुक्, स्रुवा इत्यादि उपकरणें फोडून टाकिलीं. त्यामुळें सर्व जगत् कालानें ग्रासल्याप्रमाणें शून्य दिसूं लागलें. हे राजन्, कांहीं ऋषि अदृश्य होऊन राहिले आहेत असें जाणून त्या दोघां दैत्यांनीं व्याघ्र-सिंहादि विविध हिंस्र प्राण्यांचीं रूपें धारण करण्याचा निश्चय केला. आपलें हें कपट न जाणून ऋषि भूतलावर निर्भयपणें फिरूं लागले म्हणजे त्यांच्यावर गजादि रूपांनीं चाल करून त्यांचा वध करण्याचा त्या दैत्यांचा आशय होता.

याप्रमाणें ऋषिवधाची इच्छा करणारे ते दोघे दैत्य ज्यांच्या गंडस्थलांतून मद-स्राव होत आहे, अशा मत्त गजांचीं रूपें धारण करून निघाले व त्यांनीं पर्वतांच्या दुर्गम गुहेमध्यें गुप्तपणें बसलेल्या त्या मुनींना यमसदनीं पाठविलें. ते दोघे कधीं सिंह होऊन कधीं व्याघ्र होऊन तर केव्हां मध्येंच अदृश्य होऊन फिरूं लागले व त्यांनीं ऋषि दृष्टीस पडतांच त्यांचा निरनिराळ्या उपायांनीं वध केला. त्यामुळें त्या वेळीं सर्व पृथ्वींतील यज्ञ व स्वाध्याय निवृत्त झाले. ब्राह्मण व क्षत्रिय नष्ट झाले आणि सर्व उत्सव व याग उच्छिन्न झाले. सर्वत्र हाहाकार उडाला. जगांतील क्रय-विक्रयादि व्यवहार थांबला. देवकार्यें बंद पडलीं. विवाहादि मंगल-कार्यांचा अभाव झाला. कृषी व गोरक्षण कोणी करीनासे झाले.

फार काय, पण हे राजा, क्षत्रियांचीं नगरें व ब्राह्मणांचे आश्रम यांचा विध्वंस झाला. पृथ्वीवर सर्वत्र अस्थिपंजरांच्या राशी पडल्या. त्यामुळें सर्व भूलोक भयावह झाला. पितृकार्यें व वषट्कारादि मंगल कृत्यें यांचा अभाव झाला. सर्व जगत् भीषण व दुष्प्रेक्ष्य झालें. सुंदोपसुंदांचें हें क्रूर कर्म पाहून चंद्र, सूर्य, ग्रह, तारा, नक्षत्रें व देव अतिशय खिन्न झाले. राजा युधिष्ठिरा, अशा क्रूर कर्मानें सर्व दिशा जिंकून शत्रुरहित झालेले ते दोघे दैत्य कुरुक्षेत्रांत वास करूं लागले. १. १४. २१०.

अध्याय २११ वा.

[१ तिलोत्तमेची उत्पत्ति व तिचें सुंदोपसुंदांकडे गमन.]

(१) **नारद**—हे पांडुपुत्रा, याप्रमाणें त्या दैत्यांनीं सर्व त्रिभुवनाला त्रस्त केलें. तेव्हां देवर्षि, सिद्ध व इतर श्रेष्ठ महर्षि तें महत् कदन पाहून परम दुःखार्त झाले व जितेंद्रिय, जितक्रोध व जितात्मे असलेले ते सर्व जगावर कृपा करण्यासाठीं ब्रह्मलोकीं गेले. तेथें त्यांनीं पितामहाला देव, सिद्ध व ब्रह्मर्षि यांच्या परिवारासह बसलेलें पाहिलें. तेथें महादेव, वायूसह अग्नि, चंद्र, आदित्य, इंद्र, ब्रह्मोपासक ऋषि, वैखानस, वालखिल्य, वानप्रस्थ, मरीचिप, अज, विमूढ, व तजोगर्भ या नांवाचे तपस्वी आले होते. ते सर्व महर्षि दीन होऊन ब्रह्मदेवा-पाशीं गेले व त्यांनीं सुंदापसुंदांचें तें सर्व घोर कृत्य त्यास निवेदन केलें. त्यांनीं पृथ्वीवर धनादिकांचा अपहार व प्राण्यांची हिंसा कशी कशी चालविली आहे तें सर्व पितामहाला सांगितलें आणि ते सर्व देवगण व महर्षि यांनीं असुरांच्या या कृत्याचा प्रतीकार करण्याविषयीं पितामहाची प्रार्थना केली.

तेव्हां त्या पूज्य देवाधिदेवानें त्या सर्वांचें तें आर्त वचन ऐकून क्षणभर विचार केला व कर्तव्याचा निश्चय करून त्यांच्या वधाचें साधन उत्पन्न करण्यासाठीं विश्वकर्म्याला बोलाविलें. तो समीप आला असतां, त्याच्याकडे पाहून 'हे विश्वकर्मन्, एक अतिशय कमनीय स्त्री निर्माण कर' अशी विधात्यानें त्यास आज्ञा केली.

ती ऐकून विश्वकर्म्यानें त्या पितामहाला नमस्कार केला व त्याच्या आज्ञावचनाचें अभिनंदन करून त्या निर्माणकुशल त्वष्ट्यानें पुनः पुनः विचार केला आणि एक अप्रतिम स्वरूपवती स्त्री निर्माण केली. या त्रिभुवनांत जें जें कांहीं दर्शनीय स्थावर-जंगम होतें, तें सर्व त्यानें एकत्र जमविलें. कोट्यवधि रत्नांनीं तिचे अवयव घडविले व ती देवरूपिणी स्त्री जणुं काय रत्नसंघातमयीच निर्मिली.

त्रिभुवनांतील स्त्रियांमध्यें रूपानें अप्रतिम अशी ती अप्सरा फार मोठ्या प्रयत्नानेंच उत्पन्न केली होती. तिच्याकडे पहाणाऱ्या लोकांची दृष्टि तिच्या रूपसंपत्तीमुळें ज्यामध्यें आसक्त होत नाहीं, असा तिच्या अवयवांमध्यें एखादा सूक्ष्म भागहि नव्हता. ती मूर्तिमंत कामरूपा श्रीच असून जणुंकाय सर्व लोकांना मोहित करण्यासाठीं सशरीर झाली होती. त्या कामिनीनें लोकांचे चक्षु व मन यांचें हरण केलें. ज्या अर्थीं सर्व रत्नांतील तिळ तिळ अंश घेऊन विश्वकर्म्यानें तिला निर्मिलें होतें त्या अर्थीं तिचें 'तिलोत्तमा' असें नांव ठेविलें.

त्यानंतर ब्रह्मदेवाला नमस्कार करून व हात जोडून ती म्हणाली—हे भूतेशा, ज्यासाठीं तूं मला उत्पन्न केलेंस, तें कोणतें कार्य मी आज करूं, त्याची आज्ञा कर.

तिचें वचन ऐकून पितामह म्हणाला—हे भद्रे तिलोत्तमे, सुंदोपसुंद असुरांकडे जा व आपल्या कमनीय रूपानें त्यांना मोहित कर. नुसत्या दर्शनानेंच तुझ्या स्वरूपावर आसक्त होऊन त्या दोघां असुरांचा तुझ्यासाठीं परस्पर विरोध उत्पन्न होईल असें कर.

ही आज्ञा ऐकतांच तिलोत्तमा 'ठीक आहे' असें बोलून, पितामहाला नमस्कार करून व देवसमूहाला प्रदक्षिणा घालून निघाली. ती प्रदक्षिणा घालीत असतां तिचें स्वरूप पाहून देवांनाहि मोह पडला.

हे राजन्, भगवान् विष्णु प्राङ्मुख झाला. महेश्वर दक्षिणेकडे पाहूं लागला. इतर देव उत्तरेकडे पाहूं लागले. ऋषि सर्व दिशांकडे पाहूं लागले. इंद्र व

भगवान् रुद्र हे दोघे मात्र त्या वेळीं धैर्यानें स्थिर राहिले. आपल्या जवळून गेलेल्या तिलोत्तमेला पाहण्याची इच्छा करणाऱ्या त्या रुद्राचें कमलाप्रमाणें नेत्र असलेलें सुंदर दक्षिण मुख उत्पन्न झालें. पाठीमागून जाणाऱ्या तिला पहाण्यासाठीं पश्चिममुख उद्भवलें. ती प्रदक्षिणा क्रमानें डाव्या बाजूनें जाऊं लागली असतां त्याचें उत्तर मुख उद्भवलें. इंद्राच्या तर अग्रभागीं, पृष्ठभागीं आणि दोन्ही पार्श्वभागीं विशाल आरक्त वर्ण सहस्र नेत्र उत्पन्न झाले. याप्रमाणें पूर्वी महादेव स्थाणु चतुर्मुख झाला व बलसूदन इंद्र सहस्रनेत्र झाला. देव व महर्षि यांनीं ज्या ज्या बाजूनें तिलोत्तमा गेली, त्या त्या बाजूला आपलें मुख फिरविलें.

युधिष्ठिरा, एका पितामहावांचून बाकी सर्व महात्म्या देवर्षींची दृष्टि तिच्या शरीरावर खिळून राहिली. देवलोकांतून जात असलेल्या तिलोत्तमेनें आपल्या रूपसंपत्तीनें सर्व देव व महर्षि यांना मोहित केलेलें पाहून ब्रह्मदेवादि सर्व देवगण सुंदोपसुंदांच्या नाशाचें कार्य हिनें केलेंच आहे, असें समजले. याप्रमाणें तिलोत्तमा तेथून गेली आहे असें पाहून देवाधिदेव प्रजापतीनें देव व ऋषिगण यांस स्व-स्वस्थानीं जावयास सांगितलें. १. १४. २११.

अध्याय २१२ वा.

[१ सुंदोपसुंदांचा नाश. २ पांडवांचा नियम.]

(१) **नारद**—हे युधिष्ठिरा, पृथ्वीला जिंकून शत्रुरहित व निर्भय झालेले ते दोघे दैत्य सर्व त्रिभुवन एकरूप करून कृतकृत्य झाले होते. देव, गंधर्व, यक्ष, नाग, राक्षस व मानव, या लोकांत जेवढ्या उत्कृष्ट वस्तु होत्या, त्या सर्वांचें ग्रहण करून ते दोघे असुर संतुष्ट झाले. त्यांना प्रतिबंध करणारा कोणीहि शत्रु राहिला नसल्यामुळें ते निरुद्योगी होऊन दोन देवांप्रमाणें विहार करूं लागले. ते असुर स्त्रिया, पुष्पमाला, सुगंधित द्रव्यें, विपुल भक्ष्य-भोज्य पदार्थ व आह्लादकारक विविध पेयें यांचें परम प्रीतीनें सेवन करूं लागले. अंतःपुर, उद्यान, पर्वत, वन इत्यादि इच्छेस येईल त्या प्रदेशांत ते विहार करीत.

एकदा ते दोघे भ्राते विंध्यपर्वताच्या शिखरावरील समान व सपाट प्रदेशीं विहार करावयास गेले. तें शिलातल पुष्पित तालवृक्षांनीं युक्त होतें. सर्व दिव्य भोग भोगल्यावर त्याच श्रेष्ठ आसनावर ते दोघे स्त्रियांसह हृष्ट चित्तानें बसले.

त्यावेळीं त्या स्त्रियांनीं गायन, वादन व नृत्य यांच्या योगानें त्यांची उपासना करून व स्तुतियुक्त गीत गाऊन त्यांचें रंजन केलें.

इतक्यांत त्या वनामध्यें फुलें वेंचणारी तिलोत्तमा आली. तिनें अतिशय पातळ एकच तांबडें वस्त्र धारण केलें होतें. ती नदीतीरावरील कण्हेरीचीं फुलें वेंचीत हळुहळू जेथें ते महा असुर बसले होते तेथें आली.

त्यावेळीं उत्कृष्ट मद्यपानाच्या धुंदीनें आरक्त नेत्र झालेले ते दोघे भ्राते त्या सुंदरीला पाहून कामविह्वल झाले. ते दोघेहि आपल्या आसनावरून उठले व जेथें ती लावण्यवती उभी होती तेथें आले. ते दोघेहि कामासक्त होऊन तिची कामना करूं लागले. सुंदानें तिचा उजवा हात धरिला व उपसुंदानें डावा हात धरिला. ते दोघेहि दैत्य प्रजापतीच्या वरानें व स्वतःच्या शरीरबलानें आधींच मत्त झाले होते. त्यांत धन, ऐश्वर्य आणि सुरापान यांची भर पडली. या सर्व मदांनीं उन्मत्त होऊन ते एकमेकांकडे डोळे वटारून पाहूं लागले. त्यांच्या शरीरांत काममदाचा संचार होतांच ते परस्परांस क्रोधानें असें बोलूं लागले.

सुंद म्हणाला—ही माझी भार्या तुला मातेसमान आहे. त्यावर उपसुंद म्हणाला—नाहीं, ही माझी भार्या आहे, ती तुला स्नुषेसमान आहे. याप्रमाणें 'ही तुझी नाहीं, माझी,' असें बोलतां बोलतां ते दोघेहि क्रोधाविष्ट झाले. तिच्या रूपावर आसक्त झालेले ते भ्राते परस्परांवरील निःसीम स्नेह विसरले व त्यांनीं आपल्या भयंकर गदा हातांत घेतल्या.

याप्रमाणें काममोहित झालेले ते दोघे दैत्य 'मी आधीं, मी आधीं,' असें बोलून एकमेकांच्या मस्तकावर आपल्या उग्र गदांचे प्रहार करून भूमीवर मृत होऊन पडले. त्यावेळीं त्या दोघांचे रक्तानें माखलेले देह आकाशांतून च्युत झालेल्या बाल सूर्याप्रमाणें दिसले. अशाप्रकारें ते बलाढ्य भ्राते| मरण पावलेले पहातांच त्या स्त्रिया व सर्व दैत्यगण तेथून पळाले आणि भय व खेद यांनीं कंपित होऊन त्या सर्वांनीं पातालांत प्रवेश केला.

त्यानंतर सर्व देव व महर्षि यांसह पितामह तेथें आला. त्या विशुद्धात्म्यानें तिलोत्तमेचा योग्य सत्कार केला व तिला वर दिला. संतुष्ट होऊन वर देण्याची इच्छा करणारा तो भगवान् पितामह तिला म्हणाला—" हे भामिनि, जेथें जेथें सूर्याचा संचार होतो, त्या सर्व लोकांत तूं संचार करशील. तुझ्या उग्र तेजामुळें तुला पहाणारांची दृष्टि दिपून जाईल." याप्रमाणें तिला वर व इंद्राला त्रिभुवनाचें राज्य देऊन तो प्रभु आपल्या ब्रह्मलोकीं निघून गेला.

हे कुंतीपुत्रा, याप्रमाणें सर्व कर्तव्यांमध्यें एक निश्चयानें वागणाऱ्या व सर्वदा एकत्र रहाणाऱ्या त्या भ्रात्यांनीं तिलोत्तमेसाठीं क्रुद्ध होऊन एकमेकांचा नाश केला. यास्तव मी तुम्हांला मोठ्या स्नेहानें सांगतों कीं, जर तुम्हांला माझें प्रिय करण्याची इच्छा असेल तर, ज्यायोगें द्रौपदीसाठीं तुम्हांमध्यें भेद उत्पन्न होणार नाहीं, असें वर्तन तुम्ही ठेवा. तुमचें कल्याण होवो.

(२) राजा जनमेजया, नारदाचें हें वचन ऐकून परस्परांवर प्रेम करणाऱ्या महा बलाढ्य पांडवांनीं ' आमच्यापैकीं एक भ्राता द्रौपदीसह असतांना तेथें जो कोणी दुसरा भ्राता जाईल, त्यानें बारा वर्षे ब्रह्मचर्यानें वनांत रहावें. ' असा देवर्षीच्या समक्ष नियम केला. त्या धार्मिक पांडवांनीं असा नियम केला असतां तो महामुनि मोठ्या संतोषानें आपल्या इष्ट देशीं निघून गेला. याप्रमाणें त्या बुद्धिमान् पांडवांनीं नारदमुनीच्या प्रेरणेनें पूर्वीच नियम करून ठेवल्यामुळें त्यांच्यामध्यें केव्हांहि परस्पर वैर उत्पन्न झालें नाहीं. १. १४. २१२.

येथें चवदावें विदुरागमन-राज्यलंभपर्व समाप्त झालें.

अर्जुनवनवासपर्व १५.

अध्याय २१३ वा.

[१ ब्राह्मणाच्या गोधनाचें हरण. २ त्यास अर्जुनाचा प्रतीकार. ३ नियम-भंगाच्या निवृत्तीसाठीं अर्जुनाचा वनवास.]

(१) **वैशंपायन**—हे परिक्षित्पुत्रा, वर सांगितल्याप्रमाणें परस्पर नियम करून ते पांडव खांडवप्रस्थ नगरांत आपल्या शस्त्रप्रतापानें अन्य राजांना अधीन करून सुखानें राहूं लागले. कृष्णा त्या पांची अति बलाढ्य पार्थांना अनुकूल होऊन राहिली. ज्याप्रमाणें अनेक सरोवरांनीं युक्त असलेली वनस्थली गजांच्या योगानें व ते गज त्या स्थलीच्या योगानें शोभतात, त्याचप्रमाणें कृष्णेच्या योगानें पांडव व पांच वीर पतींच्या योगानें कृष्णा परम संतुष्ट होऊन शोभली. महात्मे पांडव धर्मानें वागत असतां सर्व कुरुदेशाचा मोठा उत्कर्ष झाला. त्यांतील सर्व दोष निवृत्त झाले व प्रजा सुखी झाली.

हे पांडवेया, याप्रमाणें दीर्घ काल लोटल्यावर एकदा कांहीं चोरांनीं एका ब्राह्मणाच्या गायी चोरल्या. आपलें गोधन चोर हरण करून नेत आहेत, असें

पाहून ब्राह्मण क्रुद्ध होऊन खांडवप्रस्थास आला व पांडवांना संबोधून तो मोठमोठ्यानें आक्रोश करूं लागला—" हे पांडवहो, हे क्षुद्र, निर्दय व दुर्बुद्धि चोर माझ्या घरांतून माझें गोधन बलात्कारानें हरण करून नेत आहेत. एका शांत ब्राह्मणाचा हा हवि दुष्ट काक पळवीत आहेत. सिंहाच्या शून्य गुहेला हा नीच कोल्हा दूषित करीत आहे. प्रजेपासून षष्ठांश कर घेऊन जो राजा प्रजेचें रक्षण करीत नाहीं, तो सर्व लोकांच्या पापाचा अधिकारी होतो असें म्हणतात. यास्तव चोरांनीं ब्राह्मणाचें धन हरण केल्यामुळें धर्मकार्य लुप्त होणार, या भीतीनें आक्रोश करीत असलेल्या मज ब्राह्मणाला अभय द्या."

(२) जनमेजया, याप्रमाणें राजगृहापाशीं येऊन मोठ-मोठ्यानें आक्रोश करणाऱ्या त्या ब्राह्मणाचें वचन ऐकून कुंतिपुत्र धनंजय 'ब्राह्मणा, भिऊं नकोस.' असें म्हणाला; पण महात्म्या पांडवांचीं आयुधें जेथें ठेवलीं होतीं, तेथें धर्मराज युधिष्ठिर कृष्णेसह होता. त्यामुळें त्या वीर पांडवाला आपलीं आयुधें घेण्यासाठीं तेथें जातां येईना व आयुधावांचून त्याला चोरांचा पाठलागहि करितां येईना. गोधन नष्ट झाल्यामुळें आर्त झालेल्या त्या ब्राह्मणाचीं वाक्यें त्याला स्वस्थहि राहूं देईनात. त्यामुळें मनांत अतिशय खिन्न झालेल्या धनंजयानें मनांत असा विचार केला.

" या तपस्वी ब्राह्मणाचें गोधन चोर हरण करीत असतांना त्यांचा प्रतीकार करून ब्राह्मणाच्या दुःखाचें परिमार्जन करणें हा आपला धर्म आहे. याची उपेक्षा केल्यास राजाला फार मोठा अधर्म लागेल. हा ब्राह्मण राजद्वारीं येऊन असा मोठा आक्रोश करीत असतांना जर मी आज याचें रक्षण केलें नाहीं, तर आमच्या रक्षणावरील सर्वांचा विश्वास उडेल. आम्ही संकटप्रसंगीं प्रजेचें रक्षण करीत नाहीं, अशी आमची अपकीर्ति होईल व आम्हांला अधर्महि लागेल. बरें, राजाचा अनादर करून स्त्रीसह असलेल्या त्या अजातशत्रूपाशीं जर मी गेलों तर त्याचा नियम मोडला असें होईल व आमच्या नियमाप्रमाणें मला बारा वर्षें वनवास करावा लागेल. पण वनवासादि बाकीचें सर्व राजाच्या अपमानापुढें तुच्छ आहे. अधर्म त्याहिपेक्षां भयंकर आहे. यास्तव वनामध्यें मला मरण आलें तरी चालेल; कारण शरीराच्या विनाशानें मला श्रेष्ठ धर्म जोडतां येईल; पण या प्रसंगीं ब्राह्मणाच्या धनाचें रक्षण करणें सर्वथा उचित होय."

असा विचार करून कुंतीपुत्र धनंजय आयुधागारांत गेला व राजाच्या आज्ञेनें आपलें धनुष्य घेऊन संतुष्ट चित्तानें बाहेर आला आणि ब्राह्मणास

म्हणाला—" ब्राह्मणा, माझ्याबरोबर सत्वर ये. दुसऱ्याच्या धनाची इच्छा करणारे ते क्षुद्र चोर दूर गेले नाहींत तोंच आपण त्यांना गांठूं. मी त्यांच्यापासून तुझें धन हिरावून घेऊन तुला देईन."

त्यानंतर अंगांत चिलखत घालून, ध्वजयुक्त रथांत बसून धनुर्धर पार्थ निघाला व त्यानें थोड्याच अवधींत बाणांनीं त्या चोरांचा नाश करून ब्राह्मणाचें गोधन सोडविलें आणि तें ब्राह्मणाला परत देऊन संतुष्ट केलें. त्यामुळें सर्व प्रजेमध्यें त्याचें निर्मल यश पसरलें.

(३) राजा जनमेजया, याप्रमाणें तुझ्या वीर पूर्वजानें चोरांनीं हरण केलेलें ब्राह्मणाचें गोधन त्यास परत देऊन त्याचा आशीर्वाद घेतला व तो वीर सव्यसाची धनंजय खांडवप्रस्थास परत आला. राजमंदिरांत आल्यावर त्यानें कुंती, युधिष्ठिर, भीम व इतर पूज्य गुरुजन, यांस अभिवादन केलें. तेव्हां विजयी धनंजयाचें सर्व लहान-थोरांनीं अभिनंदन केलें.

त्यानंतर तो सत्यप्रतिज्ञ अर्जुन धर्मराजास म्हणाला—हे प्रभो, मला व्रताचरणाची आज्ञा दे. द्रौपदीसह एकांतांत असलेल्या तुझ्याजवळ येऊन मीं नियमाचें उल्लंघन केलें आहे. यास्तव आतां मी बारा वर्षें वनवास करीन. कारण आपण हाच नियम केला आहे.

अर्जुनाच्या मुखांतून अकस्मात् निघालेलें हें अप्रिय वाक्य ऐकून धर्मराज शोकाकुल झाला व सद्गदित स्वरानें त्यास म्हणाला—" वत्सा, तूं हें काय म्हणतोस ! तुझें हें भाषण ऐकून माझें देहभान नाहींसें झालें आहे. "

त्यानंतर भ्राता युधिष्ठिर मनांत पुष्कळ विचार करून अतिशय दीन झाला व आपल्या धनंजय भ्रात्याला पुनः म्हणाला—"हे प्रियदर्शन अर्जुना, मी जर तुला प्रमाण असेन, तर मी काय म्हणतों, तें ऐक. हे वीरा, तूं आयुधासाठीं माझ्या अंतःपुरांत प्रवेश करून जें माझें अप्रिय केलें आहेस, त्यांत यत्किंचित्‌हि दोष न पहातां मी तो तुझा गुणच समजत आहें. त्यामुळें 'माझें तूं कांहीं अप्रिय केलेंस' असें माझ्या मनांतहि येत नाहीं. कनिष्ठ भ्रात्यानें ज्येष्ठ भ्रात्याच्या एकान्तांत प्रवेश करणें यांत अनिष्ट असें कांहींच नाहीं. पण कनिष्ठ भ्रात्याच्या एकान्तांत ज्येष्ठ भ्रात्यानें प्रवेश केल्यास तो मात्र धर्मघ्न होतो. यास्तव हे वीरा, तूं आपला हा संकल्प सोड व माझें वचन मान्य कर. तुझा धर्मलोप झालेला नाहीं व तूं माझा अपमानहि केला नाहींस, हें मी तुला सत्य सांगत आहें."

युधिष्ठिराचें हें भाषण ऐकून अर्जुन म्हणाला—अशा कपटानें धर्माचरण करूं नये असें मी तुझ्याच तोंडून ऐकिलें आहे. यास्तव मी आपल्या आयुधाला स्पर्श करून सत्य सांगतों कीं, मी आपल्या सत्य प्रतिज्ञेपासून केव्हांहि ढळणार नाहीं.

राजा जनमेजया, असा आपला निग्रह व्यक्त करून व धर्मराजाची आज्ञा घेऊन कुंतीचा कनिष्ठ पुत्र अर्जुन वनवासास सज्ज झाला व बारा वर्षें वनांत रहाण्याच्या संकल्पानें निघून गेला. १. १५. २१३.

अध्याय २१४ वा.

[१ अर्जुनाची तीर्थयात्रा. २ उलूपीनागकन्येचा भार्यात्वानें स्वीकार.]

(१) वैशंपायन—राजा परिक्षित्पुत्रा, वनवासास निघालेल्या त्या महाबाहु, यशस्वी कुंतीपुत्राबरोबर वेदवेत्ते महात्मे ब्राह्मण, वेदवेदाङ्गपरायण विद्वान्, त्याचप्रमाणें अध्यात्मवेत्ते, भिक्षाचरण करणारे, भगवद्भक्त, सूत, पौराणिक, कथेकरी, वनौकस ऊर्ध्वरेते, यति व ब्रह्मचारी यांचा समुदाय निघाला. तसेच, दिव्य आख्यानांचा मधुर स्वरानें पाठ करणारे द्विजहि त्याच्याबरोबर होते. या सर्व मृदुभाषण करणाऱ्या अनेक विप्रसंघाच्या सोबतीनें चाललेला तो पांडुनंदन देवगणांनीं वेष्टिलेल्या इंद्राप्रमाणें शोभला.

हे भारता, मार्गामध्यें त्यानें अनेक चित्र-विचित्र वनें, रमणीय सरोवरें, नद्या, सागर, विविध देश व पवित्र तीर्थें पाहिलीं. गंगाद्वाराला पोंचल्यावर पार्थ त्या तीर्थाचा आश्रय करून तेथें राहिला.

(२) हे जनमेजया, तेथें त्या सदाचरणी पांडुपुत्रानें जें एक अद्भुत कर्म केलें तें ऐक. त्या स्थानीं अर्जुनासह रहात असतां ब्राह्मणांनीं अनेक अग्निहोत्रें सुरू केलीं. ते सर्व द्विज प्रथम गंगेंत स्नान करीत, नंतर त्या गंगातीरावर अग्नि प्रज्वलित करीत व त्या प्रज्वलित झालेल्या अग्नींत आहुत्या देत आणि पुष्पादिकांनीं पूजा करून त्याची उपासना करीत. याप्रमाणें धर्माचरणांत स्थित असलेल्या व व्रतधारण करणाऱ्या त्या महात्म्या विद्वानांच्या योगानें तें गंगाद्वार अतिशय शोभलें.

हे राजन्, तें गंगातीर असें गजबजून गेलें असतां एकदा धर्मात्मा कौंतेय स्नानासाठीं गंगेंत उतरला. तेथें स्नान करून त्यानें पितरांचें तर्पण केलें आणि पत्नीसांनिध्याच्या अभावींहि, उपासनाहोम इत्यादि अग्निकार्य करण्यासाठीं

तो तीरावर येण्याची जों इच्छा करीत आहे तोंच अकस्मात् एका नागकन्येनें त्याला जलांत ओढून नेलें.

ती उलूपी-नांवाची नागराजाची कन्या त्या महाबाहु अर्जुनाची पतीच्या इच्छेनें कामना करीत होती. नागलोकीं गेल्यावर शांतचित्त पार्थानें ' कौरव्य-' नामक नागाच्या सुंदर भवनांत प्रदीप्त अग्नि पाहिला व आपद्धर्म समजून निःशंकपणें त्यांतच अग्निकार्य केलें. त्यामुळें अग्नि त्याच्यावर संतुष्ट झाला.

याप्रमाणें आपलें अग्निकार्य उरकल्यावर त्या कुंतीपुत्रानें नागराजकन्येला हंसत म्हटलें—हे भामिनि, तूं हें साहस कशासाठीं केलेंस ? हे सुभगे, हा कोणाचा देश आणि तूं कोणाची कन्या ?

त्याचा हा प्रश्न ऐकून उलूपी म्हणाली—हे राजन्, ' कौरव्य '-नांवाचा एक ऐरावतकुलोत्पन्न नाग आहे. त्याची मी ' उलूपी '-नांवाची कन्या आहें. हे नरव्याघ्रा, मी तुला स्नानासाठीं नदीमध्यें उतरलेलं पाहून कामविह्वल झालें व येथें आणिलें. हे निष्पाप कुंतीपुत्रा, तुझ्यावर आसक्त होऊन काममोहित झालेल्या मला संतुष्ट कर. मी तुला अनन्य शरण आलें आहें; माझा स्वीकार कर.

अर्जुन म्हणाला—हे कल्याणि, धर्मराजानें मला बारा वर्षें ब्रह्मचर्य पालन करण्याची आज्ञा केली आहे. त्यामुळें मी स्वतंत्र नाहीं. हे नागकन्ये, तुझें प्रिय करण्याचीहि माझी इच्छा आहे, परंतु मी यापूर्वी केव्हांहि असत्य भाषण केलेलें नाहीं. यास्तव मला असत्याचा दोष न लागतां तुझेंहि प्रिय होईल व माझा धर्महि दूषित न होईल, असें तूं कर.

तेव्हां उलूपी स्वतःचें अतींद्रिय ज्ञान प्रकट करीत म्हणाली—हे पांडवेया, तूं पृथ्वीवर कां फिरत आहेस व तुला या ब्रह्मचर्याची आज्ञा ज्येष्ठ भ्रात्यानें कां केली आहे, तें सर्व मी जाणतें. द्रौपदीसह एक भ्राता एकान्तांत असतां तेथें जो कोणी दुसरा भ्राता मोहानें जाईल, त्यानें बारा वर्षें ब्रह्मचर्यव्रतानें वनांत रहावें, असा जो नियम तुम्हीं केलात तो केवल द्रौपदीसंबंधीच आहे. हा नियम तुम्ही आपल्या राजमंदिरांत असतांना आपल्या धर्माचें रक्षण करण्यासाठीं केला आहे. पण तो तुझा धर्म येथें दूषित होणार नाहीं. कारण आर्ताचें रक्षण अवश्य करावें, अशी धर्माज्ञा आहे. माझें रक्षण केल्यानें तुझा धर्म लुप्त होणार नाहीं. किंवा हे अर्जुना, यांत जरी धर्माचें सूक्ष्म प्रमाणानें अतिक्रमण झालें, तरी माझे प्राण वांचविण्यानें तुला पुण्यच लागेल.

हे पार्था, मज भक्तावर प्रसन्न हो व माझा स्वीकार कर. अनुरक्त कामिनीचा स्वीकार करणें सज्जनांना संमत आहे. हे प्रभो, माझी इच्छा जर तूं पूर्ण करणार नाहींस, तर मी मृतच झालें असें तूं समज. हे महाबाहो, मला प्राणदान देऊन उत्तम धर्माचें आचरण कर. हे पुरुषोत्तमा, मी तुला आज शरण आलें आहें. हे कौंतेया, तूं नित्य दीन व अनाथांचें रक्षण करितोस. मी दुःखानें विह्वल होऊन तुला शरण आलें आहें, तुझ्यापाशीं याचना करीत आहें, यास्तव माझें प्रिय कर व आत्मसमर्पणानें मला तृप्त कर.

राजा, त्या नागराजकन्येनें आर्त होऊन अशी प्रार्थना केली असतां कौंतेयानें तिला संतुष्ट केलें. तो प्रतापवान् पार्थ त्या रात्रीं नागभुवनांतच राहिला व प्रातःकालीं सूर्योदय होतांच त्या कौरव्यनागाच्या मंदिरांतून निघून तिच्यासह पुनः गंगाद्वारीं परत आला. पार्थाला मुनिसमुदायांत सोडून त्या साध्वी उलूपीनें 'तुला जलामध्यें सर्वत्र जय प्राप्त होईल व सर्व जलचर तुला अनुकूल होतील' असा वर दिला आणि ती श्रेष्ठ नागकन्या आपल्या मंदिरांत निघून गेली. १. १५. २१४.

अध्याय २१५ वा.

[१ अर्जुनाची पुढील तीर्थयात्रा. २ चित्रांगदेचें पाणिग्रहण.]

(१) वैशंपायन—हे भरतश्रेष्ठा, तो पराक्रमी शक्रात्मज पार्थ गंगेतून बाहेर आल्यावर घडलेला सर्व प्रकार ब्राह्मणांना निवेदन करून हिमालय पर्वताकडे निघून गेला. तेथून तो अगस्त्य-वटाला प्राप्त होऊन तेथून वसिष्ठ-पर्वतावर गेला व तुंगनाथ तीर्थावर जाऊन तेथें स्नानादिकांनीं तो शुचिर्भूत झाला. त्यानें ब्राह्मणांना हजारों गायी व अनेक गृहें दान दिलीं. नंतर त्यानें हिरण्यबिंदुतीर्थांत स्नान करून पवित्र देवालयें पाहिलीं व तो ब्राह्मणांसह पर्वतावरून खालीं उतरून पूर्वदिशेकडे जावयास निघाला.

हे भारता, जातां जातां त्यानें मार्गांतील अनेक तीर्थें क्रमानें पाहिलीं. नैमिषारण्य, उत्पलिनी नदी, नंदा, अपरनंदा, कौशिकी, यशस्विनी, महानदी, गया, गंगा इत्यादि सर्व नद्या, तीर्थें व आश्रम पहाणाऱ्या त्यानें स्वतःला पावन केलें. ब्राह्मणांना गायी दिल्या. अंग, वंग, कलिंग या प्रदेशांत जेवढीं तीर्थें व पवित्र स्थलें होतीं, तीं सर्व त्यानें यथाविधि पाहून तेथील ब्राह्मणांना धन दिलें.

कलिंग-राष्ट्राच्या सीमेवर पार्थाचे अनुयायी ब्राह्मण त्याला पुढें जाण्याची अनुज्ञा देऊन परत फिरले. तेव्हां तो कुंतीपुत्र धनंजय बरोबर थोडेसे शूर सहायक घेऊन समुद्राकडे निघाला.

कलिंग-देश सोडल्यावर रम्य मंदिरें, प्रेक्षणीय देश व विविध स्थलें पहात पहात तो वीर तापसांनीं शोभणाऱ्या महेंद्रपर्वतापाशीं आला. तो पर्वत पाहून कौंतेय समुद्राच्या तीरानें हळुहळू मणिपुरास गेला. तेथील सर्व तीर्थें व पुण्यप्रद स्थानें पहात तो मणिपुराधिपति धर्मज्ञ चित्रवाहन-राजापाशीं गेला. कारण त्या नृपतीला 'चित्रांगदा'-नांवाची एक सुंदर कन्या होती. ती यदृच्छेनें नगरांत फिरत असतां अर्जुनाच्या दृष्टीं पडली. त्या रूपवतीला पाहून पार्थाला तिच्या प्राप्तीची इच्छा झाली. त्यानें राजापाशीं जाऊन आपल्या येण्याचें प्रयोजन त्यास निवेदन केलें. तो म्हणाला—"हे राजन्, मज महात्म्या क्षत्रियाला ही कन्या दे."

तें ऐकून राजा म्हणाला—तूं कोणाचा पुत्र आहेस? तुझें नांव काय? तेव्हां 'मी पांडव कुंतीपुत्र धनंजय आहे' असें पार्थानें सांगितलें असतां चित्रवाहन-राजा मोठ्या आदरानें त्यास असें मधुर वचन बोलला—

(२) हे वीर पांडवा, आमच्या या कुलांत 'प्रभंजन'-नांवाचा एक राजा होऊन गेला. त्याला पुत्र नव्हता, म्हणून त्यानें पुत्रासाठीं उत्तम तप केलें. हे पार्था, त्याच्या उग्र तपानें संतुष्ट झालेल्या देवाधिदेव उमापतीनें त्याला त्याच्या कुलांत एकेकच अपत्य होईल असा वर दिला. त्यामुळें या कुलांतील पुरुषांना सर्वदा एकेकच अपत्य होतें. आजपर्यंत माझ्या सर्व पूर्वजांना पुत्रच होत आले. मला मात्र ही कन्या झाली आहे. तीच माझ्या कुलाची वृद्धि करणारी आहे. त्यामुळें हे पुरुषश्रेष्ठा, हा माझा पुत्रच आहे, अशी माझी भावना आहे. कारण ब्रह्मदेवानें 'पुत्राला कारण होणाऱ्या पुत्रिकेलाहि पुत्रच म्हणावें' असें विधान केलें आहे.

यास्तव हे वीरा, मी तुला ही आपली कन्या पुत्रिकाधर्मानें देतों. पण तुझ्यापासून हिच्या ठिकाणीं जो पुत्र होईल, तोच हिचें शुल्क असून तुझा पुत्र माझ्या कुलाची वृद्धि करणारा होईल. यास्तव हे पांडवा, तूं या नियमानें माझ्या कन्येचा स्वीकार कर. तेव्हां 'ठीक आहे' अशी सत्य प्रतिज्ञा करून व त्या राजकन्येचें पाणिग्रहण करून तो कुंतीपुत्र त्या नगरांत तीन् वर्षें राहिला.

तिच्या ठिकाणीं पुत्रोत्पत्ति झाली असतां त्या श्रेष्ठ भार्येला आलिंगन देऊन व राजाचा निरोप घेऊन तो तीर्थयात्रा करावयास तेथून निघाला. १.१५. २१५.

अध्याय २१६ वा.

[१ पांच शून्य तीर्थांचें दर्शन व सौभद्रतीर्थांतून वर्गा अप्सरेचा उद्धार.]

(१) वैशंपायन—राजा जनमेजया, त्यानंतर पराक्रमी पार्थ तपस्व्यांनीं शोभणाऱ्या दक्षिण समुद्राच्या तीरावरील अतिशय पुण्यपद तीर्थांस गेला. तेथील अगस्त्य तीर्थ, सौभद्र, परम पावन पौलोम, अश्वमेधाचें फळ देणारें प्रसन्न कारन्धम व महापापांचें क्षालन करणारें भारद्वाज तीर्थ, हीं पांच तीर्थें पूर्वीं तपस्व्यांनीं व्यापिलेलीं असून सांप्रत वर्ज्य केलीं होतीं, म्हणून तीं पांची तीर्थें त्या कुंतीपुत्रानें मुद्दाम पाहिलीं. जेथील दुर्मरणाचा दोष तीर्थांनेंहि नाश पावत नाहीं, असें जाणणाऱ्या मुनींनीं वर्ज्य केलेलीं तीं निर्जन तीर्थें पाहून त्या पांडवानें हात जोडून—'हे तापसहो, ब्रह्मवेत्त्यांनीं हीं तीर्थें कशासाठीं वर्ज्य केलीं आहेत?' असें तपस्व्यांना विचारलें.

तापस म्हणाले—कुरुनंदना, या तीर्थांमध्यें पांच सुसरी रहातात आणि त्या तपस्व्यांना ओढून नेतात. त्यामुळें त्यांनीं हीं तीर्थें वर्ज्य केलीं आहेत.

हे राजन्, त्यांचें हें वचन ऐकून तो कुरुनंदन, तापसांनीं त्याचें निवारण केलें असतांहि, तीं तीर्थें पहावयास गेला. प्रथम तो महर्षींच्या सौभद्र-नामक उत्तम तीर्थावर गेला. तेथील मोठ्या ऱ्हदांत त्या शूरानें निःशंकपणें स्नान केलें. पण तो बाहेर येत असतां एका महा सुसरीनें त्या पराक्रमी धनंजयाचा पाय धरला; तेव्हां त्या बलवानांतील श्रेष्ठ कौंतेयानें आपल्या बाहुबलानें त्या धडपड करणाऱ्या सुसरीला उचलून पाण्याच्या बाहेर आणिलें व तिला त्या यशस्वी अर्जुनानें भूमीवर ठेविलें, तोंच ती आपलें सुसरीचें रूप टाकून सर्व अलंकारांनीं युक्त अशी सुंदर स्त्री झाली. हे राजन्, ती स्त्री आपल्या कांतीनें शोभणारी, दिव्यरूप धारण करणारी व मनोरम होती. तें महदाश्चर्य पाहून संतुष्ट झालेला कुंतीपुत्र धनंजय त्या स्त्रीला म्हणाला—"हे कल्याणि, तूं कोण आहेस? तूं जलचरी कशी झालीस? तूं पूर्वीं कोणतें महत्पाप आचरिलें होतेंस?"

अर्जुनाचा हा प्रश्न ऐकून ती देवस्त्री म्हणाली—हे महाबाहो, देवांच्या वनांत विहार करणारी मी 'वर्गा'-नामक अप्सरा आहें. कुबेराला मी नित्य

प्रिय होतें. हे महाबल, माझ्या आणखी चौघी सख्या आहेत. त्याहि सर्व इच्छेस येईल तेथें गमन करण्यास समर्थ व सुलक्षणी आहेत. एकदा मीं त्यांच्यासह कुबेरच्या निवासस्थानाकडे जात असतां मार्गांत एक तीव्र व्रत-धारण करणारा ब्राह्मण पाहिला. तो रूपवान्, अध्ययन करणारा व एकान्तवासी होता.

हे राजा, त्या ब्राह्मणाच्या तपस्तेजानें तें वन व्याप्त झालें होतें. आदित्य जसा सर्व लोकांना प्रकाशित करितो त्याप्रमाणें त्याच्या तेजानें तो सर्व प्रदेश प्रकाशित झाला होता. त्याचें तें उग्र तप पाहून त्याच्या तपांत विघ्न करण्याच्या इच्छेनें आम्हीं त्या वनांत प्रवेश केला आणि हे भारता, सौरभेयी, समीची, बुद्बुदा, लता व मी अशा आम्ही पांचीजणी एकाच वेळीं त्याच्यापाशीं गेलों व गायन, हास्य, विनोद इत्यादिकांच्या योगानें त्या ब्राह्मणाला मोहित करण्याचा प्रयत्न केला. परंतु हे वीरा, त्यानें आमच्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं किंवा तो महातेजस्वी विप्र आपल्या निर्मल तपापासून च्युत झाला नाहीं. हे क्षत्रिया, उलट त्या क्रुद्ध झालेल्या ब्राह्मणानें आम्हांला 'तुम्हीं सुसरी होऊन शंभर वर्षें जलांत रहाल' असा शाप दिला. १. १५. २१६.

अध्याय २१७ वा.

[१ अर्जुनानें केलेला इतर चार अप्सरांचा उद्धार व गोकर्णक्षेत्रीं गमन.]

(१) **वैशंपायन**—हे नृपश्रेष्ठा, ती वर्गा आपला पुढील वृत्तान्त सांगण्या-साठीं त्या महाधनुर्धराला पुनः म्हणाली—"हे वीरा, तें शापवचन ऐकून आम्ही सर्वजणी दुःखानें व्यथित झालों व आपल्या व्रतापासून न ढळणाऱ्या त्या तपोधन ब्राह्मणाला शरण जाऊन म्हणालों—

हे पूज्य ब्राह्मणा, आम्हीं रूपानें, तारुण्यानें व काममदानें मत्त होऊन असें अनुचित कर्म केलें खरें, पण आतां तूं आम्हांला क्षमा कर. हे तपोधना, आम्ही तुझ्यासारख्या जितेंद्रिय महात्म्याला मोहित करावयास आलों असतां आम-चाच पूर्ण पराभव झाला, ही दुष्कीर्ति आम्हांला अगदीं पुरेशी आहे. खरोखर, हें आमचें मरणच आहे. स्त्रिया अवध्य आहेत, असें धर्मवेत्ते समजतात. यास्तव धर्मानें तुझा उत्कर्ष होवो. आमची हिंसा करणें तुला योग्य नाहीं. हे धर्मज्ञा,

ब्राह्मण सर्व प्राण्यांचा मित्र[1] आहे, असें म्हणतात. विद्वानांचें तें वचन सत्य होवो. हे दयाळो विप्रा, सज्जन शरण आलेल्यांचें रक्षण करितात, आम्ही तुला शरण आलों आहोंत; तस्मात् हे कल्याणा, आम्हांला क्षमा कर."

राजन्, त्या स्त्रियांचें हें दीन भाषण ऐकून तो शुभ कर्मै करणारा धर्मात्मा ब्राह्मण त्यांच्यावर प्रसन्न झाला व सूर्य-चंद्रांप्रमाणें तेजस्वी असलेला तो तपोनिष्ठ त्यांना म्हणाला—"हे अप्सरांनो, शत, शतसंवत्सर इत्यादि शब्द अक्षय्य असा अर्थ व्यक्त करितात; पण मीं उच्चारिलेला हा शतशब्द अक्षय्य हा अर्थ व्यक्त न करतां केवल शंभर वर्षांचाच वाचक होईल. तुम्ही सुसरी होऊन पुरुषांना जलांत ओढीत असतां जेव्हां एखादा नरश्रेष्ठ तुम्हांला जलांतून वर काढील, तेव्हां तुम्ही सर्वजणी आपल्या पूर्वरूपाला प्राप्त व्हाल. मी केव्हांहि थट्टेनें सुद्धां असत्य भाषण केलेलें नाहीं. यास्तव माझें वचन कदापि मिथ्या होणार नाहीं. तुमचा उद्धार झाल्यावर त्या सर्व नद्या सर्वत्र '**नारीतीर्थें**'-या नांवानें प्रसिद्ध होऊन विद्वानांना पावन करणारीं पवित्र तीर्थें होतील."

वर्गा—हे वीरा, ब्राह्मणानें प्रसन्न होऊन असा वर दिला असतां आम्ही त्याला वंदन व प्रदक्षिणा करून तेथून निघालों आणि अंतःकरणांत अतिशय खिन्न होऊन 'आपण आतां कोठें बरें जावें कीं जेथें आम्हांला त्या जलचरयोनींतून सोडवून आमचें मूळ स्वरूप प्राप्त करून देणारा तो पुरुष लवकर भेटेल!' असा विचार करूं लागलों. आम्ही कांहीं वेळ असा विचार करीत आहों, तोंच महाभाग देवर्षि नारद आम्हांला दिसला.

त्या महा तेजस्वी नारदाला पाहून आम्हांला संतोप झाला. हे पार्था, आम्ही त्याला अभिवंदन करून लज्जेनें अधोमुख झालों. तेव्हां त्या देवर्षीनें आमच्या दुःखाचें कारण विचारिलें व आम्हींहि तें त्याला सांगितलें.

त्यावर तो महात्मा म्हणाला—हे अप्सरांनों, दक्षिण समुद्राच्या तीरावरील जलप्रचुर प्रदेशीं रमणीय व पवित्र पांच तीर्थें आहेत. तेथें तुम्ही सत्वर जा. त्या प्रदेशीं पुरुपश्रेष्ठ धनंजय लवकरच जाणार आहे. तो शुद्धात्मा तुम्हांला निःसंशय या दुःखांतून मुक्त करील.

नारदाचें हें वचन ऐकून आम्हीं पांची जणी या तीर्थांत येऊन राहिलों. हे निष्पापा, आज तूं मला मुक्त करून तें देवर्षीचें वचन सत्य केलेंस. हे वीरा,

---

१ मैत्रो ब्राह्मण उच्यते ।

माझ्या त्या चार सख्या अद्यापि जलांतच आहेत, यास्तव त्यांनाहि मुक्त करण्याचें शुभकर्म तूं कर.

हे भूपाला, त्यानंतर त्या श्रेष्ठ पांडवानें त्या सर्वांना जलांतून वर काढून शापमुक्त केलें. त्या सुसरी जलाबाहेर येतांच आपल्या पूर्व स्वरूपाला प्राप्त होऊन अप्सरा झाल्या.

हे राजन्, तो वीर्यवान् पांडुपुत्र याप्रमाणें त्या सर्व तीर्थांना पावन करून व अप्सरांना स्वधामाला जाण्याची अनुज्ञा देऊन चित्रांगदेला भेटण्यासाठीं पुनः मणिपुरास गेला आणि तिला झालेल्या आपल्या बभ्रुवाहन पुत्राला पाहून पार्थ चित्रवाहन-राजाला म्हणाला—" हे नराधिपा, हा माझा पुत्र बभ्रुवाहन चित्रांगदेचें शुल्क म्हणून मी तुला देत आहें. त्याचा स्वीकार कर. याच्या योगानें मी तुझ्या ऋणांतून मुक्त होईन. "

चित्रवाहन-राजाला असें सांगून तो पांडुनंदन चित्रांगदेला म्हणाला—हे विमले, तुझें कल्याण असो. तूं येथेंच राहून बभ्रुवाहनाला वाढीव. लवकरच तूं माझ्या इंद्रप्रस्थ-नगरीस येशील व माझी माता कुंती, युधिष्ठिर व भीमसेन हे ज्येष्ठ भ्राते, तसेच माझे दुसरे कनिष्ठ भ्राते व इतर बांधव यांना पहाशील आणि तेथें माझ्या सर्व आप्तांमध्यें आनंदानें रहाशील.

हे भद्रे, माझा धर्मनिष्ठ व सत्यप्रतिज्ञ भ्राता युधिष्ठिर सर्व पृथ्वी जिंकून राजसूय यज्ञ करील. त्यावेळीं 'नृप' ही संज्ञा असलेले पृथ्वींतील सर्व क्षत्रिय विपुल रत्नें घेऊन तेथें येतील. त्यांत तुझा पिता चित्रवाहनहि येईल. त्यावेळीं त्याची सेवा करण्याच्या निमित्तानें तूं त्याच्याबरोबर ये. हे कमलाक्षि, त्या राजसूययज्ञाच्या वेळीं मी तुला भेटेन. तूं खिन्न होऊं नको. पुत्राचें पालन करीत येथें प्रसन्न चित्तानें रहा. हा बभ्रुवाहन माझा केवल पृथ्वीवर संचार करणारा प्राणच आहे. यास्तव तूं या वंशवर्धन पुत्राचें पोषण कर. चित्रवाहनाचा हा पौरवनंदन धर्मतः दायाद पुत्र असून तो पांडवांचा प्रिय पुत्र आहे. त्याचें प्रेमानें पालन कर. हे निर्मले, माझ्या विरहानें खिन्न होऊं नको.

राजा जनमेजया, याप्रमाणें चित्रांगदेचें सांत्वन करून तो धनुर्धर पार्थ गोकर्णक्षेत्राकडे जावयास निघाला. तें पशुपतीचें आद्यस्थान केवल दर्शनानेंच मुक्ति देणारें आहे. तेथें पातकी मनुष्यहि अभयपदाला प्राप्त होतो. १. १५. २१७.

अध्याय २१८ वा.

[१. अर्जुनाचें प्रभासक्षेत्रीं गमन व तेथें कृष्णदर्शन. २ रैवतक पर्वतावरील विहार व द्वारकागमन.]

(१) वैशंपायन—हे पारिक्षिता, तो अतुल पराक्रमी कुंतीपुत्र गोकर्ण-तीर्थाला जाऊन तेथून पश्चिम समुद्राच्या तीरावर जेवढीं पवित्र तीर्थें व स्थानें होतीं तेवढीं सर्व क्रमानें पहात पहात प्रभास क्षेत्रीं आला. तीर्थयात्रा करणारा तो पार्थ पवित्र, रमणीय व अजिंक्य अशा प्रभास देशास आला आहे, असें ऐकून भगवान् मधुसूदन आपल्या मित्राला भेटावयास तेथें आला. त्या कृष्ण-पांडवांनीं प्रभासक्षेत्रीं एकमेकांस भेटून दृढ आलिंगन दिलें व कृष्णानें अर्जुनाला त्याच्या वनवासांतील कुशल विचारिल्यावर ते दोघे प्रिय मित्र नर-नारायण ऋषि तेथेंच राहिले.

एकदा बोलतां बोलतां वासुदेव अर्जुनास म्हणाला—"हे पार्था, तूं हें तीर्थाटन व वनवास कशासाठीं करीत आहेस?" हा प्रश्न ऐकून अर्जुनानें घडलेला सर्व वृत्तान्त त्यास निवेदन केला. तो ऐकून भगवान् वार्ष्णेयानें आपला संतोष प्रदर्शित केला व 'तुम्हीं केलेला हा नियम फारच चांगला आहे' असें म्हटलें. त्यानंतर ते दोघे कृष्ण-पांडव प्रभासक्षेत्रीं यथेच्छ विहार करून रैवतकपर्वतावर रहावयास गेले. कृष्णाच्या आज्ञेवरून त्याच्या भृत्यांनीं तो पर्वत अगोदरच भूषित करून ठेविला होता.

(२) हे दोघे वीर तेथें पोंचतांच कृष्णाच्या भृत्यांनीं षड्रस भोजन तयार केलें. वासुदेवासह अर्जुनानें त्या सर्वांचा स्वीकार करून व तृप्त होऊन नट व नर्तक यांचें नाट्य अवलोकन केलें. कांहीं वेळानें त्या सर्वांचा सत्कार करून त्यांस जाण्याची अनुज्ञा दिली व अर्जुनानें उत्कृष्ट शय्येवर शयन करून पडल्या पडल्या श्रीकृष्णाला आपण वनवासांत पाहिलेलीं तीर्थें, सरोवरें, नद्या, पर्वत, वनें इत्यादिकांचें निवेदन केलें. त्या सुखावह शयनावर पडलेल्या अर्जुनाला बोलतां बोलतां झोंप लागली.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं मधुर गीत, वीणाध्वनि, स्तुति व मंगल या उपायांनीं जागा केला जाणारा तो महात्मा उठला व आपलीं सर्व अवश्य असलेलीं आह्निक कार्यें करून कृष्णासह सुवर्णमय ध्वजादिकांनीं युक्त असलेल्या रथांत बसून द्वारकेस जावयास निघाला.

हे जनमेजया, कुंतीपुत्राच्या सत्कारासाठीं द्वारकानगरी अलंकृत केली होती. त्याच्या शुभ आगमनासाठीं केवल राजमार्गच नव्हेत, तर सर्व गृहें व क्रीडास्थानेंहि भूषित केलीं होतीं. त्या कुंतीपुत्राला पहाण्याची इच्छा करणारे द्वारकावासी हजारों लोक त्वरेनें राजमार्गावर येऊन उभे राहिले. हजारों स्त्रियाहि त्याला पहाण्यासाठीं आपापल्या मंदिराच्या खिडक्यांत उभ्या राहिल्या. वृष्णि, भोज व अंधक यांचा फार मोठा समूह जमला.

याप्रमाणें त्या सर्व वीरांकडून सत्कार केला गेलेला अर्जुन राजमंदिरांत गेल्यावर पूज्य गुरूंना वंदन करून स्वतःला कृतकृत्य मानूं लागला. सर्व कुमारांनींहि मोठ्या सत्कारानें त्या वीराचें स्वागत केलें. आपल्या समवयस्क मित्रांना त्यानें पुनः पुनः आलिंगन दिलें व तो महावीर कृष्णाच्या रत्नजडित रम्य मंदिरांत वासुदेवासह कांहीं काल आहार-विहार करीत राहिला. १. १५. २१८.

येथें पंधरावें अर्जुनवनवासपर्व समाप्त झालें.

सुभद्राहरणपर्व १६.

अध्याय २१९ वा.

[१ रैवतक-पर्वतावरील उत्सव. २ सुभद्राहरणाचा संकेत.]

(१) **वैशंपायन**—हे नृपश्रेष्ठा, त्यानंतर लवकरच वृष्णि व अंधक यांचा रैवतक-पर्वतोत्सव सुरू झाला. तेथें वृष्णि, अंधक व भोजवीर त्या पर्वतदेवतेच्या उत्सवाप्रीत्यर्थ ब्राह्मणांना हजारों प्रकारचीं दानें देत असत.

हे राजेंद्रा, त्या पर्वताच्या सभोंवार रत्नखचित भव्य प्रासाद होते आणि तो कल्पवृक्षांनीं सर्व बाजूंनीं सुशोभित झाला होता. तेथें कांहीं वादक नानाप्रकारचीं वाद्यें वाजवीत होते, नट नृत्य करीत होते व गायक गात होते. वृष्णिकुलांतील अतिशय बलाढ्य कुमार अलंकार धारण करून व सुवर्णानें चित्रविचित्र केलेल्या रथांत बसून सर्वत्र चमकत होते.

त्याचप्रमाणें हजारों पौरजन आपल्या स्त्रिया व अनुचर यांसह पायांनीं व लहान-मोठ्या वाहनांतून फिरत होते. हे भारता, ज्याच्या मागून गंधर्व चालले आहेत असा प्रमत्त बलराम तेथें रेवतीसह फिरत होता. त्याचप्रमाणें गाणाऱ्या

गंधर्वांनीं युक्त असलेला वृष्णींचा प्रतापी राजा उग्रसेन सहस्र स्त्रियांसह चालला होता. युद्धांत हार न जाणारे रुक्मिणीपुत्र प्रद्युम्न व सांब मधुमत्त झाले होते. दिव्य माला व वस्त्रें धारण करणारे ते दोघे देवांप्रमाणें विहार करीत होते.

तसेच अक्रूर, सारण, गद, बभ्रु, विदूरथ, निशठ, चारुदेष्ण, पृथु, विपृथु, सत्यक, सात्यकि, भंगकार, महारव, हार्दिक्य, उद्धव व आणखीहि अनेक वीर गंधर्व व स्त्रिया यांच्या समुदायांसह पृथक् पृथक् फिरत होते. या उत्सवानें त्या रैवतकपर्वताला अतिशय शोभा आली होती. त्या पर्वतावर असा अद्भुत उत्सव चालला असतां तो पहाण्याच्या कौतुकानें श्रीकृष्ण व पार्थ हे दोघे बरोबरच तेथें आले.

त्या वेळीं त्या उत्सवांत अलंकार धारण करून आपल्या सख्यांसह फिरणारी सुलक्षणी सुभद्रा पार्थाच्या दृष्टीं पडली. तिला पाहतांच तो कामवश झाला व एकाग्रतेनें तिजकडे पाहूं लागला.

त्याच्या मनाची ही चलबिचल पाहून नरश्रेष्ठ कृष्ण हंसत हंसत म्हणाला— "पार्था काय हें ! अरे, वनांत राहून तीर्थयात्रा करणाराचें मन असें कामासक्त का होत असतें ! ही सारणाची अनुजा व माझी भगिनी सुभद्रा आहे. ही माझ्या पित्याची प्रिय कन्या आहे. तुझें कल्याण असो. तुझें मन जर खरोखरच हिच्यावर बसलें असेल तर मी स्वतः पित्याला सांगून ती तुला देववीन."

(२) त्यावर अर्जुन म्हणाला—हे कृष्णा, ही वसुदेवाची कन्या व वासुदेवाची भगिनी आहे. तेव्हां ही रूपसंपन्न सुंदरी कोणाला मोहित करणार नाहीं ? हे माधवा, ही वार्ष्णेयी जर माझी अभिषिक्त राणी होईल तर तूं माझें सर्वप्रकारें कल्याण केलेंस, असेंच मी समजेन. हे जनार्दना, ही मला कोणत्या उपायानें प्राप्त होईल तें सांग. म्हणजे मनुष्याला जें कांहीं शक्य आहे तें सर्व मी हिच्या प्राप्तीसाठीं करीन.

धनुर्धर पार्थाचें हें भाषण ऐकून वासुदेव म्हणाला—हे पुरुषश्रेष्ठा, क्षत्रियांना स्वयंवर-विवाह विहित आहे. परंतु स्त्रियांचें चित्त स्वभावतःच चंचल असतें. स्त्रिया पुरुषाची खरी योग्यता न पहातां त्याच्या बाह्य स्वरूपावर तत्काल भाळतात. त्यामुळें स्वयंवरांतील निवड संशयितच असते. बलात्कारानें वधूचें हरण करणें क्षत्रियांना विहित आहे. शूरांचा विवाह अशाच प्रकारें व्हावा, असें धर्मवेत्ते म्हणतात. यास्तव हे वीरा, या माझ्या भगिनीचें तूं बलात्कारानें हरण कर. कारण स्वयंवरांत ती कोणाला वरील याचा काय नेम सांगावा ?

राजा पारिक्षिता, असें बोलून श्रीकृष्ण व अर्जुन यांनीं पुढील सर्व योजना निश्चित केली आणि धर्मराजाची संमति घेण्यासाठीं शीघ्रगामी दूत इंद्रप्रस्थास रवाना केले. तेव्हां युधिष्ठिरानें तें सर्व ऐकून पार्थाला सुभद्राहरणाची अनुज्ञा दिली. १. १६. २१९.

अध्याय २२० वा.

[१. सुभद्राहरण.]

(१) **वैशंपायन**—हे भरतश्रेष्ठा, त्यानंतर युधिष्ठिरानें सुभद्राहरणाला अनुज्ञा दिली असतां वसुदेवकन्या रैवतक-पर्वतास गेली आहे, असें जाणून धनंजयानें वासुदेवाची संमति घेतली व त्याच्या मतानेंच पुढील कर्तव्याची योजना करून तो सुवर्णध्वजानें युक्त असलेल्या दिव्य रथांत बसून निघाला.

त्या रथाला घुंगुरमालांनीं भूषविलें होतें. त्याला शैब्य व सुग्रीव नांवाचे श्रेष्ठ अश्व जोडले असून तो सर्व शस्त्रांनीं युक्त होता. तो चालत असतां मेघगर्जनेसारखा प्रचंड आवाज होत असून त्याचा प्रकाश प्रज्वलित अग्नीसारखा सभोंवार पसरत होता व तो रथ शत्रूंचा हर्ष नाहींसा करीत होता. अशा सज्ज केलेल्या रथांतून तो महावीर कवच, खड्ग, अंगुलित्राण इत्यादि धारण करून मृगयेच्या निमित्तानें द्वारकेंतून बाहेर पडला.

राजा, इतक्यांत सुभद्रा त्या श्रेष्ठ रैवतक-पर्वताचें व देवतांचें पूजन करून, सर्व ब्राह्मणांनीं स्वस्तिवाचन केलें असतां, पर्वताला प्रदक्षिणा घालून द्वारकेला परत यावयास निघाली. तेव्हां कौंतेयानें बलात्कारानें तिला ओढून आपल्या रथांत घेतलें व तो कामबाणांनीं विद्ध झालेला पार्थ त्या हास्यमुखी सुंदरीला घेऊन व आपल्या सुवर्णध्वजालंकृत रथांत बसून स्वनगरीला त्वरेनें जावयास निघाला.

याप्रमाणें सुभद्रा हरण केली जात आहे, असें पहातांच सव सैनिक मोठा आक्रोश करीत द्वारकेकडे धांवले. त्यांनीं 'सुधर्मा'-नामक सभेंत जाऊन तेथील सभापतीला पार्थाचा सर्व पराक्रम निवेदन केला. त्यांच्या तोंडून हा वृत्तांत ऐकतांच सभापतीनें 'सर्वांनीं एकत्र जमावें.' असें सुचविणारा सुवर्णालंकृत नगारा वाजवून मोठा घोष केला.

तो शब्द ऐकून भोज, वृष्णि व अंधक अत्यंत क्षुब्ध झाले व पुढील अन्नपानहि सोडून ते सर्व चोहोंकडून तेथें जमले. त्या सभास्थानांत उंची वस्त्रांनीं

आच्छादिलेलीं सुवर्णाचीं भव्य सिंहासनें होतीं. त्यांस जडविलेल्या विविध रत्नांची प्रज्वलित अग्नीसारखी प्रभा पसरली होती. त्या सिंहासनांवर बसलेले महारथ नरश्रेष्ठ वृष्णि व अंधक वेदींतील अग्नीप्रमाणें शोभत होते. सभापालानें आपल्या अनुचरांसह देवांच्या समुदायाप्रमाणें शोभणाऱ्या त्या सिंहासनस्थ वृष्णींच्या समूहांत प्रवेश करून जिष्णूचें साहस त्यांस निवेदन केलें.

तें ऐकतांच सर्व स्वाभिमानी वृष्णिवीर संतापानें नेत्र आरक्त करून पार्थाचें तें कृत्य सहन न झाल्यामुळें आपआपल्या स्थानावरून एकदम उठले. त्यांतील कित्येक 'सत्वर रथ सज्ज करा, प्रास आणा, मोठालीं धनुष्यें व चिलखतें घेऊन या' असें ओरडूं लागले. कोणी सारथ्यांना 'रथ जोडा' असें ओरडून सांगूं लागले, तर कित्येकांनीं स्वतःच सुवर्णभूषणांनीं अलंकृत केलेले अश्व रथाला जोडिले.

याप्रमाणें रथ, कवचें व ध्वजादि आणण्याची त्या वीरांची गडबड उडाली. पण त्या वेळीं वनमाला व नील वस्त्र धारण केलेला कैलासशिखरासारखा प्रमत्त बलराम त्यांना म्हणाला—"हे मूढांनो, वासुदेव स्वस्थ बसला असतांना तुम्ही

---

१. या सुभद्राहरणाविषयीं लोकांमध्यें वीर अर्जुनाला कमीपणा आणणाऱ्या अनेक असंबद्ध गोष्टी प्रचलित आहेत. पण त्यांना **मूळ महाभारतांत** आधार नाहीं, हें वाचकांच्या लक्षांत येईलच. महाराष्ट्रांतील लोकांच्या अशा समजूती होण्यास 'सौभद्रनाटक' हें मुख्य कारण आहे. परंतु 'कुंभकोणम्' येथें छापलेल्या महाभारताच्या प्रतींत अर्जुनाचा संन्यासग्रहणाचा जो प्रक्षिप्त वृत्तांत आहे, तो कदाचित् 'सौभद्र'-कर्त्यांच्या अवलोकनांत आला असावा व त्यावरून त्यांनीं आपल्या नाटकाची कल्पना बसविली असावी. पण अर्जुनाच्या एकंदर चरित्राकडे लक्ष दिलें असतां त्यानें सुभद्रेसाठीं '**कपटसंन्यास**' घेतला असेल अशी कल्पनाहि करवत नाहीं. महात्मा अर्जुन लोकैक वीर, अधर्मभीरु, सत्यनिष्ठ व मोठा कुलाभिमानी होता. त्यानें अशा कुटिल मार्गानें सुभद्रेचें हरण केलें असावें, हें संभवत नाहीं. अर्थात् येथें जें सुभद्राहरणाचें वर्णन केलें आहे, तेंच अर्जुनाच्या प्रभावाला उचित आहे, असें आम्हांला वाटतें. पुढील १२१ व्या अध्यायाच्या आरंभीं भगवान् श्रीकृष्णांनीं अर्जुनाच्या वर्तनाचें जें समर्थन केलें आहे, त्यावरून वाचकांनाहि हें आमचें म्हणणें पटेल.

हें काय करितां ! त्याचा आशय समजून घेतल्यावांचून व्यर्थ क्रुद्ध होऊन गर्जना करण्यांत काय अर्थ आहे ! या बुद्धिमान् कृष्णाला अगोदर त्याचा अभिप्राय सांगूं द्या आणि त्याला जें योग्य दिसेल तेंच दक्षतेनें करा."

बलरामाचें हें ग्राह्य व युक्त वचन ऐकून ते सर्व वीर 'ठीक ठीक, फार चांगलें' असें बोलून सभेमध्यें पुनः स्वस्थानीं येऊन बसले. तेव्हां परंतप बलराम वासुदेवाला म्हणाला—"हे जनार्दना, तूं असा नुस्ता तोंडें पहात स्वस्थ काय बसला आहेस ! हे अच्युता, आम्हीं त्या पार्थाचा एवढा सत्कार केवळ तुझ्या-साठीं केला. परंतु तो कुलाला कलंक लावणारा दुर्बुद्धि सन्मानास मुळींच पात्र नाहीं. स्वतःला कुलीन समजणारा असा कोणता पुरुष ज्या पात्रांत अन्न सेवन केलें तेंच पात्र फोडून टाकील ! पूर्वीच्या संबंधाला मान देऊन पुढील संबं-धाची इच्छा करणारा कोणता जीवितार्थी मनुष्य असें साहस करील ! हे कृष्णा, आम्हां सर्वांचा अवमान करून व तुझाहि अनादर करून त्यानें हें सुभद्रेचें हरण केलें नसून स्वतःचा मृत्यूच ओढवून घेतला आहे. हे गोविंदा, सर्पाला जसें पायाच्या स्पर्शानें डंवचावें, तसा त्यानें आज माझ्या मस्तकावर पाय दिला आहे, तो मीं कसा बरें सहन करावा ! मी आतां सर्व पृथ्वी कौरवरहित करीन, पण अर्जुनाचा हा अतिक्रम केव्हांहि सहन करणार नाहीं."

जनमेजया, याप्रमाणें मेघ किंवा दुंदुभि यांच्या आवाजासारखी गर्जना करून बलराम बोलत असतां वृष्णि, अंधक व भोज यांनीं त्यास आपली संमति दर्शविली. १. १६. २२०.

येथें सोळावें सुभद्राहरणपर्व समाप्त झालें.

हरणहारिकापर्व १७.

अध्याय २२१ वा.

[१ श्रीकृष्णाचें हितावह भाषण. २ सुभद्रेशीं अर्जुनाचा विवाह व खांडवप्रस्थास गमन. ३. यादवांनीं पांडवांस केलेला अहेर. ४ पांडवपुत्रांची उत्पत्ति.]

(१) **वैशंपायन**—हे राजेंद्रा, याप्रमाणें सर्व वृष्णिवीरांनीं आपआपल्या सामर्थ्यानुसार भाषण केल्यावर वासुदेव धम आणि अर्थ यांनीं युक्त असें वचन

बोलला—"हे यादवांनो, धनंजयानें आपल्या कुलाचा मुळींच अपमान केला नसून उलट त्यानें अधिक सन्मानच केला आहे, यांत संशय नाहीं.

पार्थ तुम्हां सात्वतांना केव्हांहि धनलुब्ध मानीत नाहीं. त्यामुळें त्याला आसुरविवाह शक्य नव्हता. स्वयंवरांत वधू आपल्यालाच वरील असा नियम नसल्यामुळें त्याला स्वयंवरहि ग्राह्य वाटला नाहीं. पशूप्रमाणें कन्येचा प्रतिग्रह करणें, हें नीच कर्म त्या वीराला कसें रुचावें ! या भूलोकीं आपल्या अपत्याचा विक्रय तरी कोण करील ? तस्मात् क्षत्रियांना विहित असलेल्या आसुरादि विवाहप्रकारांत त्या वीरानें हे दोष पाहिले असावेत, असें मला वाटतें. त्यामुळेंच त्या पांडुपुत्रानें कन्येचें बलात्कारानें हरण केलें आहे.

शिवाय सुभद्रा व पार्थ हीं परस्परांस सर्वथा अनुरूप असल्यामुळें हा संबंधहि योग्यच आहे. या सर्व गोष्टींचा विचार करूनच पार्थानें सुभद्रेला बलात्कारानें हरण केलें. यशस्वी भरत व शांतनु यांच्या कुलांमध्यें उत्पन्न झालेला व कुंतीभोजकन्येचा पुत्र अर्जुन आपल्याला पति मिळावा अशी कोणती वरेप्सु कन्या इच्छा करणार नाहीं ? विरूपाक्ष शंकरावांचून समरांगणांत पार्थाला जिंकील असा एकहि वीर मला दिसत नाहीं.

हे श्रेष्ठ हो, इंद्र व रुद्र इत्यादिकांच्या लोकींहि अर्जुनाचा पराभव करणारा पुरुष संभवत नाहीं. तो दिव्य रथ, ते माझे वेगवान् अश्व व शीघ्र अस्त्रप्रयोग करणारा योद्धा पार्थ, यांचा एकत्र संयोग जमल्यावर अर्जुनाची बरोबरी कोण करणार ! यास्तव तुम्ही सत्वर शांतवृत्तीनें त्याच्या मागोमाग जाऊन संतोषानें त्याला परत आणा. हाच माझा दृढ निश्चय आहे. तुम्ही विरोधबुद्धीनें त्याचा पाठलाग केलात व तो तुम्हांला स्वसामर्थ्यानें जिंकून आपल्या खांडवप्रस्थाला परत गेला, तर तुमचें यश तत्काल नाहींसें होईल. यापेक्षां योग्य संबंधाचें महत्त्व ओळखून तुम्ही त्याला परत बोलवा. त्यांत पराजयाची मुळींच भीति नाहीं."

(२) हे राजा, वासुदेवाचें हें वचन ऐकून यादवांनीं तसेंच वर्तन केलें. त्यांच्या विनंतीस मान देऊन अर्जुन परत आला; त्या प्रभूनें सुभद्रेशीं यथाविधि विवाह केला व वनवासाच्या बारा वर्षांतील जो एक वर्षाहून कांहीं अधिक काल अवशिष्ट राहिला होता, त्यांतील बहुतेक काल तेथेंच घालविला. द्वारकेंत असेपर्यंत त्यानें यथेष्ट विहार केला व वृष्णिपुत्रांनींहि त्याचा मोठा

सत्कार केला. त्यानंतर जो थोडासा काल अवशिष्ट राहिला होता, तो सुभद्रेसह पुष्करतीर्थावर घालवून बारा वर्षें पूर्ण झालीं असतां अर्जुन खांडवप्रस्थास आला. प्रतिज्ञेप्रमाणें बारा वर्षांचा नियम पाळल्यामुळें शांत चित्त झालेला अर्जुन युधिष्ठिर राजाजवळ जाऊन, त्याचा सत्कार करून व ब्राह्मणांची पूजा करून द्रौपदीकडे गेला. तेव्हां ती प्रीतीनें कुरुनंदनाला म्हणाली—"हे कौंतेया, जेथें ती यदुकन्या आहे, तेथेंच जा. येथें कशाला येतोस? गवताचा भारा कितीहि घट्ट बांधला तरी त्याला दुसरा बंध बांधला कीं, पूर्वबंध शिथिल होतोच!"

अशा प्रकारें बोलणाऱ्या कृष्णेचें सांत्वन करून अर्जुनानें तिची वारंवार क्षमा मागितली व मोठ्या त्वरेनें स्वगृहीं परत येऊन तांबडें रेशमी वस्त्र परिधान केलेल्या सुभद्रेला गवळणीचा वेष देऊन द्रौपदीकडे पाठविलें. त्या वेषानें अधिकच शोभणारी यशस्विनी सुभद्रा श्रेष्ठ राजगृहास प्राप्त झाली. त्या आरक्तलोचन कृष्णभगिनीनें पृथेला वंदन केलें. तेव्हां त्या कुंतीनेंहि त्या सुंदरीच्या मस्तकाचें अवघ्राण करून मोठ्या प्रीतीनें तिला आशीर्वाद दिले. त्यानंतर ती चंद्रमुखी सुभद्रा सत्वर द्रौपदीपाशीं गेली व 'मी तुझी दासी आहें' असें म्हणून तिनें तिला वंदन केलें. तेव्हां द्रुपदकन्या कृष्णाहि आसनावरून उठली व माधवाच्या त्या कनिष्ठ भगिनीला प्रीतीनें आलिंगन देऊन 'तुझा पति शत्रुरहित होवो' असें म्हणाली. तिचा तो आशीर्वाद ऐकून सुभद्रेलाहि मोठा संतोष वाटला व ती 'तथास्तु' असें म्हणाली.

राजा कृष्णाबरोबर अशाप्रकारें आपला दृढ संबंध जडलेला पाहून महारथ पांडवांना परम संतोष झाला; अर्जुनानें सुभद्रेला महिषीचा वेष न देतां गोपालकृष्णाच्या संबंधामुळें गोपालिकेचा वेष देऊन पाठविलें, हें पाहून द्रौपदीलाहि आनंद वाटला आणि अर्जुन बारा वर्षें अरण्यवास करून सुखरूपपणें परत आल्यामुळें सर्वांनाच आल्हाद झाला.

(३) हे वीरा, त्यानंतर पराक्रमी अर्जुन सुभद्रेसह आपल्या इंद्रप्रस्थ नगरीस जाऊन पोंचला आहे, हें वर्तमान ऐकून विशुद्धात्मा कमलनयन श्रीकृष्ण बलरामासह इंद्रप्रस्थास आला. त्यांच्याबरोबर श्रेष्ठ अंधक व वृष्णिवीर, अनेक महारथ भ्राते व कुमार मोठ्या सैन्यासह निघाले. त्या वेळीं मोठा बुद्धिमान्, यशस्वी व वृष्णिवीरांचा शत्रुनाशक सेनापति अक्रूर, अतितेजस्वी अनाधृष्टि, महाभक्त म्हणून प्रसिद्ध असलेला बृहस्पतीचा शिष्य उदार उद्धव, सत्यक, सात्यकि,

सात्वत कृतवर्मा, प्रद्युम्न, सांब, विपृथु हे व असेच दुसरेहि अनेक वृष्णि, भोज व अंधक वीर पांडवांस द्यावयाचें प्रीतिदान घेऊन खांडवप्रस्थास आले.

माधव अगदीं समीप आला आहे, असें ऐकून युधिष्ठिर राजानें नकुल-सहदेवांस त्याचें स्वागत करून सन्मानानें आणण्यासाठीं पुढें पाठविलें. मोठ्या ऐश्वर्यासह येत असलेल्या त्या वृष्णींचा नकुल-सहदेवांनीं मोठा सत्कार केला आणि पताका, ध्वज यांनीं सुशोभित केलेल्या खांडवप्रस्थ-नगरांत त्यांना बहुमानानें आणिलें.

त्या नगरांतील राजमार्गांचें संमार्जन करून त्यांवर शीतल चंदनरसाचा सेक केला होता. सुगंधी पुष्पांचा सर्वत्र वर्षाव केला होता. प्रत्येक चव्हाठ्यावर अग्नि प्रज्वलित करून त्यांत निरनिराळीं सुगंधी द्रव्यें टाकिल्यामुळें सर्व नगरभर पुष्पांचा व धूपाचा गंध भरून गेला होता. कृष्ण व बलराम यांसह प्रसिद्ध यादवांना पहाण्यासाठीं हृष्ट-पुष्ट जनांची मोठी गर्दी जमली होती. श्रीमंत वैश्यांच्या स्थानांनीं तें नगर अतिशय सुशोभित झालें होतें. अशा त्या देवलोकाप्रमाणें शोभणाऱ्या खांडवप्रस्थ नगरांत अतिशय पराक्रमी केशव, बलराम व यादव यांसह प्रविष्ट झाला आणि हजारों पौर व ब्राह्मण यांकडून पूजला जाणारा राजा युधिष्ठिर कृष्ण-बलरामांसह इंद्राच्या मंदिराप्रमाणें शोभणाऱ्या राजगृहांत येऊन पोंचला.

त्याबरोबर युधिष्ठिरानें बलरामाला यथाविधि आलिंगन देऊन कृष्णाच्या मस्तकाचें अवघ्राण केलें व दोन्ही बाहूंनीं त्याला आपल्या हृदयाशीं घट्ट धरिलें. त्यामुळें गोविंदालाहि फार समाधान वाटलें. त्यानें धर्मराजाचें विनयानें समाधान करून पुरुषश्रेष्ठ भीमालाहि वंदन केलें. युधिष्ठिरानें इतर यादवांचा त्यांच्या वयाच्या अनुरोधानें यथाविधि सत्कार केला. त्यानें कोणाला गुरूप्रमाणें वंदन केलें, तो कित्येकांना मित्राप्रमाणें भेटला, कांहींजणांशीं बोलला व कित्येकांनीं त्याला अभिवादन केलें.

श्रीकृष्णानेंहि पांडवपक्षीयांचा तसाच यथोचित सत्कार करून वराच्या आप्तांना त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें वस्त्रालंकारादि अमूल्य वस्तु व धन दिलें. सुभद्रेच्या ज्ञातिबांधवांनीं वरपक्षाच्या लोकांना जें जें कांहीं अवश्य द्यावयास पाहिजे होतें तें दिलें. सुवर्णध्वज व घुंगुरमाळा यांनीं सुशोभित केलेले व चार अश्व जोडलेले सहस्र रथ निपुण सारथ्यांसह दिले. मथुरेच्या पवित्र व तेजस्वी

दहा हजार दुभत्या गायी दिल्या. चंद्रकिरणांसारख्या तेजस्वी, शुभ्र वर्णाच्या एक हजार घोड्या सुवर्णालंकारांनीं भूषित करून दिल्या.

त्याचप्रमाणें ज्यांचें सर्व शरीर शुभ्र असून फक्त मानेवर काळे केंस आहेत, अशा वायूप्रमाणें वेगवान् असलेल्या खेचरी प्रत्येक भ्रात्याला पांच-पांचशें दिल्या व स्नान, पान, उत्सव इत्यादि कार्यामध्यें निपुण असलेल्या गौरवर्ण व तेजस्वी एक हजार तरुण दासी पांडवांस अर्पण केल्या. त्या सर्व अलंकारांनीं युक्त, लोभरहित व परिचर्येंत दक्ष होत्या. तसेच बाल्हिक देशांतील रुंद पाठीचे एक लक्ष जातिवंत अश्व 'कन्याधन' म्हणून दिले. दहा मनुष्यांच्या भारंभार घडिवलेलें व न घडिवलेलें अग्नीसारखें तेजस्वी सुवर्ण जनार्दनानें पांडवांना दिलें. साहसप्रिय हलधरानें पर्वतासारखे उंच व मदाचा स्राव करणारे, सुवर्णघंटांच्या माळांनीं युक्त असलेले सहस्र हत्ती माहुतांसह पाणिग्रहणप्रसंगीं अर्जुनाला दिले.

याप्रमाणें महाधन, रत्नें, वस्त्रें, शालजोड्या, गज, अश्व इत्यादि विविध पदार्थांनीं युक्त असलेला तो मूल्यवान् रत्नौघ पांडुरूपी सागरांत शिरला. त्यामुळें अगोदरच परिपूर्ण असलेल्या पांडवांच्या रत्नौघास वाढविणारा तो यादवांपासून प्राप्त झालेला रत्नौघ त्यांच्या शत्रूला असह्य झाला.

धर्मराज युधिष्ठिरानें त्या सर्व धनाचा स्वीकार केला आणि वृष्णि व अंधक या महावीरांचा प्रतिसत्कार केला. नंतर ते महात्मे कौरवोत्तम व वृष्णि-अंधकोत्तम हे परस्परांसह इंद्राच्या अमरावतीप्रमाणें खांडवप्रस्थांत विहार करूं लागले. ते मोठ्या हर्षानें मोठ-मोठ्यानें बोलून टाळया वाजवूं लागले. कौरव व वृष्णि आपल्या बरोबरीच्या मित्रांशीं संतोषानें असा विहार करीत असतां अनेक दिवस एका दिवसासारखे निघून गेले. यादवांनीं पांडवांच्या त्या अपूर्व नगरींत याप्रमाणें पुष्कळ दिवस विहार करून आपल्या द्वारवती नगरीस परत जाण्याचा निश्चय केला असतां पांडवांनीं त्यांचा मोठा सत्कार केला. तेव्हां त्यांनीं दिलेलीं अमूल्य रत्नें घेऊन ते वृष्णि-अंधक महारथ बलरामासह आपल्या नगरीस निघून गेले.

महात्मा वासुदेव मात्र रम्य इंद्रप्रस्थ नगरींत पार्थापाशींच राहिला. तो महा यशस्वी कृष्ण अर्जुनासह यमुनेच्या तीरावरील हरिणादिकांचा वध करीत मृगयाविहारांत रममाण झाला. कांहीं दिवसांनीं केशवाची प्रिय भगिनी जी सुभद्रा तिला शचीच्या जयंताप्रमाणें वीर पुत्र झाला.

जनमेजया, वीरमाता सुभद्रा ज्याचे बाहु दीर्घ, वक्षःस्थल विशाल व नेत्र वृषभाच्या नेत्राप्रमाणें आहेत, अशा वीर अभिमन्यूला प्रसवली. तो शत्रुनाशक सुभद्रापुत्र निर्भय व मोठा शूर असल्यामुळें लोक त्याला **अभिमन्यु** म्हणूं लागले. यज्ञामध्यें अरणिमंथनानें अग्नि जसा प्रकट व्हावा, त्याप्रमाणें धनंजयापासून सात्वती सुभद्रेच्या ठिकाणीं हा अतिरथ अर्जुनपुत्र उत्पन्न झाला. त्याच्या जन्मकाळीं महातेजस्वी कुंतीपुत्र युधिष्ठिरानें दहा हजार गायी व सुवर्ण मणिमाला ब्राह्मणांना दिल्या. चंद्र जसा सर्व लोकांस आल्हादकारक वाटतो, तसा अभिमन्यु सर्व पांडवांना प्रिय झाला. वासुदेवाला तर तो अगदीं बालपणापासूनच फार आवडत असे. श्रीकृष्णानें जन्मापासून त्याच्या लालन-पालन, अलंकरण इत्यादि सर्व शुभ क्रिया केल्या. तो बालकहि शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें वाढूं लागला.

जनमेजया, त्या शत्रुनाशक वेदज्ञ अभिमन्यूनें अर्जुनापासूनच सर्व दिव्य व मानुष चतुष्पाद दशविध धनुर्वेदाचें ग्रहण केलें. अर्जुनानें आपल्या पुत्राला

---

१. मंत्रमुक्तं पाणिमुक्तं मुक्तामुक्तं तथैव च। अमुक्तं च धनुर्वेदे चतुष्पाच्छस्त्रमीरितम् ॥ अर्थ—ज्या शस्त्राचा केवल प्रयोगच होतो, उपसंहार करतां येत नाहीं तें मंत्रमुक्त. बाणादि हें पाणिमुक्त. जें शस्त्र प्रयोग व उपसंहार यांनीं युक्त असतें तें मुक्तामुक्त. जें मंत्रानें सिद्ध केलेलें ध्वजादि शस्त्र पहातांच शत्रु पळून जातात, तें अमुक्त, असें धनुर्वेदांत चतुष्पाद शस्त्र सांगितलें आहे. किंवा सूत्र, शिक्षा, प्रयोग व रहस्य असे चार ग्रंथपाद आहेत.

२. आदानमथ संधानं मोक्षणं विनिवर्तनम्। स्थानं मुष्टिः प्रयोगश्च प्रायश्चित्तानि मण्डलम् ॥ रहस्यं चेति दशधा धनुर्वेदांगमिष्यते ॥ अर्थ—१ बाणाचें भात्यांतून ग्रहण. २ त्याला प्रत्यंचेशीं जोडणें. ३ तो बाण लक्ष्यावर सोडणें. ४ असमर्थ लक्ष्यावर टाकलेल्याहि अस्त्राला परत घेणें. ५ धनुष्य व प्रत्यंचा यांचें शरसंधानाच्या वेळीं किंवा तें धारण करण्याच्या वेळीं त्याचा मध्यभाग किंवा त्याजवळील भाग, ६ तीन किंवा चार अंगुलींची मुष्टि, ७ तर्जनी व मध्यमा किंवा मध्यमा व अंगुष्ठ यांच्या मधून बाणाची योजना करणें, ८ स्वतः किंवा शत्रु यांच्यापासून प्राप्त झालेल्या किंवा होणाऱ्या ज्याघात-शरघातादिकांच्या निवारणासाठीं तलत्राण, प्रत्यस्त्र इत्यादिकांची योजना, ९ चक्राप्रमाणें भ्रमण करीत असलेल्या रथांत बसून भ्रमण करीत असलेल्या लक्ष्याचा वेध आणि १० शब्दादि वेध व एकाच वेळीं अनेक लक्ष्यांवर शरसंधान, अशीं धनुर्वेदाचीं दहा अंगें आहेत.

अस्त्रांच्या विज्ञानांतील, प्रयोगपटुत्वांतील व शरीरसंबंधक्रियांतील सर्व विशेष शिकविले. त्यानें त्या आपल्या अद्वितीय पुत्राला शास्त्र व अनुष्ठान यांमध्यें आपल्यासारखें तयार केलें. शत्रूंचा पराभव करणाऱ्या सर्व गुणांनीं युक्त, सर्व लक्षणांनीं लक्षित, अजिंक्य, पुष्ट, सिंहासारखा अभिमानी, मत्त गजाप्रमाणें संचार करणारा, मेघ किंवा दुंदुभि यांप्रमाणें ज्याचा ध्वनि आहे, पूर्ण चंद्राप्रमाणें ज्याचें मुख आहे, शौर्य, वीर्य, रूप व आकार यांमध्यें जो कृष्णतुल्य आहे, अशा आपल्या सौभद्र अभिमन्यूला अर्जुन, इंद्र जसा पार्थाला पहात होता, तसा पाहूं लागला.

साध्वी द्रौपदीलाहि पांच पतींपासून पांच शुभलक्षणी पुत्र झाले; ते पांची पुत्र पर्वतासारखे श्रेष्ठ व वीर होते. युधिष्ठिरापासून प्रतिविंध्य, वृकोदरापासून सुतसोम, अर्जुनापासून श्रुतकर्मा, नकुलापासून शतानीक व सहदेवापासून श्रुतसेन उत्पन्न झाला. पांचालीनें अशा या पांच महारथ वीरांना अदिति जशी आदित्यांस जन्म देते, तसा जन्म दिला.

राजा, त्या वेळीं विप्रांनीं युधिष्ठिराला सांगितलें कीं, विंध्यपर्वताप्रमाणें हा शत्रूंच्या प्रहाराला तुच्छ लेखील म्हणून युधिष्ठिरानें त्याचें नांव 'प्रतिविंध्य' ठेविलें. भीमानें सहस्र सोमयाग केल्यावर त्याला चंद्र-सूर्याप्रमाणें तेजस्वी व धनुर्धारी पुत्र झाला. म्हणून त्याचें नांव 'सुतसोम' ठेविलें. श्रुत म्हणजे महत्कृत्य, तें करून पार्थ परत आल्यावर या पुत्राचा जन्म झाला, म्हणून त्याचें नांव 'श्रुतकर्मा' असें ठेविलें.

कुरुकुलांत 'शतानीक' या नांवाचा एक महात्मा राजर्षि होऊन गेला. नकुलानें आपल्या कीर्तिमान् पुत्राला त्याचेंच नांव दिलें. त्यानंतर कृत्तिका नक्षत्रावर कृष्णा सहदेवापासून श्रुतसेन-नामक पुत्राला प्रसवली. हे सर्व यशस्वी द्रौपदीपुत्र एकेका वर्षाच्या अंतरानें झाले. हे राजेंद्रा, ते पांची पांडवपुत्र परस्परांचें हित इच्छिणारे होते. धौम्य महर्षीनें त्या सर्व कुमारांचे जातकर्म, उपनयन इत्यादि संस्कार क्रमानें यथाविधि केले. त्यानंतर त्या सदाचारसंपन्न पांडवकुमारांनीं वेदाध्ययन केलें. अर्जुनापासून सर्व दिव्य व मानुष इष्वस्त्रांचें ग्रहण केलें. त्या देवपुत्रांप्रमाणें सुदृढ व पराक्रमी पुत्रांना पाहून पांडवांना परम आह्लाद झाला. १. १७. २२१.

येथें सतरावें हरणहारिकापर्व समाप्त झालें.

खांडवदाहपर्व १८.

अध्याय २२२ वा.

[१ पांडवांचा खांडवप्रस्थांतील सुखनिवास. २ अर्जुन व कृष्ण यांचा यमुना तीरावरील विहार.]

(१) **वैशंपायन**—राजा जनमेजया, धृतराष्ट्र आणि शांतनव भीष्म यांच्या आज्ञेप्रमाणें इंद्रप्रस्थास रहाणाऱ्या पांडवांनीं इतर दुष्ट राजांचा वध केला. धर्मराज राज्य करीत असतां ऊर्ध्वरेखादि व गांभीर्यादि पुण्य लक्षणें आणि पवित्र कर्में यांनीं युक्त असलेल्या धर्मराजाचा आश्रय करून सर्व प्रजा स्वदेहाचा आश्रय केलेल्या देहीप्रमाणें सुखानें राहिली. ज्याप्रमाणें तीन अमात्यांना चवथा राजा आराधना करण्यास योग्य असल्याप्रमाणें भासतो, किंवा धर्म, अर्थ व काम यांना चवथा मोक्षस्वरूप आत्मा आराधनीय असतो, त्याप्रमाणें तो भरतश्रेष्ठ युधिष्ठिर धर्मादिकांना आराधनीय वाटला. त्यामुळें त्या नीतिमान् युधिष्ठिरानें प्राणाप्रमाणें प्रिय असलेल्या तीन बंधूंसारखेंच धर्म, अर्थ व काम यांचें मोठ्या आदरानें सेवन केलें.

पारिक्षिता, वेदांचें उत्तम अध्ययन करणारा, महायज्ञामध्यें त्यांचा विनियोग करणारा व साधूंचें रक्षण करणारा, तो राजा प्रजेला मोठ्या भाग्यानेंच लाधला. चंचल असलेलीहि लक्ष्मी त्या राजापाशीं स्थिर होऊन राहिली. त्याच्या ठिकाणीं बुद्धि पराकाष्ठेला प्राप्त झाली व त्या राजाच्या उदाहरणानें इतर राजांचाहि सर्व धर्म वृद्धि पावला. चार भ्रात्यांनीं युक्त असलेला तो राजा अथर्ववेदोक्त कर्में व तदंगभूत उपासना, यांनीं युक्त असलेला ऋग्यजुःसामसाध्य ज्योतिष्टोमादि याग जसा शोभतो, तसा आपल्या चार भ्रात्यांच्या योगानें अधिकच शोभला. प्रजापतीपाशीं मुख्य देव जसे उपस्थित होतात, त्याप्रमाणें बृहस्पतीसारखे धौम्यादि ब्राह्मण त्याच्या सभोंवार उपस्थित होत.

हे राजन्, शरदृतूंतील पूर्णचंद्राप्रमाणें सर्व प्रजांचें नेत्र व हृदय धर्मराजाच्या ठिकाणीं अति प्रीतीनें आसक्त झालीं. प्रजापालन करणें या राजकर्तव्यामुळेंच प्रजा त्याच्यावर अनुरक्त झाली, असें नाहीं, तर प्रजेला हितावह असलेलें प्रत्येक कार्य करून लोकप्रीति संपादन केल्यामुळें सर्व प्रजा मोठ्या भक्तीनें त्याच्यावर

आसक्त झाली. त्या बुद्धिमान् व मधुर भाषण करणाऱ्या कुंतीपुत्राच्या तोंडून अयुक्त, असत्य, असह्य किंवा अप्रिय भाषण कधींहि निघत नसे. तो महातेजस्वी युधिष्ठिर सर्व लोकांचें व आपलें हित करण्यांतच नेहमीं तत्पर असे.

राजा जनमेजया, याप्रमाणें आपल्या तेजानें सर्व शत्रूंना ताप देणारे ते पांडव सर्व शोकरहित होऊन इंद्रप्रस्थनगरींत स्वसंतोषानें काल घालवूं लागले. अशा प्रकारें कांहीं काल गेल्यावर एके दिवशीं अर्जुन श्रीकृष्णाला म्हणाला—" हे जनार्दना, आज फार ऊष्मा होत आहे, तरी आपण सुहृज्जनांसह यमुनातीरावर जाऊन जलक्रीडा करूं या व संध्याकाळीं परत येऊं. तुला हा विचार रुचतो का ?"

वासुदेव म्हणाला—हे पार्था, इष्टमित्रांसह जलक्रीडा करावी अशी माझीहि इच्छा आहे.

(२) राजा, वासुदेव व पार्थ या दोघांनीं आपसांत असा संकेत करून धर्मराजाची अनुज्ञा घेतली व ते दोघे सुहृज्जनांसह यमुनातीरीं गेले. तें क्रीडास्थान विविध वृक्षांनीं युक्त असून तेथें यमुनेच्या पात्रामध्यें निर्माण केलेलीं विहारस्थानें होतीं. तो प्रदेश इंद्राच्या अमरावतीसारखा होता. तें स्थान भक्ष्य व भोज्य पदार्थ, सुगंधी द्रव्यें आणि इतर पुष्पमाला इत्यादि सर्व अमूल्य वस्तू, यांनीं युक्त होतें. पार्थ व गोविंद यांनीं क्रीडास्थानांत प्रवेश केल्यावर त्यांच्या बरोबरचे सुहृज्जन भिन्न भिन्न रत्नखचित विहारस्थानांत जाऊन क्रीडा करूं लागले. रम्य अवयवांनीं युक्त असलेल्या कृष्णार्जुनांच्या सुंदर स्त्रियाहि तेथें कोणी वनांतून तर कोणी जलांतून यथेच्छ विहार करूं लागल्या.

हे महाराज, द्रौपदी व सुभद्रा यांनीं त्या क्रीडानंदाच्या भरांत इतर स्त्रियांना विपुल वस्त्राभरणें दिलीं. त्या स्त्रियांपैकीं कित्येक आनंदानें नृत्य करूं लागल्या तर कोणी हंसूं लागल्या. कोणी एकमेकींशीं विनोद करूं लागल्या व आपलीं रहस्यें परस्परांस निवेदन करूं लागल्या. तो वनप्रदेश वेणु, वीणा, मृदंग इत्यादि वाद्यांच्या मधुर ध्वनीनें दुमदुमून गेला होता; असा तेथें सर्वत्र आनंद चालला असतां कृष्ण व अर्जुन हे दोघे जवळच एका रम्य प्रदेशांत गेले व हे राजा, भिन्न भिन्न अमूल्य आसनावर बसले. ते वीर कृष्णार्जुन मागें घडलेल्या पराक्रमांच्या व इतर कथा परस्परांस सांगून एकमेकांचें रंजन करूं लागले. स्वर्गांतील अश्विनिकुमारांप्रमाणें बसलेले ते दोघे अतिशय हृष्ट झाले.

इतक्यांत त्यांच्याजवळ एक ब्राह्मण आला. तो मोठ्या साल वृक्षाप्रमाणें उंच होता. त्याची अंगकांति तापविलेल्या सोन्यासारखी होती. त्याचें सर्व अंग

नील-पीत वर्णाचें होतें. केंस अग्नीच्या ज्वालेप्रमाणें पीतवर्ण होते. तो जसा उंच होता, तसाच स्थूलहि होता. बाल सूर्याप्रमाणें शोभणाऱ्या त्या विप्रानें वल्कलें व जटा धारण केल्या होत्या. त्याचे नेत्र कमलाच्या पाकळीप्रमाणें असून तो आपल्या अंगकांतीनें जणुं काय प्रज्वलित होत होता. तो तेजस्वी द्विजोत्तम आपल्या समीप आला आहे असें पाहून अर्जुन व वासुदेव सत्वर उठून उभे राहिले. १. १८. २२२.

अध्याय २२३ वा.

[१ ब्राह्मणरूपी अग्नीची प्रार्थना. २ श्वेतकिराजाचा वृत्तान्त. ३ अग्नीची व्याधि व निष्फल उपाय.]

(१) वैशंपायन—हे राजा, तो ब्राह्मण खांडववनाच्या समीप असलेल्या त्या दोघां लोकप्रवीर अर्जुन-वासुदेवांना म्हणाला—" हे यादव-पांडवहो, मी अपरिमित भोजन करणारा ब्राह्मण आहें. मी नेहमीं विपुल अन्न भक्षण करतों. तुम्ही दोघेहि वीर मोठे उदार अहां. यास्तव मी तुम्हांपाशीं भिक्षा मागावयास आलों आहें. मी एकदा तृप्त होईन, इतकें अन्न मला द्या."

ब्राह्मणाचें हें वचन ऐकून ते दोघेहि सर्वसमर्थ कृष्ण-पांडव म्हणाले—हे भगवन्, कोणत्या अन्नानें तुझी तृप्ति होईल, तें सांग. म्हणजे आम्ही तें संपादन करण्याचा यत्न करूं.

तेव्हां 'आम्हीं तुझ्यासाठीं कोणतें अन्न तयार करावें' असें विचारणाऱ्या त्या वीरांस तो पूज्य ब्राह्मण म्हणाला—"हे वीरांनो, मी साधें अन्न खात नसतों. मी अग्नि आहें, असें तुम्ही समजा व मला अनुरूप अन्न द्या. देवेंद्र या खांडव-वनाचें सर्वदा सर्वप्रकारें रक्षण करीत असतो. त्यामुळेंच त्या महात्म्याकडून सुरक्षित असलेल्या या वनास मी दग्ध करूं शकत नाहीं. या वनांत त्याचा मित्र तक्षक-नाग आपल्या सर्व परिवारासह रहातो व त्या आपल्या मित्रासाठीं तो या वनाचें व त्याबरोबरच इतर प्राण्यांचेंहि रक्षण करतो. त्यामुळेंच इंद्राच्या तेजानें मी त्याला जाळूं शकत नाहीं. मी या वनांत प्रज्वलित झालों आहें, असें पाहतांच तो मेघजलाची वृष्टि करूं लागतो. त्यामुळें मला अत्यंत अभीष्ट असलेल्याहि या वनाला मी जाळूं शकत नाहीं. तुम्ही दोघे अस्त्रवेत्ते आहां. तुम्हीं

मला साह्य केल्यास मी हें खांडववन दग्ध करीन. एवढी भिक्षा मला घाला. हे श्रेष्ठ अस्त्रज्ञहो, तुझी जलधारा व वनचर प्राणी यांचें निवारण करा."

जनमेजय म्हणाला—हे ब्रह्मन्, इंद्रानें रक्षण केलेलें व विविध प्राण्यांनीं युक्त असलेलें तें खांडववन दग्ध करण्याची भगवान् अग्नीनें कां इच्छा केली? क्रुद्ध झालेल्या अग्नीनें ज्या अर्थी खांडववन जाळिलें त्या अर्थी त्याचें कारणहि तसेंच मोठें असलें पाहिजे. यास्तव हे मुने, पूर्वीं खांडववन कसें दग्ध झालें तें सविस्तर ऐकण्याची माझी इच्छा आहे. तरी तो यथार्थ वृत्तान्त मला सांग.

(२) राजाचा हा प्रश्न ऐकून वैशंपायन म्हणाला—हे राजन्, अग्नीनें खांडववन दग्ध करण्याचें कारण मी तुला मोठ्या संतोषानें सांगतों, ऐक. पुराणांत वर्णन केलेली ही खांडववनाच्या नाशाची कथा सविस्तर श्रवण कर.

पूर्वीं 'श्वेतकि'-नांवाचा महा पराक्रमी इंद्रतुल्य प्रसिद्ध राजा होऊन गेला. त्याच्यासारखा बुद्धिमान्, यज्ञ करणारा व दाता दुसरा कोणीहि झाला नाहीं. त्यानें असंख्य देवयज्ञादि स्मार्त व ज्योतिष्टोमादि श्रौत यज्ञ करून विपुल दक्षिणेनें ब्राह्मणांना तृप्त केलें. हे भूपते, दिवसेंदिवस त्या राजाला यज्ञ व दान यांवांचून दुसरा उद्योगच नाहींसा झाला. तो एकसारखा ऋत्विजांसह यजन करूं लागला. त्यामुळें ज्यांचे नेत्र धुरानें व्याकुळ झाले आहेत असे ते सर्व ऋत्विज दीर्घकाल चाललेल्या राजाच्या यज्ञाला कंटाळले व त्या यज्ञशील राजाला सोडून निघून गेले. तेव्हां राजानें त्या ऋत्विजांना अनेक प्रकारें विनविलें; परंतु दृष्टिरहित झाल्यामुळें ते त्याचा यज्ञ करावयास आले नाहींत. शेवटीं त्यांची अनुमति घेऊन राजानें तो यज्ञ इतर ऋत्विजांकडून समाप्त करविला.

त्यानंतर कांहीं कालानें राजाला पुनः शतसंवत्सर सत्र करण्याची इच्छा झाली. परंतु त्या महात्म्याला तें करण्यास कोणी ऋत्विज मिळाला नाहीं. त्या महायशस्वी राजानें आपल्या सुहृज्जनांसह ऋत्विज मिळविण्यासाठीं पुष्कळ यत्न केला. त्यानें ऋत्विजांना नमस्कार करून मधुर भाषणानें त्यांचें सांत्वन केलें, त्यांना दान दिलें व पुनः पुनः त्यांचीं आर्जवें केलीं. परंतु त्यांनीं राजाची विनंति मान्य केली नाहीं.

तेव्हां तो क्रुद्ध होऊन त्या आश्रमवासी तेजस्वी ब्राह्मणांना म्हणाला—हे द्विजश्रेष्ठहो, मी जर पतित व तुमच्या सेवेंत तत्पर नसेन, तर तुम्ही सर्व ब्राह्मण माझा सत्वर त्याग करा. परंतु तसें नसेल तर मात्र तुम्हांला माझी उत्पन्न

झालेली यज्ञश्रद्धा ढळविणें योग्य नाहीं. किंवा माझा त्याग करणेंहि तुम्हांला उचित नाहीं.

हे विप्रहो, मी तुम्हांला शरण आलों आहें. मजवर प्रसन्न व्हा. सान्त्ववचन, दान इत्यादि उपायांनीं मी आपल्या कार्यासाठीं तुम्हांला प्रसन्न करून ही प्रार्थना करीत आहें. यास्तव तुम्ही हें माझें कार्य अवश्य करा; अथवा तुम्ही जर केवल द्वेषानें माझा त्याग करीत असाल तर मी अन्य ऋत्विजांकडे जाऊन हें यज्ञकार्य स्वीकारण्याविषयीं त्यांची प्रार्थना करीन. असें बोलून तो राजा स्वस्थ बसला.

तेव्हां हे परंतपा, ते सर्व ऋत्विज राजाचें याजन करण्यास समर्थ नसल्यामुळें क्रुद्ध होऊन त्या राजाला म्हणाले—" हे नृपश्रेष्ठा, तुझें हें सतत चालणारें यज्ञकर्म करून आम्ही श्रांत झालों आहों. यास्तव श्रमानें श्रांत झालेल्या आम्हांला तूं आतां विश्रांति द्यावीस, हेंच योग्य आहे. हे निष्पापा, तुला बुद्धिवैकल्यामुळें यज्ञ करण्याविषयीं अतिशय त्वरा झाली आहे. पण आम्ही किती श्रांत झालों आहों याची तुला कल्पना नाहीं. यास्तव तूं आतां रुद्राकडे जा, म्हणजे तो तुझ्याकडून यज्ञ करवील."

ऋत्विजांचें हें निंदावचन ऐकून राजाला अतिशय क्रोध आला. तो कैलास पर्वतावर गेला व नियत चित्तानें तीक्ष्ण व्रतें धारण करून महादेवाच्या आराधनेसाठीं उग्र तप करूं लागला. हे राजा, तो दीर्घकाल उपवासपरायण झाला. तो कधीं बाराव्े दिवशीं, तर कधीं सोळावे दिवशीं कंदमूल व फळें यांचा आहार करीत असे.

तो श्वेतकि-राजा शांत चित्तानें हात वर करून नेत्र न मिटतां सहा महिने स्तंभासारखा अचल राहिला. तेव्हां महत्तप करणाऱ्या त्या नरेंद्राला शंकरानें परम प्रीतीनें दर्शन दिलें आणि स्निग्ध व गंभीर वाणीनें तो पूज्य उमापति त्यास म्हणाला—" हे नरवीरा, मी तुझ्या तपश्चर्येनें प्रसन्न झालों आहें. तुझें कल्याण असो. तुला जो वर इष्ट असेल तो मागून घे."

अतितेजस्वी रुद्राचें हें भाषण ऐकून राजर्षीनें त्याला प्रणाम केला व म्हटलें— " सर्व लोकांना पूज्य असलेला भगवान् जर मजवर प्रसन्न झाला असेल तर त्यानें स्वतः माझें याजन करावें. हे सुरेश्वरा, तूं माझा याजक हो व मजकडून शतसांवत्सरिक सत्र करीव."

राजाचें हें वचन ऐकून प्रसन्न झालेला भगवान् हंसत त्यास म्हणाला—हे राजा ज्या याजनासाठीं तूं हें महत्तप केलेंस, तें या आमच्या लोकीं नाहीं. कारण आम्हांला याजनाचा अधिकार नाहीं. तथापि मी तुला जसें सांगत आहें, त्याप्रमाणें तूं जर नियमानें वागशील तर मी तुझें याजन करवीन. हे राजेंद्रा, बारा वर्षें ब्रह्मचारी व शांतचित्त राहून तूं अविच्छिन्न घृतधारेनें जर अग्नीला तृप्त केलेंस तर तूं मजपाशीं जो वर मागत आहेस, तो तुला प्राप्त होईल.

जनमेजया, रुद्राचें हें भाषण ऐकून श्वेतकि-राजानें बारा वर्षें व्रतस्थ राहून अविच्छिन्न घृतधारेनें अग्नीला तृप्त केलें.

बारावें वर्ष पुरें झालें असतां महेश्वर पुनः त्या राजापाशीं आला व परम प्रीतीनें त्यास म्हणाला—" हे राजश्रेष्ठा, तुझ्या या अनादि वेदविहित कर्मानें मी संतुष्ट झालों आहें. याजन हें ब्राह्मणांचें विधिप्राप्त कर्म आहे. यास्तव मी स्वतः तुझ्याकडून यज्ञ करविणार नाहीं. कारण मी स्वतः यज्ञभोक्ता आहें. पण माझा अंशभूत ' दुर्वास ' या नांवानें प्रसिद्ध असलेला महाभाग द्विजोत्तम भूलोकीं आहे, तो माझ्या आज्ञेनें तुजकडून यज्ञ करवील. तूं यज्ञसामग्री सिद्ध करीव. "

रुद्राचें हें वचन ऐकून तो राजा आपल्या नगरीला परत आला व त्यानें पुनरपि यज्ञसंभार संपादन केले. यज्ञाची सर्व सामग्री सिद्ध होतांच तो राजा पुनः रुद्राकडे गेला व ' हे भगवन्, तुझ्या कृपेनें माझे सर्व संभार व सर्व उपकरणें तयार आहेत. उद्यां यज्ञदीक्षा घ्यावी, अशी माझी इच्छा आहे ' असें बोलला.

त्या महात्म्या राजाचें हें वचन ऐकून रुद्रानें दुर्वासाला बोलाविलें व म्हटलें—" हे द्विजश्रेष्ठा, हा महाभाग श्वेतकि-राजा आहे. माझ्या आज्ञेनें तूं या राजाकडून यज्ञ करीव. "

तेव्हां 'ठीक आहे' असें बोलून दुर्वासमुनि राजाबरोबर त्याच्या राजधानीस गेला व त्याचा यज्ञ यथाकालीं व यथाविधि सुरू झाला. राजानें त्या यज्ञांत ब्राह्मणांना विपुल दक्षिणा दिली. महात्म्या श्वेतकिराजाचें तें सत्र समाप्त झालें असतां दुर्वासानें ज्यांना अनुज्ञा दिली आहे, असे सर्व दीक्षित याजक व तेजस्वी सदस्य स्व-स्वस्थानीं गेले. महाभाग राजाहि आपल्या नगरास परत आला.

त्या वेळीं वेदज्ञ ब्राह्मणांनीं त्याचा मोठा सत्कार केला, स्तुतिपाठकांनीं अर्थपूर्ण स्तुति केली व नागरिकांनीं त्याचें अभिनंदन केलें. हे राजन्, याप्रमाणें याग व दीर्घ सत्र करणारा श्वेतकिराजा पुढें दीर्घ कालानें सत्रांतील ऋत्विज व सर्व सदस्य यांसह दिव्य लोकीं गेला. तेथें देवादिकांनीं त्याची फार स्तुति केली.

(३) जनमेजया, श्वेतकीच्या यज्ञांत अग्नीनें बारा वर्षे अविच्छिन्न घृतधारांचें प्राशन केलें व त्या एकरूप कर्मांतील हवीनें तो देव अतिशय तृप्त झाला. त्यामुळें त्याला दुसऱ्या कोणाहि यजमानाच्या यज्ञांतील हवि भक्षण करण्याची इच्छा राहिली नाहीं. तो निस्तेज झाला. पूर्वीसारखा प्रकाशित होईना. भगवान् वह्नीला विकार उत्पन्न झाला. त्याचें सर्व तेज नष्ट झालें व त्याला ग्लानि आली.

तेव्हां आपलें स्वाभाविक तेज नष्ट झालें आहे असें पाहून भगवान् हुताशन सर्व लोकांना पूज्य असलेल्या पवित्र ब्रह्मलोकीं गेला व कमलासनावर बसलेल्या ब्रह्मदेवाला म्हणाला—" भगवन्, श्वेतकिराजानें मला अतिशय तृप्त केलें. त्यामुळें मला अत्यंत अरुचि उत्पन्न झाली आहे. मी तिचें निवारण करण्यास समर्थ नाहीं. मी निस्तेज व बलहीन झालों आहें. यास्तव तुझ्या प्रसादानें आपल्या पूर्वस्थितीला प्राप्त व्हावें अशी माझी इच्छा आहे. "

अग्नीचें हें वचन ऐकून सर्व लोककर्ता भगवान् ब्रह्मदेव हंसतच अग्नीला म्हणाला—" हे हुताशना, तूं बारा वर्षे सतत 'वसोर्धारा'-नांवाच्या पात्रानें अविच्छिन्न घृतधारेचें सेवन करून या अवस्थेस प्राप्त झाला आहेस. त्या अविच्छिन्न घृतपानानें तुला ही ग्लानि आली असून तूं अकस्मात् असा निस्तेज झाला आहेस. पण हे महाभाग, तूं असा खिन्न होऊं नकोस. मी तुझी ही अरुचि लवकरच घालवीन व तूं आपल्या पूर्वप्रकृतीस प्राप्त होशील. हे विभावसो, पूर्वी तूं देवांच्या आज्ञेनें देवशत्रूंचें निवासस्थान, जें घोर खांडववन त्याला जाळलेंस. तेथेंच आतां सर्व प्राणी सुखानें राहत आहेत. त्यांच्या मेदानें तूं तृप्त झालास म्हणजे पुनः आपल्या पूर्व स्वरूपास प्राप्त होशील. यास्तव तूं आतां सत्वर तें अरण्य दग्ध करावयास जा. म्हणजे तुझी ग्लानि नाहींशी होईल. "

ब्रह्मदेवाच्या मुखांतून निघालेलें हें वचन ऐकून अग्नि ब्रह्मलोकांतून मोठ्या वेगानें निघाला व खांडववनांत येऊन वायूच्या प्रेरणेनें क्रुद्ध झालेला तो उत्तम वीर्य धारण करून अकस्मात् प्रज्वलित झाला. तेव्हां खांडववन प्रदीप्त झालेलें

पाहून त्यांत राहणाऱ्या प्राण्यांनीं अग्नीच्या शांतीसाठीं पराकाष्ठेचा यत्न केला. क्रुद्ध झालेल्या हजारों मदोन्मत्त गजांनीं आपल्या सोंडांनीं जलाशयांतून विपुल जल आणून अग्नीवर त्याचा सेक केला. ज्यांना अनेक मस्तकें आहेत, अशा क्रोधानें देहभान विसरलेल्या नांगांनीं आपल्या मस्तकांनीं अग्नीवर जलाची वृष्टि केली. इतर प्राण्यांनींहि आपापल्या सामर्थ्याप्रमाणें उद्यम करून अग्नीला शांत केलें. याप्रमाणें खांडववनांत पुनः पुनः प्रज्वलित झालेल्या अग्नीला तेथील प्राण्यांनीं सात वेळां विझविलें. १. १८. २२३.

अध्याय २२४ वा.

[१ ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरून अग्नीचें कृष्णार्जुनांपाशीं आगमन व साह्याची याचना. २ अर्जुनानें केलेली धनुरादि युद्धसाधनांची मागणी.]

(१) **वैशंपायन**—राजा जनमेजया, याप्रमाणें ज्याचा प्रयत्न सात वेळां निष्फल झाला आहे असा निराश, खिन्न व क्रुद्ध झालेला अग्नि ब्रह्मदेवाकडे गेला व त्यानें घडलेला सर्व वृत्तान्त त्यास निवेदन केला.

तेव्हां एक क्षणभर विचार करून तो अग्नीला म्हणाला—हे महाभागा, तुला खांडववन कसें दग्ध करितां येईल याचा विचार करून मीं त्याचा उपायहि निश्चित केला आहे. पण तूं कांहीं काल धीर धर. अनुकूल काल आला म्हणजे मी तो तुला सांगेन. त्या वेळीं नर-नारायण तुला साह्य करतील व त्यांच्या साह्यानें तूं तें वन निर्विघ्नपणें जाळूं शकशील. तेव्हां 'तथास्तु' असें बोलून अग्नि तेथून निघाला.

त्यानंतर दीर्घकालानें ते नर-नारायण ऋषि भूलोकीं उत्पन्न झाले आहेत, असें जाणून व ब्रह्मदेवाचें वाक्य स्मरून तो पुनरपि पितामहाकडे गेला. तेव्हां ब्रह्मदेव त्यास म्हणाला—"हे अग्ने, तूं इंद्राच्या डोळ्यांदेखत आजच खांडववन कसें दग्ध करूं शकशील, तें सांगतों, ऐक. हे विभावसो, नर व नारायण हे दोघे पूर्वदेव सध्यां देवांच्या कार्यासाठीं मनुष्यलोकीं अवतीर्ण झाले आहेत. लोक ज्यांना अर्जुन व वासुदेव असें समजतात, तेच नर-नारायण ऋषि होत.

या वेळीं ते दोघेहि एकत्र खांडववनासमीपच आहेत. त्यांच्यापाशीं जाऊन 'या वनाचा दाह करण्यास तुम्ही मला साह्य करा,' अशी तूं त्यांची याचना

कर. त्या पूर्वऋषींनीं तुला साह्य करण्याचें आश्वासन दिलें म्हणजे सर्व देव जरी रक्षण करीत असले, तरी तूं त्या वनाला जाळशील. ते दोघे वीर मोठ्या यत्नानें सर्व प्राण्यांचें व देवराजाचेंहि निवारण करतील, याविषयीं मला मुळींच शंका वाटत नाहीं." ब्रह्मदेवाचें हें वचन ऐकून अग्नि मोठ्या त्वरेनें तेथून निघाला व खांडववनासमीप असलेल्या कृष्णार्जुनापाशीं ब्राह्मणरूपानें येऊन त्यांस जें कांहीं बोलला तें मीं तुला सांगितलेंच आहे.

(२) त्या ब्राह्मणरूपी अग्नीचें पूर्वोक्त भाषण ऐकून कुंतीपुत्र अर्जुन इंद्राची इच्छा नसतांनाहि खांडववनाला जाळण्याची इच्छा करणाऱ्या अग्नीस त्या प्रसंगाला अनुरूप असें वचन बोलला—"हे हव्यवाहना, ज्यांच्या योगानें मी अनेक वज्रधरांशींहि युद्ध करूं शकेन, अशीं मजपाशीं अनेक दिव्य व लौकिक अस्त्रें आहेत. पण हे भगवन्, माझ्या बाहुबलाला शोभण्यासारखें धनुष्य नाहीं. समरामध्यें युद्ध करीत असतांना माझा वेग सहन करील असें धनुष्य व मी मोठ्या त्वरेनें शरसंधान करीत असतांहि क्षीण न होणारे असंख्य बाण मला पाहिजेत. मला इष्ट असलेले असंख्य शर व वाहून नेण्यास समर्थ असा रथहि मजपाशीं नाहीं. यास्तव हे विभावसो, वायूसारखे वेगवान्, दिव्य, व शुभ्र अश्व, यांनीं युक्त व मेघाप्रमाणें ज्याचा निर्घोष आहे, असा सूर्यासारखा तेजस्वी रथ, दृढ धनुष्य व अक्षय्य बाणभाते, यांची मला अपेक्षा आहे.

त्याचप्रमाणें या कृष्णाच्या सामर्थ्याला अनुरूप असें आयुध त्याच्यापाशीं नाहीं. त्याला जर अनुरूप आयुध मिळालें तर हा माधव संग्रामांत त्याच्या योगानें नाग व पिशाच यांसहि एका क्षणांत मारील. हे भगवन्, खांडव महावनावर जलधारांनीं सतत वृष्टि करणाऱ्या इंद्राचें निवारण मी ज्याच्या योगानें करूं शकेन, असा उपाय मला सांग. तुझा मनोरथ सिद्ध होईल, असा उपाय योजिल्यास, हे अग्ने, आम्ही दोघेहि प्रयत्नानें जें कांहीं करतां येणें शक्य आहे तें सर्व करूं. पण हे भगवन्, आम्हांला धनुरादिक समर्थ युद्धसाधनें तूं दे."
१. १८. २२४.

अध्याय २२५ वा.

[१ अर्जुनाला अग्नीपासून दिव्य आयुधांची प्राप्ति.]

(१) वैशंपायन—राजा जनमेजया, ज्याचा ध्वज धूम आहे अशा अग्नीनें अर्जुनाचें तें भाषण ऐकून जलांत वास करणाऱ्या अदितिपुत्र वरुणाचें, दर्शनाच्या इच्छेनें, ध्यान केलें. त्याच्या चिंतनाचा हेतु जाणून वरुण प्रकट झाला. तेव्हां पूजादि उपचारांनीं त्या लोकपालांतील चवथ्या सनातन देवाधिदेव जलेश्वरास प्रसन्न करून धूमकेतु म्हणाला—" हे भगवन्, सोमराजानें तुला जें दिव्य धनुष्य व अक्षय्य भाते दिले आहेत, ते सत्वर मला दे. ज्याच्यावर कपीचें चिह्न आहे, तो रथहि मला अर्पण कर. या युद्धोपकरणांनीं व विशेषतः गांडीव धनुष्याच्या योगानें पृथापुत्र अर्जुन देवांचें महत्कार्य करील. त्याचप्रमाणें तुजपाशीं असलेल्या दिव्य चक्रानें वासुदेवहि देवकार्य करणार आहे. यास्तव तेंहि मला दे."

तेव्हां वरुण 'ठीक आहे. देवकार्यासाठीं हें सर्व उपकरण मी तुला देतों' असें अग्नीला बोलला व तें अति अद्भुत, दृढ, यश व कीर्ति यांची वृद्धि करणारें, कोणत्याहि शस्त्रांनीं पराभूत न होणारें, शत्रूंच्या सर्व शस्त्रांचा विध्वंस करणारें, सर्व आयुधांपेक्षां प्रमाणानें मोठें असलेलें, शत्रुसैन्याचा पराभव करणारें, हजारों धनुष्यांचें एकटेंच कार्य करणारें, राष्ट्राची वृद्धि करणारें, विचित्र उच्च-नीच वर्णांनीं सुशोभित केलेलें, सुंदर, व्रणरहित, देव, दानव व गंधर्व यांनीं असंख्य वर्षें पूजिलेलें उत्कृष्ट धनुष्य, दोन अक्षय्य दिव्य भाते आणि दिव्य अश्व जोडलेला रथ त्यानें अग्नीला दिला.

श्रेष्ठ कपि हाच त्या रथाचा ध्वज असून, ज्यांच्या गळ्यांत सुवर्णमाला घातल्या आहेत, अशा रजतासारख्या शुभ्र गांधर्व अश्वांनीं तो युक्त होता. ते अश्व वायु किंवा मन यांसारखे वेगवान् होते. वरुणानें दिलेला तो दिव्य रथ सर्व उपकरणांनीं युक्त, देव-दानवांना जिंकण्यास अशक्य, तेजस्वी, भयंकर घोष करणारा व सर्व रत्नांनीं मनोहर होता.

पूर्वीं भुवनेश्वर भौमन-प्रजापतीनें मोठी तपश्चर्या करून त्या रथाला उत्पन्न केलें. त्याचें स्वरूप सूर्यासारखें असून त्यांत बसून सोमानें दानवांना जिंकलें. आपल्या दीप्तीनें तो अग्नीसारखा प्रज्वलित दिसत होता. त्याच्या ध्वजाची यष्टि सुवर्णाची असून, त्यावरील पताका नीलवर्ण होती. त्यामुळें तो ध्वज इंद्रधनुष्या-

सारखा दिसत होता. त्याच्या अग्रभागीं सिंह किंवा व्याघ्र यांप्रमाणें भयंकर शरीरानें युक्त असलेला दिव्य वानर जणुं काय शत्रुपक्षाला दग्ध करीतच स्थिर स्थित असे.

त्याचप्रमाणें त्या ध्वजावर मोठमोठीं विविध भूतें त्या कपीच्या सभोंवार बसून आपल्या भयंकर नादानें शत्रुसैन्यांना भयभीत करीत असत. विविध पताकांनीं सुशोभित केलेला तो उत्तम रथ जवळ येतांच कवच, खड्ग, अंगुलित्राण इत्यादिकांनीं सज्ज झालेल्या पार्थानें त्याला प्रदक्षिणा घातली व देवतांस प्रणाम करून एखादा पुण्यवान् पुरुष विमानांत जसा विराजमान होतो, त्याप्रमाणें त्यावर आरूढ झाला.

पूर्वीं ब्रह्मदेवानें निर्माण केलेल्या त्या दिव्य धनुःश्रेष्ठ गांडीवाला स्पर्श करून अर्जुन अतिशय प्रसन्न झाला. अग्नीला साक्षी ठेवून त्या वीर्यवानानें स्वसामर्थ्यानें रथांतील तें धनुष्य उचललें व एका क्षणांत त्यावर गुण चढविला. त्या वेळीं त्याचा जो ध्वनि झाला तो ऐकून तेथील जीवांचें मन भयानें थरारलें. याप्रमाणें तो दिव्य रथ, अक्षय्य बाणभाते व गांडीव धनुष्य यांनीं युक्त झालेला अर्जुन अतिशय संतुष्ट व अग्नीला साह्य करण्यास सज्ज झाला.

त्यानंतर अग्नीनें ज्याच्या उदरांत सूक्ष्म रज्जु आहे असें दिव्य चक्र व आपलें प्रिय आग्नेय अस्त्र कृष्णाला दिलें. त्यामुळें तो देवकीनंदनहि त्याला साह्य करण्यास समर्थ झाला.

अस्त्र व दिव्य चक्र दिल्यावर अग्नि त्यास म्हणाला—हे मधुसूदना, या अस्त्रानें तूं अमानुष शत्रूंनाहि रणांत जिंकशील, यांत कांहीं संशय नाहीं. या दिव्य चक्राच्या योगानें तूं मनुष्य, देव, राक्षस, पिशाच व नाग यांच्याशीं युद्ध करीत असतांना विजयी होशील, यांत मुळींच शंका नाहीं. किंबहुना तूं संग्रामांत या दिव्य चक्राचा ज्याच्यावर प्रयोग करशील, तो अमरहि जिवंत रहाणार नाहीं. मग इतरांची गोष्ट कशाला पाहिजे !

हे माधवा, याच्या नाभीमध्यें जें सूत्र आहे, त्याच्या योगानें तूं समरांगणांत शत्रूवर पुनः पुनः फेकलेलेंहि हें चक्र त्याला मारून पुनः तुझ्या हातीं येईल. त्याला दुसरें कोणतेंहि शस्त्र प्रतिबंध करूं शकणार नाहीं. वरुणानें त्या देवकीनंदनाला कौमोदकी गदा दिली. तिचा ध्वनि विजेच्या कडकडाटासारखा असून ती घोर गदा दैत्यांचा नाश करणारी होती. त्यानंतर हृष्ट झालेले कृष्णार्जुन

अग्नीला म्हणाले—" भगवन्, आम्ही कृतास्त्र, शस्त्रसंपन्न, रथी व ध्वजयुक्त झाल्यामुळें आतां सर्व सुरासुरांशींहि युद्ध करण्यास समर्थ आहों. मग तक्षकासाठीं आमच्याशीं युद्ध करण्याची इच्छा करणाऱ्या एका इंद्राशीं आम्ही अनायासानें युद्ध करूं, यांत काय संशय !"

अर्जुन म्हणाला—हा वीर्यवान् जनार्दन हातांत चक्र घेऊन युद्धामध्यें संचार करूं लागला, म्हणजे त्यानें सोडलेल्या या चक्रानें त्रिभुवनांतील कोणताहि जीव दग्ध झाल्यावांचून रहाणार नाहीं. त्याचप्रमाणें हें गांडीव धनुष्य व हे अक्षय्य भाते यांच्या साह्यानें मीहि सर्व लोकांना जिंकण्यास समर्थ आहें. यास्तव हे अग्ने, तूं आजच या खांडव वनाला सर्वतः व्यापून यथेच्छ प्रज्वलित हो. आम्ही दोघे तुला साह्य करण्यास समर्थ आहों.

राजा जनमेजया, दाशार्ह कृष्ण व कुंतीपुत्र अर्जुन यांनीं असें आश्वासन दिलें असतां भगवान् अग्नि तैजसरूप धारण करून खांडववन जाळण्यास प्रवृत्त झाला. तो त्या वनाला सर्वतः परिवेष्टित करून जाळूं लागला असतां प्रलयकालाचाच भास झाला.

राजा, अग्नीनें एकाच वेळीं आपल्या ज्वालांनीं खांडववनाला व्यापिलें असतां मेघगर्जनेप्रमाणें त्यांतून भयंकर ध्वनि निघूं लागला. तो ऐकून सर्व भूतें भयभीत झालीं. त्या वेळीं दग्ध होणाऱ्या त्या खांडववनाचें स्वरूप सूर्याच्या किरणांनीं सर्वतः व्याप्त झालेल्या मेरूप्रमाणें शोभलें. १. १८. २२५.

अध्याय २२६ वा.

[१ खांडववनदाह ऐकून इंद्राचा क्रोध.]

(१) वैशंपायन—हे नृपश्रेष्ठा, त्यानंतर ते श्रेष्ठ रथी कृष्णार्जुन दोन पृथक् रथांत बसले आणि ते दोघे त्या खांडववनाच्या दोन बाजूंस उभे राहून सर्व दिशांतील प्राण्यांचा भयंकर नाश करूं लागले. खांडववनांतील प्राणी ज्या दिशेनें पळून जात असलेले दिसत, त्या बाजूला हे दोघेहि वीर धांवत जाऊन त्यांचा वध करीत. त्या दोन रथांनीं वेगानें संचार करणारे ते दोघे अलातचक्राप्रमाणें गरगर फिरत असल्यामुळें त्यांतील अंतर कोणालाच दिसलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर तें एक रथाचें अविच्छिन्न वलयच आहे, असा भास झाला.

खांडववन पेटलें असतां हजारों प्राण्यांचे भयंकर आक्रोश सर्व बाजूंनीं ऐकूं येऊं लागले. त्यांतील कित्येकांच्या शरीराचा कांहीं भाग जळाला, कांहीं होरपळले, कित्येकांची दृष्टि गेली व ते अंध झाल्यामुळें भयंकर अग्निज्वालेंत पडून दग्ध झाले. कित्येक इतस्ततः पळूं लागले. कोणी आपल्या पुत्रांना, पित्यांना व भ्रात्यांना स्नेहानें आलिंगन देऊन एकमेकांस सोडण्यास समर्थ न झाल्यामुळें तेथेंच मरण पावले.

कित्येक दांत-ओंठ खाऊन मोठ्या सामर्थ्यानें वनांतून बाहेर उड्या टाकूं लागले, पण त्यांना मूर्च्छा आल्यामुळें ते पुनः अग्नीमध्येंच पडले. कित्येकांचे पंख जळाले, कित्येकांचे पाय होरपळले व त्यामुळें ते भूतलावर तडफडूं लागले. याप्रमाणें त्या वनांतील निरनिराळ्या भागीं जीवांचा भयंकर नाश होत असलेला सर्वत्र दिसला.

अग्नीच्या उष्णतेनें त्यांतील जलाशयांना कड आले व मत्स्य-कूर्मादि प्राणी त्यांत जणुंकाय शिजत आहेत असें भासलें. ज्यांचीं शरीरें अग्नीनें प्रदीप्त झालीं आहेत, असे देहवान् जीव मूर्तिमंत अग्नीसारखेच दिसले. कांहीं पक्ष्यादि प्राणी अंतरिक्षांत उडून जाण्याचा यत्न करूं लागले असतां अर्जुनानें आपल्या बाणांनीं त्यांचे तुकडे तुकडे करून त्यांस पुनः प्रदीप्त अग्नीमध्यें पाडविलें. अर्जुनाच्या तीक्ष्ण बाणांनीं ज्यांचीं शरीरें छिन्न-भिन्न झालीं आहेत, असे खांडववनांतील प्राणी भयंकर आक्रोश करून व वेगानें अग्निज्वालांतून बाहेर पडण्याचा यत्न करून पुनः त्यांतच पडले.

अर्जुनाच्या बाणांनीं ताडीत झालेले खांडववनांतील जीव संघानें आक्रोश करूं लागले असतां समुद्राच्या मंथनासारखा घोर ध्वनि सर्वत्र पसरला. त्या वेळीं अतिशय प्रदीप्त झालेल्या अग्नीच्या ज्वालाहि आकाशाला जाऊन भिडल्या. त्यामुळें स्वर्गस्थ देवांना मोठा उद्वेग झाला. त्या ज्वालांनीं सर्व देव ऋषींसह संतप्त झाले. ते सर्व महात्मे देवाधिदेव शतक्रतूकडे गेले आणि म्हणाले—“अग्नि आज सर्वच सृष्टीला जाळणार कीं काय ! हे देवेंद्रा, आज सर्व लोकांचा प्रलयकाल तर प्राप्त झाला नाहीं ना !”

राजा जनमेजया, देवांचें हें भाषण ऐकून इंद्रानें स्वतःच अग्नीचा आशय जाणला व तो खांडववनाच्या रक्षणासाठीं फार मोठ्या विचित्र रथसमूहासह तेथें आला. सर्व आकाशाला व्यापून त्यानें त्या पेटलेल्या वनावर वृष्टि करण्यास

आरंभ केला. इंद्रानें त्या वनावर मोठ्या त्वेषानें वृष्टि करण्याची आज्ञा केली असतां मेघ रथचक्राच्या आरांसारख्या हजारों धारांनीं वृष्टि करूं लागले.

पण त्या धारा खांडववनापर्यंत येऊन पोंचण्यापूर्वीच अग्नीच्या तेजानें अंतरिक्षांत सुकून गेल्या. त्या वनांत भडकलेल्या अग्नीपर्यंत जलाचा एक बिंदुहि येऊं शकला नाहीं. त्यामुळें नमुचिसूदन देवेंद्र अग्नीवर अत्यंत क्रुद्ध झाला व तो महामेघांच्या द्वारा विपुल जलवृष्टि करूं लागला. तेव्हां अग्नीच्या ज्वाला व मेघांची वृष्टि यांचा परस्परसंबंध झाल्यामुळें त्या वनांत धूम व विद्युत् यांचा भयंकर लोट उठला व मेघांनीं त्या वनाला सर्वतः व्यापून सोडिलें. १. १८. २२६.

अध्याय २२७ वा.

[१ खांडववनासमीप देव व कृष्णार्जुन यांचें युद्ध.]

(१) वैशंपायन—राजा जनमेजया, इंद्र अशा रीतीनें महावृष्टि करूं लागला असतां अर्जुनानें शरवृष्टीनें तिचें निवारण केलें. त्या वेळीं त्या बीभत्सूनें आपल्या उत्तमोत्तम अस्त्रांचा प्रयोग करून धुक्यानें चंद्र जसा आच्छादित होतो त्याप्रमाणें खांडववनाला आच्छादित केलें. त्याच्या त्या बाणाच्छादनांतून एकहि प्राणी बाहेर पडण्यास समर्थ झाला नाहीं. मोठ्या कौशल्यानें व त्वरेनें बाण सोडणाऱ्या अर्जुनानें जणुं काय अंतरिक्षांत छतच उत्पन्न केलें व त्याच्या खालीं अग्नीला तें वन यथेच्छ भक्षण करूं दिलें.

याप्रमाणें तें वन जाळलें जात असतां महा बलाढ्य नागराज तक्षक तेथें नव्हता. तो कुरुक्षेत्रांत गेला होता. तथापि त्याचा बलाढ्य पुत्र अश्वसेन तेथेंच होता. त्यानें अग्नीच्या मुखांतून सुटण्यासाठीं तीव्र यत्न केला, पण पार्थाच्या बाणांनीं प्रतिबंध केल्यामुळें तो तेथून बाहेर पडूं शकला नाहीं. तेव्हां त्याच्या मातेनें त्याला गिळून त्या प्राणसंकटांतून सोडविलें. तिनें त्याचें मस्तक प्रथम गिळलें व ती नागीण त्याला वांचविण्याच्या इच्छेनें त्याचें पुच्छ गिळून अग्नींतून बाहेर पडत आहे, तों पांडवानें तीक्ष्ण धारेच्या बाणानें तिचें मस्तक तोडिलें. तक्षकाची भार्या पुत्राला वांचविण्याच्या इच्छेनें अशा युक्तीनें बाहेर पडत असतां अर्जुनानें तिचा शिरश्छेद केलेला पाहून इंद्रानें तक्षकपुत्र अश्वसेनाला सोडविण्याच्या इच्छेनें अर्जुनाला झंझावातानें मोहित केलें व मोठ्या पराकाष्ठेनें अश्वसेनाला सोडविलें.

इंद्रानें उत्पन्न केलेली ती घोर माया पाहून व या नागानें आपल्याला फसविलें आहे असें जाणून अर्जुनानें आकाशामध्यें उड्डाण करणाऱ्या प्राण्यांचे दोन-दोन, तीन-तीन तुकडे केले व क्रुद्ध झालेला अग्नि, पार्थ व कृष्ण यांनीं त्या नागास 'तुझ्या वंशाचा उच्छेद होईल' असा शाप दिला.

नंतर इंद्रानें केलेली वंचना पाहून क्रुद्ध झालेला अर्जुन आपल्या शरांनीं सर्व आकाश व्यापून इंद्राबरोबर युद्ध करूं लागला. तेव्हां समरामध्यें क्षुब्ध झालेल्या त्याला पाहून इंद्रानेंहि सर्व आकाश आच्छादित करून आपलें तीव्र अस्त्र सोडलें. त्यामुळें सर्व समुद्राला क्षुब्ध करणारा सोसाट्याचा वायु मोठा शब्द करीत आकाशांत पसरला व त्यानें जलवृष्टि, विद्युत्पात व गडगडाट करणारे मेघ उत्पन्न केले.

तेव्हां अस्त्रविद्येंत विशारद असलेल्या पार्थानें मेघाला प्रतिकार करणारें वायव्यास्त्र मंत्रवून सोडलें. त्यायोगें इंद्रानें निर्माण केलेल्या मेघांचें सामर्थ्य नाहींसें झालें. सर्व जलधारा वाळून गेल्या, विजा लोपल्या व धूलियुक्त अंधकाराचा नाश होऊन एका क्षणांत आकाश निरभ्र व स्वच्छ झालें आणि सुखकर शीतल वायु वाहूं लागला. निष्प्रतिबंध झालेला सूर्य हृष्ट होऊन प्रकाशला व निर्विघ्न झालेला अग्नि नानाविध आकार धारण करून जागजागीं प्रज्वलित झाला. त्यांत अनेक प्राण्यांच्या शरीरांतील वसा पडल्यामुळें त्याच्या ज्वाळा अधिकच भडकल्या. याप्रमाणें त्या खांडववनांत अग्नि प्रज्वलित झाला असतां त्याचा महान् शब्द सगळ्या जगांत पसरला.

राजा, याप्रमाणें पार्थ व वासुदेव अग्नीचें रक्षण करीत असलेले पाहून आकाशांत गरुडादि पक्षी अभिमानानें एकत्र जमले. गरुडानें आपल्या वज्रतुल्य पंखांनीं, चोचीनें व नखांनीं कृष्ण व अर्जुन यांच्यावर प्रहार करण्याच्या हेतूनें झडप घातली. तसेंच, ज्यांचीं मुखें संतापानें रक्तवर्ण झालीं आहेत, असे सर्पांचे समूह त्या दोघां वीरांवर घोर विषाचा वर्षाव करण्यासाठीं त्यांच्या समीप आले. परंतु पार्थानें आपल्या रोषरूपी अग्नीनें युक्त केलेल्या बाणांचा वर्षाव करून त्या सर्वांचे तुकडे केले. तेव्हां ते सर्व आपल्या देहाचा नाश करण्यासाठीं त्या अग्नींतच येऊन पडले.

त्यानंतर असुर, गंधर्व, यक्ष, राक्षस व नाग कृष्णार्जुनांशीं युद्ध करण्यासाठीं भयंकर सिंहनाद करूं लागले व विविध शस्त्रास्त्रें हातांत घेऊन त्यांस मारण्या-

साठीं मोठ्या क्रोधानें त्यांच्या अंगावर धावून आले. तेव्हां भयंकर सिंहनाद व शस्त्रांचा वर्षाव करणाऱ्या त्या सर्वांचीं मस्तकें पार्थानें आपल्या तीक्ष्ण बाणांनीं छेदिलीं व शत्रूंचा नाश करणाऱ्या वासुदेवानें दैत्य व दानव यांच्या संघांचा भयंकर संहार केला. तेव्हां समुद्राच्या भयंकर भोंवऱ्यांत सांपडलेलें तृणादिक जसें तीरावर येऊन पडतें, तसे अस्त्रबलाच्या वेगानें भ्रमण करणारे असुरादिक कृष्णार्जुनाच्या समीप येऊन पडले. त्यानंतर अतिशय क्रुद्ध झालेला देवाधिपति इंद्र ऐरावतावर बसून कृष्णार्जुनांवर चाल करून आला व त्यानें मोठ्या वेगानें आपलें वज्र व अशनि घेऊन तीं त्या दोघांवर सोडिलीं आणि पार्थ व वासुदेव हे दोघेहि मरण पावले, असें त्यानें देवांना सांगितलें. इंद्रानें वज्र उचललेलें पाहतांच इतर सर्व देवहि आपापलीं आयुधें घेऊन सज्ज झाले.

हे राजन्, यमानें कालदंड घेतला. कुबेरानें गदा धारण केली. वरुणानें पाश हातीं घेतला. स्कंद 'अशनि'-संज्ञक महाशक्ति धारण करून 'मेरु'-पर्वतासारखा अचल होऊन उभा राहिला. अश्विनिकुमारांनीं दिव्य औषधि ग्रहण केल्या. ब्रह्मदेवानें धनुष्य व जयानें मुसल हातीं घेतलें. महा बलाढ्य विश्वकर्म्यानें क्रुद्ध होऊन पर्वत उचलून घेतला. अंशानें शक्ति, मृत्युदेवानें परश्वध, अर्यमानें परिघ व मित्रानें अनेक तीक्ष्ण पात्यांनीं युक्त असलेलें चक्र घेतलें व ते सर्व सज्ज झाले.

हे नृपश्रेष्ठा, पूषा, भग व सविता हेहि संतप्त होऊन आणि धनुष्यें व खड्ग हातीं घेऊन कृष्णार्जुनांवर धांवले. त्याचप्रमाणें रुद्र, वसु, महा बलवान् मरुत, विश्वेदेव, स्वतःच्या तेजानें देदीप्यमान होणारे साध्य व आणखीहि असंख्य देव त्या दोघां पुरुषोत्तम पार्थ-गोविंदांचा प्राण घेण्यासाठीं त्यांच्यावर चाल करून आले. त्या वेळीं प्रलयकालासारखीं उल्कापातादि दुश्चिह्नें होऊं लागलीं.

इंद्र सर्व देवांसह अत्यंत क्रुद्ध होऊन आपल्यावर चाल करून येत आहे, हें पहातांच ते दोघे अजिंक्य वीर आपलीं धनुष्यें सज्ज करून उभे राहिले व ते दोघेहि युद्धविशारद योद्धे त्या सर्व देवांवर आपल्या वज्रतुल्य बाणांचा वर्षाव करूं लागले. तेव्हां ज्यांचा सर्व प्रयत्न निष्फल झाला आहे असे समस्त देव अनेकदा पराभव पावून, शेवटीं रणांगणाचा त्याग करून भयानें इंद्राच्या आश्रयाला गेले.

अशाप्रकारें अर्जुन व माधव यांनीं देवांचा पराभव केलेला पाहून अंतरिक्षांत स्थित असलेल्या सर्व मुनींना विस्मय वाटला. त्यांचें संग्रामांतील अतुल वीर्य

पुनः पुनः अवलोकन करून इंद्र अतिशय संतुष्ट झाला व त्यांच्याशीं पुनः युद्ध करूं लागला. सव्यसाची अर्जुनाचें वीर्य पुनः पहाण्याच्या इच्छेनें त्या देवेंद्रानें त्याच्यावर फार मोठी पाषाणवृष्टि केली. पण इंद्रपुत्र अर्जुनानें मोठ्या क्रोधानें आपल्या बाणांनीं तिला पूर्णपणें प्रतीकार केला.

तेव्हां आपला यत्न निष्फल झाला आहे, असें पाहून इंद्रानें पुनः जिज्ञासेनें पाषाणवृष्टि अधिक वाढविली. पण त्या यशस्वी पांडुपुत्रानें अति वेगवान् बाणांनीं त्यांतील प्रत्येक पाषाणाचें चूर्ण करून सोडलें. तें पाहून इंद्रालाहि मोठा हर्ष झाला. नंतर त्या देवेंद्रानें पांडुनंदनाला मारण्याच्या इच्छेनें आपल्या दोन्ही हातांनीं वृक्षांसह मंदरपर्वताचें फार मोठें शिखर उपटून अर्जुनाच्या मस्तकावर फेकलें.

परंतु त्या बलाढ्य व अस्त्रकुशल अर्जुनानें ज्यांचीं अग्रें प्रदीप्त झालीं आहेत, अशा सरळ जाणाऱ्या वेगवान् बाणांनीं त्या पर्वतशिखराचेहि हजारों तुकडे केले. तेव्हां छिन्न-भिन्न होणाऱ्या त्या पर्वतशिखराचें स्वरूप सूर्य, चंद्र व ग्रह यांसह विशीर्ण होणाऱ्या आकाशासारखें भासलें. खांडववनावर छिन्न-भिन्न होऊन पडणाऱ्या त्या विशाल पर्वतशिखराखालीं तेथील अनेक प्राणी चेंगरून मरण पावले. १. १८. २२७.

येथें अठरावें खांडवदाहपर्व समाप्त झालें.

मयदर्शनपर्व १९.

अध्याय २२८ वा.

[१ देवादिकांचा पराभव व खांडववनाचा पूर्णपणें दाह.]

(१) **वैशंपायन**—हे कुरुनंदना, त्या पर्वताचें शिखर पडतांच खांडववनांत रहाणारे सर्व दानव, राक्षस, नाग, तरसें, आस्वलें, मत्त हत्ति, वाघ, सिंह हरिणें, रानरेडे, शरभ, पक्षी व इतर अनेक जातीचे प्राणी भीतीनें पळूं लागले. ते दीन मुखानें त्या वनाकडे व सशस्त्र कृष्णार्जुनांकडे पाहूं लागले. तें शिखर पडतांना जो प्रचंड शब्द झाला, त्यामुळें सर्व प्राणी घाबरून देहभान विसरले. तेव्हां त्यांना तें सर्व वन चोहोंकडून जळत असलेलें दिसलें व कृष्ण अस्त्र सज्ज

करून तेथें उभा असलेला त्यांच्या दृष्टीं पडला. तेव्हां ते त्रस्त झालेले जीव भयंकर आक्रोश करूं लागले. त्यांचें तें ओरडणें व भडकलेल्या अग्नीचा भयंकर शब्द आकाशांत प्रलयकालच्या मेघगर्जनेप्रमाणें पसरला.

इतक्यांत महाबाहु श्रीकृष्णानें स्वतःच्या तेजानें प्रकाशित झालेलें उग्र चक्र त्यांच्या नाशार्थ सोडिलें. त्यामुळें दानव, राक्षस व इतर सर्व क्षुद्र जंतू यांचा संहार होऊन ते सर्व अग्नींत जाऊन पडले. त्या वेळीं कृष्णाच्या चक्रानें विदीर्ण झालेलीं दैत्यांचीं शरीरें वसा व रक्त यांनीं माखल्यामुळें आकाशांतील सायंकालाच्या मेघांप्रमाणें आरक्त दिसूं लागलीं.

हे भारता, त्या समयीं तो वार्ष्णेय केशव साक्षात् काळाप्रमाणें हजारों पिशाच, पक्षी, नाग व इतर पशु यांचा संहार करीत तेथें फिरत होता. त्या शत्रुनाशक वासुदेवानें पुनः पुनः फेकलेलें तें चक्र अनेक प्राण्यांना छिन्न-भिन्न करून पुनरपि त्याच्या हातांत येत असे. पिशाच, राक्षस व नाग यांस मारणाऱ्या त्या सर्व भूतात्म्या कृष्णाचें स्वरूप अत्युग्र झालें.

तेथें एकत्र जमलेल्या सर्वदानवांमध्यें संग्रामांत कृष्ण व अर्जुन यांस जिंकील असा एकहि नव्हता. देवहि त्या दोघांपासून खांडववनाचें स्वबलानें रक्षण करण्यास समर्थ झाले नाहींत. उलट या दोन वीरांपुढें आपलें कांहीं सामर्थ्य चालत नाहीं, असें पाहून ते सव युद्धापासून पराङ्मुख झाले. सर्व देवगण विमुख झाले आहेत, असें पाहून हे राजा, इंद्र अतिशय संतुष्ट झाला व तो केशवार्जुनांची प्रशंसा करूं लागला.

सर्व देव युद्ध सोडून निवृत्त झाले असतां आकाशवाणी इंद्राला संबोधून अति गंभीर ध्वनीनें म्हणाली—" हे देवेंद्रा, तुझा सखा नागोत्तम तक्षक या खांडववनांत नाहीं. या वनाच्या दाहसमयींच तो कुरुक्षेत्राला निघून गेला आहे. शिवाय हे वासवा, तुला कृष्ण व अर्जुन यांना युद्धांत जिंकतां येणार नाहीं. हे स्वर्गलोकांत प्रसिद्ध असलेले पूर्व देव नर-नारायण आहेत, हें तूं माझ्या वचनावरून निश्चित जाण. त्या नर-नारायणांचा पराक्रम व वीर्य किती आहे, हें तुलाहि माहित आहेच. हे पुराण ऋषिश्रेष्ठ युद्धामध्यें अजित असल्यामुळें त्रिभुवनांत कोठेंहि व कोणाच्याहि हातून पराभूत होणें शक्य नाहीं. देव, दानव, यक्ष, राक्षस, गंधर्व, किन्नर, नर, पन्नग या सर्वांना हे दोघेहि अतिशय पूज्य आहेत. यास्तव हे देवेंद्रा, खांडववनाचा दाह दैवप्राप्त आहे, असें समजून तूं देवांसह निघून जा."

अशा प्रकारची देववाणी ऐकून इंद्रानें क्रोध व मत्सर टाकून अमरावतीस प्रयाण केलें. अमरेश्वराला परत जात असलेलें पाहून इतर सर्व देवगण आपापल्या सैन्यासह त्यालाच अनुसरले. देवांसह इंद्र युद्धापासून निवृत्त झाला आहे असें पाहतांच कृष्णार्जुनांनीं सिंहनाद केला व इंद्र परत गेल्यामुळें संतुष्ट झालेल्या त्या दोघां वीरांनीं अग्नीला तें वन निःशंकपणें दग्ध करूं दिलें.

वायु जसा मेघांना दूर घालवितो, तसें अर्जुनानें त्या देवांना पळावयास लावल्यानंतर त्या वनांतील प्राण्यांनाहि त्यानें शरसंघातांनीं विद्ध केलें. तो सव्यसाची पार्थ बाणांचा वर्षाव करूं लागला असतां कोणताहि प्राणी तेथून पळून जाण्यास समर्थ झाला नाहीं. त्याचीं अमोघ अस्त्रें पाहून कोणीहि बलाढ्य प्राणी त्याच्याकडे नुस्तें पाहूं शकला नाहीं. मग रणांगणांत जाऊन त्याच्याशीं युद्ध कोठून करणार !

पार्थानें केव्हां एका बाणानें शेकडों पक्ष्यांना वेध केला, तर केव्हां एकाच पक्ष्यावर शंभर बाण सोडले. त्यावेळीं ते प्राणी साक्षात् कालानेंच मारल्याप्रमाणें गतप्राण होऊन अग्नींत पडले. कृष्णार्जुनांकडून असा प्रतिबंध झाल्यामुळें खांडववनांतील एकाहि प्राण्याला सुखानें बाहेर पडतां आलें नाहीं. पितर व देव यांच्या लोकींहि खांडववनांतील अग्नीचा ताप जाऊन पोंचला. त्यामुळें त्यांचीं अंगें भाजूं लागलीं. अशाप्रकारें प्राण्यांचा नाश होऊं लागल्यामुळें ते सर्व दीन होऊन आक्रोश करूं लागले. हत्ती, हरिणें व तरसें मोठ्यानें ओरडूं लागलीं. त्यांचा शब्द ऐकून दूर असलेल्या गंगेंतील व सागरांतील जलचर, विद्याधर व त्या वनांतील प्राणीहि भयभीत झाले. परंतु अर्जुनाकडे किंवा कृष्णाकडे पहाण्यास कोणी समर्थ झाला नाहीं. मग त्यांच्यांशीं युद्ध करणें तर दूरच राहिलें !

तेथें कांहीं राक्षस, दानव व नाग संघानें रहात होते. ते सर्व एका संघानें त्यांच्यावर धावून आले, पण त्यांसहि वासुदेवानें आपल्या चक्रानें गतप्राण केलें. ज्यांचीं मस्तकें व देह चक्राच्या वेगानें छिन्न-भिन्न झालीं आहेत असे ते सर्व धिप्पाड राक्षसादि भयंकर प्राणी प्रदीप्त अग्नीमध्यें पडले.

याप्रमाणें मांस, रक्त व वसा यांच्या प्रवाहांनीं तृप्त झालेला तो अग्नि प्रदीप्त होऊन त्याच्या ज्वाला आकाशाला स्पर्श करूं लागल्या. तो धूमरहित झाला. प्रदीप्त झालेले त्याचे नेत्र, जिह्वा व मुख आरक्त दिसूं लागलीं. श्रीकृष्णार्जुनांनीं दिलेल्या भोजनानें तो हुताशन हृष्ट, तृप्त व शांत झाला.

इतक्यांत तक्षकाच्या गृहांतून 'मय'-नामक एक असुर पळून जात असलेला मधुसूदनानें पाहिला. तेव्हां त्याला जाळण्याची इच्छा करणाऱ्या अग्नीनें प्रज्वलित होऊन मेघाप्रमाणें शब्द करीत श्रीकृष्णाची प्रार्थना केली. त्या वेळीं हा दानवांचा श्रेष्ठ शिल्पी पळून जात आहे, हें जाणून वासुदेवानें आपलें चक्र उचलिलें. पण तें पाजळलेलें चक्र व दग्ध करण्यासाठीं प्रज्वलित झालेला अग्नि यांस पाहून तो मय अर्जुनाकडे धांवत गेला आणि 'माझें रक्षण कर' असें म्हणाला. तेव्हां दयाळु अर्जुनानें भ्यालेल्या मयाचें तें दीन वचन ऐकून त्याला 'भीऊं नकोस' असें अभय दिलें. याप्रमाणें त्या नमुचीच्या भ्रात्याला धनंजयानें अभय दिलें असतां कृष्णानें त्याला मारण्याची इच्छा केली नाहीं आणि अग्नीनेंहि त्याला जाळिलें नाहीं.

हे राजन्, अशाप्रकारें कृष्णार्जुनांनीं इंद्रापासून अग्नीचें रक्षण केलें असतां तो पंधरा दिवस तें वन दग्ध करीत होता. त्यामुळें त्या महा खांडववनांतील सर्व प्राण्यांचा संहार जरी झाला, तरी अश्वसेन, मयासुर व चार शार्ङ्गक पक्षी यांना मात्र अग्नीनें जाळलें नाहीं. १. १९. २२८.

अध्याय २२९ वा.

[१ शार्ङ्गकांचा वृत्तान्त.]

(१) जनमेजय—हे विप्रश्रेष्ठा, अग्नीनें तें वन जाळलें असतां शार्ङ्गकांस कां दग्ध केलें नाहीं, हें मला सांग. अश्वसेन व मयासुर यांना न जाळण्याचें कारण तूं सांगितलेंस; पण हे ब्रह्मन्, शार्ङ्गकांस कां सोडिलें तें सांगितलें नाहींस. अग्नीच्या मुखांतून ते जिवंत सुटणें हें मोठें आश्चर्यच आहे. यास्तव अग्नीनें त्यांचा नाश कां केला नाहीं, तें मला यथार्थ सांग.

वैशंपायन—हे भारता, अग्नीनें शार्ङ्गकांस कां जाळलें नाहीं, त्याचा सर्व वृत्तान्त मी तुला सविस्तर सांगतों, ऐक. पूर्वी 'मंदपाल'-नामक एक प्रख्यात महर्षि होता. तो धर्मज्ञांमध्यें श्रेष्ठ व तपस्वी असून तीव्र व्रतें आचरीत असे. ऊर्ध्वरेत्या ब्रह्मचारी ऋषींच्या मार्गाचा आश्रय करून तो स्वाध्याय, धर्माचरण, तप व ब्रह्मचर्य यांत तत्पर असे. त्यामुळें देहत्याग करून तो पितृलोकीं गेला. पण हे राजा, त्याला तेथें त्याच्या तपाचें फल मिळालें नाहीं.

तेव्हां आपण तपश्चर्येनें मिळविलेल्या लोकांचें फलहि आपणांस प्राप्त झालें नाहीं, हें पाहून त्यानें यमधर्मासमीप बसलेल्या देवतांना असा प्रश्न केला— "हे देवांनों, मी माझ्या तपानें संपादन केलेल्या लोकांतील दिव्य भोग मला कां मिळूं नयेत ? भूलोकांत मी असें कोणतें कर्म केलें नाहीं कीं, ज्यामुळें मला येथील भोग प्राप्त होऊं नयेत, तें मला सांगा. म्हणजे मी पुनः भूलोकीं जाऊन तें कर्म आचरीन. मीं केलेल्या तपाचें कोणतें फल आहे, तेंहि मला सांगा."

देव—हे मुनिश्रेष्ठा, मानव कोणत्या ऋणांनीं बद्ध होतात, तें ऐक. मनुष्य-प्राणी क्रिया, ब्रह्मचर्य व प्रजा या तीन ऋणांनीं युक्त असतो. तो यज्ञ, तप व पुत्र यांच्या योगें त्या तीन ऋणांतून मुक्त होतो. तूं यांतील तीव्र तपश्चर्या व यज्ञ केले आहेस; परंतु तुला संतति नसल्यामुळें पुण्यलोकींचे भोग प्राप्त झाले नाहींत. यास्तव तूं अपत्य उत्पन्न कर, म्हणजे तुला श्रेष्ठ लोकांची प्राप्ति होईल. 'पुत्र आपल्या पितरांना 'पुन्नामक'-नरकापासून मुक्त करितो' अशी श्रुति आहे. यास्तव तूं संतानवृद्धीसाठीं यत्न कर.

हे पारिक्षिता, देवांचें हें वचन ऐकून तो मंदपाल ऋषि 'कोणत्या योनींत अल्पावधींत पुष्कळ संतति उत्पन्न होईल बरें !' याचा विचार करूं लागला. तेव्हां पक्ष्यांना विपुल संतति असते, हें त्याच्या लक्षांत आलें. म्हणून तो शार्ङ्गक पक्षी झाला व त्यानें 'जरिता'-शार्ङ्गिकेच्या समागमानें चार पुत्र उत्पन्न केले. ते चौघेहि पुत्र ब्रह्मवेत्ते होते. ते चारहि बालक अंडावस्थेंत असतांनाच त्यांना त्यांच्या मातेसह त्या वनांत सोडून तो मुनि 'लपिता'-नामक दुसऱ्या भार्येकडे निघून गेला.

हे भारता, ऋषि आपणास सोडून गेला, हें पहातांच त्या साध्वी जरितेला अतिशय खेद झाला. अंडावस्थेंत असलेल्या बालकांना वनांत एकटें टाकून जाणें मुनीला अयोग्य होतें, तरी तो निघून गेला; परंतु शोकार्त झालेली जरिता अपत्यस्नेहामुळें त्याच्या मागोमाग गेली नाहीं. त्या अंड्यांतून पिलें बाहेर पडतांच तिनें चारा आणून मोठ्या वात्सल्यानें त्यांचें रक्षण केलें.

त्यानंतर कांहीं कालानें तो ऋषि मंदपाल लपितेसह त्या वनांत संचार करीत असतां, खांडववन जाळण्यासाठीं येत असलेल्या अग्नीला त्यानें पाहिलें. अग्नीचा संकल्प कळतांच त्याला आपल्या बालकांचें स्मरण झालें व त्यांचा नाश होऊं

नये म्हणून त्या अतिशय सामर्थ्यवान् लोकपाल अग्नीला त्या ब्राह्मणश्रेष्ठानें स्तुतीनें संतुष्ट केलें.

तो म्हणाला—हे पावका, तूं सर्व लोकांचें मुख आहेस. जीवरूपानें तूं भोक्ता आहेस. तूं यज्ञांतील हव्याला देवांकडे पोंचविणारा हव्यवाट् आहेस. तूं सर्व भूतांच्या अंतःकरणांत ब्रह्मरूपानें गूढ रहातोस. म्हणजे तूं इंद्रियादिकांचा विषय होत नाहींस. विद्वान् लोक तुला एक म्हणतात व कोणी 'दिव्य, भौम व औदर्य असा तूं त्रिविध आहेस,' असें सांगतात. यज्ञामध्यें तूं पंचभूतें, चंद्र, सूर्य व यजमान असा आठ प्रकारचा होऊन यज्ञाचें संपादन करितोस, असेंहि कित्येक म्हणतात. तूंच या विश्वाला उत्पन्न केलेंस, असें श्रेष्ठ ऋषि सांगतात.

हे अग्ने, सद्रूप असलेल्या तुझ्यावांचून हें सर्व जगत् तत्काल नाश पावेल. ब्राह्मण तुला वंदन करूनच पत्नी व पुत्र यांसह स्वकर्मानें संपादन केलेल्या शाश्वत गतीला प्राप्त होतात. आकाशामध्यें संचार करणारे विद्युद्युक्त मेघहि तूंच आहेस. तुझ्यापासून निघालेल्या ज्वाला सर्व भूतांना जाळतात.

हे तेजस्विन्, तूंच हें सर्व विश्व उत्पन्न केलें आहेस. कर्माचें विधान करणारा वेद हें तुझेंच वाक्य आहे. सर्व चराचर भूतें तूंच आहेस. तूंच सद्रूप ईश्वरानें आकाशादि पंचमहाभूतें उत्पन्न केलींस व हें सर्व जगत् तुझ्याच आधारानें स्थित आहे. हव्य-कव्यादि सर्व देव-पितृकार्यें तुझ्या ठिकाणींच प्रतिष्ठित आहेत. त्यांचा भोक्ता व फलदाताहि तूंच आहेस. हे देवा, तूंच अग्नि, धाता, बृहस्पति, अश्विनिकुमार, यम, मित्र, सोम व वायु आहेस.

राजा, त्या मंदपाल मुनीनें अशी स्तुति केली असतां अग्नि त्या अति तेजस्वी मुनीवर प्रसन्न झाला व 'हे मुने, मी तुझें कोणतें इष्ट करूं तें सांग' असें बोलला. तेव्हां मंदपाल मुनि हात जोडून—'भगवन्, खांडववनाला जाळीत असतांना तूं माझ्या पुत्रांचे प्राण वांचीव' असें त्यास म्हणाला. तें ऐकून 'ठीक आहे' असें बोलून अग्नीनें खांडववनाला जाळते वेळीं या शार्ङ्गकांना दग्ध केलें नाहीं. १. १९. २२९.

अध्याय २३० वा.

[१ जरिता व शार्ङ्गक यांचा प्राणरक्षणोपायाविषयीं संवाद.]

(१) वैशंपायन—राजा परिक्षित्पुत्रा, त्यानंतर खांडववन दग्ध करण्यासाठीं अग्नि जेव्हां तेथें प्रज्वलित झाला, तेव्हां त्या वनांत रहाणारे ते चौघे शार्ङ्गक अतिशय दुःखित झाले. त्यांना कोणीच त्राता दिसेना. त्यांची तपस्विनी जरिता-माता शोकविह्वल होऊन विलाप करूं लागली.

ती म्हणाली—हा प्रज्वलित झालेला भीषण अग्नि या वनाला जाळीत इकडेच येत आहे. सर्व जगाला दीप्त करणारा हा देव माझें दुःख वाढवीत आहे. कारण माझीं हीं अर्भकें अद्यापि मूढ आहेत. त्यांना अजून पंख व पाय फुटले नाहींत. हीं अपत्यें आमच्या पूर्वजांचा आधार आहेत. हे माझे पुत्र आमच्या पितरांचें नरकापासून रक्षण करणारे आहेत. पण हा भगवान् अग्नि मोठमोठ्या वृक्षांना दग्ध करीत इकडेच येत आहे. आतां या माझ्या पुत्रांची काय गति होईल! खरोखर पुत्रस्नेह मला व्याकुळ करीत आहे व हा अग्नि तर समर्थ जीवांच्याहि मनास उद्विग्न करीत आहे. माझ्या पुत्रांना पंख आले नसल्यामुळें ते माझ्या मागून येण्यास समर्थ नाहींत. यांना उचलून न्यावें तर माझ्यामध्यें तेवढें सामर्थ्य नाहीं व या माझ्या प्रिय बालकांना येथें सोडून जाण्याचेंहि धैर्य होत नाहीं. खरोखर माझ्या मनाला अतिशय क्लेश होत आहेत. मला प्रिय असलेल्या या चार पुत्रांतील मी कोणाला टाकूं व कोणाला घेऊन जाऊं!

बाळांनो, तुम्ही तरी मला कांहीं उपाय सुचवा. मीं काय केलें असतां तुमचें रक्षण व माझें समाधान होईल! या अग्नीच्या मुखांतून तुम्हांला सोड-विण्याचा मीं पुष्कळ विचार केला, पण मला कांहीं उपाय सुचत नाहीं. आतां तुम्हांला आपल्या पंखाखालीं झांकून घेऊन मी तुमच्या बरोबरच मरून जाईन.

वत्सांनो, तुम्ही अंड्यांतून बाहेर येण्यापूर्वींच 'तुमच्यांतील ज्येष्ठ भ्राता जो जरितारि त्याच्यावर हें कुल अवलंबून राहील. दुसरा सारिसृक्क संतति उत्पन्न करून पितृकुलाची वृद्धि करील. तिसरा स्तंबमित्र तपाचरण करील व चौथा द्रोण श्रेष्ठ ब्रह्मवेत्ता होईल' असें सांगून तुमचा निष्ठुर पिता निघून गेला. आतां या संकटांतून कसें बरें पार पडावें! काय केलें असतां मी कृतकार्य होईन!

हे राजा, असें म्हणून ती जरिता अतिशय विह्वल झाली. तिला आपल्या पुत्रांना अग्नीपासून मुक्त करण्याचा कांहीं उपाय सूचेना. तेव्हां असें बोलून व्याकुल झालेल्या आपल्या मातेला शार्ङ्गक म्हणाले—"हे माते, तूं आतां आमच्यावरील स्नेह सोडून दे व जेथें अग्नि नसेल तेथें जा. कारण आमचा जरी नाश झाला तरी तुला दुसरे पुत्र होतील. परंतु तूं नष्ट झालीस तर आमच्या कुलाचाच विच्छेद होईल. यास्तव या दोन्ही गोष्टींचा विचार करून ज्यायोगें आपल्या कुलाचा क्षय होणार नाहीं असें कर. सर्व कुलाचा विनाश होण्याचा प्रसंग आला असतां पुत्रस्नेह धरूं नकोस. आमच्या पित्यानें संततीसाठीं केलेला स्त्रीपरिग्रह व्यर्थ न होवो."

पुत्रांचें हें भाषण ऐकून जरिता म्हणाली—बाळांनों, या वृक्षाच्या समीप भूमीमध्यें उंदराचें एक बिळ आहे. त्यांत तुम्हीं सत्वर प्रवेश करा. तेथें तुम्हांला वह्नीचें भय नाहीं. तुम्हीं आंत गेलांत म्हणजे मी तें बिळ धुळीनें झांकून टाकीन व अग्नीपासून तुमचें रक्षण होईल आणि अग्नि निवृत्त झाल्यावर मी त्या बिळा-वरील मातीची रास दूर करून तुम्हाला बाहेर काढीन. वत्सांनो, अग्नीपासून मुक्त होण्याचा हा उपाय तुम्हांला रुचतो का ?

यावर शार्ङ्गक म्हणाले—हे जननि, आम्हांला अद्यापि पंख फुटले नाहींत. आम्ही केवळ मांसाचे गोळे आहोंत. तेव्हां कच्चें मांस खाणारे उंदिर आम्हांला भक्षण करतील, यांत संशयच नाहीं. हें भय प्रत्यक्ष पहात असतां त्या बिळांत प्रवेश करण्यास आमचें मन धजत नाहीं.

हे माते, अग्नीनें आम्हांला जाळूं नये म्हणून काय करावें ? उंदीर आमचा नाश करणार नाहींत, असा कोणता उपाय योजावा ? आमच्या पित्याचा हेतु निष्फल न होण्यास काय युक्ति करावी ? कोणत्या मार्गानें आमच्या मातेचें जीवित वांचवितां येईल, हा मोठा विचार पडला आहे. बिळांत प्रवेश केला तर उंदीर आमचा नाश करतील व बाहेर राहिलों तर अग्नि दग्ध करील. या दोन संकटांचा विचार केला असतां दग्ध होऊन मरणेंच अधिक बरें. दुसऱ्याचें भक्ष्य होणें योग्य नव्हे. उंदराच्या बिळांत शिरल्यास त्याच्या भक्ष्यस्थानीं पडून निंद्य मरण येईल. त्यापेक्षां अग्नीमध्यें देहत्याग करणें अधिक श्रेयस्कर आहे. १. १९. २३०.

अध्याय २३१ वा.

[१ पुत्रांच्या आग्रहानें जरितेचें खांडववनांतून गमन.]

(१) वैशंपायन—राजा, याप्रमाणें त्या शार्ङ्गकांचें भाषण ऐकून जरिता म्हणाली—" बाळांनों, या बिळांत रहाणारा उंदीर बाहेर आला असतां, त्यावर श्येनपक्ष्यानें झडप घातली व त्या क्षुद्र प्राण्याला आपल्या पायांत धरून तो उडून गेला. तेव्हां तुम्हांला आतां त्या बिळांत उंदराचें भय बाळगण्याचें कारण नाहीं. "

शार्ङ्गक म्हणाले—हे माते, श्येनानें उंदीर नेल्याचें आम्हांला माहीत नाहीं आणि जरी त्यानें एक उंदीर नेला असला, तरी त्या बिळांत दुसरे उंदीर असतील. त्यांच्यापासून आम्हांला भय आहेच. शिवाय अग्नि येथपर्यंत वनाला जाळीत येईल किंवा नाहीं, याचा संशयच आहे; कारण वायूमुळें अग्नि निवृत्त होत असतो, हें प्रसिद्धच आहे. पण आम्ही बिळांत शिरलों तर मात्र तेथील प्राण्यांकडून आम्हांला निःसंशय मृत्यु येईल. यास्तव हे माते, निश्चित मृत्यु येण्याच्या स्थानापेक्षां मृत्यूविषयीं संशयित असलेलें स्थान अधिक श्रेष्ठ असल्यामुळें आम्हीं येथेंच रहातों व तूं आकाशांत उडून जा. तुला आमच्याहूनहि उत्तम पुत्र होतील.

जरिता—हे वत्सांनो, तो बलाढ्य श्येनपक्षी त्या बिळांतील उंदराला वेगानें घेऊन जात असतांना मीं प्रत्यक्ष पाहिलें आणि तो मोठ्या वेगानें उडत असतां मी त्याच्या मागोमाग गेलें व बिळांतून उंदीराला उचलून नेणाऱ्या त्याला असा आशीर्वाद दिला—" हे श्येनराज, तूं आमच्या शत्रूला उचलून नेत आहेस, यास्तव तूं देवलोकीं स्थिर होऊन शत्रुरहित व दिव्य देह धारण करणारा हो. "

त्यानंतर श्येनपक्ष्यानें जेव्हां त्या उंदराला पूर्णपणें भक्षण केलें तेव्हांच मी त्याची आज्ञा घेऊन पुनः स्वगृहीं परत आलें. यास्तव, हे पुत्रांनो, तुम्ही निःशंकपणें या बिळांत शिरा. तुम्हांला येथें कोणाचेंहि भय नाहीं. महात्म्या श्येनानें माझ्या डोळ्यांदेखत यांतील उंदराला आकाशांत नेऊन भक्षण केलें आहे.

शार्ङ्गक म्हणाले—हे जननि, श्येनानें यांतील उंदराला येथून नेल्याचें आम्हांला विदित नाहीं व त्याविषयीं मनांत संशय असतांना आम्ही या भूछिद्रांत प्रवेश करण्यास समर्थ नाहीं.

जरिता—पुत्रांनो, श्येनानें यांतील मूषिकाला भक्षण केलेलें मीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. त्यामुळें तुम्हांला येथें मुळींच भय नाहीं. बाळांनों, माझें हें वचन तुम्ही मान्य करा.

शार्ङ्गक—माते, आम्हांला सोडून जाण्याची तुझी इच्छा आहे; पण अशा मिथ्या उपचारानें आम्हांला भयापासून सोडविण्याची युक्ति तूं योजूं नकोस. बिळामध्यें प्रवेश करणें हा संदिग्ध उपाय आहे. तो केल्यास आम्हीं बुद्धिमानांसारखें आचरण केलें, असें कधींहि होणार नाहीं. कारण या बिळामध्यें आमचा शत्रु असण्याचा संभव आहे, अशी शंका असतांना त्यांत प्रवेश करणें सर्वथा अयुक्त आहे. असलें साहस आम्ही कधींहि करणार नाहीं. आम्ही तुझ्यावर यापूर्वी कांहीं उपकार केलेले नाहींत व पुढेंहि ते करूंच असाहि निश्चय नाहीं. असें असतांना आम्हांकडून पीडिली जाणारी तूं आमचें रक्षण कशाला करतेस! आम्ही तुझे कोण व तूं तरी आमची कोण! हा आपला संबंध भ्रांतिमूलक आहे. हे जननि, तूं तरुण, सुंदर व पतीचा मनोरथ पूर्ण करण्यास समर्थ आहेस. यास्तव तूं आपल्या पतीकडे जा. तुला आणखीहि सुंदर पुत्र होतील. आम्ही अग्नीमध्यें प्रवेश करून उत्तम लोकास प्राप्त होऊं. कदाचित् अग्नीनें आम्हांला नच जाळल्यास तूं पुनरपि आम्हांकडे ये.

वैशंपायन—राजा, पुत्रांनीं असा उपदेश केला असतां जरिता आपल्या चारी पुत्रांना खांडववनांत सोडून जेथें अग्नीची पीडा होणार नाहीं अशा निर्भय स्थानीं त्वरेनें गेली. त्यानंतर ज्याच्या ज्वाला अतिशय तीक्ष्ण आहेत, असा अग्नि मंदपाल-ऋषीचे शार्ङ्गपुत्र जेथें होते, तेथें सत्वर आला. तो भगवान् हव्यवाहन प्रज्वलित झाला आहे, असें पाहून ते चारी पक्षी भयभीत झाले. पण त्यांतील ज्येष्ठ भ्राता जरितारी अग्नीची स्तुति करूं लागला. १. १९. २३१.

अध्याय २३२ वा.

[१ जरितारिप्रभृति शार्ङ्गकांनीं केलेली अग्नीची स्तुति. २ प्रसन्न झालेल्या अग्नीनें केलेलें त्यांचें रक्षण.]

(१) जरितारि—बुद्धिमान् पुरुष संकटकाल प्राप्त होणाच्या पूर्वीच दक्ष असतो. तो मरणकालापूर्वींच ज्ञानासाठीं यत्न करितो, त्यामुळें मरणकाल प्राप्त

---

१ महामोहरूपी अग्नीनें व्यापिलेल्या या संसारमहारण्यांत माता, पिता इत्यादि

झाला असतां तो व्यथा पावत नाहीं. ज्ञानी पुरुषाला मरणाची व्यथा कधींच होत नाहीं. पण याच्या उलट जो पुरुष आपल्या चित्ताला स्वाधीन ठेवीत नाहीं त्याला मरणकाल आपल्या पाठीमागें लागला आहे, हें कळत नाहीं. त्यामुळें तो मरणप्रसंग ओढवला असतां दुःखानें व्याकुळ होतो व कर्माधीन झालेल्या त्याला मोक्षाख्य परम श्रेय कधींच प्राप्त होत नाहीं.

सारिसृक्क म्हणाला—हे भ्रात्या, सत्संगामुळेंच मरणव्यथा निवृत्त होते. तूं योगी व ज्ञानी आहेस. तूं ध्यान करितोस व ऊहापोह करण्यांतहि कुशल आहेस. आम्हांवर हें प्राणसंकट ओढवलें आहे. तूं आम्हां सर्वांपेक्षां प्राज्ञ व शूरहि आहेस. यास्तव तूंच आमचें रक्षण कर.

स्तंबमित्र म्हणाला—हे जरितारे, तुझ्या अनुग्रहावांचून आम्हांला तरणोपाय नाहीं. कारण ज्येष्ठ भ्राता हा पिताच आहे. जो ज्येष्ठ असतो, तो संकटापासून स्वतः मुक्त होतो. पण ज्येष्ठच जर संकटांतून कसें मुक्त व्हावें हें जाणत नसेल तर कनिष्ठभ्राता काय करील !

द्रोण म्हणाला—हा अग्नि प्रदीप्त होऊन मोठ्या त्वरेनें आमच्या घरट्याकडे येत आहे. कालि, करालि, मनोजवा इत्यादि त्याच्या सात जिह्वा असून त्यांच्या योगानें तो सर्व पदार्थांना दग्ध करीत इकडेच येत आहे. तो कदाचित् आम्हांलाहि ग्रासील. यास्तव स्वतःच्या रक्षणासाठीं स्वतःच यत्न केला पाहिजे.

हे राजा, मंदपालाचे ते चौघे पुत्र परस्परांशीं असें भाषण करून शुद्धचित्तानें अग्नीची स्तुति करूं लागले. त्यांतील ज्येष्ठभ्राता जरितारि म्हणाला—हे अग्ने, तूं सूत्रात्म्या वायूचेंहि स्वरूप आहेस. तूं ओषधि-वनस्पतींचें शरीर आहेस.

कोणीहि आप्त रक्षण करण्यास समर्थ नाहींत. ते सर्व स्वार्थी असतात. केवल एक ब्रह्मिष्ठच सर्वांचें रक्षण करण्यास समर्थ आहे. हाच या सर्व अध्यायाचा सारभूत अर्थ आहे. 'ज्यानें आपल्या कामादि सर्व शत्रुगणांचा नाश केला आहे तोच जरितारि' असा या नांवाचा अक्षरार्थ आहे.

१ या श्लोकाचा अध्यात्मपर अर्थ—'हिरण्यरेताः'–हरण करणारें हिरण्य म्हणजे विषयवासना, तेंच ज्याचें बीज आहे, तो 'हिरण्यरेताः' म्ह० मरणकालीन मोह आमच्या शरीररूपी गृहाकडे नेत आहे. त्याचें मुख म्ह० भोगसाधन पंच ज्ञानेंद्रियें, बुद्धि व मन या सात जिह्वांनीं युक्त असून त्यांच्या योगानें त्यानें आम्हांला ग्रासून टाकिलें आहे. यास्तव आम्हांलाच आमच्या मोक्षासाठीं यत्न केला पाहिजे.

म्हणजे तूं विराडात्मा आहेस. ओषधि-वनस्पतींची योनि जी पृथ्वी व जल तें तुझें शुक्र म्ह० बीज आहे व तें तुजपासून झालें आहे. जलाचेंहि तूं कारण आहेस. हे महावीर्यवाना, तुझ्या ज्वाला सूर्याच्या किरणांप्रमाणें तुझ्या सभोंवार चार दिशांमध्यें पसरतात.

राजा, जरितारीनें याप्रमाणें मुख्य ब्रह्मविद्येच्या अधिकारासाठीं समष्टि-उपासना सांगितली असतां त्या उपासनेचा अनधिकारी व बाह्यभोगासक्त असलेला सारिसृक्क म्हणाला—"हे अग्ने, आमची माता कोठें निघून गेली. आमचा पिता कोण हें आम्हांला ठाऊक नाहीं व आम्हांला अद्यापि पंखहि फुटले नाहींत. तुजवांचून आमचा त्राता कोणी नाहीं. यास्तव हे वह्ने, तूं आम्हां बालकांचें रक्षण कर. तुझें जें शांत व लोकहितावह रूप आहे व तुझ्या ज्या सात जिह्वा आहेत त्यांच्या योगानें तूं आर्त व शरणार्थी असलेल्या आम्हां बालकांचें रक्षण कर. हे जातवेदा, तूंच एक सर्वांना ताप देतोस. हे देवा, सूर्यकिरणांमध्येंहि तुजवांचून दुसरा कोणी ताप देणारा नाहीं. म्हणजे सूर्यहि तूंच आहेस. आम्हां ऋषिबालकांचें तूं रक्षण कर व हे अग्ने आम्हांपासून तूं दूर जा."

राजा त्यानंतर व्यष्टि-उपासनेनें शुद्ध झालेल्या अधिकाऱ्याला छांदोग्योपनिषदांत प्रसिद्ध असलेली शांडिल्यविद्यादिरूप सार्वात्म्योपासना स्तंबमित्र म्ह० सर्व प्राणिसमूहाचा मित्र सांगूं लागला. तो म्हणाला—"हे अग्ने, तूंच एक हें सर्व आहेस. हें जगत् तुझ्यामध्येंच स्थित आहे. तूं सर्व भूतांना व भुवनांना धारण करितोस. सुवर्णामध्यें सर्व अलंकार जसे त्रिकालीं स्थित असतात, त्याप्रमाणें तुझ्यामध्यें हें सर्व जगत् उत्पत्ति, स्थिति व नाश या त्रिकालीं स्थित आहे. तूंच अग्नि, तूंच देवांकडे हव्य वाहून नेणारा व परम हवि आहेस. विद्वान् लोक तुला कार्यरूपानें बहुविध व कारणरूपानें एकरूप जाणतात. हे वह्ने, तूं या ब्रह्मांडाला उत्पन्न करून, प्रलयकाल प्राप्त झाला असतां तमोगुणानें अतिशय वृद्धि पावून त्याचा नाश करितोस. तूंच या भुवनांचें उत्पत्तिस्थान आहेस व हे अग्ने, तूंच त्याचें लयस्थानहि आहेस.

---

१ छान्दोग्योपनिषद् अ० ३. खं० १४ यांत 'सर्वं खल्विदं ब्रह्म तज्जलानिति शांत उपासीत' अशी शांडिल्यविद्या पठित आहे. २ हें वर्णन मांडूक्योपनिषदांतील 'एष योनिः सर्वस्य प्रभवाप्ययौ हि भूतानाम् ।' ६. या श्रुतीच्या आधारानें केलें आहे.

राजा जनमेजया, त्यानंतर द्रोण (‘नान्तःप्रज्ञं०’-इत्यादि मांडूक्य श्रुति मंत्र ४ यांत वर्णिलेल्या) निर्विशेष तुरीयब्रह्मरूपानें अग्नीची स्तुति करूं लागला— “हे अग्ने, तूं प्राणोपासकांनीं भक्षण केलेलें अन्न आहेस. म्हणजे ते स्थूल जगाचा सूक्ष्मभूतांमध्यें लय करितात. तूं भूतांमध्यें राहतोस, म्ह० सूत्रात्म्याच्या शरीराचा आरंभ करणारीं अपंचीकृत पंचभूतें तुझ्यामध्यें अंतर्भूत झालीं आहेत. नित्य प्रवृद्ध झालेला तूं सर्वांना आपल्यामध्यें लीन करितोस. त्यामुळें तूं भूतांचें लयस्थानहि आहेस. म्ह० ब्रह्मोपासक सूक्ष्म सृष्टीचा कारणामध्यें लय करितात. त्यामुळेंच तूं सर्व स्थूल-सूक्ष्म कार्यांचा पति आहेस. तूं सृष्टि व संहार करण्यास स्वतंत्र आहेस. अति शुद्ध असलेल्या तुझ्या ठिकाणीं हें सर्व कार्य-कारणात्मक जगत् रज्जूंतील सर्पादिकांप्रमाणें स्थित आहे.

हे निरुपाधिक ईश्वरा, तूं सूर्य होऊन आपल्या किरणांनीं पृथ्वीवरील सर्व रसांचें ग्रहण करितोस व पुनरपि योग्य कालीं वृष्टिरूपानें तें पृथ्वीवर पाडतोस. भूमि, जल, इत्यादिकांतील सर्व सत्त्वांचा संहार करून कारणरूप होतोस. प्रलयकालीं बीजरूपानें स्थित होऊन पुनः सृष्टिकालीं सर्व ब्रह्मांडाला आपली चित्सत्ता देऊन उत्पन्न करितोस. तुझ्यापासूनच ज्यांवर हिरवीं पानें आहेत, अशा या सर्व वेली उत्पन्न होतात. या सर्व पुष्करिणी व महासागर तुझ्यापासूनच होतात. हे दिसणारे सर्व जड पदार्थ तुझ्याच सत्तेनें सत्तायुक्त झाले आहेत. प्रखर तेज धारण करणाऱ्या अग्ने, रसनेंद्रियाचा अधिपति जो वरुण, त्याचें हें शरीर परम आलंबन आहे. कारण पक्षिदेहानें सर्व रसांचा आस्वाद घेतां येतो. यास्तव, तूं अंतरात्माच आमचा रक्षक हो व आज आमचा नाश करूं नकोस. हे पिंगाक्षा, हे लोहितग्रीव, हे कृष्णवर्त्मन्, हे हुताशन, नद्यांप्रमाणें आम्हांला सोडून तूं दूर जा.”

राजा जनमेजया, ब्रह्मवादी द्रोणानें अशी स्तुति केली असतां अग्नि प्रसन्नचित्त झाला व मंदपाल ऋषीला दिलेलें वचन आठवून आणि त्याच्या पुत्रांची ही स्तुति ऐकून तो द्रोणास म्हणाला—

“हे मंदपालपुत्रा, तूं द्रोणऋषि आहेस. तूं माझ्या स्तुतीच्या मिषानें हें ब्रह्मच सांगितलें आहेस. मी तुझा इष्ट मनोरथ पूर्ण करीन. तुला मजपासून मुळींच भय नाहीं. तुम्ही येथें अहांत, हें मंदपालानें मला पूर्वींच सांगून ठेविलें आहे. ‘खांडववन दग्ध करीत असतांना तूं माझ्या पुत्रांचें रक्षण कर’ असें

त्यानें मला सांगितलें आहे. हे द्रोणा, त्याचें तें वचन व तुझें हें भाषण हीं दोन्ही मला मान्य आहेत. यास्तव हे ब्राह्मणा, मी तुझें कोणतें प्रिय करूं, तें सांग. हे श्रेष्ठा, मी तुझ्या स्तोत्रानें अतिशय प्रसन्न झालों आहें."

त्यावर द्रोण म्हणाला—हे अग्ने, हीं रानमांजरें आम्हांला नित्य भिववीत असतात. यास्तव तूं सर्व परिवारासह त्यांना दग्ध कर. राजा जनमेजया, त्या अग्नीनें द्रोणाच्या इच्छेप्रमाणें सर्व मांजरांना जाळून टाकिलें व त्या शार्ङ्गकांची अनुज्ञा घेऊन त्यानें बाकीचें खांडववनहि दग्ध केलें. १. १९. २३२.

अध्याय २३३ वा.

[१ मंदपालाची पुत्रांविषयीं चिंता. २ लपितेनें केलेली त्याची निंदा. ३ जरिता व पुत्र यांचें त्यानें केलेलें समाधान.]

(१) वैशंपायन—राजा जनमेजया, खांडववनांत असा प्रकार घडत असतां इकडे मंदपाल ऋषि आपल्या पुत्रांविषयीं चिंता करूं लागला. त्यानें जरी 'माझ्या पुत्रांना दग्ध करूं नकोस' अशी अग्नीची प्रार्थना केली होती, तरी त्याच्या मनाला स्वस्थता वाटेना.

पुत्रांसाठीं चिंतेनें व्याकुल झालेला तो मुनि लपितेला म्हणाला—हे लपिते, घरट्यांत असलेले माझे पुत्र अग्नि प्रदीप्त झाला असतां व वायु वेगानें वहात असतां त्यांतून सुटण्यास कसे समर्थ होतील! त्यांची तपस्विनी माता त्यांचें रक्षण करण्यास असमर्थ असल्यामुळें ती काय बरें करील! पुत्रांचें रक्षण आपल्या हातून होणें शक्य नाहीं, असें पाहून ती बिचारी शोकार्त होऊन बसेल. ते माझे बालक आकाशांत उंच उड्डाण करण्यास समर्थ नसल्यामुळें त्यांची माता रडत व विलाप करीत इकडे तिकडे धांवत असेल. अरेरे, तो माझा पुत्र जरितारि, सारिसृक्क, स्तंबमित्र व द्रोण यांची काय अवस्था होईल! आतां जरिता काय करील!

(२) भारता, याप्रमाणें तो मंदपाल ऋषि विलाप करीत असतां लपिता त्यास जणुकाय असूयेनेंच म्हणाली—"भगवन्, तुला आपल्या पुत्रांविषयीं चिंता करावयास नको; कारण 'माझे पुत्र तेजस्वी व वीर्यवान् ऋषि आहेत' असें तूं नेहमीं म्हणत असतोस. तेव्हां त्यांना अग्नीपासून कांहीं भय नाहीं. शिवाय

तूं माझ्यासमक्षच अग्नीची प्रार्थना करून त्यांस त्यांचें रक्षण करण्याविषयीं सांगितलें आहेस व महात्म्या अग्नीनें ती विनंति मान्य केली आहे. तेव्हां तो लोकपाल आपला शब्द मिथ्या करील असें मुळींच संभवत नाहीं.

यास्तव हे वंचका, तुझें मन पुत्रांचें रक्षण करण्यामध्यें आसक्त झालें नसून माझी सवत जी जरिता तिच्या चिंतेनें तूं इतका व्याकुल होत आहेस, खरो-खर तुझें तिच्यावर जसें प्रेम होतें, तसें कांहीं मजवर नाहीं. सहायसंपन्न असलेल्या अति प्रेमळ व समर्थ सुहृदानें आपल्या पुत्र-स्त्रीरूप आत्म्याला पीडा होत असतांना निर्दयपणें त्यांची उपेक्षा करणें सर्वथा युक्त नाहीं. यास्तव जिच्यासाठीं तूं इतका शोकसंतप्त होत आहेस, त्या जरितेकडेच जा. एखाद्या हीन पुरुषाच्या स्त्रीप्रमाणें मी एकटीच काल कंठीन.

(३) लपितेचें हें मत्सरयुक्त भाषण ऐकून मंदपाल म्हणाला—हे लपिते, तूं समजतेस तसा मी कामासक्त होऊन वागत नाहीं. मी जगामध्यें केवल संततीसाठींच संचार करीत आहें. सांप्रत जरितेच्या अपत्यांवरच संकट ओढवलें आहे. असलेल्या अपत्यांची उपेक्षा करून पुढें तुला संतति होईल ही आशा करणें खरोखर मूर्खपणाचें आहे. अशा मूढाचा लोक अवमान करितात. या उप्पर तुला जसें योग्य वाटेल तसें कर. मोठाल्या वृक्षांनाहि जाळून भस्म करणारा हा प्रज्वलित अग्नि माझ्या अंतःकरणांत अनेक अशुभ विचार उत्पन्न करीत आहे.

राजा, त्या दोघांचा असा संवाद चालला आहे, तोंच त्या चार शार्ङ्गकांच्या प्रार्थनेनें प्रसन्न झालेला अग्नि त्या प्रदेशांतून दूर गेला. तेव्हां पुत्रस्नेहानें व्याकुल झालेली जरिता त्यांच्यापाशीं परत आली व आपले सर्व पुत्र अग्नीच्या मुखांतून सुटून कुशल आहेत असें पाहून तिनें आनंदाश्रु ढाळले व पुनः पुनः त्या रडणाऱ्या पण उपद्रवरहित असलेल्या पुत्रांना डोळे भरून पाहिलें. आक्रोश करणारी ती जरिता एकेका पुत्रास भेटली.

हे भारता, इतक्यांत तेथें मंदपाल मुनिहि अकस्मात् आला; परंतु त्या चार पुत्रांतील कोणी एकानेंहि त्याचें स्वागत केलें नाहीं. तो ऋषि प्रत्येक पुत्राशीं व जरितेशीं पुनः पुनः बोलत असतांहि त्याला कोणीं बरें किंवा वाईट उत्तर दिलें नाहीं.

तेव्हां तो मंदपाल करुण वाणीनें बोलला—हे साध्वि, मी दुःखार्त होऊन ‘या माझ्या बालकांतील ज्येष्ठ कोणता, त्याच्या पाठचा कोणता, मधला कोणता

व सर्वांत कनिष्ठ पुत्र कोणता,' हें पुनःपुनः विचारीत असतां तूं माझ्याशीं भाषण कां बरें करीत नाहींस ! मी पूर्वी तुझा त्याग करून जरी गेलों, तरी माझ्या मनाला शांति मुळींच प्राप्त झाली नाहीं.

जरिता म्हणाली—हे महाभाग, तुला ज्येष्ठ पुत्राशीं काय करावयाचें आहे व दुसरा, मध्यम व कनिष्ठ कोणता हें तरी समजून घेण्याचें काय कारण आहे ! मला अशा संकटावस्थेंत सोडून तूं पूर्वी ज्या हास्यमुखी लपितेकडे गेला होतास, त्याच तरुणीकडे आतां जा.

मंदपाल—हे कल्याणि, स्त्रियांच्या परलोकप्राप्तीचें विघातक, असें व्यभिचार व सापत्नभाव या दोहोंवांचून तिसरें कारण कांहीं नाहीं. या दोन्ही गोष्टी स्त्री-पुरुषांच्या मनांत वैराग्नि प्रदीप्त करून त्यांना उद्विग्न करणाऱ्या आहेत. हे पतिव्रते, सर्व लोकांमध्यें प्रसिद्ध असलेली भगवती अरुंधतीहि एकदा महात्म्या वसिष्ठाविषयीं साशंक झाली होती आणि सप्तर्षींमध्यें बसलेल्या त्या सदाचारसंपन्न निष्पाप मुनीचा तिनें अपमान केला. पतीविषयीं मनांत संशय येतांच ती असूयेनें निस्तेज झाली व वेष पालटून कधीं गुप्त, तर कधीं प्रकट होऊन पतीच्या वर्तनाकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहूं लागली. त्या अरुंधतीप्रमाणें तूं आज, अपत्यस्नेहानें व्याकुळ होऊन येथें आलेल्या मजकडे संशयित मनानें पहात आहेस आणि ती लपिताहि तुजकडे असूयेनें पहात आहे. पुरुषानें 'ही माझी भार्या' असा विश्वास खरोखर कधींहि धरूं नये. स्त्री एकदा पुत्रवती झाली कीं मग तर ती पतिसेवेकडेहि दुर्लक्ष करिते.

राजा, याप्रमाणें तो मंदपाल बोलला असतां त्याचे चौघे पुत्र व भार्या त्याच्या शुश्रूषेंत तत्पर झाली व तोहि आपल्या अपत्यांचें असें समाधान करूं लागला. १. १९. २३३.

---

१ न हि भार्येति विश्वासः कार्यः पुंसा कथंचन ।
न हि कार्यमनुध्याति नारी पुत्रवती सती ॥

अध्याय २३४ वा.

[१ मंदपालानें केलेलें पुत्रांचें सान्त्वन. २ अग्नीची प्रसन्नता व वरदानपूर्वक कृष्णार्जुनांचें विसर्जन.]

(१) वैशंपायन—राजा जनमेजया, त्यानंतर तो मंदपाल आपल्या पुत्रांना म्हणाला—" वत्सांनो, अग्नीनें खांडववन दग्ध करण्यापूर्वीच मीं त्याची तुम्हांला वांचविण्याविषयीं प्रार्थना केली व त्या महात्म्यानेंहि 'ठीक आहे' असें म्हणून माझी विनंति मान्य केली. त्या अग्नीच्या वचनावर माझा विश्वास होता. तुमची माताहि तुमच्यासंबंधामुळें धर्मज्ञ आहे व तुम्हीहि सामर्थ्यवान् आहांत. अशी माझी खात्री असल्यामुळें मी यापूर्वींच येथें आलों नाहीं. यास्तव बाळांनो, तुम्ही मजविषयीं मनांत संतप्त होऊं नका. तुम्ही ब्रह्मवेत्ते ऋषि आहां, हें अग्नीला ठाऊक आहे."

राजा, याप्रमाणें तो मंदपालमुनि आपल्या पुत्रांचें समाधान करून जरितेसह अन्य प्रदेशीं निघून गेला.

हे भरतश्रेष्ठा, याप्रमाणें प्रदीप्त झालेल्या भगवान् अग्नीनें कृष्णार्जुनांच्या साह्यानें दुष्ट प्राण्यांचा नाश करून जगाचें हित करण्यासाठीं सर्व खांडववन दग्ध केलें. वसा व मेद इत्यादिकांचे प्रवाह प्राशन करून तृप्त झालेला तो अग्नि अर्जुनापुढें प्रकट झाला. इतक्यांत देवगणांनीं परिवेष्टित असलेला इंद्रहि अंतरिक्षांतून खालीं उतरला आणि पार्थ व केशव यांस म्हणाला—" हे वीरहो, देवांनाहि दुष्कर, असें हें तुमचें महत्कृत्य पाहून मी संतुष्ट झालों आहें. तरी तुम्ही या लोकीं पुरुषाला दुर्लभ असलेला वर मागा." हें वचन ऐकून पार्थानें इंद्रापाशीं सर्व अस्त्रें मागितलीं.

तेव्हां तेजस्वी इंद्र म्हणाला—हे धनंजया, योग्य काल येतांच तुला तीं सर्व अस्त्रें प्राप्त होतील. जेव्हां भगवान् महादेव तुजवर प्रसन्न होईल, तेव्हां हे पांडवा, मी सर्व अस्त्रें तुला देईन. तो काल केव्हां प्राप्त होईल तें मीच जाणतों. हे पार्था, तूं केलेल्या महत्तपामुळें तुला अग्न्यस्त्रें, वायव्यास्त्रें व माझीं सर्व अस्त्रें मिळतील.

राजा, इंद्रानें पार्थाला असा वर दिला असतां वासुदेवानें 'पार्थावर माझें निरंतर प्रेम रहावें' असा वर मागितला. तेव्हां त्या सुरपति इंद्रानेंहि तो

बुद्धिमान् कृष्णाला दिला. नंतर अग्नीची अनुज्ञा घेऊन अमरेंद्र सर्व देवगणांसह देवलोकीं परत गेला.

अग्नीनें तें खांडववन पशु-पक्ष्यांसह दग्ध करून सहा दिवस विश्रांति घेतली. अनेक प्रकारचें मांस, रक्त व मेदादि यांचें प्राशन करून तृप्त झालेला महात्मा अग्नि परमप्रीतीनें कृष्णार्जुनांस बोलला—"तुम्हीं पुरुषश्रेष्ठांनीं मला यथेच्छ तृप्त केलें. आतां मी तुम्हांला जाण्याची अनुज्ञा देतों. तुमची जेथें जाण्याची इच्छा असेल, तेथें तुम्हीं खुशाल जा. तुम्हांला कोठेंहि प्रतिबंध होणार नाहीं."

हे भरतश्रेष्ठा, अग्नीचें हें वचन ऐकून वासुदेव, पार्थ व दानव मय हे तिघेहि हुताशनाला प्रदक्षिणा करून यमुनानदीच्या रमणीय तीरावर जाऊन एकत्र बसले. १. १९. २३४.

येथें एकोणिसावें मयदर्शन उपपर्व व पहिलें आदिपर्वहि समाप्त झालें.

यापुढें सभापर्व येईल. त्याचा हा पहिला श्लोक आहे.—

वैशंपायन उवाच—

ततो ब्रवीन्मयः पार्थं वासुदेवस्य संनिधौ ।
प्रांजलिः श्लक्ष्णया वाचा पूजयित्वा पुनः पुनः ॥